महाराष्ट्राचे

# शिल्पकार

## क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी



डॉ. नंदा पारेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# महाराष्ट्राचे शिल्पकार

## क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी


लेखक

**डॉ. नंदा पारेकर**



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ४०६-१

■ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राचे शिल्पकार : क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी

■ **लेखक :** डॉ. नंदा पारेकर

■ **प्रथमावृत्ती :** २०१८

■ **प्रकाशक :** सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

■ © **प्रकाशकाधीन :**

■ **मुद्रक :** व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

■ **किंमत :** रु. 171

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.



लढाऊ नेतृत्व : क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी



राष्ट्रपती भवनातील अशोक हॉलमध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णांचे अभिनंदन करताना
पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग, सोबत वैभव (काका) नायकवडी, कुसुमताई नायकवडी (माई) आदी




हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर उभारण्यात आलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील व क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, कुसुमताई नायकवडी, शरद पवार, वैभवकाका नायकवडी, बाळासाहेब थोरात, मदन पाटील




शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभामध्ये क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांना डी.लिट्. पदवी प्रदान करताना कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे. शेजारी डॉ. सुखदेव थोरात, डॉ. सुधामुर्ती



क्रांतिसिंह नाना पाटील व कर्मवीर भाऊरावआण्णा पाटील यांच्या समवेत क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी व अन्य कार्यकर्ते

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना
तसेच विविध आंदोलनांत
जिवाची बाजी लावून लढलेल्या
असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना
कृतज्ञतापूर्वक ... !

# अध्यक्षांचे निवेदन

स्वातंत्र्याची फळे आपण गेली सत्तर वर्षे चाखत आहोत. स्वांतत्र्यपूर्व काळात दीडशे वर्षे परकीय सत्तेचा अंमल हिंदुस्थानावर होता. या काळात पारतंत्र्यात निद्रित अवस्थेत असलेल्या समाजास जागृत करण्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काम अनेक समाजपुरुषांनी केले. अशा क्रांतिवीरांच्या संघर्षामुळेच ब्रिटीश सत्तेला येथून काढता पाय घ्यावा लागला. महाराष्ट्रात पहिल्या फळीच्या राष्ट्रपुरुषांनी स्वातंत्र्यलढ्यात जेवढे महत्त्वाचे काम केले तेवढेच नव्हे, तर त्या बरोबरीने अनेक क्रांतिवीरांनी आपापल्या भागात या उठावास मदत केली. अशा हजारो हातांच्या संघर्षामुळेच स्वातंत्र्याची पहाट उगवली. असे हे सगळेजण राष्ट्र उभारणीच्या काळातील शिल्पकारांच्या साखळीतील एक-एक महत्त्वाची कडी आहेत. त्यातील क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी हे एक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत.

सांगली जिल्ह्यातील वाळवा गावी शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या नागनाथअण्णांनी शून्यातून आपल्या कर्तृत्त्वाने समाजसेवा आणि राष्ट्रसेवेचा डोंगरच उभा केला. परिस्थितीवर कष्ट मेहनतीने मात करत एका हुशार विद्यार्थ्याने समाजपरिवर्तनासाठी उद्योग-धंद्याची जोड कशी देता येईल याचे स्वप्न पाहिले. त्या स्वप्नपूर्तीसाठी ध्यास घेतला. पारतंत्र्याचे जोखड झुगारून देण्यासाठी, स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय होण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षणावर पाणी सोडून राष्ट्रीय कार्यात झोकून दिले आणि स्वातंत्र्याचे एक साक्षीदार झाले.

स्वातंत्र्यानंतर समाजसेवा करताना नागनाथअण्णांना गोरगरीब अन् उपेक्षितांबद्दल अत्यंत कणव होती. त्यातून आयुष्यभर वंचितासाठी त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, बँक, दूध संस्थांच्या माध्यमातून उत्तम कार्य केले. कोणत्याही स्वच्छ आणि चांगल्या कार्याची सुरुवात स्वत:पासून करावयाची असते. अण्णांनी स्वातंत्र्यसैनिक असूनही स्वातंत्र्यसैनिकाची पेन्शन स्वीकारली नाही. स्वच्छ चारित्र्य, मूल्याधिष्ठित जीवन प्रणाली आणि प्रत्यक्ष जीवनातील नैतिकतेचे दर्शन त्यांनी आपल्या कृतीतून घडविले.

नागनाथअण्णा हे दुर्दम्य आशावादी होते. ते म्हणत, 'आपली लोकशाही ही आयुर्वेदिक उपचारासारखी आहे. जनकल्याणाचा गुण यायला थोडा वेळ लागेल.' उपचारात औषध लागू पडले की, रोग बरा होणारच, यावर त्यांचा विश्वास होता. कार्यकर्त्याने स्वत: नि:स्पृह व पारदर्शी जीवन जगण्याची सुरुवात केल्यास इतरांवर सकारात्मक प्रभाव पडेल, असा त्यांचा आशावाद होता. त्यासाठी कारभाऱ्याचे चारित्र्य स्वच्छ असावे, असा ते आवर्जून आग्रह धरायचे.

आज अनेक क्षेत्रांवर संशयाचे अन् असमाधानाचे ढग जमा होत आहेत. अशा काळात गरज आहे, आदर्श नेता आणि तशाच कारभाऱ्याची. ह्याची आठवण व समाधान क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे डॉ. नंदा पारेकर यांचे हे चरित्र महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून प्रकाशित करताना होत आहे. अशा चरित्र वाचनातून आदर्श जगण्याच्या पाठाचे पुनर्वाचन होणार आहे.



(बाबा भांड)
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# लेखकाचे मनोगत ....

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्याविषयी खूप ऐकले होते. विशेषत: स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे कार्य अतुलनीय अशा स्वरुपाचे ठरले. इंग्रजांच्या विरोधात त्यांनी दिलेल्या संघर्षाच्या अनेक कथा रोमहर्षक आणि थरारक आहेत. त्यांची प्रतिमा एखाद्या थोर योध्यासारखी किंवा रॉबिनहूडप्रमाणे मनात तयार झाली होती. मात्र कल्याण येथे झालेल्या फुले, शाहू, आंबेडकर जागतिक साहित्य संमेलनावेळी त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. तेव्हा ते फारच साधे व कमालीचे विनयशील वाटले. अत्यंत आपुलकीने ते बोलले. एका मोठ्या व्यक्तीचे वेगळेच दर्शन घडले. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी उभा केलेले 'हुतात्मा संकुल' तसेच शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील विविध संस्था पाहण्याचाही लवकरच योग आला. त्यांच्या प्रचंड कार्याची माहिती मिळत गेली. गोरगरीब व प्रामुख्याने दलित, आदिवासी व भटक्या विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी चालविलेली वसतिगृहे, शाळा व उच्च शिक्षणाच्या विविध सोयी-सुविधांचा वाढविस्तार पाहून अचंबित व्हायला झाले. सहकार क्षेत्रातील सहकारी साखर कारखाना, बँक व दूध संस्था आदींविषयी, त्यांनी राबविलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांविषयी आणि विशेषत: हुतात्मा सहकारी साखर कारखान्याने केलेल्या विविध विक्रमाविषयी वेळोवेळी वृत्तपत्रातून वाचायला मिळत असे. 'हुतात्मा' सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने वाळव्यासारख्या ग्रामीण परिसरात तसेच जिल्ह्यात ठिकठिकाणी होणाऱ्या विद्रोही साहित्य संमेलने, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे लढे, पाणी परिषदा तसेच वेगवेगळे क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील उपक्रम आदींमुळे स्वातंत्र्योत्तर काळातही या भागात एक प्रकारचे चैतन्य सळसळत राहिले. सभोवती प्रदूषित वातावरण असूनही त्यांच्यासारख्या नेत्याने सामान्य माणसांच्या सहकार्याने उभे केलेले प्रचंड कार्य पाहून थक्क व्हायला होत असे. नागनाथअण्णांच्या या कार्याविषयी कुतूहल वाटत राहिले. मग त्यांच्याविषयी अधिकाधिक माहिती घेत गेले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेअंतर्गत क्रांतीवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचे जीवन चरित्र लिहिण्याची जबाबदारी सोपविल्यानंतर त्यांच्याविषयी जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा व त्यांच्या जीवनाचा नव्याने धांडोळा घेण्याचा प्रयत्न केला. माझे पती पत्रकार दशरथ पारेकर यांना नागनाथअण्णांचा बरीच वर्षे निकट सहवास लाभला. स्वातंत्र्योत्तर काळातील त्यांच्या विधायक क्षेत्रातील वाटचालीची त्यांना सर्वांगीण माहिती होती. नागनाथअण्णांशी

त्यांच्या वारंवार भेटी होत असत. वृत्तपत्रांसाठी म्हणून त्यांनी त्यांच्या प्रसंगपरत्वे प्रदीर्घ मुलाखतीही घेतल्या होत्या. या पुस्तक लेखनाच्या निमित्ताने त्यांच्याशी झालेल्या विस्तृत चर्चांमुळेही नागनाथअण्णांच्या कार्याची व्याप्ती आणि त्यांच्या कार्यक्षमतेचा आवाका समजून घेता आला. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांचे कार्य जसे विलक्षण क्रांतीकारी ठरले, तद्वतच स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी केलेले विधायक कार्यही अत्यंत प्रशंसनीय असेच आहे. स्वातंत्र्यासाठी उमेदीची बरीच वर्षे खर्ची घातलेले नागनाथअण्णा स्वातंत्र्योत्तर काळातही त्याच जिद्दीने कार्यरत राहिले. महत्त्वाचे म्हणजे हाती घेतलेले कार्य अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे ते करीत राहिले आणि उभारलेल्या विविध संस्थांची कार्यपद्धती पारदर्शक व निकोप राहील, याची त्यांनी काळजी घेतली. नागनाथअण्णा हे तर स्वच्छ चारित्र्याचे, त्यागी व पारदर्शी व्यक्तीमत्त्व होतेच पण त्यांनी आपल्या पठडीतील कार्यकर्त्यांचा एक मोठा संचही तयार केला. शिक्षण व सहकार या दोन क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार विचारात घेता नागनाथअण्णांनी आपल्या संस्था तर उत्तम पद्धतीने चालविल्याच पण त्यांना कुठेही, कसलाही डाग लागू दिला नाही. एक आदर्श नेता अशी नागनाथअण्णांची मनात तयार झालेली प्रतिमा त्यांच्याविषयीच्या अभ्यासानंतर प्रत्यक्षाहूनही विशाल आणि उत्तुंग होत गेली. केवळ कपोलकल्पित वाटावे असेच त्यांचे व्यक्तीमत्त्व आणि सारे जीवनही ! त्यांच्यासारखी अशी कुणी व्यक्ती होऊन गेली, यावर कदाचित उद्याच्या पिढीतील अनेकांचा विश्वासही बसणार नाही. चरित्र लेखनाचे हे काम माझ्यासाठी अत्यंत आनंददायी ठरले. ही जबाबदारी माझ्यावर विश्वासाने सोपविल्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड व सचिव मीनाक्षी पाटील तसेच लेखनाच्या बाबतीत ज्यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले ते प्रसिद्ध साहित्यिक डॉ. राजन गवस व प्रा. अविनाश सप्रे यांची मी अत्यंत आभारी आहे.

या लेखनासाठी डॉ. अवनिश पाटील, डॉ. भारतभूषण माळी, वसंत चव्हाण, अरुण कांबळे व उदय गोंजारे यांचे विशेष सहकार्य लाभले. या सर्वांचेही मन:पूर्वक आभार.

**– डॉ. नंदा पारेकर**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | जडण घडण | .. | १-६ |
| २. | प्रतिसरकारचा लढा | .. | ७-२२ |
| ३. | तुरुंगातून पलायन | .. | २३-३५ |
| ४. | विवाह व शैक्षणिक कार्य | .. | ३६-४० |
| ५. | राजकारण आणि संघर्ष | .. | ४१-५२ |
| ६. | साखर कारखान्याची उभारणी | .. | ५३-६७ |
| ७. | शेतकरी, शेतमजुरांचे लढे | .. | ६८-७३ |
| ८. | दुष्काळी पाणी परिषदा | .. | ७४-७९ |
| ९. | प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांचे पुनर्वसन | .. | ८०-८८ |
| १०. | साहित्य संमेलने व समाज प्रबोधन | .. | ८९-९४ |
| ११. | वाटचाल आणि भूमिका | .. | ९५-१०७ |
| १२. | आगळा वाढदिवस सोहळा | .. | १०८-११५ |
| १३. | गौरव व मानसन्मान | .. | ११६-१२० |
| १४. | सोव्हिएत युनियनचा दौरा | .. | १२१-१२३ |
| १५. | 'क्रांतिसिंहां'च्या छायेत | .. | १२४-१२८ |
| १६. | सत्शील, पारदर्शी व्यक्तिमत्त्व | .. | १२९-१३३ |
| १७. | कृतार्थ जीवनाची अखेर | .. | १३४-१४१ |

# १
# जडण घडण

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सशस्त्र क्रांतिकारक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेले आणि स्वातंत्र्योत्तर काळात गरीब व उपेक्षितांच्या न्याय हक्कासाठी सतत संघर्षरत राहिलेले नागनाथअण्णा नायकवडी हे एक बहुआयामी व उत्तुंग व्यक्तिमत्व होते. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाळवा या गावी १५ जुलै, १९२२ ला त्यांचा एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म झाला. घरची शेतीवाडी असली तरी परिस्थिती तशी जेमतेमच होती. खाऊन पिऊन सुखी असलेले गावातले एक शेतकरी कुटुंब. वडील रामचंद्र गणू नायकवडी सरळ स्वभावाचे, कष्टकरी शेतकरी. गावात बापू या नावाने ते सर्वपरिचित होते. गोरगरिबांना मदत करण्याची त्यांची वृत्ती होती. कोणाच्या अध्यातमध्यात नसणारे, लोकांच्या अडीअडचणीला धावून जाणारे, सत्शील, करारी, स्वाभीमानी व तत्त्वनिष्ठ म्हणून ओळखले जाणारे बापू समाधानाने जगणारे एक साधेसुधे व्यक्तिमत्व होते. कसलीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसणाऱ्या या कुटुंबात जन्मलेल्या नागनाथअण्णांवर बालपणी सुसंस्कार झाले ते बापू आणि आई लक्ष्मीबाई यांचे. या संस्कारातूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत गेली. गावातील प्राथमिक शाळेत त्यांना दाखल करण्यात आल्यावर ते शाळेत जाऊ लागले आणि त्याबरोबरच कुस्ती शिकायला तालमीतही. अण्णांनी थोडेफार कामापुरतेच चार इयत्तापर्यंतचे शिक्षण घ्यावे व नोकरीकडे न वळता घरच्या शेतीव्यवसायात यावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती, तर त्यांनी खूप शिकावे आणि 'कलेक्टर' व्हावे, असे त्यांच्या आईला वाटत होते. नागनाथअण्णांना शामराव नावाचे एक लहान बंधू होते. त्यांनी मात्र शाळेत न जाता वडिलांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्याबरोबर शेतीत राबायला सुरूवात केली होती. नागनाथअण्णांना शाळेत जायला आवडत असे आणि शिक्षणात त्यांना चांगली गती होती. एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांना ओळखले जात असे. गणित व भूमिती हे त्यांच्या विशेष आवडीचे विषय होते. या विषयांत त्यांना परीक्षेत नेहमी पैकीच्या पैकी गुण मिळायचे.

सहाव्या इयत्तेपर्यंत अण्णांचे शिक्षण वाळवा येथेच झाले. त्यानंतर सातवीच्या वर्गासाठी ते तालुक्यातील आष्टा या गावी गेले. आष्ट्याजवळचे मिरजवाडी हे त्यांचे आजोळ.

आष्टा येथे शिक्षणासाठी भाड्याने खोली घेऊन ते राहत असत. आजोबा दररोज त्यांच्यासाठी मिरजवाडीहून जेवणाचा डबा पोहोच करीत. शालेय जीवनात नागनाथअण्णांना बरेच मित्र लाभले होते. विशेष म्हणजे विविध जातीजमातीच्या मित्रांची त्यांना संगत होती आणि त्यात दलित मुलांचाही समावेश होता. हुशार विद्यार्थी म्हणून त्यांना शिक्षकांचे प्रेम लाभले आणि शाळेत लोकप्रियताही. मित्रमंडळींनाही ते हवेहवेसे वाटत. एकंदरीत त्यांचा मित्रांचा गोतावळाही बराच होता आणि त्यात पुढेही सतत भर पडत गेली. आष्ट्यात असताना वर्गशिक्षक हणमंत गणेश नवांगुळ यांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. नवांगुळ गुरुजी राष्ट्रीय विचारांचे होते. नागनाथअण्णांच्या मनात त्यांच्यामुळेच स्वातंत्र्यसंग्रामाचे विचार रूजले असावेत. स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणाही त्यांना तेथूनच मिळाली असावी. या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांचे वाळवा तालुक्यात राष्ट्रीय चळवळीचे कार्य सुरू होते. त्यांच्या सभांना अण्णा उपस्थित राहत असत. त्यांच्यावर क्रांतिसिंह नाना पाटलांच्या भाषणांचाही विलक्षण प्रभाव पडला असावा. येथूनच त्यांची स्वातंत्र्य लढ्यात झोकून देण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली आणि त्यांनी जीवनाचे ध्येय निश्चित केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याचा त्यांनी निर्धार केला आणि देशप्रेमाने भारलेल्या अवस्थेत त्यांची पुढील पावले पडत राहिली, एका खडतर वाटेने आणि आव्हानात्मक दिशेने.

नागनाथअण्णांना लहानपणापासूनच व्यायामाची आवड होती. मैदानी खेळात आणि विशेषत: कुस्तीत ते अधिक रस घेत. त्यामुळे त्यांची प्रकृती उत्तम होती. शरीर दणकट बनत होते. त्यांचा आहार चांगला होता आणि पैलवान होण्याच्या दृष्टीने त्यांनी खाण्यापिण्याकडे योग्य लक्ष द्यावे, याबाबतीत वडिलांचाही कटाक्ष होता. त्यांना चांगला खुराक जाणीवपूर्वक दिला जात असे. शाळासोबती व अन्य सवंगड्यांसमवेत बालपणी त्यांचा वेळ मजेत जात असे. इयत्ता सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरला पाठविण्याचा निर्णय वडिलांनी घेतला. राजाराम हायस्कूल ही त्या काळातील प्रसिद्ध माध्यमिक शाळा होती. दक्षिण महाराष्ट्रातील दूरदूरचे विद्यार्थी तेथे शिक्षणासाठी येत असत. या शाळेत नागनाथअण्णांचेही नाव दाखल करण्यात आले. राहण्याची व्यवस्था प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या वसतिगृहात करण्यात आली. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हे बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांचे आकर्षण बनले होते. एक तर तेथे अल्प मोबदल्यात वा विनामूल्य निवास, भोजनाची सोय होत असे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी स्वतंत्रपणे कोल्हापुरात राहणे परवडत नसे. त्यामुळे अनेक विद्यार्थी माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला

आल्यानंतर या विद्यार्थी वसतिगृहातच वास्तव्य करीत असत. पुढे राजकारणात नावलौकिक मिळवलेल्या व विविध क्षेत्रांत चमकलेल्या कितीतरी जणांनी प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये राहूनच शिक्षण पूर्ण केले होते. नागनाथअण्णांनाही या वसतिगृहाने मोठाच आधार दिला. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्वाची व वैचारिक जडणघडणही या काळातच प्रामुख्याने झाली. स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहत असताना कोल्हापुरातील वातावरणही चैतन्यदायी व प्रेरक स्वरुपाचे होते. नागनाथअण्णांवर या वातावरणाचा मोठाच परिणाम झाला. स्वातंत्र्याच्या विचाराने त्यांना अक्षरशः भारून टाकले आणि नकळत ते स्वातंत्र्य चळवळीच्या दिशेने ओढले जाऊ लागले. चर्चा-शिबिरांना उपस्थित राहण्यापासून ते मोर्चात सहभागी होण्यापर्यंत ते सक्रिय बनले. कोल्हापुरातील तालीम संस्थांकडेही ते आकर्षित झाले होते. साहजिकच व्यायामाची आवड त्यांनी चांगली जोपासली होती. व्यायामशाळेतही ते नियमितपणे जात असत. शाळेत जसा एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा प्रभाव होता, तसाच बोर्डिंग व अन्यत्र एक दमदार कार्यकर्ता व संघटक म्हणून चांगलाच वट निर्माण झाला होता. त्यांच्या मनमिळावू व मोकळ्या स्वभावामुळे त्यांचा चाहता व समर्थक वर्गही वाढत होता. महाविद्यालयात, वसतिगृहात तसेच बाहेरही कांही उपक्रम ते स्वतंत्रपणे राबवीत असत. स्वतः पुढाकार घेऊन मित्रांच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत. कोल्हापुरात होणाऱ्या जाहीर सभा व संमेलनांना ते आवर्जून उपस्थित राहत असत. राष्ट्र सेवा दलाच्या एका निवासी शिबिरालाही ते उपस्थित राहिले होते. तेथे समाजवादी विचारांच्या काही नेत्यांच्या भाषणाचा व तेथे झालेल्या विविध विषयांवरील चर्चांचा त्यांच्यावर बराच परिणाम झाला असावा. या शिबिरानंतर स्वातंत्र्य चळवळीबाबत ते अधिकाधिक गंभीरपणे विचार करू लागले. याच काळात ७ ते ९ ऑगस्ट, १९४२ ला मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनालाही ते उपस्थित राहिले. या अधिवेशनासाठी खास करून ते कोल्हापूरहून मुंबईला बराच आटापिटा करून व प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गेले होते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल यांच्यासारखे राष्ट्रीय पातळीवरील तत्कालीन दिग्गज नेते या अधिवेशनास उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्यामुळे त्यांच्याविषयीचे आकर्षण तर होतेच, पण स्वातंत्र्य लढ्याविषयी त्यांच्या मनात निर्माण झालेली प्रेरणा व ओढ हेही एक कारण होते. ते मुंबईला गेले खरे, पण अधिवेशनात प्रवेश मिळविण्याचे आव्हान उभे राहिले. बऱ्याच खटपटी-लटपटी करून मोठ्या हुशारीने त्यांनी अधिवेशनस्थळी प्रवेश तर मिळविलाच, पण थेट व्यासपीठावर जाऊन महात्मा गांधींची स्वाक्षरीही मिळविली. या अधिवेशनातील काँग्रेस नेत्यांच्या भाषणांचा त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला असावा. कारण काही एक निर्धार करुनच ते मुंबईहून कोल्हापूरला

परतले. गांधी-नेहरू यांनी अधिवेशनात निर्णायक स्वातंत्र्यासाठी अंतिम लढ्याची हाक दिली. आपापल्या भागात जाऊन काँग्रेस कार्यकर्त्यांनी जनजागृतीचे व स्वातंत्र्याचा संदेश पोहचवण्याचे काम करावे, असे आवाहन केले. या आवाहनास प्रतिसाद देऊन कार्यरत राहण्याचा नागनाथअण्णांनी निर्धार केला.

## स्वातंत्र्याची प्रेरणा

कोल्हापूरला परतल्यावर त्यांनी आपल्या मित्रांना मुंबईतील काँग्रेस अधिवेशनाचा वृत्तांत कथन केला आणि यापुढे स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय राहण्याच्यादृष्टीने त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. आपल्यासारख्या तरुणांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होणे कसे आवश्यक आहे हे काही निकटवर्तीय मित्रांना पटवून देण्यात ते यशस्वी झाले. वीस-पंचवीस तरुणांच्या गटाने त्यांना चळवळीत साथ देण्याचा निर्णय घेतला आणि या बेहोशीतच स्वातंत्र्य लढ्यात उडी घेण्याचा त्यांनी निर्धार केला. महाविद्यालयीन शिक्षणावर पाणी सोडून स्वातंत्र्य लढ्यातील कार्यात भूमिगतांना मदत करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखालील युवा गट सक्रीय झाला. त्यानंतर या लढ्यासाठी अनुकूल असणाऱ्या वाळव्याच्या भूमीकडे त्यांनी पावले वळवली. बेचाळीसच्या लढ्यातील धगधगत्या क्रांतिपर्वात सहभागी होण्यासाठी नागनाथअण्णांच्या पुढाकाराने कोल्हापूरहून निघालेला हा 'ज्वलंत' प्रवाह क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सामर्थ्यशाली महाप्रवाहाचा एक भाग बनला.

नागनाथअण्णांना सामाजिक कार्याची आवड शालेय जीवनापासूनच होती. तथापि कोल्हापुरात आल्यानंतर त्यांच्यातील सुप्त गुणांना अधिक वाव मिळाला आणि त्यांच्या कार्याची व्याप्तीही वाढली. शाळेत असताना व्यक्तिगत उत्साहापोटी ते विविध कार्यात सहभागी होत. सार्वजनिक उपक्रमात भाग घेत. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर वेगवेगळ्या कार्यात ते पुढाकार घेऊन स्वतंत्रपणे कार्यक्रमांचे आयोजन करू लागले. संघटनात्मक जबाबदारीही पार पाडू लागले. १९३९ मध्ये कोल्हापूरजवळ सोनतळी येथे झालेल्या राष्ट्र सेवा दलाच्या दहा दिवसांच्या शिबिराला उपस्थित राहून आल्यानंतर त्यांनी ठिकठिकाणी सेवा दलाच्या शाखा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. खेडोपाडी फिरून सेवा दलाचे सदस्य करण्यापासून शाखा सुरू करण्यापर्यंत ते कार्यरत राहिले. सेवा दल शाखा सुरू करताना विद्यार्थ्यांच्या प्रबोधनाबरोबरच त्यांना व्यायाम व देशी खेळासाठी प्रवृत्त करण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. बलशाली युवकांचे संघटन राष्ट्रकार्यासाठी उपयुक्त ठरू शकेल, असे त्यांना मनोमन वाटत असे. त्यांच्या ठायी स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण करणे हा त्यांचा त्यामागचा मुख्य उद्देश होता. त्यासाठी युवकांचे मेळावे घेण्याचा, विद्यार्थ्यांच्या

परिषदा भरविण्याचा, त्यांच्यासाठी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्याचा त्यांनी सपाटा लावला. ग्रामीण व विशेषतः दुर्गम भागातील मुलांसाठी शाळा सुरू करण्याच्या दृष्टीनेही त्यांनी भरीव प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळत गेला आणि खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा उभ्या राहू लागल्या. देणग्या गोळा करून या शाळा स्थापन करताना तेथील ग्रामस्थांना या कार्यात सहभागी करून घेण्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. ग्रामीण भागात शिक्षण प्रसाराबरोबरच स्वातंत्र्यविषयक जनजागृती करण्याचे कामही अप्रत्यक्षरीत्या ते पार पाडू लागले. अशा शाळांतून तयार होणारे विद्यार्थी स्वातंत्र्य चळवळीच्या दृष्टीने एक प्रकारची सुप्त शक्ती बनतील आणि लढा प्रखर बनविण्यास पूरक ठरतील, असे त्यांना वाटत होते. शाळा उभारण्याची त्यांची कल्पना सर्वप्रथम त्यांनी शिराळा तालुक्यातील झोळंबी या अत्यंत दुर्गम खेड्यात कार्यवाहीत आणली. त्यानंतर एकेक करीत सांगली व सातारा जिल्ह्यात वीसहून अधिक शाळा त्यांनी सुरू केल्या. श्रीराम शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या या सर्व शाळा पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेत विलीन करण्यात आल्या. स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्यासाठी म्हणून महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडून बाहेर पडलेल्या नागनाथअण्णांनी आपल्या कार्याची सुरुवात शैक्षणिक संस्थेच्या उभारणीद्वारे केली आणि शाळा सुरू करण्याच्या निमित्ताने ग्रामीण जनतेशी संपर्क वाढविण्यास सुरुवात केली. एक प्रकारे स्वातंत्र्य चळवळीच्या कार्याला त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याची अप्रत्यक्ष जोड दिली. कर्मवीर भाऊरावअण्णा व त्यांच्या रयत शिक्षण संस्थेशी त्यांचे निकटचे संबंध होते. १९४२ च्या लढ्यात पूर्णपणे सहभागी झाल्यानंतर मात्र त्यांनी शैक्षणिक कार्यापेक्षा राजकारणाकडेच अधिक लक्ष दिले. एक लढाऊ क्रांतिकारक म्हणून ते भूमिगत राहून कार्यरत राहिले. क्रांतिकार्यातील त्यांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत राहिला. इंग्रज सरकारशी त्यांचा थेट संघर्ष सुरू झाला आणि क्रांतिकार्याला अधिकाधिक तेज प्राप्त होत गेले. जहाल क्रांतिकारक म्हणून राज्यभर त्यांची ख्याती झाली.

१९४२ ते १९४७ हा काळ दक्षिण महाराष्ट्रातील आणि त्यातही सातारा जिल्ह्यातील क्रांतिकारकांच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला. स्वातंत्र्याच्या मागणीसाठी देशभर आंदोलने, मोर्चे, प्रभात फेऱ्या हे सारे सुरू असताना सातारा जिल्हा याबाबतीत आघाडीवर राहिला. विशेषतः स्वातंत्र्यसैनिकांच्या भूमिगत लढ्याला जोर चढला. एका बाजूला स्वातंत्र्य लढ्याला जनजागृतीची जोड म्हणून ठिकठिकाणी गुप्त बैठका, सभा, मेळावे आदी गोष्टी सुरूच होत्या, पण त्याबरोबरच इंग्रज शासनाच्या विरोधात भूमिगतांच्या कारवायाही सुरू राहिल्या. काही ठिकाणी कायदा मोडण्याचे वा तो हातात घेण्याचेही प्रकार घडत राहिले. या ना त्या मार्गाने

इंग्रज शासनाला सळो की पळो करून सोडण्याच्या उद्देशाने हे सारे सुरू झाले. देशात कायदेभंगाची चळवळ चालू राहिली, तद्वतच इंग्रज प्रशासनाला विरोध केला जाऊ लागला. त्यातूनच काही ठिकाणी हिंसक घटनाही घडल्या. स्वातंत्र्य चळवळीत अडसर बनलेल्या तसेच भूमिगतांच्या विरोधात इंग्रजांना मदत करणाऱ्यांना अद्दल घडविण्याच्या दृष्टीने संबंधितांना 'शिक्षा' ही करण्यात आल्या. यातूनच पुढे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'प्रतिसरकार' ची स्थापना करण्यात आली.

कुंडल हे प्रतिसरकारचे मुख्य केंद्र आणि प्रामुख्याने तत्कालीन सातारा जिल्हा हे कार्यक्षेत्र होते. या प्रतिसरकारचा इतिहासही मोठा रोमांचक ठरला. क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड, डॉ. उत्तमराव पाटील यांच्याबरोबरच क्रांतिवीर नागनाथअण्णा हेही या लढ्यातील प्रतिसरकारचे बिनीचे शिलेदार म्हणून ओळखले जात होते. धुळे खजिना लूट आणि शेणोलीजवळ खास पगारी रेल्वे गाडीतील (स्पेशल पे-ट्रेन) सरकारी पैशांच्या थैल्यांची लूट या दोन थरारक घटनांत त्यांचा पुढाकार राहिला. गोव्याहून शस्त्रास्त्रे आणण्यातही तेच आघाडीवर होते. या तिन्ही घटना म्हणजे भूमिगत क्रांतिकारकांच्या धाडसी कार्याच्या थरारक शौर्यकथाच म्हणाव्या लागतील ; आणि जी. डी. बापू लाड व नागनाथअण्णा हे या शौर्यकथांचे जणू महानायकच !

प्रतिसरकारच्या चळवळीत कार्यरत असताना नागनाथअण्णांनी काही पथ्ये जाणीवपूर्वक पाळली होती. क्रांतिकारकांना बदनाम करण्यासाठी सरकारने गुंड, गुन्हेगारांची मदत घेत सर्वसामान्य जनतेवर अन्याय, अत्याचार करण्यासाठी त्यांना रान मोकळे करून दिले होते, पण भूमिगत क्रांतिकारकांकडून सर्वसामान्यांना त्रास होणार नाही, त्यांच्या मालमत्तेची लूट होणार नाही आणि सरकारी अधिकारी व गुन्हेगारांकडूनही त्यांच्यावर अन्याय होणार नाही, यादृष्टीने प्रयत्न सुरू ठेवले होते. तशी दक्षता ते घेत असत. लोकांना धीर व संरक्षण देण्याबरोबरच अन्याय करणाऱ्यांना धडा शिकविण्याचेही काम चोखपणे बजावत. त्यामुळे एकीकडे इंग्रज पोलिसांचा ससेमिरा चुकवत, त्यांच्याशी संघर्ष करत 'स्वकियां'शीही दोन हात करण्याचे दुहेरी कार्य त्यांना पार पाडावे लागत होते. त्याबरोबरच लोकांच्यात विधायक वृत्ती व राष्ट्रप्रेम वाढविण्याच्या दृष्टीने प्रबोधनात्मक उपक्रमही ते राबवत असत. त्यासाठी गावोगावी तरुण कार्यकर्त्यांना संघटित करणे आणि त्यांच्यात स्वातंत्र्याची भावना जागृत करणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून ते सक्रिय झाले. त्यादृष्टीने त्यांनी अनेक कार्यक्रम आयोजित करून ते यशस्वी पार पाडले. सांगली जिल्ह्यातील पणुंब्रे येथे झालेल्या बैठकीत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रतिसरकार'ची घटना व कार्यपद्धती ठरविण्यात आल्यानंतर त्यानुसार नागनाथअण्णांनी नियोजनबद्ध कार्य सुरू केले. ▣▣▣▣

# २

# प्रतिसरकारचा लढा

ब्रिटिशांची सत्ता भारतातून उलथवून टाकण्यासाठी क्रांतिकारकांचे अनेक भूमिगत गट तयार झाले होते. सातारा जिल्ह्यातही असे काही गट होते. त्यांचे लढ्याचे स्वरूप ठरवण्यासाठी सुरूवातीची एक बैठक कुंडल गावी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली झाली होती. त्या बैठकीत ब्रिटिशांच्या विरोधात कसे काम करायचे व ग्रामीण भागामध्ये आपली सत्ता कशी स्थापन करायची, याविषयी प्राथमिक चर्चा झाली. तथापि निश्चित धोरण, कार्यक्रम, घटना, रुपरेषा ठरवण्यात आली नव्हती. ब्रिटिशांची मर्जी सांभाळत जे लोक सामान्य जनतेला छळत होते, अशा वतनदार, पाटील, कुलकर्णी, सावकार, गावगुंड आणि दरोडेखोर यांचा बंदोबस्त भूमिगत कार्यकर्ते करत होते. प्रत्येक गटाच्या कार्याचा उद्देश तोच असला तरीही कार्यपद्धती वेगवेगळी होती. त्यामध्ये एकसूत्रता यावी, संपूर्ण प्रतिसरकारच्या कामाची एक निश्चित घटना असावी, जेणेकरून संघटितपणे एकाच स्वरुपाचे कार्य व्हावे, असे नेत्यांना वाटत होते.

नाना पाटील व त्यांचे सर्व सहकारी यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा विलक्षण प्रभाव होता. म्हणूनच आपल्या सर्व सहकाऱ्यांमार्फत ग्रामीण भागामध्ये आदर्श ग्रामराज्य निर्माण करण्यासाठी, जनतेच्या हितासाठी त्यांनी सातारा जिल्ह्यात 'प्रतिसरकार' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्याची घटना, स्वरुप, रुपरेषा ठरवण्यासाठी ३ ऑगस्ट, १९४३ रोजी पणुंब्रे येथे एक बैठक बोलावली. या बैठकीचे अध्यक्षस्थान नाना पाटलांनी स्वीकारले होते. या बैठकीला  नागनाथअण्णा, जी. डी. बापू लाड, नाथाजी लाड, धन्वंतरी वैद्य, बाबूराव चरणकर, किसन अहिर, पांडूतात्या बोराडे, घोरपडे मास्तर, वाय. सी. पाटील, डी. जी. देशपांडे, दत्तोबा लोहार, बापूराव जगताप आदी क्रांतिकारक हजर होते.

प्रामुख्याने ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीतून जनतेची सुटका करणे हाच प्रतिसरकार स्थापण्यामागे मुख्य उद्देश होता. जनतेचे, शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे सावकाराकडून होणारे शोषण थांबवणे, चोर-दरोडेखोरांपासून होणाऱ्या लुटींना पायबंद घालणे, स्त्रियांवर अत्याचार

करणाऱ्यांचा बंदोबस्त करणे, गावागावातील हेवेदावे मिटवून त्यांच्यात सामंजस्य प्रस्थापित करणे अशा प्रकारची उद्दिष्टे प्रतिसरकारच्या घटनेत अंतर्भूत करण्यात आली होती. इंग्रजी राजवटीच्या अत्याचाराने जनता त्रासून गेली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी जनतेच्या हितासाठी जनतेने चालविलेल्या 'प्रतिसरकार'ची स्थापना नाना पाटलांनी केली. याच बैठकीत न्यायदान मंडळ नियुक्त करण्यात आले. या न्यायदान मंडळावर क्रांतिकारक नियंत्रण ठेवणार होते. त्याचप्रमाणे भूमिगत कार्यकर्त्यांतूनच कार्यकारिणीची निवड करायची व त्यातून डिक्टेटर, गटनायक, उप गटनायक, सुपरवायझर अशी पदे निर्माण करून न्यायदान मंडळद्वारे प्रजेच्या हिताची कामे सुरू करायची असे ठरले.

प्रतिसरकारच्या प्रमुख नेत्यांना आदर्श ग्रामराज्य निर्माण करताना येणाऱ्या भावी काळातील अडचणींची जाणीव होती. म्हणून प्रतिसरकारमार्फत आपण कोणती कामे अग्रक्रमाने हाती घ्यायची हे त्यांनी ठरविले. यामध्ये प्रामुख्याने भूमिगत क्रांतिकारकांच्या विषयी माहिती पुरवणाऱ्या पोलिसांच्या खबऱ्यांचा बंदोबस्त करणे, गावचा प्रमुख म्हणून कारभार चांगल्या प्रकारे न करता जनतेला त्रास देणाऱ्या पोलीस पाटील व तलाठ्यांना शिक्षा करणे, ब्रिटिशांना मदत करून अन्यायाने गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्या सावकारांचा बंदोबस्त करणे, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याबरोबर उठबस असणाऱ्या प्रतिष्ठित मंडळींवर वचक बसविणे, दरोडेखोरांचा बंदोबस्त करणे, स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणारे ब्रिटिशांचे हस्तक, काळाबाजारवाले, सावकार, गावगुंड यांचा बंदोबस्त करणे इत्यादी कलमांचा समावेश होता. त्यासाठी सातारा जिल्ह्यातील भूमिगतांचे, त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार १८ गट पाडण्यात आले व त्यांच्या पंचक्रोशीमध्ये न्यायदान मंडळ व प्रतिसरकारची स्थापना करण्यात आली.

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात देशात जी पाच प्रतिसरकारे निर्माण झालेली होती त्यामध्ये नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली जी. डी. बापू लाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी कुंडल येथे व नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली वाळवा येथे चालवलेले प्रतिसरकार यांचा समावेश होता. नाना पाटील, जी. डी. बापू, नागनाथअण्णा व इतर अनेक भूमिगत कार्यकर्त्यांना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी सतत तीन वर्षे निकराचा प्रयत्न केला. या क्रातिकारकांना पकडून देण्यासाठी १० हजाराच्यावर बक्षिसेही जाहीर करण्यात आली होती. तथापि पकड वॉरंट असूनही अडीच-तीन वर्षे ब्रिटिशांना त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. भूमिगत कार्यकर्ते गनिमी काव्याने ब्रिटिशांशी लढत होते. गनिमी काव्याने लढण्यासाठी जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती त्यांना अनुकूल ठरली. अनेक डोंगर, दऱ्या, जंगले यामुळे ब्रिटिशांना भूमिगत कार्यकर्ते सहजासहजी सापडले नाहीत.

भूमिगतांच्या न्यायदान मंडळांनी गुंडांना शिक्षा देऊन ब्रिटिशधार्जिण्यांवर वचक बसवला होता, त्यामुळे 'प्रतिसरकार'ला मोठ्या प्रमाणात लोकांचे पाठबळ मिळत होते. 'प्रतिसरकार' चालवण्यासाठी भूमिगत कार्यकर्त्यांना अनेक गुंड, दरोडेखोरांबरोबर संघर्ष करावा लागत होता. त्यासाठी निधड्या छातीचे, धाडसी, भूमिगत कार्यकर्ते होते, पण त्यांच्याकडे गुंड, दरोडेखोरांशी सामना करण्यासाठी हत्यारे नव्हती. त्यामुळे प्रतिसरकारचा विस्तार करणे व गुंडांचा बंदोबस्त करणे यासाठी त्यांच्या काही विश्वासू भूमिगत कार्यकर्त्यांनी हत्यारे मिळवण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूर त्या काळात संस्थान असल्यामुळे संस्थानातील अनेक खेड्यापाड्यात काही इनामदार, वतनदार राहत असत. त्यांच्याजवळ शिकारीसाठी वा संरक्षणासाठी बंदुका होत्या. नागनाथअण्णा व जी. डी. बापू यांनी कोल्हापूर संस्थानातून हत्यारे गोळा करायचे ठरवले. त्यासाठी ते संस्थानातील अनेक खेड्यापाड्यात गेले. कोल्हापूर जिल्ह्यातून थोडीफार हत्यारे मिळाली, पण अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

नागनाथअण्णा व जी. डी. बापू यांनी सातारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी स्वतंत्र न्यायव्यवस्था अस्तित्वात आणल्या. त्यामध्ये संशयित आरोपीला किंवा गुन्हेगाराला पत्री लावणे किंवा पत्री मारणे ही एक भयंकर शिक्षा होती. त्याबाबत लोकांत प्रचंड चर्चा सुरू झाली. त्यामुळे नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील या न्याय व्यवस्थेला 'प्रतिसरकार' (किंवा अपभ्रंशाने पत्रीसरकार) म्हणण्यात येत असे. एखाद्या गुन्हेगाराला पकडल्यानंतर त्याचे हातपाय बांधून त्याच्या पायाच्या तळव्यावर किंवा ढुंगणावर तो गुन्हा कबूल करेपर्यंत काठीने जोरदारपणे सतत मारणे असे त्या शिक्षेचे स्वरूप होते. त्यामुळे जखम न करता प्रचंड वेदना देऊन संबंधितांकडून गुन्हा कबूल करवून घेतला जात असे. यालाच पत्री मारणे असे म्हटले जात होते.

प्रति सरकारच्या पत्री मारणे या शिक्षेचा प्रभाव इतका वाढला की, सरकारचे खबरे व सरकारी पक्षाचे लोक हादरून गेले आणि हळूहळू भूमिगतांना होणारा गावच्या खबऱ्यांचा, गुंडांचा विरोध मावळू लागला. आपली सर्व गावे ब्रिटिश शासनापासून मुक्त करून आपणच तेथील कारभार चालवायचा, असे भूमिगतांचे मत होते. पत्री मारण्याच्या प्रकरणामुळे हे सरकार मजबूत आहे व ते आपल्याला न्याय देईल, याबाबत लोकांना विश्वास वाटत होता. दैनंदिन जीवनातील अडचणी सोडवणारी यंत्रणा गावातील गोरगरीब जनतेला हवी होती. गावामध्ये अनेक गट असायचे. त्यामुळे अंतर्गत गटबाजीचा गावच्या लोकांना त्रास व्हायचा. भूमिगतांच्या नेत्यांनी अनेक गावांना गटबाजीमुक्त केले व त्यांच्यात ऐक्य घडवून आणले.

एकप्रकारे गावातील गटबाजी व गुंडगिरी मोडून काढण्याचा मार्ग प्रतिसरकारने अवलंबला. काही ठिकाणी न्यायदान करून गोरगरिबांवरील अन्यायही दूर केला.

कुंडल हे प्रतिसरकारचे मुख्य केंद्र आणि प्रामुख्याने सातारा जिल्हा (सध्याच्या सांगली जिल्ह्यासह) हे कार्यक्षेत्र होते. या प्रतिसरकारचा इतिहासही मोठा रोमांचक ठरला. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, डॉ. उत्तमराव पाटील यांच्याबरोबरच क्रांतिवीर नागनाथअण्णा हेही या लढ्यातील प्रतिसरकारचे बिनीचे शिलेदार म्हणून ओळखले जात होते. धुळे खजिना लूट आणि शेणोलीजवळ खास पगारी रेल्वे गाडीतील (स्पेशल पे-ट्रेन) सरकारी पैशांची लूट या दोन थरारक घटनांत त्यांचा पुढाकार राहिला. कसबा सांगाव पोलीस ठाण्यातून बंदूका पळवून आणण्यातही तेच आघाडीवर होते. या तिन्ही घटना म्हणजे भूमिगत क्रांतिकारकांच्या धाडसी कार्याच्या थरारक शौर्यकथाच म्हणाव्या लागतील; आणि जी. डी. बापू लाड व नागनाथअण्णा हे या शौर्यकथांचे जणू महानायकच !

प्रतिसरकारच्या चळवळीत कार्यरत असताना भूमिगत क्रांतिकारकांनी काही पथ्ये जाणीवपूर्वक पाळली होती. क्रांतिकारकांना बदनाम करण्यासाठी सरकार, गुंड-गुन्हेगारांचा वापर करीत असे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेवर अन्याय, अत्याचार करण्यासाठी त्यांना मोकळे रान मिळाले होते, तथापि, भूमिगत क्रांतिकारकांकडून सर्वसामान्यांना त्रास होणार नाही, त्यांच्या मालमत्तेची लूट होणार नाही आणि सरकारी अधिकारी व गुन्हेगारांकडूनही त्यांच्यावर अन्याय होणार नाही, यादृष्टीने प्रतिसरकारचे प्रतिनिधी दक्षता घेत असत. लोकांना धीर व संरक्षण देण्याबरोबरच अन्याय करणाऱ्यांना धडा शिकविण्याचेही काम ते चोखपणे बजावत. त्यामुळे एकीकडे इंग्रज पोलिसांचा ससेमिरा चुकवत, त्यांच्याशी संघर्ष करत 'स्वकियां'शीही दोन हात करण्याचे दुहेरी कार्य त्यांना पार पाडावे लागत होते. त्याबरोबरच लोकांच्यात विधायक वृत्ती व राष्ट्रप्रेम वाढविण्याच्या दृष्टीने प्रबोधनात्मक उपक्रमही ते राबवत असत. त्यासाठी गावोगावी तरुण कार्यकर्त्यांना संघटित करणे आणि त्यांच्यात स्वातंत्र्याची भावना जागृत करणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून ते सक्रिय राहिले. त्यादृष्टीने त्यांनी अनेक कार्यक्रम आयोजित करून ते यशस्वी पार पाडले. 'प्रतिसरकार'च्या घटना व कार्यपद्धतीनुसार नियोजनबद्ध कार्य सुरू राहिले.

प्रतिसरकारमधील बहुतेक सर्वच प्रमुख नेते भूमिगत राहून कार्य करीत होते. इंग्रजांविरुद्ध संघर्ष करण्याबरोबरच लोकहिताच्या व कल्याणकारी भूमिकेतून ग्रामस्वराज्याची संकल्पना राबविण्याचा या सरकारचा प्रयत्न सुरू होता. क्रांतिकारकांच्या कार्याची, हालचालींची पोलिसांना माहिती देणाऱ्या खबऱ्यांना तसेच अन्याय, अत्याचार करणाऱ्या सरकारी

अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना 'शिक्षा' देण्याचे काम प्रतिसरकारने नियुक्त केलेल्या न्याय यंत्रणेमार्फत केले जात असे. सातारा जिल्ह्यात कार्यरत असलेल्या या 'प्रतिसरकार'चे जे अठरा गट होते, त्यातील वाळवा-शिराळा गटाचे नागनाथअण्णा प्रमुख होते. या गटाने आपल्या कार्यक्षेत्रात 'ग्रामस्वराज्या'ची संकल्पना राबविण्याचा जाणीवपूर्वक व यशस्वी प्रयत्न केला. मुख्यत्वे गुंडगिरी करणाऱ्या गावगुंडांना पायबंद घालणे आणि सावकारांकडून होणारी लुबाडणूक थांबविणे, अन्यायग्रस्तांना 'न्याय' मिळवून देणे यासाठी नेतेमंडळी पुढाकार घेत. गोरगरिबांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात न्यायनिवाडा करण्यासाठी 'प्रतिसरकार' ने गावोगावी न्यायमंडळे स्थापन केली होती. सामान्य लोकांना या न्याय मंडळांचा मोठा आधार वाटते असे. एका व्यापक दृष्टिकोनातून न्याय मंडळांची रचना करण्यात आली होती व त्याप्रमाणे कोणावर अन्याय, अत्याचार होणार नाही याबाबत दक्षता घेतली जात होती. सावकार व धनदांडग्यांकडून होणारी लुबाडणूक व शेतकऱ्यांच्या जमिनीवरील अतिक्रमणे थांबविण्याच्या दृष्टीने या न्याय मंडळानी महत्त्वाची भूमिका बजावली. गावोगावी स्वच्छता मोहीम राबविण्यात तसेच राष्ट्र सेवा दलाच्या शाखा सुरू करण्यात या भूमिगतांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. ऐतवडेसारख्या गावात सामुदायिक शेतीचा प्रयोग केला आणि दुर्गम भागात स्वयंसेवी संस्थांद्वारे शाळा चालविण्याचा उपक्रम राबविला. स्वातंत्र्य चळवळीच्या जोडीने सामाजिक सुधारणांचा एक आगळा मार्ग भूमिगत नेत्यांनी अवलंबला. इंग्रजांशी संघर्ष करताना व सर्वसामान्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढताना त्यांना प्रसंगी हिंसक मार्ग अवलंबावा लागला, तरी गावपातळीवर शांतता व सलोखा टिकून राहील या दृष्टीने वातावरण तयार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न 'प्रतिसरकार'च्या या गटप्रमुखांनी केला. एक प्रकारे गांधीजींच्या कल्पनेतील 'ग्रामस्वराज्या'ची कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा त्यांचा हा विधायक मार्ग होता. स्वातंत्र्याचा लढा अंतिम टप्प्यात आल्यानंतर 'स्वराज्य'त कशाप्रकारे वाटचाल करायची याचे जणू 'प्रात्यक्षिक'च त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात दाखवायला सुरूवात केली. ग्रामपातळीवर स्वच्छता मोहीम राबविणे आणि शिक्षण प्रसाराला पोषक वातावरण तयार करणे या कामाला त्यांनी अग्रक्रम दिला. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीला देशभर मोठा प्रतिसाद मिळाला. तथापि, पुढे हळूहळू ही चळवळ थंडावत चालली होती, पण सातारा जिल्ह्यात मात्र 'प्रतिसरकार'च्या मार्गदर्शनाखाली ती त्याच जोमाने सुरू राहिली. नागनाथअण्णांनी तर स्वतःला या चळवळीत सर्वस्वी झोकून दिले होतेच, पण त्यांच्याबरोबर इतर अनेक कार्यकर्तेही त्यांना मनापासून साथ देत होते. विशेष म्हणजे नागनाथअण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई व त्यांचे वडील रामचंद्र गणू नायकवडी हेही त्यांना सर्वतोपरी सहकार्य

करीत होते. नागनाथअण्णांच्या या कार्यात त्यांच्या मातापित्यांचा व कुटुंबातील अन्य सदस्यांचाही थेट सहभाग राहिला होता. त्यांचे सर्व कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. साहजिकच, सर्वांनाच इंग्रज सरकारचे पोलीस व अन्य अधिकाऱ्यांचा त्रास सहन करावा लागला. त्यांच्या आई व वडिलांना दोघांनाही तुरुंगवास भोगावा लागला. येरवडा येथे आईला तीन महिने तर वडिलांना सहा महिने कारावासात राहावे लागले. स्वातंत्र्य चळवळीत साऱ्या नायकवडी कुटुंबालाच अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. आई-वडील अशिक्षित असले तरी नागनाथअण्णांच्या उच्च ध्येयाची आणि देशासाठी ते करीत असलेल्या संघर्षाची त्यांना चांगली जाण होती. अण्णांच्या भावना त्यांना समजत होत्या आणि त्यांच्या कार्यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच चळवळीच्या प्रत्येक कार्यात त्यांना घरच्यांची साथ मिळत गेली. अत्यंत निरपेक्ष भावनेने कुटुंबीयांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच नागनाथअण्णा जोमाने व बिनधास्तपणे चळवळीत कार्यरत राहू शकले. कुटुंबीयांना त्यांच्याविषयी विलक्षण प्रेम व जिव्हाळा होता. म्हणूनच स्वातंत्र्य लढ्यात ते उत्तुंग कामगिरी करू शकले.

प्रतिसरकारचे कार्य सातारा जिल्ह्याच्या काही तालुक्यांपुरते मर्यादित असले तरी, त्याचा दबदबा मोठा होता. साऱ्या राज्यभर त्याचा बोलबाला झाला होता. क्रांतिसिंह नाना पाटील हे या प्रतिसरकारचे प्रमुख नेते होते आणि कारभाराच्या सोयीसाठी एकूण कार्यक्षेत्राची चार गटात विभागणी करण्यात आली होती. प्रतिसरकारचे मुख्य केंद्र कुंडल असल्याने तेथील क्रांतिकारकांचा गट सर्वाधिक प्रभावी होता. नाना पाटलांचे वास्तव्यही प्रामुख्याने तेथेच असे. तेथील गटाचे नेतृत्व नाथाजी लाड व जी. डी. बापू लाड यांच्याकडे होते, तर शिराळा-वाळवा भागातील कार्यकर्ते नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली कार्यरत होते. सातारा जिल्ह्यातील भूमिगत काँग्रेस कार्यकर्त्यांचा एक गट कराड भागात यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली व दुसरा गट वाई तालुक्यात किसन वीर यांच्या नेतृत्वाखाली काम करत होता, तर सांगली भागात भूमिगतांच्या तिसऱ्या गटाचे नेतृत्व वसंतदादा पाटील करीत होते. चौथा गट बाबूराव चरणकरांच्या नेतृत्वाखाली बिळाशी भागात संघर्ष करत होता. शिवाय काशीनाथ देशमुख, स्वामी रामानंद भारती, गोविंदराव खोत, भूपाल काटे यांचेही गट वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात भूमिगत राहून सरकारविरोधी घातपाती कारवाया करीत होते. प्रतिसरकारच्या घटनात्मक कार्यपद्धतीची कार्यवाही मात्र मुख्यत्वे कुंडल व शिराळा-वाळवा भागात काही काळ सुरू राहिली. पुढे नागनाथअण्णांचा गटही स्वतंत्रपणे काम करू लागला. कुंडल गटापासून हा गट दूर होण्यास निमित्त ठरले, ते गाजलेले धुळे खजिना लूट प्रकरण.

धुळे खजिना लुटून आणण्यात नागनाथअण्णांचा वाटा मोठा होता, असे मानले जाते. कारण कांही असो, या घटनेनंतर कुंडल गटातील प्रमुख नेत्यांत काही तात्विक मतभेद होऊन दोन गट स्वतंत्रपणे काम करू लागले, हे खरे. हे दोन्ही गट नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनानुसारच कार्य करीत होते, तरी त्यांचा परस्परांशी संबंध राहिला नाही. नागनाथअण्णांनी किसन अहिर, वाय. सी. पाटील व अन्य काही प्रमुख सहकाऱ्यांना घेऊन प्रतिसरकारमध्ये सवता सुभा निर्माण केला. कृष्णा-वारणेच्या खोऱ्यातील गुंड, गुन्हेगार, पोलिसांचे खबरे, भ्रष्ट अधिकारी, सावकार, सर्वसामान्य गरीब जनतेवर अन्याय-अत्याचार करणारे समाजकंटक यांच्यावर त्यांनी दहशत बसविली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची लढाऊ वृत्ती आणि महात्मा गांधीजींची विधायक दृष्टी यांचा समन्वय साधून त्यांनी आपल्या कार्यपद्धतीला नवी दिशा दिली. त्यामुळे त्यांना लोकांचा प्रतिसाद तर मिळालाच, पण ग्रामीण भागात त्यांची लोकप्रियताही वाढली. त्यांच्या संघटनेचा सामान्य नागरिकांना आधार वाटू लागला. साहजिकच, त्यांच्याविषयीचा आदरभाव वाढला. जनमानसात त्यांची वेगळीच प्रतिमा तयार झाली आणि त्यांच्या कार्यालाही गती मिळाली. समाजातील त्यांचे कार्यकर्तृत्व आणि त्यांच्या क्रांतिकार्याची दखल सरकारी पातळीवर गंभीरपणे घेतली जाऊ लागली. त्यांच्या विविध शौर्यकथांनी अनेक युवकांना झपाटून टाकले. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यातील सहभागासाठी त्यांना एक प्रकारे नवी प्रेरणा मिळाली.

प्रतिसरकारच्या काळात भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांनी इंग्रज सरकारविरोधात केलेल्या अनेक कारवाया म्हणजे रोमहर्षक संघर्षकथाच. या कथांनी जनसामान्यांच्या मनात स्वातंत्र्याच्या ऊर्मी जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. स्वातंत्र्य लढ्यातील कार्यकर्त्यांविषयी त्यांच्या मनात आदराची भावना असल्यामुळे भूमिगतांना लोकांचे चांगले सहकार्य मिळत असे. जिवावर उदार होऊन लोक निर्भयपणे भूमिगतांना शक्य ती सर्वप्रकारची मदत करीत असत. नागनाथअण्णा तर स्वातंत्र्य चळवळीत अनेकांचे 'हिरो' बनले होते. ते उघडपणे वावरत नसले तरी त्यांच्याविषयीच्या अनेक शौर्यकथा प्रसृत झाल्या होत्या. कोल्हापूर जिल्ह्यातील कसबे सांगाव येथील पोलीस ठाण्यातून रायफली पळविण्याची घटना ही अशा रोमांचक शौर्यकथांपैकीच एक.

कसबे सांगावला भरवस्तीत असलेल्या पोलीस ठाण्यातून थेट पोलिसांच्या साक्षीने येथील तीन बंदुका पळवून आणण्याचा पराक्रम नागनाथअण्णांनी केला. आपल्या तिघा सहकाऱ्यांसह त्यांनी ही मोहीम पार पाडली. विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारचा हिंसाचार आणि जीवित हानी होऊन न देता ही मोहीम त्यांनी फत्ते केली. तेथून पळवून आणलेल्या बंदुका प्रतिसरकारच्या कार्यासाठी त्यांनी कुंडलला आणून पोहोच केल्या. अत्यंत प्रतिकूल

परिस्थितीत थेट पोलीस ठाण्यातून भरदिवसा बंदुका पळविण्याच्या या घटनेने साऱ्या राज्यभर केवढी खळबळ माजली असेल याची कल्पना केलेली बरी. नागनाथअण्णांच्या कार्यकर्तृत्वाची या घटनेनंतर व्यापक चर्चा होत राहिली. कसबे सांगावच्या या क्रांतिकार्यात जी. डी. बापू लाड, शाम पाटील व ईश्वरा गुरव या अन्य तिघा भूमिगत सैनिकांनी नागनाथअण्णांना साथ दिली होती. या मोहिमेतील त्यांचेही योगदान महत्त्वाचे ठरले. १ ऑक्टोबर, १९४३ ची ही मोहीम स्वातंत्र्य लढ्यातील प्रतिसरकारच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना म्हणून नोंदली गेली.

## कसबा सांगावचे थरारनाट्य

कोल्हापूर संस्थानातील कागलजवळील कसबा सांगाव हे त्या काळात 'चलेजाव' चळवळीचे केंद्र होते. सांगावमधील मगदूम मास्तर यांनी तेथे युवकांना संघटित करून स्वातंत्र्य लढ्याचे कार्य सुरू ठेवले होते. गावचा पाटीलही ब्रिटिशांच्या विरोधात मगदूम मास्तरांना मदत करत होता. काही देशप्रेमी तरुणांनी रेसिडेन्सी बंगल्यावर निदर्शने केली होती. त्यामुळे ब्रिटिश सरकारने अनेक लोकांना पकडून तुरुंगात घातले होते. गावकऱ्यांवर दहशत ठेवण्यासाठी सरकारने चार पोलिसांचे एक पथक तेथे तैनात केले होते. त्या पोलिसांचा राहण्याचा, जेवणाचा सर्व खर्च गावकऱ्यांनाच करावा लागत होता. त्यासाठी गावावर सामुदायिक दंड बसवण्यात आला होता. नागनाथअण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांना या पोलिसांबद्दल व त्यांच्याकडे असणाऱ्या हत्यारांबद्दल माहिती मिळाली. पोलिसांकडे असलेल्या बंदुकांची लूट करण्याचे त्यांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी पोलिसांच्या दैनंदिन कार्यपद्धतीची पूर्ण माहिती आपल्या सहकाऱ्यांमार्फत मिळवली. गावात रस्ते कसे आहेत, पोलीस ज्या ठिकाणी राहतात त्या मारुतीच्या देवळापासून व चावडीपासून गावाबाहेर पडायला किती वेळ लागतो, त्यासाठी कोणता मार्ग सोयीस्कर आहे आदी माहिती घेऊन पोलिसांच्या बंदुका केव्हा, कोणत्या वेळेला व कशा पळवायच्या, याचे पूर्ण नियोजन नागनाथअण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. १ ऑक्टोबर, १९४३ हा दिवस बंदुका लुटण्यासाठी ठरविण्यात आला. नागनाथअण्णा हे कोल्हापूरच्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसमध्ये राहिले असल्यामुळे कोल्हापूरचे अनेक लोक त्यांच्या परिचयाचे होते. त्यांनी कसबा सांगाव मोहिमेचे नियोजन केले. कसबा सांगावला जाण्यासाठी त्या काळात खासगी मोटारी होत्या. जी. डी. बापू लाड व ईश्वरा गुरव हे लक्ष्मीपुरीतील मोटार स्टँडवर जाऊन कागल गाडीत बसले. शामराव पाटील व नागनाथअण्णा हे कोल्हापूरच्या बाहेर कागलच्या रस्त्यावर असणाऱ्या प्रवासी थांब्यावर जाऊन थांबले होते. कागलला जाणारी मोटारगाडी तिथे

आल्यावर ते दोघेही त्याच गाडीत बसले. सायंकाळी पाच वाजता हे चौघे कागलला पोहोचले. तेथून दोघादोघांचा गट करून ते कसबा सांगावकडे निघाले. पोलिसांजवळ कोणत्या प्रकारच्या बंदुका आहेत याची पूर्ण माहिती त्यांनी अगोदर काढली होती. अर्ध्या एक तासाने ते सगळे कसबा सांगावच्या ओढ्याजवळ पोहोचले. चौघांच्याही कमरेला रिव्हॉल्व्हर होते. सगळ्यांनीच रिव्हॉल्व्हरमध्ये गोळ्या भरल्या. दिवेलागणीची वेळ होताच ते कसबा सांगावमध्ये पोहोचले. थोड्याच वेळात ते पोलीस राहत होते त्या चावडीजवळ आले. देवळालगतच्या एक खोलीत ते राहत होते. साध्या वेशातील एक पोलीस हवालदार दिवेलागणीच्या अंधूक प्रकाशात उंबऱ्यावरच तांदूळ निवडत बसला होता.

'काय हवालदारसाहेब, काय चाललंय ?' असे नागनाथअण्णांनी विचारले व ते खोलीत गेले. पाठोपाठ जी. डी. बापू, शामराव पाटील, ईश्वरा गुरव पोलीस ठाण्यात शिरले. दुसरे दोन पोलीस हवालदार स्वयंपाक करीत होते व त्यांचा पत्त्याचा डावही चालला होता. कुणाच्या काही लक्षात यायच्या आत पोलिसांनी खोलीत खुंटीला अडकवून ठेवलेल्या बंदुका, काडतुसांच्या माळा तसेच पोलिसांचे बूट, गणवेश, पट्टे आदी साहित्य त्यांनी गोळा केले. तेव्हा उंबरठ्यावर बसलेल्या कॉन्स्टेबलचे आत लक्ष गेले. आत येऊन तो आतून दाराला कडी लावण्याचा प्रयत्न करणार हे नागनाथअण्णांच्या लक्षात आले. त्यांनी आपल्या रिव्हॉल्व्हरमधून कडीला घातलेल्या पोलिसाच्या हातावर गोळी मारली. त्यामुळे तो ओरडत बाहेर पळाला. बाकीचे दोन हवालदार हालचाल करायच्या आतच त्यांच्यावर रिव्हॉल्व्हर रोखल्यामुळे ते गप्प बसले. क्रांतिकारकांना तीन बंदुका मिळाल्या. चौथी बंदुक काही सापडली नाही. त्याबद्दल त्यांनी पोलिसांना जाब विचारला, पण त्यांच्याकडून काही उत्तर मिळाले नाही. तीन बंदुका घेऊन कुणाला काही समजायच्या आत ते गावातून बाहेर पडले. चौथा पोलीस बंदुक घेऊन कागलला पोस्टमनबरोबर संरक्षक म्हणून गेला होता. तो परत आल्यानंतर दाराची बाहेरची कडी लावून आत बंद केलेल्या आपल्या तीन सहकाऱ्यांची त्याने सुटका केली. घडलेल्या प्रकाराची व हत्यारे पळविल्याची माहिती त्याला मिळाली. त्या चार पोलिसांनी आपली एक बंदूक घेऊन गावातील पन्नास-साठ लोकांबरोबर क्रांतिकारकांचा पाठलाग सुरू केला. पाठलाग करत असताना क्रांतिकारकांच्या दिशेने त्यांनी हवेत गोळीबार केला. क्रांतिकारकांनीसुद्धा जमावाच्या दिशेने गोळीबार केला. मात्र आपल्या गोळ्यांमुळे एकही गावकरी जखमी होऊ नये याची दक्षता घेतली. कारण बंदुका बळकावणारे हे क्रांतिकारक आहेत हे गावातल्या लोकांना माहिती नव्हते. केवळ दहशत निर्माण व्हावी, यासाठी त्यांनी हवेत गोळीबार केला.

सुमारे २० मिनिटे ही चकमक चालू राहिली. क्रांतिकारक गावालगतच्या उसाच्या फडात घुसले. त्यानंतर लोक व पोलिसही परत गेले. नंतर ते उसाच्या फडातून बाहेर आले, पण कोल्हापूरला येण्याचा नेमका मार्ग त्यांना सापडला नाही. कोल्हापूरकडे येताना रात्रभर चालून थकल्यामुळे व वाट चुकल्यामुळे मध्यावरच त्यांना थांबावे लागले. एका शेतकऱ्याकडे ते थांबले. दुसऱ्या दिवशी परत त्यांना रात्रभर चालावे लागले व शेवटी ते कोल्हापूरला येऊन पोहचले. तिन्ही बंदुका, काडतुसांचे पट्टे, पोलिसांचे गणवेश हे सर्व एका पोत्यात व्यवस्थित बांधून नागनाथअण्णा व जी. डी. बापू नागनाथअण्णांच्या एका नातेवाईकाच्या गाडीतून वाळव्याला आले. मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे सगळीकडे चिखल झाला होता. नद्या, ओढे भरून वाहत होते. शामराव पाटील, ईश्वरा गुरव हे सुद्धा नंतर वाळव्यात आले. नागनाथअण्णांच्या घरी रात्री मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सर्वजण कुंडलला गेले.

## सरकारी पैशांची लूट

इंग्रजांच्या बलाढ्य सत्तेविरुद्ध भूमिगत लढा सुरू ठेवायचा, तर स्वातंत्र्यसैनिकांच्या दैनंदिन खर्चासाठी पैसा व शस्त्रे गरजेची होती. ती कोठून, कशी मिळवायची ही मोठी चिंतेची बाब होती. लोकांकडून पैसे जमा करावयाचे झाले तरी ते उघडपणे मागता येत नसल्याने निधी जमविणे अवघड झाले होते. अशा परिस्थितीत मिळेल त्या मार्गाने शस्त्रास्त्रे जमा केली जात होती. कसबा सांगावहून मिळवलेल्या ती बंदुकांनी काम भागण्यासारखे नव्हते. आणखी शस्त्रे विकत आणायची तर त्यासाठीही पैसा हवा होता. तो कसा मिळवायचा, हा प्रश्न सर्वांनाच भेडसावत होता. त्यातूनच स्पेशल पे ट्रेन (पगार घेऊन जाणारी खास रेल्वे गाडी) लुटण्याची कल्पना पुढे आली. सरकारी मालमत्ता लुटण्यास कोणाचाच विरोध नव्हता. साहजिकच या योजनेला नाना पाटील यांनीही संमती दिली. दरमहा ७ तारखेला मिरजेपासून पुण्यापर्यंत एका रेल्वेगाडीतून सरकारी नोकरांचा पगार नेला जात असे. ७ जून, १९४३ या दिवशी ही पगाराची रक्कम लुटण्याचे भूमिगतांच्या बैठकीत ठरले. कराड लगतच्या शेणोली खिंडीत रेल्वेगाडी काहीशा धीम्या गतीने जात असे. तेथे रेल्वे रुळावर दगड टाकून ती अडविण्याची व ठराविक वेळेत लुटण्याची योजना आखण्यात आली आणि ठरल्याप्रमाणे ती पार पाडली गेली. खिंडीत विशिष्ट ठिकाणी सकाळी ८ वाजता रेल्वेगाडी आल्यानंतर रेल्वे मार्गावरील दगडांच्या ढिगामुळे तिचा वेग कमी झाला. त्यावेळी जी. डी. बापू लाड यांनी रेल्वे इंजिनवर चढून रेल्वेच्या ड्रायव्हरला पिस्तुलाचा धाक दाखवला व गाडी थांबविण्यास सांगितले. बाकीच्या सहकाऱ्यांनी लगतच्या डब्यातील पैशाची पेटी

फोडली आणि सर्व रक्कम घेऊन नजीकच्या डोंगरात पलायन केले. कराडच्या पोलीस ठाण्याला हे वृत्त कळून घटनास्थळी पोलीस यायला तासाभराचा अवधी लागला. तेवढ्या वेळात लुटीची रक्कम घेऊन स्वातंत्र्यसैनिक पुन्हा भूमिगत झाले होते. त्या मोहिमेचे नेतृत्व जी. डी. बापू व नागनाथअण्णांनी केले होते. त्यांच्याबरोबर नाथाजी लाड, रामभाऊ पवार, अण्णा धनगर, आप्पा लाड, बंडू लाड, रामा तेली, एस. पी. पाटील, ज्ञानू चौकीवाले (वस्ताद), रामू तात्या, एस. पी. जाधव, रावसाहेब कळके व दुधोंडीकर पाटील असे आणखी बारा साथीदार होते. चौदा जणांनी फत्ते केलेल्या या मोहिमेत १९ हजार ७१६ रुपये मिळाले. ही रक्कम त्या काळात मोठीच होती, पण चळवळीच्या कार्याचा व्याप विचारात घेता ती पुरेशी पडणारी नव्हती. या थरारक घटनेचीही सर्वत्र व्यापक चर्चा झाली. पोलिसांच्या दृष्टीने हे लुटीचे प्रकरण आव्हानात्मक ठरले. पोलिसांनी तपास केला, पण गुन्ह्याचा छडा लागू शकला नाही. एकही भूमिगत कार्यकर्ता त्यांच्या हाताशी लागला नाही आणि लुटीची रक्कमही त्यांना मिळू शकली नाही.

शेणोलीच्या खास पगारी रेल्वे गाडीवरील दरोड्यानंतर आठ-दहा महिन्यातच धुळे खजिना लुटीचे प्रकरण गाजले. इंग्रज सत्तेला हादरवून सोडणाऱ्या या घटनेची साऱ्या राज्यभर चर्चा झाली. शेणोली रेल्वे लुटीतील तुटपुंजा पैशाने भूमिगतांचा खर्च भागण्यासारखा नव्हता. त्यामुळे आणखी कुठून तरी पैसा मिळवणे आवश्यक होते. भूमिगतांच्या मदतीसाठी ठिकठिकाणाहून निधी जमविण्याचा प्रयत्न सुरू होता, पण त्याला फारसा प्रतिसाद मिळत नव्हता. त्या दृष्टीने चाचपणी सुरू होती, पण कुठेच काही आधार मिळत नव्हता. शेवटी आणखी कुठे तरी सरकारी खजिन्याचीच लूट करण्याचा विचार पुढे आला. धुळे येथील सरकारी खजिन्यातून सुमारे साडेपाच लाख रुपये १४ एप्रिल, १९४४ या दिवशी नंदुरबारला खासगी वाहनाने नेण्यात येणार असल्याची माहिती भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना त्यांच्या गुप्तचर यंत्रणेमार्फत मिळाली. त्यानुसार ४० जणांच्या चमूने चार चार जणांचा गट करून धुळे-नंदुरबार मार्गाने कसे जायचे ? कुठे कुठे थांबायचे ? कोणी कुठली जबाबदारी पार पाडायची ? पैसे घेऊन जाणारे वाहन कुणी व कसे अडवायचे ? वगैरे सर्व नियोजन करण्यात आले. धुळे येथील फकिरा देवरे या भूमिगत स्वातंत्र्यसैनिकाने या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती व त्यांच्याच मार्गदर्शनानुसार ही मोहीम पार पाडण्यात येत होती. पोलिसांच्या नजरा चुकवून व कोणालाही संशय येणार नाही अशा पद्धतीने साऱ्या हालचाली करणे गरजेचे होते. ज्या खासगी वाहनातून सरकारी खजिन्यातील रक्कम नेण्यात यावयाची

होती त्या गाडीत भूमिगत कार्यकर्त्यांपैकी धोंडिराम माळी, रावसाहेब कळके व आप्पासाहेब पाटील यांनी एका महत्त्वाच्या कामासाठी तातडीने जायचे आहे, असे सांगून कसाबसा प्रवेश मिळविला होता. खासगी मोटारगाडी ज्या मार्गाने जाणार होती, त्या मार्गावर लुटूपुटूचे भांडण करीत काही जणांनी रस्त्यात अडथळा निर्माण करायचा व संबंधित मोटारीच्या चालकाला रस्त्यात मोटार थांबवायला भाग पाडायचे, असे ठरविण्यात आले होते. त्यानुसार मोटारगाडी समोरून येत असताना नागनाथअण्णा व जी. डी. बापू लाड आणि इतर दोघांनी पूर्वनियोजनानुसार भर रस्त्यावर खोटे खोटे भांडायला सुरुवात केली. तथापि, चालकाला काहीतरी गडबड असल्याचा संशय आल्याने त्याने मोटार तशीच पुढे न्यायचा प्रयत्न केला, पण रस्ता चढाचा असल्याने त्याला वेगाने पुढे जाता आले नाही. दरम्यान भांडणाचे नाटक करणाऱ्या या भूमिगतांनी गाडीचा पाठलाग करून ती पकडली आणि चालकाच्या हातावर पिस्तुलाने दोन गोळ्या झाडल्या. तरीही चालकाने मोटार पुढे रेटायला सुरूवात केली. मग क्रांतिकारकांनी आणखी दोन गोळ्या झाडल्या व त्याला जखमी केले. तेव्हा कुठे चालकाने मोटार थांबविली व मोटारीची किल्ली क्रांतिकारकांच्या हातात दिली. दरम्यान इतर सहकाऱ्यांनी संरक्षक पोलिसांना पकडून त्यांच्याकडील बंदुका व काडतुसे काढून घेतली. अशाप्रकारे साऱ्यांची कोंडी केल्यानंतर खजिन्याची लोखंडी पेटी फोडून त्यातील नोटा क्रांतिकारकांनी आपल्या ताब्यात घेतल्या. या घटनेनंतर अल्पावधीतच ही बातमी नजीकच्या पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचली. त्यामुळे मोठी खळबळ माजली. तातडीने तेथील पोलिसांनी क्रांतिकारकांचा पाठलाग सुरू केला. त्यांनी केलेल्या गोळीबारात जी. डी. बापू लाड जखमी झाले. त्यांच्या पायाच्या पिंढरीत गोळी लागल्याने त्यांना पुढे चालणे अवघड झाले. नागनाथअण्णांच्याही उजव्या खांद्याला एक गोळी लागली, पण किरकोळ जखम झाली. पाठीमागून पोलिसांच्या होत असलेल्या गोळीबारास क्रांतिकारकांनीही गोळ्या झाडून प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. अखेरीस सायंकाळी अंधार पडू लागल्यानंतर पोलिसांनी पाठलाग सोडून दिला व ते माघारी गेले.

भूमिगतांनी जखमी जी. डी. बापूंसह रात्री पुढे वाटचाल करण्याचा निर्णय घेतला. भिल्ल समाजातील एका तगड्या व्यक्तीस पैसे देऊन जी. डी. बापूंना खांद्यावर घेऊन नजीकच्या गावापर्यंत सारेजण चालत आले. तेथे एका भाड्याच्या टांग्यातून पुढे जाण्याची व्यवस्था झाली. टांग्यातून जखमी जी. डी. बापू, नागनाथअण्णा, डॉ. उत्तमराव पाटील व अन्य दोघे भूमिगत बोरकुंड येथे ओंकारनाथ पाटील नावाच्या भूमिगतांना मदत करणाऱ्या व्यक्तीच्या घरी येऊन थांबले. खजिना लुटीच्या या मोहिमेसाठी खानदेशातील डॉ. उत्तमराव

पाटील, शंकरराव माळी, ओंकारबापू दिवाण, केशव वाणी, नानासाहेब ढेरे, व्यंकटराव रणवीर, चंद्रकांत देवरे पाटील, भाऊराव पाटील आदिनी मोठे सहकार्य केले. खजिना लुटीचा पैसा सातारा जिल्ह्यात कसा न्यायचा, हा प्रश्न उभा राहिला. त्यासाठी भूमिगतांना साथसंगत करणाऱ्या राजमतीताई पाटील यांना धुळे येथे येऊन थांबण्यास सांगण्यात आले होते. नियोजनानुसार त्या धुळे येथे आल्या होत्या. त्यांच्यासोबत भूमिगतांपैकी धोंडिराम माळी यांना पाठविण्याचे ठरले. त्यानुसार खजिन्यातील नोटाची बंडले कलिंगडे व टरबुजांच्या पोत्यात भरून ती विक्रीसाठी म्हणून नाशिककडे प्रारंभी बैलगाड्यांतून व नंतर मोटारीतून नेण्यात आली. नाशिकहून रेल्वेने ही नोटा भरलेली 'फळां'ची पोती सातारा जिल्ह्यात आणण्यात आली. चार लाख ३१ हजार रुपयांची ही रक्कम त्या काळात फारच मोठी व चळवळीच्या दृष्टीने 'मौलिक'ही होती. भूमिगतांच्या खर्चासाठी म्हणून मोठ्या धाडसाने लुटून आणलेली ही सर्व रक्कम नाना पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. त्यावेळी नाना पाटील यांचे वास्तव्य आटपाडीस होते. भूमिगत कार्यकर्त्यांसाठी या रकमेचे त्यांच्या सल्ल्यानुसार वाटप करण्यात आले. मुंबईस अच्युतराव पटवर्धन व ग. बा. नेवाळकर यांच्याकडे १ लाख १० हजार रुपये पोहचविण्यात आले, तर खानदेशातील कार्यकर्त्यांसाठी तेवढीच रक्कम पाठविण्यात आली. उरलेले २ लाख ११ हजार रुपये सातारा जिल्ह्यातील भूमिगतांच्या खर्चासाठी राखून ठेवण्यात आले. नाना पाटील यांचे सचिव नाथाजी लाड यांच्याकडे ही उरलेली सर्व रक्कम ठेवण्यात आली. खर्चाचा हिशोब तेच ठेवत असत. धुळे खजिना लुटीच्या या घटनेची सर्वत्र जोरदार चर्चा होत राहिली. नेमक्या किती रकमेची लूट झाली आणि कुणाला किती पैस दिले याबाबत भूमिगत कार्यकर्त्यांतही बरीच उलट सुलट चर्चा सुरू झाली. अफवाही पसरल्या. परिणामी कुंडलखेरीज अन्यत्र कार्यरत असणाऱ्या भूमिगतांच्या या पैशाबाबतच्या अपेक्षा वाढल्या आणि त्यांच्या गटप्रमुखाकडून तशा मागण्या येऊ लागल्या. लुटीच्या पैशात आपल्या गटालाही वाटा मिळावा, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू झाले. काही गटनेत्यांना त्यांच्या गरजेनुसार मागणीप्रमाणे पैसे देण्यात आले. वाई गटाचे किसन वीर यांच्या कार्याला या आर्थिक मदतीमुळे मोठी गती आली. नागनाथअण्णांशी त्यांचे संबंध त्यामुळे अधिक दृढ झाले, पण काही गट असंतुष्ट बनले. त्यांच्यात नाराजी पसरली. संशयाचे वातावरण तयार झाले. परिणामी भूमिगतांच्या काही गटात आणि गटनेत्यातही दुराव निर्माण झाला. खुद्द नागनाथअण्णा आणि जी. डी. बापू या दोघा 'लढवय्या' नेत्यातही या घटनेनंतर कटुता आली. त्यानंतर चळवळीच्या काळात ते कधीच एकत्र आले नाहीत. आपल्या गटाचे काम त्यांनी स्वतंत्रपणे सुरू ठेवले. 'क्रांतिसिंहां'च्या अत्यंत जवळचे असे

हे दोघे प्रमुख नेते परस्परांपासून दुरावले तरी त्यांनी भूमिगत चळवळीवर मात्र त्याचा परिणाम होऊ दिला नाही. एकमेकांबद्दलचा आदरभावही कायम ठेवला. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालीच ते पुढेही कार्यरत राहिले. भूमिगत कार्यकर्त्यांच्या काही गटात बारीक सारीक मतभेद असत, पण उघडपणे त्याची चर्चा होत नसे. चळवळीविषयी जनसामान्यांच्या मनात आत्मियतेची भावना टिकून राहील, या दृष्टीने सर्वजण काळजी घेत. त्यामुळे जी. डी. बापू व नागनाथअण्णा या निकटवर्तीय मित्रांतील मतभेदही कधी उघड चर्चेचा विषय बनले नाहीत. धुळे खजिना लुटीतील फरारी भूमिगत कार्यकर्त्यांना पकडण्यासाठी तत्कालीन इंग्रज सरकारने जंग जंग पछाडले. त्यांची माहिती देणाऱ्यांसाठी मोठ्या रकमेची बक्षिसे जाहीर केली होती, पण जनतेच्या पाठिंब्यामुळे त्यांना पकडणे सरकारला शक्य झाले नाही. स्वातंत्र्य चळवळीबद्दल सहानुभूती असणारे पोलीस खात्यातील काही कर्मचारी व अधिकारीही अप्रत्यक्षरित्या भूमिगत कार्यकर्त्यांना मदत करीत असत. अर्थात याला काही अपवाद होतेच. भूमिगतांत वावरण्याचे नाटक करीत पोलिसांना बातम्या देण्याचे काम काहीजण करीत, तर समाजातील काहींना बक्षिसांचा मोह होत असे. सुरुवातीपासून भूमिगतांच्या विरोधात असणारेही काही लोक होते. त्यामुळे भूमिगत कार्यकर्त्यांच्या बाबतीत कधी कधी दगाफटकाही होत असे. काही कार्यकर्त्यांना त्यामुळे पोलिसांनी पकडल्यामुळे तुरुंगात जावे लागले. धुळे खजिना लुटीनंतर नागनाथअणांना गुन्ह्यातील प्रमुख आरोपी घोषित करून सरकारने त्यांना पकडून देणाऱ्यांसाठी ५,००० रुपयांचे बक्षिस जाहीर केले होते. पोलीस सतत त्यांच्या मागावर असत, पण त्यांना न जुमानता नागनाथअण्णांनी चळवळीचे काम सुरूच ठेवले.

## इस्लामपूरचा मोर्चा

सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नाव सर्वतोमुखी झाले होते. नाना पाटलांनी १९४२ च्या आंदोलनापूर्वी १० वर्षे ठिकठिकाणी सभा घेऊन, मोर्चे काढून शेतकऱ्यांचे प्रबोधन केले होते. शेतकरी सुखी व्हायचा असेल, तर ब्रिटिशांना या देशातून हाकलले पाहिजे, असे प्रतिपादन करून स्वातंत्र्याविषयी शेतकऱ्यांमध्ये त्यांनी प्रचंड जागृती निर्माण केली होती. शेतकऱ्यांच्या अनेक तरुण मुलांवर नाना पाटलांच्या स्वातंत्र्याच्या विचारांचा पगडा होता. चळवळीचा भाग म्हणून सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुका कचेरीचा ताबा घेऊन त्या कचेरीवर तिरंगा फडकवण्याचे व ब्रिटिशांचा ध्वज खाली उतरवण्याचे क्रांतिकारकांनी ठरवले होते. त्यासाठी त्यांनी तासगाव कचेरीची प्रथम निवड केली. तासगाव तालुक्यातील गावोगावी, खेड्यापाड्यात नाना पाटील, जी. डी. बापू, नागनाथअण्णा, वि. स. पागे, वसंतदादा पाटील, स्वामी रामानंद भारती यांनी फिरून जनतेत जागृती करून लोकांना

संघटित केले. १९४२ पासून तासगाव तालुक्यातील किर्लोस्करवाडी व तेथील किर्लोस्कर कारखाना हा स्वातंत्र्य लढ्याचे केंद्रस्थान बनला होता. किर्लोस्कर कारखान्यातील अनेक कामगार व कुंडल परिसरातील लोक तासगावच्या मोर्चामध्ये मोठ्या प्रमाणात सामील झाले होते. त्यावेळी नाना पाटलांना पकडून तुरुंगात घालण्यासाठी पोलीस व ब्रिटिश अधिकारी धडपडत होते, पण ते त्यांच्या हाती लागत नव्हते. या पार्श्वभूमीवर ३ सप्टेंबर, १९४२ ला तासगावचा मोर्चा निघत होता. मोर्चा तासगाव कचेरीच्या दारात आला. आंदोलकांनी संबंधित अधिकाऱ्यांना ब्रिटिश युनियन जॅक कचेरीवरून खाली ओढायला लावला व त्या ठिकाणी तिरंगा झेंडा वर चढविला गेला. तहसीलदार व फौजदार यांना त्यांच्या डोक्यावरील साहेबी टोप्या काढायला लावल्या व स्वातंत्र्याचे प्रतिक असणारी गांधी टोपी त्यांच्या डोक्यावर घातली. त्यानंतर सामुदायिक 'वंदे मातरम्' झाल्यावर आंदोलक परत गेले.

तासगाव मोर्चानंतर इतर ठिकाणी मोर्चाचे नियोजन केले गेले. मोर्चामुळे लोकजागृती होते, स्वातंत्र्य लढ्यात लोक मोठ्या प्रमाणात सहभागी होतात, अशी मोर्चा काढणाऱ्यांची भावना होती. तासगाव मोर्चा यशस्वी झाल्यामुळे लोकांचे मनोधैर्य वाढले होते. नंतर ९ सप्टेंबर, १९४२ ला वडूज येथेही मोर्चा काढण्यात आला. पण ब्रिटीश अधिकारी सावध झाले होते. वडूज येथील कचेरीवर ध्वज फडकवण्यासाठी गेलेल्या मोर्चावर पोलिसांनी स्वैर गोळीबार केला. त्यामध्ये ७ लोक हुतात्मा झाले. तर ७० गंभीर जखमी झाले. तेथील कचेरीवर तिरंगा फडकला गेला नाही. मोर्चा उधळून लावण्यात ब्रिटीश पोलीस व अधिकारी यशस्वी झाले होते. या बातम्या कळूनसुद्धा १० सप्टेंबर, १९४२ च्या इस्लामपूर मोर्चात लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. वाळवा तालुक्यातील व कुंडल, किर्लोस्करवाडी भागातील आंदोलकांचा या मोर्चात प्रामुख्याने सहभाग होता. या मोर्चाचे नेतृत्व जी. डी. बापू लाड करीत होते.

तासगाव कचेरीवर तिरंगा फडकवल्यामुळे ब्रिटिश सरकारमधील सर्व गोरे अधिकारी अत्यंत चिडले होते. स्वतःच्या हाताने तासगाव कचेरीवर तिरंगा फडकवणाऱ्या मामलेदारांना त्यांनी निलंबित केले होते. १० सप्टेंबर, १९४२ ला इस्लामपुरात येणारा मोर्चा कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ द्यायचा नाही असा निर्धार पोलिसांनी केला होता. त्या दृष्टीने त्यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. इतर जिल्ह्यांतून जादा पोलीस आणले होते. सातारचे डी.एस.पी. सी. एम. इटस् स्वतः हजर होते. कारण हा मोर्चा यशस्वी झाला तर जिल्ह्यातील सर्वच कचेऱ्यांवर अशा प्रकारचे उठाव होतील, अशी भीती ब्रिटिश अधिकाऱ्यांना वाटत होती त्यामुळे तासगाव मोर्चाची पुनरावृत्ती या ठिकाणी होऊ द्यायची नाही, असे त्यांनी

ठरविले होते. त्यावेळेला कचेरीमध्ये डी.एस.पी. व इतर अधिकारीही हजर होते. पूर्वनियोजनानुसार इस्लामपूरचा मोर्चा संयुक्तपणे निघणार होता, पण किर्लोस्करवाडी व कुंडल भागातून आलेले व वाळवा तालुक्यातून आलेले लोक यांचा एकत्रित मोर्चा न निघता ते स्वतंत्रपणे निघाले. वाळवा तालुक्यातून आलेला मोर्चा आधी इस्लामपूर कचेरीवर गेला, पण पोलिसांनी तो उधळून लावला. नंतर किर्लोस्करवाडीच्या बाजूने दीड-दोन हजारांचा मोर्चा इस्लामपूर कचेरीच्या दिशेने आला. मोर्चा कचेरीच्या जवळ आला असतानाच दीड फर्लांगावर तो पोलिसांनी अडविला.

सरकारी अधिकाऱ्यांना तासगाव मोर्चाची पुनरावृत्ती होण्याची भीती वाटत होती, म्हणून त्यांनी मोर्चा दूरवर थांबवून मोर्चाच्या नेत्यांना उद्देशून विचारले, 'तुम्ही कोणत्या उद्देशाने मोर्चा काढून येथे आला आहात ?' त्यावर चर्चेसाठी म्हणून पांडू मास्तर व अन्य काही नेते सरकारी अधिकाऱ्यांसमोर गेले, तेव्हा त्यांना ताब्यात घेऊन ते कचेरीच्या बाजूला घेऊन जाऊ लागले. हे पाहून मोर्चातील लोक बिथरले व त्यांनी म. गांधी व क्रांतिसिंह नाना पाटलांच्या नावाने जोरदार घोषणा दिल्या. मोर्चा हळूहळू पुढे सरकू लागला. त्यामुळे पोलिसांनी लाठीमार केला व नंतर अश्रुधुराची नळकांडी फोडली. पण मोर्चेकऱ्यांची एकजूट टिकून राहिली. ते हळूहळू पुढे सरकू लागले. लाठीमार, अश्रुधूर यामुळे मोर्चा हटत नाही असे पाहून शेवटी डी.एस.पी. ने मोर्चाला आदेश दिला, 'तीन अंक मोजेपर्यंत मोर्चा विसर्जित करून येथून निघून जा.' पण मोर्चा विस्कटला नाही, उलट चाल करून कचेरीवर गेला. त्यामुळे डी.एस.पी. ने स्वतःच मोर्चावर गोळीबाराला सुरूवात केली. या गोळीबारात किर्लोस्कर कारखान्यातील कामगार संघटनेचे नेते उमा शंकर पांडे ऊर्फ पंड्या इंजिनिअर व कामेरीचे विष्णू बारबट्टे हुतात्मा झाले.

हजारो निःशस्त्र शेतकरी व सत्याग्रही यांच्यावर ब्रिटिश पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबार यामुळे त्यांचे नीतिधैर्य खचले. जिवाच्या भीतीने सर्व मोर्चेकरी जिकडे वाट दिसेल तिकडे पळत सुटले आणि काही क्षणातच कचेरीसमोरच्या परिसरात शुकशुकाट झाला. सत्याग्रही व शेतकरी आपापल्या गावाच्या दिशेने निघून गेले. गोळीबाराची बातमी सर्वत्र पसरली. अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या मनामध्ये इस्लामपूर मोर्चाच्या अपयशाचे शल्य बोचत राहिले. ब्रिटिश अत्यंत निष्ठूर व निर्दयी आहेत याची जाणीव त्यांना प्रकर्षाने झाली. आपणही ब्रिटिशांशी डावपेचाने व शस्त्र हातात घेऊन लढले पाहिजे, असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. बहुधा त्यामुळेच नागनाथअण्णांच्या मनातील सशस्त्र संघटना उभी करण्याचा विचारही प्रबळ बनला असावा.

■■■■

# ३
# तुरुंगातून पलायन

२८ जुलै, १९४४ ला सेवा दलाच्या वतीने वाळवा येथे हाळ या भागात शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या मेळाव्यास सुमारे चारशे शेतकरी उपस्थित होते. मेळाव्यापूर्वी गावातून निघालेल्या मोर्चासही शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. मोर्चा व मेळाव्याचा कार्यक्रम सुमारे चार-पाच तास चालला. या मेळाव्याच्या निमित्ताने वाळव्यास आलेले नागनाथअण्णा त्या रात्री काही कार्यकर्त्यांसमवेत गावातच मुक्कामास होते. सरकारच्या हस्तकांपैकी कोणीतरी ही बातमी पोलिसांना दिली आणि त्या रात्री पडलेल्या पोलिसांच्या धाडीत ते अन्य पाच कार्यकर्त्यांसह पकडले गेले. नारायण जगदाळे, बाबूराव खोत, बाबू पाचोरे, शामगोंडा पाटील व शंकरराव परुळेकर या कार्यकर्त्यांसह नागनाथअण्णांना दुसऱ्या दिवशी वाळव्यातील चावडीत आणण्यात आले. ही बातमी समजताच गावकऱ्यांनी चावडीला घेरावा घातला, पण नागनाथअण्णांनीच काही अनर्थ घडू नये म्हणून त्या सर्वांची समजूत काढून त्यांना परत पाठवले. वाळवा गावावर त्या दिवशी शोककळा पसरली होती. ज्यांनी पोलिसांना माहिती पुरवली त्यांच्याविषयी संताप व्यक्त करण्यात येत होता. वाळव्याहून पोलिसांनी नागनाथअण्णा व अन्य पाच जणांची इस्लामपूरला पोलीस लॉकअपमध्ये रवानगी केली. तथापि तेथे असताना त्यांचा भूमिगत कार्यकर्त्यांशी संपर्क असल्याचे निदर्शनास आल्यामुळे पोलिसांनी त्यांना सातारा येथील तुरुंगात पाठवले.

नागनाथअण्णांचा पोलिसांना सुगावा कसा काय लागला ? पोलिसांना त्यांच्याविषयी कोणी माहिती दिली ? याबाबत अनेक तर्क वितर्क केले जात होते. अखेरीस ही बातमी उघड झाली. नागनाथअण्णांच्या बरोबर कार्यरत असणारे एक भूमिगत कार्यकर्ते रामू गोटखिंडे यांनीच दगाबाजी केल्याचे स्पष्ट झाले. नागनाथअण्णा वाळव्यात शंकरराव परुळेकर यांच्या घरी कार्यकर्त्यांसमवेत रात्रीचे भोजन करून शेजारी तुकाराम देसाई यांच्या घरी झोपण्यास गेले होते. ती संधी साधून रामू गोटखिंडे याने आष्टा पोलिसांना ही माहिती दिली

होती. भूमिगत कार्यकर्त्यांच्या गटातील एका कार्यकर्त्याचे पिस्तूल रामूने लंपास केले होते. नागनाथअण्णांनी ते संबंधितास परत करण्यास बजावल्यामुळे रामू दुखावला होता. तेव्हापासून तो नागनाथअण्णांवर नाराज होता. या अपमानास्पद घटनेचा बदला घेण्याची तो वाट पाहत होता. वाळव्यातील नागनाथअण्णांच्या वास्तव्यादिवशी त्याने योग्य वेळ साधून पोलिसांना बातमी दिली व स्वतः पुढाकार घेऊन नागनाथअण्णा जेथे मुक्कामास होते ती जागा त्यांना दाखवली. त्यामुळे पोलिसांना रात्री नागनाथअण्णा व इतर काही भूमिगत कार्यकर्ते बेसावध असताना त्यांना पकडणे शक्य झाले. जंग जंग पछाडूनही नागनाथअण्णा पोलिसांना सापडले नव्हते, पण जवळच्या तथाकथित कार्यकर्त्याच्या दगाबाजीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. सातारा तुरुंगात त्यांच्या परिचयाचे काही कार्यकर्ते आधीपासूनच शिक्षा भोगत होते. त्यांच्या सहकार्याने त्यांनी तुरुंगातून पलायन करण्याची योजना आखली व ती यशस्वी केली. तुरुंगाच्या भिंतीवरून उडी मारून बाहेर पडल्यानंतर ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या घरी गेले. तेथील विद्यार्थी वसतिगृहात त्यांनी आश्रय घेतला. तेथून एक-दोन दिवसांनी बाहेर पडून लपत छपत ते मेढा मार्गे वाळवा तालुक्यातील तांबवे गावी आले. तेथे भूमिगत कार्यकर्ते डी. जी. पाटील यांच्या मळ्यातील घरात त्यांचे वास्तव्य राहिले. या काळात त्यांची भेट घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण, धन्वंतरी कासेगावकर वैद्य, पांडू मास्तर आदी भूमिगत कार्यकर्ते येऊन गेले. नागनाथअण्णांना पोलिसांनी पकडल्यानंतर दरम्यानच्या काळात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. नागनाथअण्णांना पकडून नेणाऱ्या पोलिसांना मदत केल्याच्या संतप्त भावनेतून वाळवा येथील सदू आप्पा देशपांडे व नारायण अनंत ऊर्फ बाबूराव देशपांडे यांचा उजवा हात व डावा पाय अज्ञातांनी तोडून टाकला. हे दोघेही पोलिसांना सहकार्य करतात असा भूमिगत कार्यकर्त्यांच्या समर्थकांना संशय होता. या हिंसक घटनेचे तीव्र पडसाद उमटले. पोलिसांना मदत करणाऱ्यांना भूमिगत कार्यकर्ते शिक्षा करतात हे समजल्यामुळे चळवळीतील कार्यकर्त्यांविषयी जनतेत दहशतीचे वातावरण तयार झाले. या गुन्ह्यातील संशयित आरोपी म्हणून २०-२२ लोकांविरुद्ध गुन्हा नोंद झाला, पण पोलिसांना चौकशीच्यावेळी ग्रामस्थांनी सहकार्य न करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे पोलीस चौकशीत काहीही निष्पन्न झाले नाही. पोलिसांना सहकार्य करणाऱ्यांना मात्र चांगलीच जरब बसली. बाबूराव देशपांडे यास जबर दुखापत करण्याच्या आरोपावरून पडवळवाडी येथील तुकाराम नाना खोत (वस्ताद), कृष्णा रामा करमाळकर (तात्या), हरी गणू कदम (भाऊ), यशवंत बापू करमाळकर, महादेव अनुसे धनगर (देवास), शाम ऊर्फ तुकाराम साधू कुंभार व दत्तू लखू बाड या सात जणांवर आरोपपत्र ठेवण्यात आले, पण ते सर्व फरारी असल्यामुळे

पुढची प्रक्रिया होऊ शकली नाही. सातारा तुरुंगातून सहीसलामत बाहेर पडल्यापासून नागनाथअण्णांचे नाव प्रतिसरकारचे प्रमुख क्रांतिकारक म्हणून इंग्रज सरकारच्या पोलिसांच्या यादीत अग्रक्रमावर आले. त्यांना पकडण्यासाठी सरकारचा प्रचंड आटापिटा सुरू झाला. त्यासाठी गिल्बर्ट नावाच्या खास पोलीस अधिकाऱ्याची सरकारने नेमणूक केली. नागनाथअण्णांना पकडण्याचा त्याने विडा उचलला होता. नागनाथअण्णा जरी भूमिगत होते, तरी विविध कार्यक्रमांना लपून छपून उपस्थित राहत असत. पोलिसांनाही याचा अंदाज असायचा, पण नागनाथअण्णा पोलिसांना हुलकावणी देत असत. पोलिसांची चाहूल लागताच ते कार्यक्रमाच्या ठिकाणाहून लगोलग पसार होत. ऐतवडे बुद्रुक येथे २६ जानेवारी, १९४५ ला स्वामी रामानंद भारती यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शेतकरी मेळाव्यास ते उपस्थित होते. या मेळाव्यानंतर राजमती पाटील यांच्या घरी नेते व प्रमुख कार्यकर्त्यांसाठी भोजनाचा कार्यक्रम होता. तेथे नागनाथअण्णाही भोजनासाठी आलेले होते. पोलिसांना या गोष्टीचा सुगावा लागताच त्यांनी राजमती पाटील यांच्या घराला वेढा दिला. पोलीस अधिकारी गिल्बर्ट स्वतः या मोहिमेवर आला होता. गिल्बर्ट आल्याचे पाहताच नागनाथअण्णा जेवणाच्या ताटावरून उठले व घराच्या मागच्या बाजूने तटावरू उडी मारून ते पसार झाले. गावाबाहेरील एका विहिरीजवळ असलेल्या गुहेत सुरक्षित जागी दडून बसले. ते पोलिसांच्या हाती लागू शकले नाहीत. गिल्बर्टला हात हलवीत परत जावे लागले. शेकडो लोकांच्या साक्षीने घडलेले हे थरारनाट्य कल्पनेहून भयंकर म्हणावे लागेल.

## दोन सहकारी हुतात्मे

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनापासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंतचा काळ हा प्रतिसरकारच्या क्रांतिकार्याचा कालखंड मानला जातो. या काळात एका बाजूला भूमिगत कार्यकर्ते सरकारविरोधी मोहिमा राबवत, तर दुसरीकडे विधायक उपक्रमही पार पाडत असत. कुठेही जाहीर न करता क्रांतिसिंह नाना पाटील यांची भाषणे होत असत. स्वातंत्र्याचे मोल लोकांच्या मनावर ठसवून सरकारविरोधात जनमत तयार करण्याबरोबरच शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, अंधश्रद्धाविरोधी प्रबोधन करणे, लोकांच्यात स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्यासाठी प्रेरणादायी वातावर तयार करणे अशा विविध गोष्टी भूमिगत नेत्यांकडून केल्या जात. नाना पाटील यांच्याप्रमाणेच नागनाथअण्णा, जी. डी. बापू लाड, किसन वीर, वसंतदादा पाटील, डॉ. उत्तमराव पाटील, व्यंकटराव रणधीर असे भूमिगत नेते आपापल्या पद्धतीने ठिकठिकाणी कार्यरत होते. नागनाथअण्णांनी तर नेताजी सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेच्या धर्तीवर

लढाऊ सेना उभारण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यासाठी ठिकठिकाणाहून बंदुका, काडतुसे, पिस्तुले आदिंची जमवा जमव केली होती. गोव्याहून लपून छपून बंदुका आणण्यापासून पोलिसांच्या बेसावधापणाचा फायदा घेत सरकारी बंदुका पळविण्यापर्यंत नाना उपद्व्याप केले. वाळवा तालुक्यात ऐतवडे बुद्रुक येथे आणि नंतर कोल्हापूर जिल्ह्यात धावडे येथे युवकांना लष्करी शिक्षण देऊन क्रांतिकार्यासाठी तयार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. दोघा लष्करी जवानांना खास प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी पंजाबहून आणले. मनसासिंग व नानकसिंग हे ते शीख जवान पूर्वी आझाद हिंद सेनेत सामील झाले होते. तथापि त्यांची शीख रेजिमेंट इंग्रजांनी बंदिवान करून त्यातील सैनिकांना युद्धकैदी बनवून ताब्यात घेतले होते. त्या बंदिवासातून सुटका करून घेऊन ते पंजाबात परतले होते. नागनाथअण्णांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना क्रांतिकारकांच्या प्रशिक्षणासाठी वाळव्यास आणले. पोलिसांची नजर चुकवून गुपचूपपणे निर्जन परिसरात वा घनदाट जंगल विभागात हे प्रशिक्षण चालत असे. या शीख तरुणांपैकी नानकसिंग व नागनाथअण्णांचा एक सहकारी किसन अहिर हे २५ फेब्रुवारी, १९४६ ला पोलिसांशी झालेल्या चकमकीत शहीद झाले. प्रशिक्षण कँपवर पोलिसांनी धाड टाकल्यानंतर तेथून निसटून जाणाऱ्या प्रशिक्षणार्थींवर पोलिसांनी केलेल्या हल्ल्यात हे दोघे गंभीर जखमी झाले होते. राऊतवाडी येथे या हुतात्म्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. नानकसिंग व किसन अहिर यांच्या शहीद होण्यामुळे फौजी संघटनेची मोठी हानी झाली. या घटनेनंतर मनसासिंग यांना नागनाथअण्णांनी पंजाबला परत पाठवले. त्या दोघांनी केलेल्या लष्करी प्रशिक्षण कार्याची प्रतिसरकारच्या इतिहासात कायमची नोंद झाली. आपला मुलूख सोडून स्वातंत्र्याच्या प्रेरणेने भारावलेल्या या दोघा पंजाबी तरुणांमुळे नागनाथअण्णांनी उभारलेल्या फौजी संघटनेस मोठे बळ प्राप्त झाले होते आणि चळवळीतही नवचैतन्य निर्माण झाले होते. सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेच्या कार्यामुळे प्रभावित झालेल्या नागनाथअण्णांनी त्यांच्याच पद्धतीने वाळवा तालुक्यात स्थापन केलेल्या सशस्त्र संघटनेने एक इतिहास घडविला. अशाप्रकारे तत्कालिन सातारा जिल्ह्यात वाळवा व कुंडल येथे उभारण्यात आलेल्या सशस्त्र संघटना देशात अपवादात्मकच म्हणाव्या लागतील. इंग्रज सरकारशी सशस्त्र संघर्ष करण्याची कल्पना नागनाथअण्णांच्या मनात १९४२ पासूनच रुजली होती. ६ सप्टेंबर, १९४२ ला सातारा जिल्ह्यातील वडूज येथील मोर्चावर इंग्रज सरकारच्या पोलिसांनी केलेल्या गोळीबारात ९ लोक हुतात्मा झाले होते. त्यानंतर इस्लामपूर येथे मोर्चावर झालेल्या गोळीबारात किर्लोस्करवाडीचे इंजिनिअर उमाशंकर पंड्या व कामेरीचे विष्णू बारपट्टे शहीद झाले होते. निशस्त्र लोकांच्या मोर्चावर पोलिसांनी अनपेक्षितपणे लाठीमार

सुरू केला व त्यानंतर सैरावैरा पळणाऱ्यांवर स्वैर गोळीबारही करण्यात आला. या गोळीबारात दोघांना प्राण गमवावा लागला, तर असंख्य लोक जखमी झाले. ही गोष्ट नागनाथअण्णांच्या मनावर गंभीर परिणाम करणारी ठरली होती. त्याचवेळी त्यांनी सशस्त्र संघटना उभी करून इंग्रजांशी संघर्ष करण्याचा निश्चय केला होता. पुढे हा विचार त्यांनी लष्करी प्रशिक्षण केंद्र उभारून प्रत्यक्षात आणला. विशेष म्हणजे या केंद्रात काही महिलांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. स्वातंत्र्य लढ्याचा तो अत्यंत महत्त्वाचा काळ ठरला. लढ्याने त्यावेळी जणू अत्युच्च शिखर गाठले होते. स्वातंत्र्याच्या धगधगत्या विचाराने पेटलेल्या दिवसांचा तो मंतरलेला काळ होता. असंख्य तरुण त्या वातावरणाने भारावून गेले होते.

स्वातंत्र्य अगदी दृष्टिपथात आले असतानाही नागनाथअण्णांनी सशस्त्र लढ्यासाठीची तयारी सुरू ठेवली होती. या काळात फौजी संघटनेतील प्रशिक्षणार्थींच्या पोलिसांशी बऱ्याचदा चकमकी होत होत्या. कधी भूमिगतांची सुटका करण्यासाठी तर कधी प्रशिक्षण केंद्रांवर पोलिसांनी छापा टाकण्याचा प्रयत्न चालविला म्हणून ठिकठिकाणी संघर्ष होत राहिला. नानकसिंग व किसन अहिर हे पोलिसांशी झालेल्या अशाच एका चकमकीत हुतात्मा झाले. नागनाथअण्णांच्या दृष्टीने हा फार मोठा धक्का होता. व्यक्तिशः ते तर अत्यंत व्यथित झालेच, पण प्रशिक्षण घेणाऱ्या छावणीतील सर्व तरुणांवर या घटनेचा विलक्षण परिणाम झाला. साऱ्या छावणीवर दुःखद छाया पसरली. तथापि त्यानंतरही प्रशिक्षण कार्य सुरुच राहिले. या हुतात्म्यांपासून प्रेरणा घेऊन संघटनेतील कार्यकर्ते जिद्दीने पेटून उठले व त्यांचे प्रशिक्षण कार्य अधिक जोमाने सुरू झाले. त्या सशस्त्र चकमकीनंतर इंग्रज सरकारच्या पोलिसांनी लष्करी प्रशिक्षण छावणीतील भूमिगतांचा जणू धसका घेतला व ते पुन्हा त्यांच्या वाटेला गेले नाहीत. भूमिगतांच्या या संघटनेची मोठीच दहशत निर्माण झाली, पण सर्वसामान्यांना मात्र कसलीच भीती वाटत नव्हती. उलट त्यांना सहकार्य केले जाऊ लागले. भूमिगत चळवळीतील नेत्यांनी एक पथ्य पाळले होते. सामान्य जनतेला कुठलाही त्रास होणार नाही याची दक्षता सर्व भूमिगत कार्यकर्त्यांनी घ्यावी असा दंडक घालून देण्यात आलेला असल्यामुळे हाती असलेल्या शस्त्रास्त्रांचा गैरवापर होत नव्हता. गोरगरिबांना त्रास देणाऱ्या, नाडणाऱ्या लोकांना मात्र योग्य धडा शिकवला जात असे, पण या बाबतीत पूर्ण खातरजमा केल्याशिवाय कोणालाही 'शिक्षा' केली जात नसे. भूमिगतांच्या नावावर गुंडगिरी व लूट करणाऱ्यांच्या काही टोळ्या तयार झाल्या होत्या. त्यांना इंग्रज पोलिसांची फूस असे. त्यांच्यामुळे भूमिगतांविषयी जनतेत गैरसमज निर्माण होत असत आणि चळवळही बदनाम होत असे. अशा टोळ्यांचा

छडा लावून त्यांचा बंदोबस्त करण्याचा मार्ग अवलंबला जाई. पोलिसांना भूमिगतांविषयी माहिती देऊन चळवळीशी गद्दारी करणाऱ्यांना तसेच पोलिस खबऱ्यांना, भूमिगतांविरोधात पोलिसांना मदत करणाऱ्यांना मात्र धडा शिकवला जात असे. तथापि, सामान्य व निरपराधांवर अन्याय होणार नाही, याबाबत दक्षता घेतली जात असे. इंग्रजांशी सशस्त्र लढा देऊन स्वातंत्र्य मिळविण्याचे ध्येय बाळगलेल्या आझाद हिंद सेनेचा आदर्श समोर ठेवून कार्यरत झालेल्या लष्करी संघटनेचे कार्य वाढत व विस्तारत असताना नागनाथअण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांना विविध संकटांचा सामना करावा लागला. अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले. एकीकडे पोलिसांचा छापा कधी पडेल ही सतत चिंता असे, तर दुसरीकडे छावणीतील प्रशिक्षणार्थींसाठी करावा लागणाऱ्या खर्चाची काळजी असे. या दोन्ही आघाड्यांवर मोठ्या जिद्दीने सामना करीत लष्करी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू ठेवण्यात नागनाथअण्णा यशस्वी झाले होते. या बाबतीत लोकांचे मिळणारे सहकार्य मोलाचे होते. त्यांच्या कार्याविषयी सामान्य जनतेत आदराची भावना होती. प्रशिक्षण केंद्रातील सर्वांनाच स्वातंत्र्याची आस लागून राहिली होती. नागनाथअण्णांवरील निष्ठेने व विश्वासाने त्यांच्या कार्यात सहभागी झालेल्या त्यांच्या सर्वच साथीदारांना स्वातंत्र्याच्या प्रेरणेने झपाटून टाकले होते. या क्रांतिकार्यात उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडूनही पाठिंबा व सहकार्य मिळत होते. काही गावे तर स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यात पूर्णांशाने सहभागी झाली होती. तेथील ग्रामस्थ भूमिगतांना सर्वतोपरी सहकार्य करीत. त्यामुळेच डोंगरदऱ्यांच्या साक्षीने व जंगलाच्या आधाराने निर्मनुष्य भागात भूमिगतांच्या लष्करी प्रशिक्षणाचे कार्य शांततेत व सुरळीतपणे पार पडत असे. १९४४ पासून १९४६ पर्यंत व नंतरही अगदी स्वातंत्र्याचा संधिप्रकाश दृष्टिपथात येईपर्यंत या भूमिगत संघटनेचे कार्य सुरूच राहिले.

## विधायक कार्याचा मार्ग

२१ सप्टेंबर, १९४५ ला मुंबईत गवालिया टँकवर अखिल भारतीय काँग्रेस समितीची बैठक झाली. पंडित जवाहरलाल नेहरूंनी या बैठकीत आणि दुसऱ्या दिवशी चौपाटीवर झालेल्या सभेत सातारा जिल्ह्यातील भूमिगतांच्या क्रांतिकार्याचा गौरव केला. २० ऑक्टोबर, १९४५ ला सरकारने सभा-संमेलनांवरील बंदी उठवली व निवडणुका जाहीर केल्या. काँग्रेस पक्षाने निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. मुंबई इलाख्यात बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले. २५ एप्रिल, १९४६ ला या सरकारने सर्व भूमिगतांवरील पकड वॉरंटे रद्द केली. १६ मे, १९४६ ला सातारा जिल्ह्यातील भूमिगतांचा स्वागत समारंभ कराड तालुक्यातील कणेगाव येथे भव्य प्रमाणात साजरा झाला. या

सोहळ्यात क्रांतिसिंह नाना पाटील व अन्य भूमिगतांचा जाहीर सत्कार करण्यात आला. नागनाथअण्णाही या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहिले.

कणेगावच्या सत्कार सोहळ्यानंतर भूमिगतांचे अन्यत्रही ठिकठिकाणी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले. नागनाथअण्णांनी मात्र नंतर कुठल्याही सत्कार समारंभास उपस्थित राहणार नसल्याचे जाहीर केले. नानकसिंग व किसन अहिर हे आपले दोन जीवलग सहकारी २५ फेब्रुवारी, १९४६ ला म्हणजे दोनच महिन्यांपूर्वी पोलिसांशी झालेल्या गोळीबारात ठार झाल्यामुळे नागनाथअण्णा अद्याप त्या धक्क्यातून सावरले नव्हते. त्यामुळेच त्यांनी कुठेही सत्कार न स्वीकारण्याचा निर्णय घेतला व स्वत:ला विधायक कार्यात गुंतवून घेण्याचे ठरविले. सामुदायिक शेती आणि शैक्षणिक काम हा या कार्याचा पहिला टप्पा होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ऐतवडे बुद्रुक येथील आपल्या मालकीची जमीन सामुदायिक शेतीसाठी देऊ केली होती. त्या संदर्भात २२ मे, १९४६ ला ऐतवडे बुद्रुक येथे त्यांनी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. ही बैठक झाली, त्या रात्रीच कामेरी येथील कुप्रसिद्ध गुंड सखाराम बारपटे व शिवा महार (वशी लाडेगाव) यांनी केलेल्या गोळीबारात बाबूराव कोकाटे (पडवळवाडी) व प्रतापराव पाटील (ब्याकूड) हे तरुण ठार झाले. अनपेक्षित झालेल्या गुंडांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या तरुण सहकाऱ्यांच्या मृत्यूमुळे नागनाथअण्णा अत्यंत व्यथित झाले. विधायक कार्याच्या प्रारंभीच घडलेल्या या दु:खद घटनेने प्रचंड नैराश्य येणे साहजिकच होते, पण नागनाथअण्णांनी मनोधैर्य खचू दिले नाही. मोठ्या धीराने त्यांनी आपल्या जीवनातील नवा अध्याय सुरू केला. सत्तेच्या राजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय त्यांनी याच काळात घेतला आणि १९४६ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून ते जाणीवपूर्वक अलिप्त राहिले. काँग्रेसच्या सत्तेच्या राजकारणात ते अडकले नाहीत. काँग्रेस पक्षापासून नागनाथअण्णा दूर राहिल्याचे दिसून येताच समाजवादी पक्षाचे नेते एस. एम. जोशी व जयप्रकाश नारायण हे त्यांना वाळवा येथे भेटण्यास आले व त्यांनी त्यांना समाजवादी पक्षात येण्याचा आग्रह केला, पण नागनाथअण्णांनी त्यांना विनम्रपणे नकार दिला. सत्तेच्या वा कुठल्याच सक्रिय राजकारणापेक्षा समाजकारणाची दिशा महत्त्वाची मानून त्यांनी त्या दिशेने वाटचाल करण्याचे ठरवले.

नागनाथअण्णांची कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर मोठी श्रद्धा होती. समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने भाऊरावअण्णांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे व मोलाचे आहे, असे त्यांचे ठाम मत होते. भूमिगत कार्यातून बाहेर पडल्यानंतर अण्णांच्या शैक्षणिक कार्याला मदत करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. आर्थिक सहकार्याची गरज असणाऱ्या रयत शिक्षण

संस्थेसाठी निधी संकलनाचे काम त्यांनी सुरू केले. या कार्याचा एक भाग म्हणून त्यांनी कराड तालुक्यातील गोळेश्वर येथे विद्यार्थी परिषदेचे आयोजन केले. या परिषदेस अध्यक्ष म्हणून सानेगुरुजींना निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेत कर्मवीर भाऊरावअण्णांच्या शैक्षणिक कार्यासाठी त्यांना एक लाख रुपयांचा निधी अर्पण करण्याची योजना जाहीर करून निधी संकलाचे आवाहन करण्यात आले. त्या काळात एवढी मोठी रक्कम उभी करणे हे मोठे आव्हान होते, पण नागनाथअण्णांनी ते स्वीकारले व ते कामाला लागले. निधी संकलनासाठी बापूजी साळुंखे, वाय. सी. पाटील, पी. जी. पाटील, बी. डी. कोकाटे यांची समिती स्थापन करण्यात आली होती. या परिषदेचा वृत्तांत राज्यातील विविध वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला. नागनाथअण्णा राजकारणाऐवजी विधायक कार्याकडे वळल्याचीही या निमित्ताने लोकांना माहिती झाली. दोन वर्षे त्यांनी या कामात पूर्ण लक्ष घातले आणि निधी संकलनाचे कार्य पूर्ण केले. या निधी अर्पण सोहळ्यासाठी महात्मा गांधींना निमंत्रित करण्याची योजना होती. परंतु देश स्वतंत्र झाल्यावर उसळलेल्या जातीय दंगलीमुळे गांधीजी येऊ शकले नाहीत. मात्र त्या कार्यक्रमासाठी त्यांनी संदेश पाठविला होता. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करून त्यांना हे कार्य अव्याहत सुरू ठेवण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या होत्या. दरम्यान ३० जानेवारी, १९४८ रोजी गांधीजींची हत्या झाल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलला गेला. नंतर संत गाडगे महाराजांच्या हस्ते भाऊरावअण्णांचा जाहीर सत्कार २७ नोव्हेंबर, १९४८ ला महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीदिनी करण्यात आला. सातारा शहरातून कर्मवीरअण्णांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीसाठी हत्ती आणण्यात आला होता, पण त्यांनी गाडगे महाराजांबरोबर मिरवणुकीत पायी चालणेच पसंत केले. मिरवणुकीत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. मिरवणुकीनंतर झालेल्या जाहीर समारंभात संत गाडगे महाराजांच्या हस्ते एक लाख रुपयांचा कृतज्ञता निधी कर्मवीर भाऊरावअणांना अर्पण करण्यात आला. भाऊरावअण्णा या जाहीर सत्काराने अत्यंत भारावून गेले. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, 'मला आज एक लाख हृदये मिळाली आहेत. मी एक साधा रयत सेवक आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, सद्‌गुरू गाडगे महाराज यांच्याकडून मी शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेतली आहे. 'स्वावलंबनातून शिक्षण' हे जगातील शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. मला व माझ्या संस्थेला असेच सहकार्य मिळत राहावे अशी अपेक्षा आहे.'

कर्मवीर भाऊरावअण्णांच्या शैक्षणिक कार्याविषयी नागनाथअण्णांना प्रचंड आस्था होती. एक लाखाचा निधी जमविण्यासाठी तर त्यांनी खूपच कष्ट घेतले. जाहीर केल्याप्रमाणे

निधी संकलित करण्याचे काम त्यांनी पार पाडलेच, पण त्यानंतरही या कार्यासाठी कर्मवीरअण्णांना ते मदत करीत राहिले. आपल्या भावाच्या लग्नासाठी वधू पक्षाकडून मिळालेल्या ७०० रुपयात आणखी ३०० रुपयांची भर घालून ती रक्कम कर्मवीरअण्णांच्या शैक्षणिक निधीसाठी देऊन त्यांनी एक नवा पायंडा पाडण्याचा प्रयत्न केला. कर्मवीरअण्णांच्या कार्याची ओळख नागनाथअण्णांना ते कोल्हापूरला विद्यार्थी असल्यापासून झाली होती व ते प्रचंड प्रभावित झाले होते. आपणही भावी काळात अशा प्रकारचे कार्य करावे, असे त्यांना वाटत होते. कर्मवीर भाऊरावअण्णांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन १९४०-४१ च्या सुमारास त्यांनी शिराळा तालुक्यातील अतिदुर्गम भागात स्वयंसेवी शाळा सुरू केली होती. या कार्याला संस्थात्मक स्वरूप देऊन त्यांनी आणखी २२ ठिकाणी स्वयंसेवी शाळा व दोन वसतिगृहे सुरू केली. किसान शिक्षण संस्थेच्या वतीने वाळवा व सोनवडे येथे निवासी शाळा सुरू केल्या. या वसतिगृहातील गरीब विद्यार्थ्यांच्या निवास, भोजनाची मोफत सोय केली. या वसतिगृहांसाठी घरोघरी जाऊन धान्य व निधी गोळा करण्यात ते स्वतः आघाडीवर राहून काम करीत. सर्व विद्यार्थ्यांचे भोजन झाल्याशिवाय शिक्षकांनी जेवण घेऊ नये, असा नियम त्यांनी केला होता. विशेष म्हणजे नागनाथअण्णा स्वतः हा नियम पाळत असत. घरून डबा मागवून नेहमी वसतिगृताच भोजन घेत. हे पथ्य त्यांनी अखेरपर्यंत पाळले. घरी ते कधीच भोजन घेत नसत. वसतिगृहातील विद्यार्थी जे अन्न घेत, तेच शिक्षकही सर्वांबरोबर घेत, यात कसलाही दुजाभाव नव्हता. सारे मनापासून आणि आत्मियतेने केले जात असे.

नागनाथअण्णांना खरे तर शिक्षक व्हायचे होते. बी.ए.बी.टी. होऊन गावात शाळा सुरू करायचा विचार त्यांच्या मनात सातवी इयत्तेत असतानाच रुजला होता, पण पुढे ते स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले आणि त्यांचे शिक्षण थांबले. मात्र शिक्षणाविषयीची ओढ मनात कायम राहिली. शिक्षणाचे महत्त्व तर त्यांना नेहमीच वाटत असे. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी मनोमन जाणले होते. त्यामुळेच कर्मवीर भाऊरावअण्णांच्या कार्याविषयी त्यांना आत्मियता वाटत असे. आपणही अशा प्रकारचे कार्य करावे ही ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. पदवीधर होण्याची त्यांना संधी मिळाली नाही, पण समाज परिवर्तनासाठी शिक्षणाला अग्रक्रम देण्याची गरज आहे हे त्यांनी ओळखले व त्यादृष्टीने वाटचाल सुरू ठेवली. लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय गावोगावी होण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले. नागनाथअण्णांचे जे दोन सहकारी नानकसिंग व किसन अहिर पोलीस गोळीबारात

शहीद झाले होते, त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सोनवडे येथे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व किसन अहिर वसतिगृह सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. एका बाजूला शैक्षणिक कार्य सुरू ठेवण्याबरोबरच नागनाथअण्णांनी सामाजिक प्रश्नांकडेही लक्ष द्यायला सुरुवात केली. तत्कालिन दलित समाजाची स्थिती आजच्याहून कितीतरी कठीण होती. त्यांच्या उन्नती व प्रगतीसाठी विविधांगी प्रयत्नांची गरज होती. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या मार्गाने सुरू होते. एकीकडे महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निवारणासाठी काही कार्यक्रम राबवायला सुरूवात केली होती, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला होता. साने गुरुजींनी दलितांच्या मंदिर प्रवेशासाठी उपोषण केले होते. कर्मवीर भाऊरावअण्णांच्या प्रमाणेच नागनाथअण्णांनीही दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करून त्यांना शिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. डॉ. आंबेडकरांनी महार वतने रद्द करण्यासाठी कायदेशीर मार्ग अवलंबला होता. नागनाथअण्णांनी त्यांच्या या कार्यात त्यांना साथ देण्याच्या दृष्टीने 'वतन मुक्ती लढा' सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी वाळवा व तासगाव तालुक्यातील ऐंशी गावात त्यांनी समित्या स्थापन केल्या व जनजागृती आणि प्रबोधन कार्य सुरू केले. ऐंशी गावातील प्रत्येकी पाच प्रमाणे महार समाजातील प्रतिनिधी व त्यांच्या समर्थकांची परिषद वाळवा येथे घेण्याच्या दृष्टीने नागनाथअण्णांनी ग्रामीण भागात दौरा केला व थेट जनसंपर्काद्वारे महार वतनदारांना संघटित केले. वाळवा येथील परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. परिषदेत महारांनी गावकीची कामे बंद करण्याचा निर्धार केला. तसेच महार वतनांचे रयतावा पद्धतीत रुपांतर करण्याची मागणी केली. महारांनी समतेसाठी केलेल्या या मागण्या अत्यंत महत्वाच्या होत्या. वाळवा परिषदेतील महारांच्या आवाजाचा मोठा परिणाम झाला. दलितांच्या दृष्टीने समाज परिवर्तनाच्या दिशेने टाकले गेलेले हे महत्वाचे पाऊल ठरले. महार समाजातील अनिष्ट रुढी व वेठबिगारी बंद होण्याच्या दृष्टीने सुरू असलेली चळवळ गतिमान होण्यास वाळवा परिषद पूरक ठरली. महार वतने नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९ मार्च, १९२८ रोजी ब्रिटिश कौन्सिलमध्ये कायद्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर १७ सप्टेंबर, १९३७ मध्ये पुन्हा मांडला होता, पण कायद्याच्या या प्रस्तावाला पुरेसा पाठिंबा न मिळाल्याने तो कार्यवाहीत येऊ शकला नव्हता. अखेर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर हा कायदा अस्तित्वात आला. मधल्या काळात ज्या अनेकांनी त्यासाठी प्रयत्न केले, त्यात नागनाथअण्णांचा वाटाही मोलाचा ठरला. वाळवा येथे त्यांनी घेतलेली 'महार वतन मुक्ती परिषद' ही त्या प्रयत्नांचीच निदर्शक म्हणता येईल. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक सुधारणांसाठी प्रयत्न

करताना उपेक्षित महार समाजाच्या व्यथा-वेदनांची जाणीव ठेवून त्या दूर करण्यासाठी सक्रिय राहिलेला नागनाथअण्णांसारखा नेता अपवादात्मकच ! समाजातील खालच्या थरातील घटकांविषयी आस्था व तळमळ असणाऱ्या नागनाथअण्णांचे वेगळेपण अधोरेखित करणारीच ही घटना म्हणावी लागेल.

## स्वकीय सरकारशी संघर्ष

परकीय सत्तेविरुद्ध स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांचे काम स्वातंत्र्यानंतर खरे तर पूर्ण व्हायला हवे होते, पण तसे झाले नाही. नागनाथअण्णांसारख्या नेत्यांच्या दृष्टीने इतर विविध कामांचा डोंगर नव्याने तयार झाला. सामाजिक प्रश्नांसाठी त्यांचा संघर्ष सुरू राहणार होताच, पण काही राजकीय धोरणांविरुद्ध आपल्याच सरकारशी संघर्ष करण्याची वेळ आली. शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या समस्या समोर आल्या. त्यातील एक होती, त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्याबाबतची. त्या काळी सरकार शेतकऱ्यांकडून 'लेव्ही' रुपाने धान्य खरेदी करत असे. या 'लेव्ही' म्हणून घेतल्या जाणाऱ्या धान्याला सरकार योग्य भाव देत नसल्यामुळे नागनाथअण्णांनी त्याविरुद्ध आवाज उठविण्याचे ठरविले. सरकारकडून 'लेव्ही' खरेदीच्या धान्याला योग्य भाव मिळाला पाहिजे ही जशी शेतकऱ्यांची मागणी होती, त्याचप्रमाणे शेती उत्पादनासाठी लागणाऱ्या वस्तू रास्त भावात मिळाव्यात, ही देखील त्यांची मागणी होती. या मागण्यांसाठी व सरकारी धोरणांच्या निषेधार्थ नागनाथअण्णांनी वाळवा तालुक्यात जुने खेड येथे शेतकरी परिषद आयोजित केली. सरकारविरोधात त्यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे तत्कालीन गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भूमिगत लढ्यातील कार्यकर्त्यांनी आपल्याकडील शस्त्रे सरकारजमा करावीत असे जे फर्मान त्यांनी काढले होते, त्याला वाळवा तालुक्यातील कार्यकर्त्यांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे आधीच ते चिडून होते. तशात आता सरकारविरोधी परिषद घेऊन आंदोलनाचा मार्ग अवलंबल्यामुळे नागनाथअण्णांविषयीच्या त्यांच्या संतापात आणखी भर पडली. जुने खेड येथील परिषदेस क्रांतिसिंह नाना पाटील, कॉम्रेड दत्ता देशमुख, कॉम्रेड यशवंत चव्हाण आदी नेते उपस्थित राहिले व त्यांनी शेतकऱ्यांवरील अन्यायाविरोधात आवाज उठवला. या परिषदेचा मोठा गाजावजा झाला. त्यामुळे डिवचल्या गेलेल्या मोरारजींनी १९४२ च्या लढ्यातील शस्त्रास्त्रे परत न केल्याच्या कारणावरून नागनाथअण्णांविरोधी पकड वॉरंट काढले. दरम्यान नागनाथअण्णांनी पदवी शिक्षण पूर्ण करण्याचे ठरवून कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये

प्रवेश घेतला होता. पोलिसांनी त्यांना कॉलेजात जाऊन पकडण्याचा प्रयत्न केला, पण त्यावेळचे कॉलेजचे प्राचार्य बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांनी त्यांना कॉलेजमधून बाहेर पडण्यास मदत केली. त्यामुळे त्यांची अटक टळली. नागनाथअण्णा तेथून पसार झाले. त्यानंतर काही दिवसांनी किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर कंपनीच्या कामगारांसमोर ते भाषण करीत असताना पोलिसांनी त्यांना पकडण्याचा पुन्हा प्रयत्न केला. पोलिसांचा सुगावा लागताच नागनाथअण्णांनी कारखान्याच्या भिंतीवरून उडी मारून पळून जाण्याचा मार्ग अवलंबला, पण तो यशस्वी झाला नाही. भिंती पलीकडील कुंपणामुळे ते पोलिसांच्या हाती लागले. नागनाथअण्णांना तेथून सांगली जेलमध्ये नेण्यात आले. त्यांना पोलिसांनी अन्यायकारक रीतीने अकारण पकडून नेल्यामुळे संतप्त बनलेल्या कामगारांनी तत्कालीन दक्षिण सातारा जिल्ह्याच्या सांगली येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. सुमारे दहा हजार कामगार व त्यांचे समर्थक सांगलीपर्यंत पायी मोर्चाने गेले. जनतेच्या संतप्त भावनांची व हाताबाहेर जात असलेल्या परिस्थितीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी गृहमंत्रालयाशी संपर्क साधून नागनाथअण्णांची तुरुंगातून सुटका करण्यासाठी परवानगी मिळवली. सरकारला या प्रकरणी नमते घेऊन त्यांच्या सुटकेचा निर्णय तात्काळ घ्यावा लागला. सरकारला नामुष्की पत्करावी लागली. या घटनेमुळे नागनाथअण्णांविषयी असणाऱ्या जिव्हाळ्याच्या लोकभावनेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. त्यांची जनमानसातील प्रतिमा अधिकच उंचावली. ज्या तडफेने नागनाथअण्णा इंग्रज सत्तेविरुद्ध लढत राहिले, तोच बाणा जनतेच्या वतीने स्वकीय सरकारशी न्यायासाठी संघर्ष करताना त्यांनी कायम ठेवला. न्याय्य मागण्यांसाठी सरकारशी लढत राहण्याचा, शांततामय आंदोलनाचा मार्ग त्यांनी सातत्याने अवलंबला. भावी जीवनातही संघर्ष हा जणू त्यांच्या कार्यपद्धतीचाच भाग बनून राहिला. सांगलीतील मोर्चाच्या व नागनाथअण्णांची तुरुंगातून बिनशर्त सुटका केली जाण्याच्या या घटनेमुळे त्यांना सर्वसामान्य जनतेचा किती पाठिंबा होता आणि त्यांची लोकप्रियता केवढी मोठी होती हे दिसून आले. स्वातंत्र्यानंतर सक्रिय राजकारणापासून व सत्तापदापासून दूर राहण्याचा नागनाथअण्णांनी निर्णय घेतला होता, पण अन्यायाविरुद्धचा लढा मात्र थांबविला नव्हता. तो त्यांनी सुरूच ठेवला. किर्लोस्कर कारखान्यातील कामगारांचा लढा हा त्याचाच एक भाग होता. मोरारजी देसाई यांच्यासारख्या प्रभावी राजकीय नेत्याचा आणि पर्यायाने सत्ताधाऱ्यांचा रोष पत्करणे म्हणजे सत्तेच्या राजकारणाकडे पाठ फिरवण्यासारखेच होते. नागनाथअण्णांनी कशाचीही पर्वा न करता सरकारविरोधी भूमिका घेण्याचे धाडस अगदी प्रारंभीच्या टप्प्यातच दाखवले. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या सरकारमध्ये विविध सत्तापदे मिळविण्यासाठी काही

नेत्यांचा जोरदार आटापिटा सुरू असताना नागनाथअण्णांनी मात्र वेगळा मार्ग अनुसरला. सरकार परकीय असो वा स्वकीय, ते जर सर्वसामान्यांवर अन्याय करीत असेल, तर त्याविरुद्ध लढण्यासाठी नागनाथअण्णा नेहमीच अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहत आले. अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी लढण्याची परंपरा त्यांनी कायम राखली.

स्वातंत्र्यानंतर बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या काँग्रेसच्या पहिल्या मंत्रिमंडळात मोरारजी देसाई गृहमंत्री होते. या काळात सातारा जिल्ह्यात आणि त्यातही प्रामुख्याने तालुक्यात सूडाचे राजकारण सुरू झाले. वाळवा तालुक्यातील एक गुंड सखाराम बारपट्टे याने त्यावेळचे काँग्रेसचे आमदार के. डी. पाटील (कामेरी) यांचा खून केल्याचे उघडकीस आले. या खून प्रकरणाने सातारा जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली व भयग्रस्त वातावरण तयार झाले. हे सूडाचे राजकारण व खुनाचे प्रकार थांबावेत आणि शांततामय वातावरण निर्माण व्हावे यासाठी मोरारजी देसाई यांनी मुंबईत आपल्या निवासस्थानी सातारा जिल्ह्यातील प्रमुख स्वातंत्र्यसैनिकांची बैठक निमंत्रित केली. या बैठकीस वसंतदादा पाटील, बाबूजी पाटणकर, शेख काका, किसन वीर, कासेगावकर वैद्य यांच्याबरोबर नागनाथअण्णाही उपस्थित होते. त्यावेळी यशवंतराव चव्हाणांनी उपस्थित सर्वांची मोरारजींशी ओळख करून दिली. नागनाथअण्णांचा परिचय करून देताना मोरारजींनी त्यांच्याकडे पाहून 'आपण मोठे पुढारी झाला आहात' अशी उपहासगर्भ शेरेबाजी केली. 'मला कधी भेटला नाहीत' असेही ते म्हणाले. त्यावर 'पुढाऱ्यांना भेटण्याची मला सवय नाही' असे नागनाथअण्णांनी प्रत्युत्तर दिले. त्यावर मोरारजींनी 'ठीक आहे', असे म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. नागनाथअण्णांना हे खटकले. त्यांचे वर्तन अवमानकारक वाटल्याने 'ठीक आहे', असे म्हणून ते बैठकीतून उठून बाहेर पडले. विशेष म्हणजे इतर स्वातंत्र्यसैनिकांनाही मोरारजींचे वर्तन आवडले नाही व नागनाथअण्णांपाठोपाठ तेही बैठकीतून उठून निघाले. साहजिकच बैठक होऊ शकली नाही. तेथून बाहेर पडताना वसंतदादांनी नागनाथअण्णांच्या पाठीवर थाप मारली आणि त्यांनी 'योग्य ते केले' असे मत व्यक्त केले. मोरारजींसारख्या नेत्याने बोलावलेल्या बैठकीतून बाहेर पडण्याची कृती मोठी धाडसाची होती. नागनाथअण्णांनी बाणेदारपणा दाखविला आणि साताराचे पाणीही ! कसलेही दडपण न घेता आपल्या मनाला जे पटेल ते करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी बाणली होती. त्यांच्या या स्वतंत्र व बाणेदार वृत्तीचे दर्शन या प्रसंगानिमित्ताने उपस्थित साऱ्यांनाच घडले.

■■■■

# ४
# विवाह व शैक्षणिक कार्य

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भूमिगत राहून लढण्याचे दिवस संपले. अनेक कार्यकर्ते विविध विधायक कार्याकडे वळले. नागनाथअण्णांनीही शैक्षणिक व सामाजिक कार्यात स्वत:ला गुंतवून घेण्याचे ठरविले. शिक्षण पूर्ण करून गावी आपल्याच शिक्षण संस्थेत ज्ञानदानाचे कार्य करण्याचा त्यांचा विचार होता. तो त्यांनी व्यक्तही केला होता, पण त्याच वेळी त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई यांना मात्र नागनाथअण्णांनी आता लग्नाचाही विचार करावा असे वाटत होते. त्यादृष्टीने त्यांनी त्यांच्या मागे लकडा लावला होता. अखेर नागनाथअण्णांनी लग्नाला संमती दिली. आपल्यासाठी योग्य वधू पाहण्याविषयी त्यांनी आईला सुचवले. तासगाव तालुक्यातील बुरुंगवाडी येथील यशवंत गोविंद कदम यांच्या कन्येचे स्थळ नागनाथअण्णांच्या एका सहकारी कार्यकर्त्याने सुचवले. यशवंत कदम हे मिरज येथे पोस्ट मास्तर होते. त्यांची कन्या कुसुमताई त्यावेळी माध्यमिक शाळेत शिकत होती. लक्ष्मीबाई यांनी प्रत्यक्ष भेटून मुलगी पसंत केली. त्यानंतर बुरुंगवाडीस जाऊन मुलगी पाहण्याचा कार्यक्रम रीतसर पार पडला. नागनाथअण्णांचे कोल्हापूर येथील एक शिक्षक श्री. अय्यर यांच्या घरी लग्न अत्यंत साधेपणाने करण्याचे ठरले व त्यानुसार १३ फेब्रुवारी, १९४९ रोजी लग्नसोहळा पार पडला. नागनाथअण्णांच्या इच्छेनुसार वधू पक्षाकडून हुंडा वगैरे काहीही न घेता लग्न लावण्यात आले. विशेष म्हणजे ना भटजी, ना मंगलाष्टका ना मुहूर्ताची वेळ पाहणे वगैरे कसल्याही सोपस्काराविना लग्न समारंभ झाला. नागनाथअण्णांच्या गुरूभगिनीने यावेळी एक गाणे म्हटले आणि वधू-वरांनी परस्परांना पुष्पहार घातले. नागनाथअण्णांनी लग्नासाठी म्हणून नवे कपडे देखील घेतले नाहीत किंवा कसलाही डामडौल केला नाही. नेहमीच्या जुन्या कपड्यावरच लग्न समारंभ पार पडला. या लग्न सोहळ्यास अंकलखोप येथील पैलवान बिरनाळे, राजमतीताई, माधवराव गायकवाड, जी. आर. पाटील, मुलीचे आईडील, अय्यर पती-पत्नी अशी मोजकीच मंडळी उपस्थित होती. लग्न अत्यंत साधेपणाने करण्यामागे क्रांतिसिंह नाना पाटील यांचा प्रबोधनात्मक विचार होता. नाना पाटील आपल्या भाषणात नेहमी लग्नातील अनिष्ट रुढी, परंपरा व अनावश्यक खर्चावर टीका करीत असत.

अर्थातच नागनाथअण्णा हे नाना पाटील यांच्या विचारांचे पाईक असल्याने त्यांनी लग्न साधेपणाने करण्याचा मार्ग अवलंबला, हे ओघानेच आले. तत्कालीन परिस्थितीत चळवळीचा भाग म्हणून सत्यशोधकी पद्धतीने वा 'गांधी लग्न' करण्याचा मार्ग अनेक कार्यकर्ते जाणीवपूर्वक अवलंबत असत. साहजिकच नागनाथअण्णांनीही तोच सत्यशोधकी मार्ग पसंत केला. विशेष म्हणजे आपण कार्यकर्ते आहोत आणि भूमिगत चळवळीच्या काळात निर्माण झालेल्या काही छुप्या शत्रूंमुळे आपल्या जिवाला धोका आहे याची पूर्वकल्पना त्यांनी लग्नापूर्वी आपल्या पत्नीला व त्यांच्या कुटुंबीयांना स्पष्टपणे दिली होती. तसेच लग्नानंतर पुढे शिकण्याची कुसुमताईंना इच्छा आहे की नाही हे ही विचारून घेतले होते. जीवनाच्या भावी वाटचालीत आपल्या पत्नीला कोणत्या परिस्थितीशी सामना करावा लागेल किंवा आपल्या शैक्षणिक कार्यात कशी साथ द्यावी लागेल याबाबत स्पष्ट कल्पना देणे आपले कर्तव्य समजून त्यांनी सर्व खुलासा केला होता. कुसुमताईंना या एकंदर परिस्थितीची पूर्वकल्पना असल्यामुळे निःसंदिग्ध मनाने त्यांनी नागनाथअण्णांच्या सांसारिक जीवनात प्रवेश केला. नागनाथअण्णांना जीवनसाथी तर मिळालाच पण त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्यात सर्वस्व झोकून देणारा आणखी एक भक्कम सहकारीही लाभला. त्यांच्या भावी जीवनाच्या दृष्टीने कुसुमताईंची साथसंगत अत्यंत मोलाची ठरली.

कुसुमताईंचे शिक्षण लग्नानंतरही सुरू राहिले. मिरज हायस्कूलमधून ११ वी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात प्रवेश घेतला. त्यावेळी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये त्या राहत असत. या बोर्डिंगमध्ये त्या एकट्याच विद्यार्थिनी होत्या. १९६३ मध्ये पुणे विद्यापीठाच्या पदवीधर झाल्यानंतर त्यांनी वाळवा येथील जिजामाता कन्या शाळेत शिक्षिका म्हणून नोकरीस प्रारंभ केला. दरमहा दीडशे रुपये मानधनावर त्यांचे शैक्षणिक सेवाकार्य सुरू झाले. नागनाथअण्णांना त्यांच्या प्रत्येक लढ्यातही त्या साथ देत राहिल्या. पुढे १९६५ साली त्या बी. एड. झाल्या आणि त्यानंतर माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली व २६ वर्षांहून अधिक काळ ती पार पाडली.

## हुतात्म्यांच्या नावे शिक्षण संस्था

नागनाथअण्णांचा विवाह झाला त्यावेळी वाळवा येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू होते. १९४९ साली त्या इमारतीचे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्या चार खोल्यांच्या इमारतीचा पुढे विस्तार होत गेला. शासकीय

अनुदान नसल्याने ही इमारत लोकवर्गणीतूनच उभी राहिली होती. अनुदान मिळण्यासाठी रीतसर शिक्षण संस्थेची स्थापना करणे गरजेचे होते. त्यामुळे संस्था स्थापन करून ३१ ऑगस्ट, १९५३ ला तिची नोंदणी करण्यात आली. किसान शिक्षण संस्था हे नाव संस्थेस जाणीवपूर्वक देण्यात आले व संस्थेची उद्दिष्टेही व्यापक ठेवण्यात आली. परिसराच्या शैक्षणिक गरजा विचारात घेऊन शिक्षण प्रसाराचे कार्य करण्याची व योग्य ते शिक्षण देण्याची व्यवस्था घटनात्मक तरतुदीद्वारे करण्यात आली. किसन अहिर विद्यालयातर्फे मुलामुलींच्यासाठी स्वतंत्र माध्यमिक विद्यालये सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी १९४९ मध्ये हुतात्मा नानकसिंग वसतिगृह तर १९६५ साली मुलींसाठी सावित्रीबाई फुले वसतिगृह सुरू करण्यात आले. गरीब मुले व मुलींसाठी मोफत निवास, भोजनाची सोय करण्यात आली. १९७५ मध्ये उच्च माध्यमिक विद्यालय सुरू झाले. नागनाथअण्णांनी आपल्या भूमिगत चळवळीच्या काळातील दोन सहकारी किसन अहिर व नानकसिंग यांची नावे शाळा व वसतिगृहासाठी नियोजनपूर्वक दिली. हे दोघेही पोलिसांच्या गोळीबारात हुतात्मा झाले होते. त्यांच्या स्मृती जोपासण्याचा एक कृतिशील प्रयत्न त्यांनी केला. हे दोघे ज्या सोनवडे परिसरात शहीद झाले होते, तेथेही त्यांच्या स्मृत्यर्थ माध्यमिक शाळा व वसतिगृह सुरू करण्याची योजना नागनाथअण्णांच्या मनात होती. पुढे १९८५ मध्ये तेथे सुमारे पन्नास एकर जागेत त्यांनी शैक्षणिक संकुल उभारले व आपल्या मनातील कल्पना प्रत्यक्षात आणली. वाळवा व सोनवडे या दोन्ही ठिकाणी दोन हजारांहून अधिक विद्यार्थी सध्या शिकत आहेत. अत्यंत गरीब व मागासलेल्या तसेच आदिवासी समाजातील महाराष्ट्रातील विविध ठिकाणची कितीतरी मुले-मुली शिक्षण घेत आहेत. अनेक देणगीदारांच्या उत्स्फूर्त देणग्यांतून या दोन्ही शैक्षणिक संकुलात वेगवेगळे उपक्रम राबविले जात असून सर्व विद्यार्थी आनंददायी शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

नागनाथअण्णांना शिक्षणाविषयी विलक्षण ओढ होती. त्यांना स्वतःला फार शिक्षण घेता आले नाही, पण शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटले होते. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकास व परिवर्तनासाठी शिक्षणाला पर्याय नाही हे ते जाणून होते. कर्मवीर भाऊराव अण्णांचा त्यांच्यापुढे आदर्श होता आणि सुरुवातीच्या कार्यात त्यांचेच मार्गदर्शन त्यांना लाभत होते. अत्यंत कठीण परिस्थितीत व अनेक अडीअडचणींवर मात करून त्यांनी शैक्षणिक संकुलाचा पाया घातला आणि परिश्रमपूर्वक त्याचा वाढविस्तार केला. त्यांचे हे शैक्षणिक संकुल आदर्श शैक्षणिक कार्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखले जाते. शैक्षणिक विस्तार कार्य सतत वाढतच गेले आणि त्यात उच्च शिक्षणाच्या विविध शाखांची भर पडत राहिली. पूर्व

प्राथमिक शिक्षणापासून ते पदवीपर्यंत तसेच विविध तंत्र शाखांच्या अभ्यासक्रमाची सोय तेथे करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे, किसान शिक्षण संस्थेने आपले कार्यक्षेत्र वाळवा व सोनवडेपुरते मर्यादित न ठेवता आजूबाजूच्या खेड्यांतही त्याचा विस्तार केला. शिरगाव येथे क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी विद्यालय व पडवळवाडी येथे हुतात्मा बाबूराव कोकाटे विद्यालय सुरू झाले. शैक्षणिक क्षेत्र हे तर नागनाथअण्णांच्या कार्याचे महत्त्वाचे अंग होतेच, पण केवळ संस्थाविस्तार हे मात्र त्यांनी मुख्य उद्दिष्ट मानले नव्हते. शिक्षणातून सुसंस्कारित, सजग व देशप्रेमी नागरिक घडले पाहिजेत याकडे त्यांचा कटाक्ष होता. या संस्था चालविताना सामाजिक भान त्यांनी सतत जोपासले होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर गुजरातमध्ये समाविष्ट झालेल्या डांग जिल्ह्यातील २७ विद्यार्थ्यांची त्यांनी वाळवा येथील वसतिगृहात व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे ३० सप्टेंबर, १९९३ ला मराठवाड्यात झालेल्या भूकंपामुळे निराश्रित बनलेल्या १०८ मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या निवास, भोजन व शिक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचे महनीय कार्य कर्तव्य भावनेने केले. समाजातील गरीब व तळागाळातील, उपेक्षित समाजातील मुलांसाठी तर त्यांच्या वसतिगृहात अग्रक्रमाने प्रवेश खुला होताच, पण कोणत्याही परिस्थितीत ही मुले शिक्षण अर्धवट सोडून जाणार नाहीत, याचीही ते दक्षता घेत असत. नागनाथअण्णा एकप्रकारे वसतिगृहातील सर्वच मुलांच्या पालकत्वाची जबाबदारी पार पाडीत असत. संस्कारक्षम वयात या मुलांची वाढ शारीरिक व मानसिकदृष्ट्या चांगल्या प्रकारे होऊन ते ज्ञानसंपन्न कसे होतील आणि देशप्रेमी नागरिक म्हणून भावी जीवनात कसे वावरू शकतील, याची त्यांना चिंता असे. त्यामुळे त्यांच्या रोजच्या खाण्यापिण्यापासून ते विविध खेळ व अभ्यासापर्यंत कोणत्याही बाबतीत ते तडजोड करीत नसत. म्हणूनच त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांबाबत 'हुतात्मा किसन अहिर विद्यालयाचा विद्यार्थी' एवढी ओळख पुरेशी बोलकी ठरत असे. नागनाथअण्णांच्या संस्थेने असे असंख्य विद्यार्थी खऱ्या अर्थाने घडविले. या विद्यार्थ्यांचे वेगळपण प्रकर्षाने जाणवत असे. वाळव्याच्या माळावर त्यांनी लावलेल्या ज्ञानज्योतीची मशाल पुढेही अधिकाधिक प्रज्वलित होत राहिली. महत्त्वाचे म्हणजे नागनाथअण्णांनी आपल्या संस्थेचे शैक्षणिक पावित्र्य जपले. त्यांनी आपला 'शिक्षणसम्राट' होऊ दिला नाही आणि शिक्षणाचा धंदा केला नाही. त्यांनी तयार केलेले कार्यकर्ते व शिक्षक वर्गही त्यांनी मळवलेल्या वाटेने आणि दाखविलेल्या दिशेनेच चालत राहिले. नैतिकता, त्याग आणि पावित्र्य या मूल्यांची जपणूक केल्यामुळेच शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य वेगळेपणाने व तेजस्वीपणे नजरेत भरते.

नागनाथअण्णांचे वास्तव्य संस्थेच्या वसतिगृहात असे आणि ते स्वतःही तेथेच भोजन घेत असत. त्यामुळे शिक्षण संस्था हेच खऱ्या अर्थाने त्यांचे कुटुंब होते.

शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेताना नागनाथअण्णांच्या पुढे ग्रामीण भागातील गोरगरीब, तसेच मागासलेल्या, उपेक्षित समाजातील, आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या मुलांचा विचार प्रामुख्याने होता. त्याबरोबरच मुलींच्या शिक्षणाचाही त्यांनी अग्रक्रमाने विचार केला होता. वाळवा येथे मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्रपणे सोय करताना त्यांच्यासाठी वसतिगृह सुरू करण्याचे त्यांनी आधीपासून ठरविले होते. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी किंवा शहरात पाठविण्यास त्यांचे पालक सहसा तयार नसत. त्यामुळे प्रारंभीच्या काळात खेडोपाडी जाऊन, मुलींच्या पालकांना विश्वासात घेऊन त्यांनी त्यांना वसतिगृहात ठेवण्यासाठी प्रवृत्त केले. विशेष म्हणजे नागनाथअण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई यांनाही मुलींच्या शिक्षणाविषयी अत्यंत आस्था होती. मुलींनी शिकले पाहिजे या भूमिकेतूनच त्यांनी आपल्या सूनबाईनाही शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. वसतिगृहातील मुलींच्या दृष्टीने त्या आईचीच भूमिका पार पाडत असत. वाळव्यातील मुले-मुली विविध खेळातही अग्रेसर असत. मुलींचा संघ जिल्हा व राज्यस्तरावर स्पर्धेसाठी जात असे, तेव्हा स्वतः लक्ष्मीबाई संघाबरोबर जात असत. मुलींची काळजी तर त्या घेत असतच, पण आपल्या शाळेच्या मुली विविध स्पर्धेत आघाडीवर असल्या पाहिजेत, असे त्यांना वाटत असे. अस्सल मराठमोळ्या वेशातील लक्ष्मीबाई शाळेच्या विविध उपक्रमात उत्साहाने भाग घेत असत आणि त्यांच्याविषयी साऱ्यांना आदरयुक्त भीती वाटत असे. शाळा आणि मुलींचे वसतिगृह हेच त्यांचे कार्यक्षेत्र असल्याने सगळीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असे. त्यांच्या छायेखाली असंख्य मुलींनी शिक्षण पूर्ण केले आणि विविध क्षेत्रात नावही कमावले. लक्ष्मीबाईंचाच वसा व वारसा पुढे नागनाथअण्णांच्या पत्नी कुसुमताईंनी चालवला. मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून त्या कार्यरत असल्याने त्यांच्याही मार्गदर्शनाचा शाळा व वसतिगृहातील मुलींना लाभ झाला. अत्यंत गरीब कुटुंबातील व मागासलेल्या, आदिवासी समाजातील शेकडो मुलींचे भवितव्य घडविण्यात साऱ्या नायकवडी कुटुंबियांचे योगदान फार मोठे व महत्त्वाचे ठरले. मुलींच्या शिक्षणाविषयीची आस्था हेच त्या मागचे एकमेव कारण होते. नायकवडी कुटुंबीयांच्या तीन पिढ्यांनी सारख्याच विचाराने व आस्थेवाईकपणाने मुलींच्या शिक्षणाचा समन्यायी पद्धतीने विचार करावा, हे उल्लेखनीय म्हणावे लागेल. नागनाथअण्णांना या कामाचे मोठेच समाधान वाटत असे.

▣▣▣▣

# ५

# राजकारण आणि संघर्ष

स्वातंत्र्यानंतर काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार स्थापन झाले. त्याचप्रमाणे मुंबई प्रांतातही काँग्रेसचीच सत्ता आली. सत्तेच्या राजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय नागनाथअण्णांनी घेतला होताच, पण इतर कुठल्या पक्षाशीही संबंध ठेवलेला नव्हता. वास्तविक साथी एस. एम. जोशी यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते, पण त्यांनी समाजवादी पक्षात सहभागी होण्याचे आवाहन करून देखील ते त्यांच्या पक्षापासून दूर राहिले. त्या पक्षाचे राष्ट्रीय नेते जयप्रकाश नारायण यांनीही त्यांना पक्षात येण्याविषयी आग्रह केला. तथापि, नागनाथअण्णांनी आदरपूर्वक त्यांना नकार दिला. धर्मनिरपेक्ष राहून स्वतंत्रपणे गोरगरीब कष्टकरी, शेतमजूर आणि दुर्बल घटकांसाठी कोणता राजकीय पक्ष काम करतोय, हे पाहून त्यानंतरच त्यात सामील होण्याचा आपण निर्णय घेऊ असे त्यांनी एस. एम. जोशी व जयप्रकाशजींनाही सांगितले होते. पुढे काही महिन्यांतच आपल्या विचारांशी जवळच्या वाटणाऱ्या कॉम्रेड दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखालील कामगार किसान पक्षात ते सहभागी झाले. काँग्रेस पक्षाने सर्वसमावेशक पद्धतीचे राजकारण सुरू केल्यामुळे मोठे भांडवलदार, जमीनदार, संस्थानिक व समाजातील उच्च वर्गाने या पक्षाला पाठबळ द्यायचे ठरविले. नागनाथअण्णांना हे पटण्यासारखे नव्हते. त्यामुळेच शेतकरी, कामगार व सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षांशी त्यांनी जवळीक साधली. दरम्यान १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा झाली. कामगार किसान पक्ष व डावा समाजवादी पक्ष (मार्क्सवादी लेनिनवादी) यांच्या संयुक्त आघाडीतर्फे वाळवा मतदारसंघातून नागनाथअण्णांची उमेदवारी जाहीर झाली. काँग्रेस पक्षाच्या विरोधात नागनाथअण्णांनी निवडणूक लढविली, पण विरोधी आघाडीतील अंतर्गत मतभेदामुळे येलूर येथील बोगर वकील हेही निवडणुकीत उतरले. परिणामी काँग्रेसविरोधी मतांची विभागणी होऊन नागनाथअण्णांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांच्यासारखा प्रभावी व लोकप्रिय उमेदवार असूनही विरोधकांत एकजूट न राहिल्याने त्यांना पराभूत व्हावे लागले. या निवडणुकीचा निकाल काय लागणार याचा नागनाथअण्णांना आधीच अंदाज आला होता. त्यामुळे पराभवामुळे खचून न जाता ते पूर्ववत आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याकडे वळले.

पुढे दोन-तीन वर्षांतच संयुक्त महाराष्ट्रासाठीचे आंदोलन सुरू झाले. द्विभाषिक राज्याची कल्पना १० ऑक्टाबर, १९५५ ला मांडण्यात आली. या कल्पनेला विरोध सुरू झाला आणि 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या मागणीसाठी राज्यभर आंदोलन सुरू झाले. संयुक्त महाराष्ट्रासाठीच्या लढ्यात विरोधी पक्षांच्या आघाडीत इतर नेत्यांबरोबर नागनाथअण्णाही सहभागी झाले. एस. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र समितीत सेनापती बापट, प्र. के. अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, ना. ग. गोरे, कॉम्रेड यशवंत चव्हाण, जयंतराव टिळक, जी. डी. (बापू) लाड, एन. डी. पाटील आदी नेत्यांच्या बरोबर नागनाथअण्णाही सक्रिय झाले. हा लढा म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील क्रांतिपर्वच ठरले. १० जानेवारी, १९५६ ला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र व गुजराथ ही द्विभाषिक राज्ये जाहीर करताना मुंबईचे अस्तित्व स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली. या निर्णयामुळे राज्यात संतापाची लाट उसळली. मुंबईत तर वातावरण अत्यंत तापले. शहरात ठिकठिकाणी पोलिस व आंदोलकांत संघर्ष सुरू झाला. आंदोलकांना अटकाव करणे पोलिसांना कठीण झाले. प्रमुख नेत्यांची धरपकड सुरू झाली. नागनाथअण्णाही त्यावेळी मुंबईत होते. संतप्त आंदोलकांना काबूत ठेवण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी पोलिसांना गोळीबार करण्याचा आदेश दिला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवर आंदोलक ठाम होते. १५ ते २१ जानेवारी, १९५६ या काळात मुंबईत ठिकठिकाणी झालेल्या पोलीस गोळीबारात १०५ लोकांना प्राण गमवावे लागले. संयुक्त महाराष्ट्रासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या या सर्वांना 'हुतात्मा' म्हणून संबोधण्यात येते. या हुतात्म्यांच्या यादीत विविध जातीधर्माच्या मराठी भाषिकांचा समावेश होता. विशेष म्हणजे त्यात काही महिलाही होत्या. आंदोलनात जखमी झालेल्यांची संख्या तर फारच मोठी होती. या हिंसक आंदोलनामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारविषयी जनतेत संतापाची भावना तयार झाली. या पार्श्वभूमीवर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा झाली. ही निवडणूक संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरच लढविण्याचा सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी निर्णय घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीतील अनेक नेते या निवडणूक रिंगणात उतरले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने नागनाथअण्णाही वाळवा मतदारसंघातून निवडणुकीस उभे राहिले आणि भरघोस मतांनी निवडून आले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एस. डी. पाटील यांचा त्यांनी पराभव केला. पश्चिम महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीला चांगले यश मिळाले. काँग्रेस उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर पराभवाचा फटका सहन करावा लागला. काँग्रेस पक्षाची बरीच पिछेहाट झाली. मात्र गुजराथ, मराठवाडा व विदर्भात काँग्रेसला चांगले यश मिळाल्याने

पुन्हा विशाल द्विभाषिक राज्यात काँग्रेसचेच सरकार सत्तेवर आले. काँग्रेस नेते यशवंतराव चव्हाण हे या द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री बनले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आमदारांनी विधानसभेत मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्राची मागणी सातत्याने लावून धरली. राज्यभर प्रचार कार्यही सुरू ठेवले. परिणामी जनमताच्या रेट्यामुळे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा निर्णय केंद्र सरकारला घ्यावा लागला. अखेर १ मे, १९६० ला महाराष्ट्र या नव्या राज्याची निर्मिती झाली. स्वातंत्र्यासाठीच्या १९४२ च्या लढ्यानंतर संयुक्त महाराष्ट्रासाठीचा लढाही महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. स्वातंत्र्य लढ्यातील अनेक दिग्गज नेते याही लढ्यात अग्रभागी राहिले. नागनाथअण्णा हे त्यापैकीच एक. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यादरम्यान गोवा मुक्तीसाठीही लढा सुरू होता. भारत स्वतंत्र झाला तरी गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. गोवा मुक्तीसाठी देशभरातून सत्याग्रहींच्या तुकड्या गोव्यात जात होत्या व सत्याग्रही अटक करवून घेत होते. या लढ्यात महाराष्ट्रातील सत्याग्रहींचा वाटा मोठा होता. नागनाथअण्णांचाही या लढ्यात महत्त्वाचा सहभाग राहिला. या मुक्तिलढ्याचा वाढता प्रभाव विचारात घेऊन केंद्र सरकारने अखेर लष्करी कारवाईद्वारे गोवा ताब्यात घेतला. गोवा मुक्ती संग्रामाचा इतिहासही रोमहर्षक असाच आहे.

१९५७ च्या निवडणुकीत नागनाथअण्णा विधानसभेत निवडून गेले. १९५२ च्या निवडणुकीतील त्यांच्या पराभवाचे शल्य त्यांच्या असंख्य समर्थकांना बोचत राहिले होते. या विजयामुळे नागनाथअण्णा आमदार म्हणून सक्रिय राजकारणात कार्यरत झाले, पण तेथे ते फारसे रमले नाहीत. सरकारतर्फे सभागृहात जी आश्वासने दिली जातात, सुधारणा करण्याच्या, विकासाच्या ज्या गोष्टी होतात त्याप्रमाणे कामे होत नाहीत असे त्यांच्या अनुभवास येत राहिले. शेतकरी, शेतमजुरापर्यंत योजनांचा लाभ पोहचत नाही याची त्यांना खंत वाटे. ते ती वारंवार बोलून दाखवीत असत. ग्रामीण भागातील नेत्यांच्या हाती सत्ता असली तरी खरी सत्ता नोकरशाहीच्याच हातात आहे आणि पांढरपेशी नोकरशाही शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधी आहे, सामान्य माणसांबद्दल नोकरशाहीला आस्था नाही, असे त्यांचे मत होते. सरकारच्या कार्यपद्धतीविषयी ते नेहमीच नाराज असत. गोरगरीब जनतेसाठी सरकार काही करू शकत नाही, अशी त्यांची पक्की खात्री झाली. त्यामुळे सक्रिय राजकारणापासून दूर राहणे त्यांनी पसंत केले ; पण लोकशाहीवर त्यांचा विश्वास होता व सर्वसामान्यांचे प्रतिनिधी निवडून गेले पाहिजेत, असे त्यांना वाटे. राजकीय जागृती झाली नाही तर भांडवलदार व धनदांडग्यांचेच राजकारणावर वर्चस्व राहील म्हणून त्यांना विरोध करायलाच पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. त्यासाठीच निवडणुकीच्या राजकारणात ते सहभागी होत असत.

पैसा व सत्तेच्या बळावर समाजातील विशिष्ट वर्ग राजकारणात वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्या वर्गाला विरोध करण्यासाठी शेतकरी, कामगार व सर्वसामान्य नागरिकांनी निवडणुकीत सक्रिय राहिले पाहिजे, असे त्यांना वाटे. म्हणूनच निराश न होता निवडणुकीचा मार्ग ते अवलंबत असत. मात्र निवडणुकांचा गदारोळ संपला की, पुनश्च ते स्वतःला विधायक कार्यात गुंतवून घेत असत. सार्वत्रिक निवडणुका या राजकीय प्रबोधन आणि जनजागृतीसाठी आवश्यक असल्या तरी समाज परिवर्तनासाठी सत्तेचे राजकारण पुरे पडू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. भांडवलदार व उच्चभ्रू आणि उच्चवर्णीयांची राजकारणात मक्तेदारी होऊ नये आणि त्याचबरोबर जातीय शक्तींना थारा मिळू नये, अशी त्यांची स्पष्ट विचारधारा होती. या विचारांशी ते नेहमीच प्रामाणिक राहिले. दलित, उपेक्षित, शेतकरी, कामगार व कष्टकरी वर्गाचा त्यांनी सतत कैवार घेतला आणि त्यांच्या हितासाठीच ते कार्यरत राहिले. सत्ताधारी काँग्रेस पक्षात राहून स्वार्थी व आपमतलबी राजकारण करणाऱ्या, भांडवलदारांचे हितसंबंध जोपासणाऱ्या आणि सत्तेचा वापर वेगवेगळ्या मार्गाने पैसा मिळविण्यासाठी करणाऱ्या संधिसाधू प्रवृत्तीच्या राजकारण्यांना त्यांचा नेहमीच विरोध राहिला. त्याबरोबरच प्रतिगामी विचाराच्या व जातीय पक्षांपासूनही ते जाणीवपूर्वक दूर राहिले. राजकीय क्षेत्रात साधनशूचितेचे पालन आणि मूल्यांची जपणूक करणारा त्यांच्यासारखा नेता अपवादात्मकच म्हणावा लागेल. सत्तेसाठी तर त्यांनी कधीच तडजोड केली नाही आणि आपले विचार व मूल्ये यांच्याशीही फारकत घेतली नाही. या भूमिकेतून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ, हिंदू महासभा यांसारख्या जातीय पक्ष व संघटनांना प्रतिनिधित्व दिले जाऊ नये यासाठी विरोध केला होता. त्यावेळी त्यांची भूमिका तत्कालीन नेत्यांना मान्य झाली नाही, पण नागनाथअण्णा मात्र आपल्या विचारांशी अखेरपर्यंत चिकटून राहिले. जातीय संघटनांच्या व्यासपीठावर ते स्वतः कधी गेले नाहीत आणि अशा प्रवृत्तींना त्यांनी कधीच जवळ केले नाही. ब्राह्मणी वृत्तीच्या संस्था व प्रतिगामी संघटनांच्या प्रतिनिधींचा पुष्पहार स्वीकारण्यासही ते नकार देत असत ; तेव्हा अशा संस्थांकडून होणाऱ्या सत्कार समारंभास उपस्थित राहणे तर दूरच ! जातीय संघटनांविषयी आणि त्यातही गांधीजींची हत्या करणाऱ्या प्रवृत्तीविषयी त्यांच्या मनात अत्यंत चीड होती. ती ते उघडपणे बोलूनही दाखवत असत.

१९५७ ते १९६२ या काळात ते विधानसभेचे सदस्य होते, पण विधिमंडळाच्या कामात त्यांनी स्वतःला फार गुंतवून घेतले नाही. त्यापेक्षा आपल्या मतदारसंघातील विकास

कामांचा पाठपुरावा करून ती मार्गी लावण्यावर त्यांनी अधिक भर दिला. आपल्या कार्यक्षेत्रात विविध प्रकारची विधायक कामे तर त्यांनी सुरू ठेवली होतीच, पण व्यापक समाज हितासाठी आणखी काय करता येईल, याचा ते विचार करीत. त्यादृष्टीने वेगवेगळ्या विधायक उपक्रमांचे आयोजन करीत. १९६२ च्या निवडणुकीस ते उभे राहिले नाहीत. किंबहुना पुढे निवडणुकांच्या राजकारणापासून आणि सक्रिय राजकारणापासून जवळजवळ पाव शतकभर ते दूरच राहिले. याचा अर्थ ते राजकारणापासून दूर गेले असा नव्हे. जरी राजकारणात सक्रिय नसले तरी देशात आणि राज्यात राजकीय क्षेत्रात काय चालले आहे याकडे त्यांचे बारीक लक्ष असे. वाढत्या जातीय आणि धर्मांध प्रवृत्तीविषयी ते चिंता व्यक्त करीत आणि योग्य दिशेने व तत्त्वनिष्ठ वाटचाल करणाऱ्या राजकीय पक्षांना वेळोवेळी पाठिंबा देत. राजकारणात गुंतून पडले नसले तरी राजकीय क्षेत्रातील घडामोडीबाबत ते जागरूक असत. जाणकारांशी त्याबाबत चर्चा करीत. राजकारणाचे त्यांना वावडे कधीच वाटले नाही, पण राजकीय क्षेत्रातील अपप्रवृत्तीबाबत ते दक्ष असत. धर्म वा जातीच्या नावावर राजकारण करणाऱ्या पक्ष व उमेदवारांविषयी ते संताप व्यक्त करीत. त्यांना दोन हात दूर ठेवीत. मात्र समतेचा व समाजवादी विचार करणाऱ्या राजकीय पक्षाविषयी त्यांना आस्था वाटे. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत ते त्या निकषावर कुणाला पाठिंबा द्यायचा हे ठरवीत. डाव्या पक्ष व विचाराची त्यांनी नेहमीच कास धरली आणि या विचाराच्या पक्ष व उमेदवारांना त्या त्या वेळी मदतही केली. विचारांच्या बाबतीत त्यांनी कधीच तडजोड केली नाही. तत्त्व-विचार आणि मूल्यांची जपणूक ही त्यांची जीवननिष्ठा होती. तिचे पालन त्यांनी जाणीवपूर्वक आणि काटेकोरपणे केले. आपल्या विचारावर निष्ठा ठेवून अशाप्रकारे वाटचाल करणारा त्यांच्यासारखा नेता अपवादात्मकच म्हणावा लागेल. राजकारणाचा विचार करतानाही जनहिताचे काय या गोष्टीस त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. निव्वळ लोकांचा पाठिंबा मिळावा म्हणून त्यांनी तत्त्वांना मुरड कधीच घातली नाही आणि लोकप्रियतेसाठी सवंग राजकीय भूमिकाही घेतली नाही. सत्तापदांचा मोह तर त्यांनी कधीच धरला नाही. आपल्या मनाला जे पटेल, योग्य वाटेल आणि व्यापक जनहिताचे ठरेल तेच ते करीत राहिले. या तत्त्वनिष्ठ विचारांमुळेच बहुधा पुढे बराच काळ ते सक्रिय राजकारणापासून दूर राहिले. याचा अर्थ त्यांनी राजकारण सोडले होते असा नव्हे. मात्र, सामाजिक कार्य व लोककल्याणकारी प्रकल्प उभारणीकडे त्यांनी अधिक लक्ष द्यायला सुरूवात केली. त्यासाठी चळवळीचा मार्गही अवलंबला. त्या दिशेने त्यांनी टाकलेले पहिले दमदार पाऊल म्हणजे वाळवा तालुक्यात सुरू केलेली साराबंदी चळवळ.

## सारबंदी आंदोलन

वाळवा-इस्लामपूर रस्त्याच्या डांबरीकरण मागणीसाठीही त्यांनी चळवळ आरंभली. वाळव्याहून इस्लामपूरला जाण्यासाठी अत्यंत सुमार दर्जाचा रस्ता होता. बव्हंशी वाहतूक या खडतर मार्गानेच चालत होते. मोठ्या प्रमाणावर वाहतूक असतानाही या रस्त्याच्या सुधारणेकडे शासनाचे पूर्ण दुर्लक्ष झालेले होते. स्वातंत्र्यानंतर पाव शतकाचा काळ लोटला तरी या रस्त्याचे भाग्य उजाडले नव्हते. या त्रासातून परिसरातील नागरिकांची सुटका करणे गरजेचे होते. नागनाथअण्णांनी या रस्त्याच्या डांबरीकरणाची मागणी केली आणि सरकारचे लक्ष वेधण्यासाठी जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला. या रस्त्याचे डांबरीकरण होईपर्यंत शेतकऱ्यांनी शेतसारा भरू नये असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील हजारो शेतकरी आंदोलनात सहभागी झाले. विशेष म्हणजे हे आंदोलन शांततामय मार्गाने व स्वातंत्र्य चळवळीच्या काळात झालेल्या बार्डोली येथील सारबंदी आंदोलनाच्या धर्तीवर करण्यात आले. या रस्त्याचा प्रश्न असंख्य लोकांच्या जिव्हाळ्याचा असल्याने शेतकऱ्यांबरोबर त्यांचे कुटुंबीयही या आंदोलनात उतरले. पोलिसांनी आंदोलन दडपण्याचा जोरदार प्रयत्न केला, पण लोक मागे हटले नाहीत. १९७१ च्या फेब्रुवारीत सुरू झालेले शेतसारा बंदी आंदोलन चार वर्षे चालले. या काळात शेतकऱ्यांनी शेतसारा भरला नाही. अखेर आंदोलनकर्त्यांपुढे शासनाला नमते घ्यावे लागले. नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखालील या लढ्यात त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. आंदोलनातील महिलांचे त्यांनी नेतृत्व केले आणि लढा यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले. आंदोलनाच्या रेट्यामुळे शासनाने विशेष बाब म्हणून या रस्त्याचे काम हाती घेऊन ते तातडीने पूर्ण केले. एखाद्या रस्त्यासाठी अशाप्रकारे चार वर्षे लढा सुरू ठेवला गेल्याचे हे उदाहरण जिल्ह्यात बहुचर्चित आणि प्रेरकही ठरले. वाळवा-इस्लामपूर रस्त्यासाठीचा लढा यशस्वी झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना अधिकच हुरूप आला. सनदशीर मार्गाने आंदोलन करून सरकारवर दबाव आणता येतो व मागणी पदरात पाडून घेता येते हे त्यांना पटले. नागनाथअण्णांनी त्यांना जणू या आंदोलनाद्वारे एकप्रकारे लढ्याचे प्रात्यक्षिकच दाखवले. अशा प्रकारचा वाळवा-इस्लामपूर 'रोड मॉडेल' लढा त्यानंतर राज्यात इतरत्रही काही ठिकाणी लढविला गेला. शांततामय गांधीवादी मार्गाने यशस्वी झालेल्या या आंदोलनानंतर नागनाथअण्णांनी आणखी एक विधायक काम हाती घ्यायचे ठरवले. वाळवा परिसरातील बहुतेक शेतकरी कोरडवाहू जमिनीचे मालक होते. कृष्णा नदीकाठचे काही शेतकरी आपापल्या शेतापुरत्या पाणी योजना राबवीत,

पण नदीवर किंवा नदीकाठच्या विहिरींवर ऑईल इंजिन बसवून थोडीफार बागायती करण्याइतपतच त्यांची मर्यादा असे. एखादे हंगामी पीक घेण्यापुरताच जमिनींचा वापर होई. बारमाही शेती बागायती होत नसे. तशात उन्हाळ्यात कृष्णा नदीचे पाणी कमी झाले की काही गावातून पिण्याच्या पाण्याचीही समस्या उद्भवत असे. अशा परिस्थितीत जमिनीला पाणी देण्याचा प्रश्न तर फारच दूरचा. कृष्णा नदीतून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्याची कुठलीही योजना नव्हती. जर कृष्णेवर एखादा बंधारा किंवा छोटे धरण उभा करता आले तर किमान उन्हाळ्यात तरी पात्रात पाणी साठवता येईल असा विचार नागनाथअण्णांच्या मनात येत असे. त्यादृष्टीने त्यांनी शासनाकडे तशी मागणीही केली होती. कृष्णा नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधला तर तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना त्याचा लाभ होऊ शकेल, असे त्यांना वाटे. रस्त्यासाठीचे आंदोलन यशस्वी झाल्यानंतर नागनाथअण्णांनी या बंधाऱ्याच्या कामाचा पाठपुरावा सुरू केला. त्यांनी याबाबतीत आक्रमक पवित्रा घेतल्याचे निदर्शनास येताच शासनाने ताबडतोबीने हालचाली सुरू केल्या. वातावरण तापलेले असल्यामुळे कदाचित दुसऱ्या लढ्याचे रणशिंगे फुंकले जाईल या भीतीपोटी आंदोलनाची घोषणा होण्यापूर्वीच कृष्णा नदीवर नागठाणे येथे बंधारा बांधण्याचा निर्णय शासनाने जाहीर केला. नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखालील लढ्याची शासनाने केवढी धास्ती घेतली होती, याचेच हे निदर्शक म्हणावे लागेल. साराबंदी आंदोलनाच्या चार वर्षांच्या लढ्याचा प्रभाव असा जबरदस्त पडला की नागठाणे बंधाऱ्याला विना आंदोलन मंजुरी मिळाली आणि त्याचे कामही तातडीने सुरू झाले. संघटित जनशक्तीच्या बळावर उभारलेल्या लोकचळवळीचे हे दुसरे मोठे यश ठरले. नागठाणे बंधाऱ्यामुळे वाळवा तालुक्यातील कोरडवाहू क्षेत्र मोठ्या प्रमाणात ओलिताखाली येणार होते. कृष्णेच्या पात्रात ऐन उन्हाळ्यातही पाणी साठून राहू शकल्यामुळे अनेक गावांचा पाणीटंचाई प्रश्नही निकालात निघणार होता. एकदा बंधाऱ्याच्या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर नागनाथअण्णांनी ते लवकर कसे पूर्ण होईल, यादृष्टीने शासनाकडे पाठपुरावा सुरू केला. संबंधित कंत्राटदार, अधिकारी वर्ग यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवून हे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी त्यांना त्यांनी सर्व ते सहकार्य केले.

नागनाथअण्णांची अशी एक खास कार्यपद्धती होती. कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी ते विविधांगी विचार करीत. संबंधितांशी चर्चा करीत. निर्णय पक्का झाला की, मगच कामाला हात घालत, पण एकदा का ते काम हाती घेतले की तडीस नेल्याशिवाय स्वस्थ बसत नसत. त्यासाठी कितीही त्रास सहन करावा लागला तरी ते चिंता करीत नसत.

येणाऱ्या अडचणींवर मात करून ते काम पुढे नेण्याचा प्रयत्न करीत. बरोबरच्या सहकाऱ्यांना निराश न होऊ देता, त्यांची हिंमत टिकवून ठेवण्याचे, त्यांना ऊर्जा देण्याचे काम करीत. बऱ्याचदा संघर्ष केल्याशिवाय काही पदरात पडणार नाही याची त्यांना पुरेपूर जाणीव असे, पण एखाद्या कामाला हात घातला की कोणत्याही परिस्थितीत ते अर्धवट सोडत नसत. नव्हे, असे काम मुळातच ते हाती घेत नसत. त्यामुळे नागनाथअण्णा ज्या कार्याकडे वळतील ते पूर्ण होणारच याची सर्वांनाच खात्री वाटत असे. आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी जनतेत तसा विश्वास निर्माण केला होता. त्यांच्या या कार्यपद्धतीची माहिती असल्यामुळेच त्यांना मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत असे. कोणत्याही कार्यात त्यांचा व्यक्तिगत स्वार्थ नसल्यामुळे व लोककल्याणाचा हेतू स्पष्ट व स्वच्छ असल्यामुळे सारा व्यवहार खुल्लमखुल्ला व सर्वांना बरोबर घेऊनच करण्याचा पायंडा त्यांनी पाडला होता. साहजिकच, त्यांच्या निर्णयाबाबत वा त्यांनी हाती घेतलेल्या कोणत्याही कामाबाबत कोणतीही संभ्रमावस्था नसे किंवा कुठेही संशयाला जागा उरत नसे. अशा प्रकारची कार्यपद्धती अवलंबण्यात आल्यामुळेच त्यांच्या पाठीशी जनशक्ती उभी राहत असे. त्यांचे सारे व्यवहारही पारदर्शी होत असत. एवढा निःसंदिग्ध मोकळेपणा क्वचितच कुठल्या नेत्याच्या कार्यपद्धतीत पहायला मिळत असे. नागनाथअण्णांच्या कार्याचे हेही एक वैशिष्ट आणि वेगळेपण होते. अर्थातच नागनाथअण्णांनाच हे जमू शकले. कारण त्यांच्याकडे तेवढे नैतिक बळ होते, प्रामाणिकपणा होता आणि स्वच्छ चारित्र्यही. पुढील काळात त्यांनी उभारलेल्या विविध विधायक कार्यांच्या मुळाशी ही फार मोठी भांडवली गुंतवणूक होती. हाती फारसे आर्थिक बळ नसतानाही त्यांनी डोंगराएवढी कामे उभी केली. त्या प्रत्येक कामामागे नागनाथअण्णा नावाचा थोर सच्छिल माणूस प्रचंड पहाडासारखा उभा होता. आकाश कवेत घेण्याची त्यांची आकांक्षा असल्यामुळेच अशक्यप्राय वाटणाऱ्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्या तो पूर्णत्वास नेत होता. एखाद्या आदर्श नेत्याचे कल्पनाचित्र रेखाटले तरी आणखी दशांगुळे उंच वाटणारे आणि त्या चित्राच्या चौकटीत न मावणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. बहुपेडी, बहुआयामी आणि बहुगुणी स्वरुपाचे. असे असले तरी नागनाथअण्णा सर्वसामान्यांना कधी वेगळे वाटले नाहीत. ते त्यांच्यातलेच राहिले आणि त्यांच्यातच वावरले.

## पाणीपुरवठा योजना

नागठाणे बंधाऱ्यामुळे वाळव्याच्या जवळ पाणीसाठा उपलब्ध झाला तरी ते पाणी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत कसे पोहोचणार, हा प्रश्न होता. पाणी जवळ आहे, पण त्याचा शेतीसाठी लाभ घेता येत नाही, अशी गरीब शेतकऱ्यांची अवस्था झाली. बंधारा

झाला, कृष्णेत पाणी साठले पण उन्हाळ्यात पुन्हा शेती कोरडी ठणठणीतच. पाणी जवळपास नव्हते तेव्हा त्याचा कुणी विचारच करीत नव्हते, पण आता पेला तोंडापर्यंत आलेला असतानाही तहान भागवता येत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली. साहजिकच शेतकरी अधिक हवालदिल झाले. त्यांना हळहळ वाटू लागली. नदीतील पाणी शेतापर्यंत कसे येईल, याबाबत त्यांचा विचार सुरू झाला. नदीचे पाणी शेतापर्यंत आणायचे तर ते थेट पाट काढून आणणे शक्य नव्हते. त्यासाठी नदीवर लिफ्ट बसवणे आणि ते पाणी मोठ्या टाकीत साठवून तेथून पाटाने वा पाइप्सद्वारे शेतापर्यंत नेणे गरजेचे होते. अर्थात त्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणार होता. वाळवा परिसरातील कोरडवाहू किंवा थोड्याफार प्रमाणात हंगामी बागायती शेती करणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे अत्यंत अवघड व आवाक्याबाहेरचे काम होते. यातून कसा मार्ग काढायचा, याची त्यांना चिंता लागून राहिली. एकदा नदीचे पाणी शेतापर्यंत आले तर बव्हंशी शेती बारमाही बागायती होणार होती. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणार होती. हे साऱ्यांनाच पटत होते, पण पैसा कोठून व कसा उभा करायचा, हा खरा प्रश्न होता. कृष्णा नदीचे पाणी लिफ्ट करून शेतापर्यंत आणणे ही गोष्ट तत्त्वतः साऱ्यांनाच मान्य होती ; पण खर्चाचे काय करायचे, हे समजत नव्हते. हळूहळू या कल्पनेने जोर धरला आणि शेतकरी एकत्र येऊन विचार करू लागले. त्यातल्या त्यात आर्थिक स्थिती बरी असणाऱ्या शेतकऱ्यांनी सुमारे शंभर एकरासाठीची छोटी लिफ्ट योजना उभी करण्याच्या दृष्टीने पावले उचलायला सुरूवात केली. काही शेतकऱ्यांनी नागनाथअण्णांच्या समोर ही कल्पना मांडली. त्यांनीही या दिशेने विचार सुरू केला होताच. लोकांनी याबाबत उत्सुकता दाखविल्यामुळे त्यांनी या कल्पनेचा जोमाने पाठपुरावा करण्याचे ठरविले. मर्यादित क्षेत्रासाठी ही पाणी योजना उभारण्याऐवजी आणखी काही शेतकऱ्यांना त्यात सामावून घ्यावे व सिंचनाखाली आणावयाच्या जमिनीचे क्षेत्र वाढवावे, असे त्यांना वाटू लागले. शिवाय मूठभर धनवान वा सुस्थितीतील शेतकऱ्यांसाठी योजना कार्यवाहीत आणण्यापेक्षा सर्वसामान्य व अल्पभूधारक शेतकऱ्यांचाही त्यात समावेश झाला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांनी व्यापक विचारविनिमयासाठी वाळवा परिसरातील शेतकऱ्यांची बैठक बोलावली आणि त्यांच्यापुढे ४५० एकर क्षेत्रासाठीच्या पाणी सिंचन योजनेची कल्पना मांडली. या योजनेला सर्वांची मान्यता मिळाली आणि 'किसान लिफ्ट पाणीपुरवठा' योजना स्थापन करण्याचे ठरले.

एकदा सर्वसंमतीने निर्णय झाल्यानंतर कामाचा पाठपुरावा करण्याची नागनाथअण्णांची एक खास कार्यपद्धती होती. किसान लिफ्ट पाणीपुरवठा योजनेची कार्यवाही करण्यापूर्वी

त्यांनी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांशी संपर्क साधला. त्यांची मते घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पुढील पावले टाकण्याचे ठरविले. या कामात कुणाकुणाची मदत होऊ शकेल, त्यांच्या नावाची यादी करून त्याप्रमाणे भेटीगाठी सुरू केल्या. सर्वप्रथम त्यांनी कराड जवळच्या कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयवंतराव भोसले यांची भेट घ्यायचे ठरविले. त्या काळात वाळव्याचे बव्हंशी शेतकरी विहीर बागायतीवर घेतलेला ऊस कृष्णा सहकारी साखर कारखान्याला देत असत. त्यामुळे कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे व वाळव्याच्या शेतकऱ्यांचे संबंध अत्यंत स्नेहपूर्ण होते. त्याचा फायदा किसान लिफ्ट इरिगेशनच्या नियोजित उभारणीसाठी होईल अशी अटकळ बांधून नागनाथअण्णांनी वाळव्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह जयवंतरावांची भेट घेतली. जयवंतरावांनी त्यांना या योजनेसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. सुरुवातीला पाणीपुरवठा योजनेचा आराखडा कारखान्याच्या अभियंत्याकडून तयार करून देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे संबंधित अभियंत्यांना सूचना दिल्या व हे काम तातडीने सुरू करण्यास सांगितले. आराखडा तयार झाल्यानंतर योजनेसाठी अंदाजे किती खर्च येणार हे पाहून त्यानुसार जिल्हा भूविकास बँकेकडून कर्ज घेण्याचे ठरले. जिल्हा भूविकास बँकेचे तत्कालीन अध्यक्ष आबासाहेब शिंदे-म्हैसाळकर यांनी या योजनेसाठी कर्ज मंजूर करण्याचे आश्वासन दिले. पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे वीज पंप उपलब्ध करून देण्याचे किर्लोस्कर ब्रदर्स लि.चे तत्कालीन कार्यकारी संचालक पी. डी. गुणे यांनी मान्य केले. योजनेसाठी उत्तम दर्जाचे सिमेंट पाईप्स खरेदी करण्यात आले. आर्थिक प्रश्न सुटल्यामुळे योजनेची कार्यवाही झपाट्याने होण्यात कुठलीच अडचण आली नाही. त्यामुळे अवघ्या ८० दिवसांत ३५ किलोमिटर लांबीची पाईपलाईन पूर्ण होऊन कृष्णेचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात पडले. एवढ्या कमी कालावधीत शेतकऱ्यांना पाणी मिळणे ही गोष्ट अगदी चमत्कार वाटावी अशी ठरली. योजनेच्या या पहिल्या टप्प्यामुळे शेतकरी तर अचंबित झालेच, पण इतरानांही त्याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही. या योजनेमुळे वाळवा तालुक्यातील ४५० एकराला बारमाही पाणीपुरवठा होऊ लागला. साहजिकच शेतकऱ्यांचा उर आनंदाने भरून आला. नागनाथअण्णांविषयीचा त्यांचा आदरभाव दुणावला. नागनाथअण्णांच्या कल्पनेतून साकारलेल्या या योजनेचे प्रचंड कौतुक झाले. ते कोणतीही अशक्य गोष्ट शक्य करून दाखवितात असा जनतेत विश्वास निर्माण झाला.

शेतीला पाणी मिळू लागल्यामुळे बागायती क्षेत्र वाढणे अपेक्षितच होते, पण विहिरींच्या पाण्यावर बागायती पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना ओलिताखाली अधिक जमीन आल्यामुळे

बैलांच्या साहाय्याने शेती करणे अवघड होऊ लागले. बदलत्या परिस्थितीत शेतीच्या मशागतीसाठी शेतकऱ्यांना आधुनिक साधनांची गरज भासू लागली. ट्रॅक्टरसारख्या साधनाशिवाय शेताच्या नांगरणीपासून ते खते व ऊस वाहतुकीपर्यंत विविध प्रकारची काम करणे अपरिहार्य बनले. त्यामुळे गरजेपोटी ट्रॅक्टर खरेदीची कल्पना पुढे आली. नागनाथअण्णांनी याही बाबतीत पुढाकार घेतला. किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर ब्रदर्स कारखान्याने सहकार्य करण्याचे मान्य केले. कंपनीचे कार्यकारी संचालक पी. डी. गुणे यांनी वाळव्यातील शेतकऱ्यांना कंपनीच्यावतीने शंभर टक्के कर्ज योजनेद्वारे ट्रॅक्टर्स विक्री करण्यास मान्यता दिली. किर्लोस्कर कंपनीच्यावतीने त्यावेळी जर्मन डाइटस् कंपनीच्या सहकार्याने भारतात ट्रॅक्टर्स बनविले जात होते. ट्रॅक्टर्सची विक्री वाढविण्याच्या दृष्टीने किर्लोस्कर कंपनीने बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने शेतकऱ्यांना शंभर टक्के कर्ज पुरवठ्याद्वारे ट्रॅक्टर्स विक्रीचा हा उपक्रम राबविला. या उपक्रमाचीही त्यावेळी व्यापक चर्चा झाली. केवळ नागनाथअण्णांच्या हमीमुळेच किर्लोस्कर कंपनीने हे पाऊल उचलले. नागनाथअण्णांनी जबाबदारी स्वीकारल्यामुळे कर्जफेडीची चिंता करण्याचे कारण नाही, असे कंपनीच्या पदाधिकाऱ्यांना वाटले. शेतकऱ्यांबाबत अशाप्रकारे विश्वास व्यक्त करण्यासारखी परिस्थिती त्यावेळी नव्हती. तरीदेखील कंपनीने हा निर्णय घेतला, तो केवळ नागनाथअण्णांच्या पुढाकारामुळे ही वस्तुस्थिती होती. काही असो, सारे काही जमून आले आणि किर्लोस्कर कंपनीने एकाच दिवशी अकरा ट्रॅक्टर्सचे वाळव्यातील शेतकऱ्यांना समारंभपूर्वक वितरण केले. या आगळ्या सोहळ्याचीही त्यावेळी जोरदार चर्चा झाली. सर्वसामान्य शेतकरी स्वतःच्या मालकीचा ट्रॅक्टर विकत घेऊ शकतो ही कल्पनाच त्या काळात अविश्वासार्ह वाटावी, अशी एकंदर परिस्थिती होती, पण नागनाथअण्णांच्या नेतृत्वामुळे हे अघटित घडू शकले. सामान्य अकरा शेतकरी 'ट्रॅक्टर मालक' झाले. आधुनिक पद्धतीने शेती करू लागले. त्यांच्या या ट्रॅक्टरचा लाभ परिसरातील इतरही शेतकरी घेऊ लागले. साहजिकच त्यांची शेती अधिक चांगल्या प्रकारे होऊ लागली. विशेष म्हणजे या सर्वच ट्रॅक्टर मालक शेतकऱ्यांनी आपली कर्जे नियमितपणे हप्ते भरून दिलेल्या मुदतीत फेडली आणि ते खऱ्या अर्थाने ट्रॅक्टर मालक बनले. ४५० एकरांच्या पाणी योजनेमुळे बारमाही पाणी उपलब्ध झाले आणि परिसरातील ९०० एकर क्षेत्रात ट्रॅक्टरच्या साहाय्याने आधुनिक पद्धतीने शेती कसली जाऊ लागली. १९७२ ते ७५ या काळात किसान लिफ्ट पाणीपुरवठा योजना कार्यवाहीत आली आणि वाळव्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात लक्षणीय बदल झाला. सुमारे चाळीस वर्षापूर्वी आधुनिक शेतीच्या दिशेने वाळवा येथे झालेला हा प्रयोग क्रांतिकारक म्हणावा लागले. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी

एखादा नेता उपलब्ध साधनसामग्रीच्या बळावर केवळ उद्योजक व बँक अधिकाऱ्यांशी संपर्क, सुसंवाद व समन्वय साधून केवढे महत्कार्य करू शकतो, याचे हे आगळे वेगळे ठळक उदाहरण म्हणावे लागले. सर्वसामान्य शेतकऱ्यांविषयी आत्यंतिक तळमळ असणारा नागनाथअण्णांसारखा नेताच हे करू जाणे. या योजनापूर्तीमुळे नागनाथअण्णांविषयीचा आदर दुणावणे साहजिकच होते. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अन्य नेत्यांनी आदर्श घ्यावा असाच हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम ठरला. किसान लिफ्ट पाणीपुरवठा योजनेच्या कार्यवाहीमुळे एक तर शेतकऱ्यांत नवा उत्साह संचारला आणि आपण संघटितपणे प्रचंड व अशक्यप्राय वाटणारी कामे उभी करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला. या योजनेची पूर्ती म्हणजे एकप्रकारे आगामी भव्य प्रकल्पाची नांदीच म्हणावी लागेल. त्या दिशेने पावले टाकण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना नवी प्रेरणा मिळाली.

▣▣▣▣

# ६
# साखर कारखान्याची उभारणी

वाळव्याच्या शिवारात कृष्णेचे पाणी आल्यामुळे शेती बारमाही बागायती झाली. कोणतेही पीक घ्यायची शेतकऱ्यांनी तयारी केली. या परिसरात प्रामुख्याने ऊसपीक घेतले जात असे. एक तर ऊस हे नगदी पीक होते आणि परिसरात कराडजवळ 'कृष्णा' व साखराळे येथील 'वाळवा' हे दोन सहकारी साखर कारखाने होते. ऊस हे हमखास पैसा देणारे, उत्पादनाच्या दृष्टीनेही कमी धोक्याचे पीक समजले जाई. शिवाय सहकारी साखर कारखाने त्यावेळी दरही चांगला देत असत. तथापि, वाळवा परिसरात सहकारी साखर कारखाना उभारला गेला, तर आपल्याला कृष्णा वा साखराळे येथील साखर कारखान्यांवर अवलंबून रहावे लागणार नाही, असे शेतकऱ्यांना वाटू लागले. त्यावेळी एकूणच महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची उभारणी जोमाने सरू झाली होती. १९५१-५२ मध्ये प्रवरानगर येथे विठ्ठलराव विखे-पाटील यांनी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली पहिला सहकारी साखर कारखाना उभारल्यानंतर १९५४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात बिद्री, पंचगंगा, वारणा आदी सहकारी साखर कारखाने उभे राहिले. १९५६ मध्ये सांगली येथे वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी सहकारी साखर कारखाना उभा राहिला. १९६० नंतर तर राज्यात ठिकठिकाणी सहकारी साखर कारखाने उभे राहण्याचे प्रमाण वाढतच गेले. जेथे जेथे पाण्याची उपलब्धता असेल तेथे सहकारी साखर कारखाने व त्याला जोडून अन्य सहकारी संस्था उभारणीचे सत्रच सुरू झाले. पूर्वी सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांची गूळ तयार करण्याची पंरपरा होती, पण गूळ उत्पादक शेतकऱ्यांचे व्यापारी व दलालांकडून शोषण होत असे. त्यांना रास्त दर मिळत नसे आणि विक्री व्यवस्थाही व्यापाऱ्यांच्या हाती असल्याने त्यांची मनमानी चाले.

या गूळ उत्पादकांची जशी व्यापाऱ्यांकडून लूट होई तशीच खासगी साखर कारखान्यांकडूनही नाडवणूक होत असे. यातून मार्ग काढण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांची उभारणी सुरू झाली आणि शेतकऱ्यांकडूनही त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. सहकारी साखर कारखान्यांमुळे शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारू लागली. हे बदललेले चित्र वाळवा

परिसरातील शेतकऱ्यांना जवळच्या सहकारी साखर कारखान्यांमुळे परिचयाचे झाले होते. सहकारी साखर कारखान्यांमुळे परिसराचाही विकास होत होता आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हाती पैसा खेळू लागला होता, हे त्यांना दिसत होते. साहजिकच आपल्याही भागात सहकारी साखर कारखाना व्हावा, ही वाळवा परिसरातील शेतकऱ्यांची इच्छा प्रबळ बनली. वाळव्यातील शेतकरी जेव्हा जवळच्या सहकारी साखर कारखान्यांकडे ऊस नेत तेव्हा त्यांना बऱ्याचदा सापत्न वागणूक मिळत असे. त्यांना ऊसतोड लवकर मिळत नसे. त्यामुळे त्यांच्या ऊसाचा उतारा कमी भरत असे. आपल्या मालकीचा हक्काचा साखर कारखाना झाला तर आपली ही दुखणी दूर होतील आणि परिसराचा विकासही गतीने होऊ शकेल, असे शेतकऱ्यांना वाटू लागले. अर्थात या दृष्टीने त्यांचे प्रबोधन अप्रत्यक्षरीत्या नागनाथअण्णांच्या मार्गदर्शनानुसार होतच राहिले होते. वाळवा परिसरात पाणी आल्यामुळे बागायत शेतीचे प्रमाण आणि त्यातही उसाचे क्षेत्र वाढले होते. हा सारा ऊस इतर सहकारी साखर कारखान्यांना न्यायचा तर वाहतूक खर्च वाढत असे. जवळपास साखर कारखाना झाला तर ऊसतोड लवकर मिळेल आणि वाहतूक खर्चही कमी होईल, हे गणित शेतकऱ्यांना सहज पटणारे होते.

शेतकऱ्यांच्या मनात अंकुरलेल्या या भावनेला नागनाथअण्णांनी योग्य प्रकारे खतपाणी घातले आणि सहकारी साखर कारखान्याची कल्पना त्यांच्यापुढे मांडली. परिसरातील जे सामान्य ऊस उत्पादक शेतकरी जवळपासच्या विविध सहकारी वा खासगी साखर कारखान्यांना ऊस गळितासाठी नेत असत, त्यांना योग्य वेळी ऊसतोड मिळत नसे. ऊसतोडीचा कार्यक्रम ज्या त्या साखर कारखान्यातील अधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असे. बऱ्याचदा याबाबतीत वशिलेबाजी होत असे व संचालक मंडळाचे सदस्य वा अधिकाऱ्यांच्या जवळच्या मंडळींना अग्रक्रम दिला जात असे. आपला ऊस लवकर न्यावा म्हणून शेतकऱ्यांना संबंधित अधिकाऱ्यांची मनधरणी करावी लागे. ऊसतोड लवकर मिळाली नाही, तर उसाचे वजन कमी भरे किंवा ऊस जागेवर वाळून जाण्याचा धोका असे. बरेच शेतकरी ऊसतोड लवकर मिळाली नाही, तर ऊसाचे फड पेटवून देत असत. त्यामुळे पेटवलेल्या उसाची तातडीने तोड झाली, तरी शेतकऱ्यांचे नुकसान होत असे. शिवाय ऊस लवकर न नेल्यामुळे जादा पाणीपट्टी भरावी लागे आणि पुढील हंगामालाही उशीर होत असे. बऱ्याच वेळा ऊसतोड कामगारांकडून उसाची तोड योग्य प्रकारे केली जात नसे. ऊस मुळापासून तोडला नाही, तर त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसत असे. याही उपर ऊसतोड होऊन कारखान्याला

ऊस गेल्यानंतर त्याचे योग्य ते वजन होईलच, याची खात्री नसे. काही कारखान्यांत जाणीवपूर्वक काटामारी केली जात असे. म्हणजे पूर्वी जशी गूळ उत्पादक शेतकऱ्यांची व्यापारी व दलालांकडून लूट व्हायची तशी ती आता साखर कारखानदांराकडून होऊ लागली. या व अशा वेगवेगळ्या प्रतिकूल अनुभवामुळे ऊस उत्पादक शेतकरी वैतागले होते. त्यातून सुटका करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वतंत्र सहकारी साखर कारखान्याची उभारणी करणे, या निष्कर्षाप्रत ते आले होते. वाळवा तालुक्यातील उपेक्षित ऊस उत्पादकांची ही गरज नागनाथअण्णांनी चांगल्या प्रकारे जाणली होती. त्यामुळेच आपल्या मनातील कल्पनेला मूर्त रूप देण्याच्या दृष्टीने त्यांनी वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील आणि पुरोगामी विचाराचे बाबाजी पुरुषोत्तम रंगाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बैठक बोलावली. ते १९७७ साल होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या व्यापक हितासाठी वाळवा येथे सहकारी साखर कारखाना उभारण्याची त्यांनी कल्पना मांडली. हुतात्म्याचे स्मारक म्हणून कारखाना उभारण्याचा विचारही त्यांनी बोलून दाखवला आणि नियोजित सहकारी साखर कारखान्यास हुतात्मा किसन अहिर यांचे नाव देण्याचेही निश्चित केले. नागनाथअण्णांच्या या कल्पनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि टाळ्यांच्या गजरात नियोजित सहकारी साखर कारखान्याचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला. त्यानंतर हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात सुमारे ४००० शेतकऱ्यांच्या व्यापक बैठकीत कारखान्याचे चीफ प्रमोटर म्हणून शामराव ज्ञानू सव्वाशे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. नागनाथअण्णांचे एक वैशिष्ट्य म्हणजे कल्पना त्यांची असली आणि पाठीमागचे सूत्रधार म्हणून सर्व योजनेची कार्यवाही त्यांच्याच विचाराने होत असली तरी ते स्वतः पदाधिकारी होत नसत. त्या त्या कामाची जबाबदारी आपल्या अन्य सहकाऱ्यांवर सोपवत असत. नियोजित हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून ते अखेरपर्यंत त्यांनी कारखान्याशी संबंधित कुठलेही पद कधीच स्वीकारले नाही. सत्तेच्या खुर्चीच्या व पदांच्या मोहापासून ते जाणीवपूर्वक दूर राहात आले. हे पथ्य त्यांनी सर्वच संस्थांच्या बाबतीत कटाक्षाने पाळले. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीतही ते प्रारंभापासूनच सत्तापदापासून अलिप्त राहिले. नियोजित हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा प्रस्ताव तयार करण्यासाठी वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील सांगलीच्या तत्कालीन शेतकरी सहकारी कारखान्याने नागनाथअण्णांना सर्वतोपरी सहकार्य केले. वसंतदादा हे स्वातंत्र्य लढ्यातील नागनाथअण्णांचे समकालीन नेते होते व त्यांचे परस्परसंबंध जवळीकीचे व मैत्रीपूर्ण होते. नागनाथअण्णांच्या कार्यनिष्ठेविषयी वसंतदादांना

विश्वास व आपुलकी होती. त्यामुळे त्यांच्याकडून प्रारंभीच्या काळात नागनाथअण्णांना आवश्यक ती सर्व प्रकारची मदत मिळाली. वसंतदादा हे सहकार क्षेत्रातील जाणकार व अभ्यासू नेते होते. कोणत्याही विधायक कार्याला पाठिंबा देण्याची त्यांची वृत्ती होती. नागनाथअण्णांच्या नियोजित सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीतही त्यांनी अत्यंत आस्थापूर्वक सर्वतोपरी सहकार्य केले. त्यावेळी वाळवा तालुक्यात साखराळे येथे राजारामबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाळवा सहकारी साखर कारखाना कार्यरत होता. नागनाथअण्णांच्या नियोजित सहकारी साखर कारखान्याला मान्यता मिळाली तर तालुक्यातील बराचसा ऊस त्या कारखान्याकडे जाईल, अशी भीती वाळवा कारखान्याच्या संचालक मंडळाला वाटत होती. त्यावेळचे ऊसक्षेत्र विचारात घेतले, तर त्यांना तसे वाटणे साहजिकच होते. वाळवा परिसरातील पुरेसा ऊस आपल्या साखर कारखान्यास मिळाला नाही, तर कारखान्याच्या उत्पादकतेवर परिणाम होईल, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे नियोजित किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावाला त्यांच्याकडून अप्रत्यक्षरीत्या विरोध सुरू झाला होता. हा प्रस्ताव मंजूर होऊ नये या दृष्टीने त्यांचे राजकीय स्तरावर प्रयत्नही सुरू होते. नागनाथअण्णांना याची पूर्ण कल्पना होती, पण त्याची पर्वा न करता त्यांनी आपल्या परीने विविध मार्गाने प्रयत्न चालू ठेवले.

१९७७ साली वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि नागनाथअण्णांच्या आशा आणखी दुणावल्या. त्यांनी मुंबईस वसंतदादांच्याकडे शिष्टमंडळ नेले व हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावाला मान्यता देऊन तो केंद्र सरकारकडे पाठविण्याची मागणी केली. त्यावेळी वाळवा सहकारी साखर कारखान्याकडून साखर संचालक कार्यालयाकडे करण्यात आलेल्या तक्रारींची त्यांना माहिती मिळाली. साखराळे येथील वाळवा सहकारी साखर कारखान्याच्या नेत्यांनी नागनाथअण्णांच्या नियोजित साखर कारखान्याला विरोध केल्याचे स्पष्ट झाले. या नव्या सहकारी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस नसल्याचाही त्यांचा दावा होता. त्यानंतर वसंतदादांनी साखर संचालकांना वाळवा परिसराची पाहणी करून नियोजित साखर कारखान्याच्या प्रस्तावाबाबत अहवाल देण्यास सांगितले. त्यानुसार साखर संचालकांनी पाहणी करून अहवाल पाठविला पण वाळवा साखर कारखान्याचा विरोध असल्याचेही नमूद केले. त्यावर नागनाथअण्णांनी नामी युक्ती लढवली. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीस राजारामबापू पाटील उभे राहिले होते. निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने ते वाळवा येथे आले असताना वाळवा परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांना घेरावो घातला व आमच्या नियोजित साखर कारखान्यास तुमचा विरोध कशासाठी?

अशी स्पष्ट विचारणा केली. निवडणुकीच्या प्रचारासाठी आलेल्या राजारामबापूंना त्यांनी एकप्रकारे खिंडीत पकडले. राजारामबापूंनीही एकंदर परिस्थिती ओळखून भूमिका बदलली व कारखान्यास आपला विरोध नसल्याचे सांगितले; पण याबाबत शेतकऱ्यांनी लेखी आश्वासनाची मागणी केली. विशेष म्हणजे वाळवा सहकारी साखर कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांनीही तसे स्पष्टपणे लिहून दिले व नियोजित साखर कारखान्याचा मार्ग मोकळा करून दिला. हे लेखी आश्वासनाचे पत्र नागनाथअण्णांनी साखर संचालकांना दिले आणि प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्याबाबत सुचवले. अखेरीस तसा अनुकूल प्रस्ताव साखर संचालकांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. नागनाथअण्णांनी मग मुख्यमंत्री वसंतदादांच्या कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू केला. अखेरीस १ एप्रिल, १९७८ ला मुख्यमंत्र्यांनी नियोजित हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या प्रस्तावावर सही केली आणि शिफारसीसह तो केंद्र सरकारकडे पाठविला.

## 'हुतात्मा' साखर कारखान्याला मंजुरी

हुतात्मा कारखान्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे गेला, त्याच काळात केंद्र शासनाने साखर कारखान्यांबाबत नवे धोरण जाहीर केले. २५ किलोमीटरच्या आत नव्या साखर कारखान्यास परवानगी न देण्याच्या नियमाचा त्यात अंतर्भाव होता. वाळवा तालुक्यात साखराळे येथे राजारामबापू पाटील यांचा वाळवा सहकारी साखर कारखाना कार्यरत असताना 'हुतात्मा'ला परवानगी कशी मिळणार, हा प्रश्न निर्माण झाला. कारण 'हुतात्मा'ची नियोजित जागा वाळवा सहकारी साखर कारखान्यापासून १५-१६ किलोमीटरवरच होती. या नियमाची ढाल पुढे करून वाळवा सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनीही 'हुतात्मा'ला विरोध केला. जरी राजारामबापूंनी निवडणूक काळात 'हुतात्मा'ला विरोध नसल्याचे लेखी आश्वासन वाळवा कारखान्याच्या संचालक मंडळाकरवी दिले होते, तरी प्रत्यक्षात मंजुरी मिळण्याच्या वेळी मात्र केंद्र शासनाकडे तक्रार अर्ज देऊन आपल्या कारखान्याच्या २५ किलोमिटर परिक्षेत्रात अन्य साखर कारखान्यास मंजुरी देऊ नये, अशी भूमिका घेतली. वास्तविक साखर कारखाना कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस असेल आणि तो साखर कारखाना किमान १६० दिवस चालू शकत असेल तरच परवानगी मिळू शकत होती. याच नियमाचा आधार घेऊन 'हुतात्मा'च्या वतीने कॉम्रेड दत्ता देशमुख यांनी तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री राव वीरेंद्र सिंग यांच्यापुढे 'हुतात्मा'ची बाजू मांडली. वाळवा सहकारी साखर कारखाना किमान १९० दिवस चालू शकत होता आणि त्यासाठी आवश्यक ऊस कारखान्याच्या कार्यक्षेत्रात होता. वाळवा

सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ७०-८० गावे आहेत व त्यापैकी फक्त १० गावांचे कार्यक्षेत्र 'हुतात्मा' कारखान्यासाठी आवश्यक असून तेथे पुरेसा ऊस उपलब्ध होणे सहज शक्य आहे, असे कॉम्रेड देशमुख यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात अन्यत्र बऱ्याच ठिकाणी अवघ्या ५-६ किलोमीटरवर असणारे साखर कारखानेही चांगल्या क्षमतेने चालत असल्याची काही उदाहरणे दिली. 'हुतात्मा' साखर कारखान्याचा वाळवा साखर कारखान्यावर कसलाही परिणाम होणार नाही आणि दोन्ही कारखाने पूर्ण क्षमतेने चालण्याइतपत ऊस वाळवा तालुक्यात उपलब्ध असल्याची आकडेवारी सादर केली. राव वीरेंद्र सिंग यांनी वाळवा साखर कारखान्याच्या संचालकांचीही बाजू ऐकून घेतली व त्यांचा विरोध कशासाठी, अशी विचारणा केली. हुतात्मा साखर कारखान्यासाठी पाणी व पुरेसा ऊस उपलब्ध असेल, तर अंतराचा विचार न करता या कारखान्यास मंजुरी देण्यात यईल, असा निर्णय त्यांनी जाहीर केला. विशेष म्हणजे केंद्र शासनाचे साखर कारखान्याबाबत पुढेही हेच धोरण राहील, असे घोषित केले. एका दृष्टीने 'हुतात्मा'च्या मंजुरीसाठी नागनाथअण्णांनी केंद्र शासनापर्यंत केलला पाठपुरावा साखर कारखान्यांविषयी नवा धोरणात्मक निर्णय होण्यास कारणीभूत ठरला. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास केंद्र सरकारच्या कृषी खात्याने २६ मार्च, १९८१ ला इरादा पत्र सुपूर्द केले. नागनाथअण्णांनी १९७७ ला साखर कारखान्याच्या मंजुरीसाठी सुरू केलेल्या प्रयत्नांना तब्बल पाच वर्षांनी यश आले. त्यांच्या या कार्यास अनेकांचे सहकार्य लाभले. वाळव्यातील प्रमुख शेतकरी व हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षकांपासून ते दिल्लीत अनेक खासदार व अधिकाऱ्यांची त्यांना या कामी मदत झाली. कारखान्याच्या मंजुरीसाठी मुंबई व दिल्लीच्या अनेक खेपा त्यांना कराव्या लागल्या होत्या. प्रवास, निवास आदीसाठी बराच खर्चही करावा लागला होता. या सर्व खर्चाचा तपशील त्यांनी लिहून ठेवला होता. अत्यंत काटकसरीने खर्च करून कारखाना मंजुरीपर्यंत मजल मारली होती. अनेकांच्या श्रमाचा, घामाचा हा पैसा असल्याची जाणीव ठेवून सर्व व्यवहार सांभाळले होते. आवश्यक तेथे व तेवढाच खर्च केला होता. कारखान्याला मंजुरी मिळवण्यासाठीचे त्यांचे श्रम सार्थकी लागले होते. एक महत्त्वाची लढाई त्यांनी जिंकली होती. पण दुसरी अधिक महत्त्वाची लढाई अद्याप सुरू व्हायची होती. कारखान्यासाठी भागभांडवल उभा करणे आणि योग्य जागेची निवड करून ती ताब्यात घेणे आवश्यक होते. कारखान्याला मंजुरी मिळाल्याचा आनंद मोठा होता. तो तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने साजराही केला; पण पुढील आव्हानांना सामोरे कसे जायचे, ही चिंता लागून राहिली. साखर कारखान्याला मंजुरी मिळाल्यामुळे वाळव्याच्या शेतकऱ्यांना एक प्रकारे नवी

प्रेरणा मिळाली. त्यांच्यात नवा उत्साह संचारला आणि नव्या जोमाने त्यांची वाटचाल सुरू झाली. तालुक्यातील बड्या नेत्यांशी संघर्ष करीत, सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या पाठबळावर नागनाथअण्णांनी मिळवलेल्या या यशाला मोठीच झळाळी मिळाली. जनमानसातील त्यांची प्रतिमा अधिकच उंचावली. विजयोत्सवानंतर ते व त्यांचे समर्थक पुन्हा झपाटून कामाला लागले.

साखर कारखान्यांसाठी पुरेशी व योग्य जागा मिळवणे आणि भागभांडवल उभे करणे ही दोन्ही कामे तशी सोपी नव्हती. वाळवा परिसरातील बव्हंशी शेती बागायती झाल्याने कारखान्यासाठी जागा उपलब्ध होणे कठीण होते. सांगली, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातील बहुसंख्य साखर कारखाने कोरडवाहू शेतीक्षेत्रात किंवा माळरानावर उभे राहिले होते. साखर कारखान्यांच्या प्रारंभीच्या उभारणी काळात तशी जागेची फारशी समस्या नव्हती. त्यावेळी जागा सहज उपलब्ध होऊ शकत होत्या. मात्र वाळवा परिसरात एक तर कोरडवाहू शेतीचे क्षेत्र कमी होते आणि जे होते, त्यापैकी बरेचसे सिंचनाखाली आले होते; पण त्याही परिस्थितीत दोन-तीन जागांची पाहणी करून वाळवा गावच्या दक्षिणेस असलेल्या गंजीखान्याजवळील जागा निश्चित करण्यात आली. साखर कारखान्याचे कार्यालय, गाडीतळ व अधिकाऱ्यांची निवास कॉलनी यासाठी ७२ एकर जागा निवडण्यात आली. बाकीची १३० एकर जागा नजीकच्या पडवळवाडी हद्दीतील निश्चित करण्यात आली. महाराष्ट्र राज्य साखर संचालकांची या जागेला मान्यता मिळाली. कारखान्याचा नियोजित परिसर एकदाचा सीमाबद्ध झाला.

नियोजित हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला केंद्र सरकारची तत्त्वतः मंजुरी मिळाली, पण ही फक्त सुरुवात होती. जागा निश्चित झाल्यानंतर तिथे यंत्रसामग्री बसविण्यासाठी आवश्यक बांधकामाची तयारी करणे गरजेचे होते. महत्त्वाचे म्हणजे भागभांडवल उभारणी हे मोठे आव्हान होते. किमान ५५ लाख रुपये भागभांडवल उभे करणे आवश्यक होते. प्रारंभी भांडवलापोटी पंधरा लाख रुपये सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जमा केल्याशिवाय साखर संचालकांकडून नोंदणी क्रमांक मिळणार नव्हता. त्यामुळे या १५ लाखांची तरतूद आधी करण्यात आली आणि साखर संचालकांकडून नोंदणी क्रमांक मिळविण्यात आला. त्यानंतर विविध वित्तीय संस्थांकडून तसेच शासनाकडून कर्ज मागणीसाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून एक कोटी रुपये, आयएफसीआयकडून १ कोटी २० लाख रुपये, आय.सी.आय.सी.आयकडून एक

कोटी रुपये व आयडीबीआयकडून दोन कोटी २० लाख रुपये असे एकूण ५ कोटी ४० लाख रुपये कर्ज मंजूर झाल्यानंतर कारखाना उभारणीस सुरुवात झाली. कोल्हापुरचे प्रख्यात वास्तुशिल्पी मे. बेरी यांनी साखर कारखान्याचा आराखडा तयार केला. साखर उद्योगातील विविध अनुभवी कंत्राटदारांकडून कामाच्या स्वतंत्रपणे निविदा मागवून त्यांच्याकडे कामे सुपूर्द करण्यात आली. प्राथमिक बांधकाम वेगाने पूर्ण करून कारखान्याची यंत्रसामग्री लवकरात लवकर उभी करण्याचे नियोजन करण्यात आले. मे. बकावुल्फ कंपनीकडून यंत्रसामग्री मागविण्यात आली. तत्कालीन मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनीही त्यावेळी आवश्यक ते सहकार्य केले. कारखान्याच्या जागेवर एक झोपडी उभारून नागनाथअण्णा स्वतः सर्व कामावर देखरेख करीत असत. एका बाजूला कारखाना उभारणीचे काम जोरात सुरू असताना दुसरीकडे भागभांडवल उभारणीचे कामही गतीने सुरू झाले. हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व परिसरातील प्रमुख शेतकरी भागभांडवल उभारणीचे काम जोमाने करू लागले. भागभांडवल गोळा करणे हे सोपे काम नव्हते. दहा गावांचेच कार्यक्षेत्र असल्याने समभाग विक्रीसाठी सक्षम शेतकऱ्यांची संख्या कमी होती. तशात नुकतेच बागायती शेती करू लागलेले अल्पभूधारक शेतकरी परिस्थितीने तसे गरीबच होते. त्यांना एकेक समभाग विकत घेण्यासाठी देखील आटापिटा करावा लागत होता. शिवाय नागनाथअण्णांच्या या सहकारी साखर कारखान्याला अप्रत्यक्ष विरोध करणारा छुपा वर्ग जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करीत होता. या अडचणींवर मात करत, लोकांना समजावून सांगत समभाग विक्री सुरू होती. अखेरीस आवश्यक भागभांडवल उभारणीचे लक्ष्य पुरे झाले आणि कारखान्याच्या उभारणीचे कामही वेगाने सुरू झाले. शेतकऱ्यांकडून पुरेशा भागभांडवलाची उभारणी झाल्यामुळे राज्य शासनाकडून उरलेले भागभांडवल मिळण्याची प्रतीक्षा सुरू झाली. हे भागभांडवल मिळण्यातही बरेच अडथळे आले. कधी स्पर्धक नेत्यांनी तर कधी नोकरशाहीने प्रश्न लोंबकळत ठेवला, पण कारखान्याचा सर्व कारभार पारदर्शी असल्यामुळे नागनाथअण्णांची रीतसर मागणी शासनाला फार काळ लांबवता आली नाही. त्यांच्या नैतिक दबावामुळे अडथळे आणणाऱ्यांना नमते घ्यावे लागले. वारंवार पाठपुराव्याद्वारे मागणी धसास लावल्यामुळे शेवटी शासनाकडून भागभांडवलापोटी दोन कोटी ८० लाख ९० हजार रुपये मिळाले. शासनाच्या वाट्याची आणखी काही रक्कम मिळणार होती, पण अत्यंत काटकसरीने कारखान्याची उभारणी करण्यात आल्यामुळे उरलेले भागभांडवल मिळविण्याची कारखान्याच्या प्रवर्तकांनाही गरज भासली नाही. २१ जानेवारी, १९८४ ला कारखान्याची पहिली चाचणी घेण्यात आली. चाचणी यशस्वी झाली

आणि साखरेचे उत्पादन सुरळीतपणे होऊ लागले. अवघ्या दहा-अकरा महिन्यांत साखर कारखान्याची उभारणी होऊन साखर उत्पादन सुरू होणे हा एक विक्रमच ठरला. साखर कारखान्याच्या उभारणीस किमान तीन-चार वर्षे लागत. काही साखर कारखान्यांची कामे तर दहा दहा वर्षे रेंगाळली होती. या पार्श्वभूमीवर 'हुतात्मा'ची अल्प काळात उभारणी होऊन गळित हंगाम सुरू झाला याचे अनेकांना आश्चर्य वाटणे साहजिक होते. अनंत अडचणींवर मात करीत साखर कारखाना उभारणीचे हे दिव्य एकदाचे पार पडले. नागनाथअण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई नायकवडी यांचे आशिर्वाद आणि नागनाथअण्णांच्या अथक प्रयत्नामुळे हे घडू शकले, अशीच सर्वांची भावना होती. या मायलेकरांना भेटून अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि त्यांना धन्यवाद दिले. वाळवा परिसरातील शेतकऱ्यांत तर अत्यानंदाचे वातावरण निर्माण होणे साहजिकच होते. हा आनंद सर्वांनी मोठ्या उत्साहाने साजरा केला. २८ जानेवारी, १९८४ पासून साखर कारखान्याचा गळित हंगाम नियमितपणे सुरू करण्याचे ठरले, पण अद्याप केंद्र सरकारकडून साखर कारखान्याला औद्योगिक परवाना मिळालेलाच नव्हता. काही छुपे विरोधक झारीतले शुक्राचार्य बनून अखेरच्या क्षणापर्यंत नागनाथअण्णा व वाळव्याच्या शेतकऱ्यांना सतावत राहिले होते. हा अडथळा पार करण्यासाठीही तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनीच सहकार्य केले. औद्योगिक परवाना तातडीने मिळवून देण्यासाठी त्यांनी दिल्लीस स्वत: जाऊन प्रयत्न केले. अखेरीस २८ जानेवारी, १९८४ लाच त्यांनी औद्योगिक परवाना मिळवून दिला. योगायोगाने सर्व तयारीनिशी सुसज्ज असलेला 'हुतात्मा' साखर कारखाना त्याच दिवशी सुरू झाला. पहिल्या गळित हंगामास समारंभपूर्वक प्रारंभ झाला. साखर कारखान्यात तयार झालेली चिमूटभर साखर नागनाथअण्णांनी आपल्या तोंडात टाकली आणि कारखान्याच्या आवारातून ते बाहेर पडले. ज्या साखर कारखान्याची आपण उभारणी केली, त्याची सर्व सूत्रे संचालक मंडळाच्या हवाली करत असल्याचे त्यांनी जाहीर केले आणि पुनश्च कारखान्यात पाऊन न टाकण्याचा निर्धारही व्यक्त केला. आवारातून बाहेर पडताना साखर कारखाना संचालकांना व संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी बजावले, 'जर कारखान्याला ऊस घालणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय झाला तर मीच त्यांच्यावतीने कारखान्यावर मोर्चा घेऊन येईन.' विशेष म्हणजे एकदा साखर कारखाना सुरू झाल्यानंतर पुन्हा कधीही त्यांनी कारखान्यात प्रवेश केला नाही. त्यांनी आपला शब्द खरा केला. कारखान्याच्या कारभारात हस्तक्षेप तर कधीच केला नाही, उलट बाहेर राहून संचालक व अधिकाऱ्यांवर नैतिक दबाव ठेवला. साखर कारखान्याचा कारभार पारदर्शी, चोख आणि सचोटीने करण्याची त्यांना मोकळीक दिली. त्यांनी दाखवलेल्या

मार्गाने संचालक मंडळाचा कारभार सुरू झाला. नागनाथअण्णांनी एक प्रचंड मोठे कार्य तडीस नेले. कारखान्याच्या कामातून ते बाजूला झाले, तरी वेळोवेळी संचालक मंडळ त्यांच्याकडून मार्गदर्शन घेत असे. सारे सुरळीत सुरू राहण्यामागे सर्वस्वी त्यांचीच प्रेरणा होती. त्यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कारखान्याचे कामकाज पुढे उत्तम प्रकारे सुरू राहिले. या साखर कारखान्याने पुढील काळात एक आदर्श सहकारी साखर कारखाना म्हणून लौकिक संपादन केला तसेच साखर उद्योगात अनेक विक्रमांची नोंद केली.

## 'हुतात्मा पॅटर्न'चा लौकिक

देशात सहकारी व खासगी मिळून सातशेहून अधिक साखर कारखाने असून त्यापैकी सुमारे एक तृतीयांश महाराष्ट्रात आहेत. तसेच नव्वद हजार कोटी रुपयांहून अधिक भांडवल साखर उद्योगात गुंतले असून, अंदाजे दहा कोटी लोक त्यावर अवलंबून आहेत. १९५१-५२ मध्ये देशातील पहिला सहकारी साखर कारखाना डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील व डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात नगर जिल्ह्यात उभा राहिला. त्यानंतर सहकारी साखर कारखान्यांचे राज्यभर जाळेच पसरले. त्यातही पश्चिम महाराष्ट्रात त्यांची संख्या वाढत राहिली. कोल्हापूर, सोलापूर, नगर यांसारख्या काही जिल्ह्यात, तर प्रत्येकी वीसहून अधिक सहकारी साखर कारखाने उभे राहिले. सहकारी साखर उद्योगामुळे त्या त्या साखर कारखान्यांचा परिसर विकसित होत राहिला. नव्या सहकारी संस्था सुरू झाल्या. काही ठिकाणी शैक्षणिक संकुलेही उभी राहिली. सहकारी साखर कारखाने विकासाची केंद्रे बनली; पण वैभवाच्या शिखरावर पोहोचलेल्या या उद्योगात हळूहळू सत्ताकांक्षी राजकीय नेत्यांचा शिरकाव झाला आणि सत्तास्पर्धेचे राजकारण सुरू झाले. काही राजकीय नेत्यांनी तर आर्थिक लाभासाठी म्हणूनच सहकारी साखर कारखाने उभे केले. राजकारणामुळे निर्माण झालेली गटबाजी, सत्तास्पर्धा, गैरव्यवस्थापन व भ्रष्टाचार यामुळे सहकारी साखर कारखान्यांची कार्यक्षमता कमी झाली. कालांतराने बरेच सहकारी साखर कारखाने आजारी पडले आणि आर्थिकदृष्ट्या डबघाईला आल्यामुळे काही तर पूर्णतः बंदच पडले. अशा बंद पडलेल्या व आजारी सहकारी साखर कारखान्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत राहिली आणि सहकारी साखर कारखानदारीच अडचणीत येत गेली. सुमारे ७० टक्के सहकारी साखर कारखान्यांची वाताहत होत राहिली. पन्नास वर्षांच्या काळात जोमाने उभ्या राहिलेल्या सहकारी साखर कारखानदारीला गालबोट लागले. त्यातूनच बंद पडलेले काही सहकारी साखर कारखाने मोडीत निघाले आणि त्यांची लिलावाने विक्री झाली. यापैकी बरेचसे सहकारी साखर कारखाने अन्य काही सक्षम साखर कारखान्यांनी किंवा खासगी कंपन्यांनी विकत वा कराराने

चालवण्यास घेतले. या पार्श्वभूमीवर हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील सर्वात कमी कार्यक्षेत्र असणारा साखर कारखाना असूनसुद्धा शेतकऱ्यांच्या उसाला सर्वाधिक दर देणारा सहकारी साखर कारखाना असा त्याचा लौकिक झाला आहे. ऊस उत्पादकांना जास्तीत जास्त दर देण्याची प्रथा या कारखान्यानेच सुरू केली. जे साखर कारखाने साखरेशिवाय मद्यनिर्मितीसारखी अन्य उपउत्पादने घेऊनही जो दर देतात त्यापेक्षा जास्त ऊसदर केवळ साखर उत्पादन करणारा हुतात्मा कारखाना देत असतो. शिवाय कामगारांना चांगला पगार व प्रतिवर्षी ४० टक्के बोनस देणाराही हा अपवादात्मक साखर कारखाना आहे. विशेष म्हणजे हुतात्मा साखर कारखाना सामाजिक बांधिलकी म्हणून जे विविध उपक्रम राबवीत असतो, तसे अन्य कोणताही साखर कारखाना राबविताना दिसत नाही. असे असूनही हा कारखाना सर्वाधिक दर शेतकऱ्यांना कसा काय देऊ शकतो, हा इतर कारखान्यांना चकित करून सोडणारा प्रश्न आहे. त्याचे कारण म्हणजे अत्यंत काटकसरीने व नियोजनबद्धपणे केले जाणारे कारखान्याचे गळीत आणि कार्यक्षम व्यवस्थापन. योग्य प्रकारे ऊस तोडणीपासून त्याचे लवकरात लवकर गळित करण्यापर्यंत सर्व टप्प्यांवर कामाचे उत्तम नियोजन होत असते. साहजिकच उतारा चांगला मिळतो आणि साखर उत्पादनही दर्जेदार होते. 'हुतात्मा'ने आपली अशी एक वेगळी व्यवस्थापन व एकंदर कार्यपद्धती निर्माण केली असून साखर उद्योगातील 'हुतात्मा पॅटर्न' म्हणून ती ओळखली जाते. या कार्यपद्धतीमुळे हुतात्मा साखर कारखान्याला देशभर प्रसिद्धी मिळाली असून त्याने आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. 'हुतात्मा'चे कार्यक्षेत्र सध्या केवळ पंधरा गावांपुरते मर्यादित आहे, पण दीड-दोनशेहून अधिक गावांचे कार्यक्षेत्र असणाऱ्या अन्य सहकारी साखर कारखान्यांपेक्षाही त्याची कामगिरी तुलनेने नेहमीच सरस राहिली आहे. या साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी सभासद, ऊस तोडणी मजूर, कामगार, कष्टकरी यांचे हित जोपासत आणि त्याही पुढे जाऊन सामाजिक बांधिलकी जपत धरणग्रस्त व दुष्काळग्रस्त जनतेला मोठा दिलासा दिला आहे. उपेक्षित समाजाला आधार व न्याय देण्याच्या वृत्तीमुळेच 'हुतात्मा' साखर कारखाना देशपातळीवर बहुचर्चित ठरला आहे.

साखर उतारा हा हुतात्मा कारखान्याचा 'प्राण' आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. गाळप केलेल्या उसातून प्रतिटन जास्तीत जास्त साखर मिळवण्याचा प्रयत्न या कारखान्यात जाणीवपूर्वक केला जातो. ऊस तोडणीपासून ते गळीत व साखर उत्पादनापर्यंत कारखान्याचे सर्व स्तरावर प्रभावी नियंत्रण असते. तोडणी मजुरांना पूर्ण परिपक्व झालेलाच ऊस आणि तोही जमिनीपासून तोडण्याची सूचना असते. तसेच तोडलेल्या उसाचे आठ

तासांच्या आत गाळप होईल हे पाहिले जाते. याबाबतीत कसलीही तडजोड केली जात नाही. त्यामुळे साखरेचे उत्पादन चांगले मिळते. टनाला १३५ किलोपर्यंत साखर मिळविण्याचा प्रयत्न होतो. शिवाय उच्चतम गुणवत्तेमुळे उत्पादित साखरेला बाजारात १५ ते २० रुपये जादा दर मिळतो. 'हुतात्मा'च्या साखरेला बाजारपेठेत दर्जेदार स्थान प्राप्त झाले आहे. गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर आणि कामगारांचे योगदान यामुळे 'हुतात्मा' दर्जा व गुणवत्तेच्या दृष्टीने सतत आघाडीवर राहिला आहे. साखर उताऱ्याच्या बाबतीत कारखान्याला वीसहून अधिक वेळा पुरस्कार मिळाला आहे. जास्तीत जास्त 'रिकव्हरी' टिकविण्याच्या दृष्टीनेही कारखाना प्रयत्नशील असतो. त्यासाठी शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन दिले जाते. कामगार व सभासदांच्या परतीच्या ठेवी शक्य तो लवकरात लवकर परत करण्याच्या दृष्टीने कारखान्याच्यावतीने नियोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कामगार व सभासदांना दरमहा दहा किलो साखर तीन रुपये किलो दराने पुरविली जाते. कारखाना स्थळावर कामगार व अधिकाऱ्यांसाठी निवास व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांच्यासाठी उत्तम घरे बांधून देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे ऊस तोडणी मजुरांसाठी सुमारे पाचशे पक्की घरे कारखाना कार्यस्थळावर बांधून देण्यात आली असून, त्यांना वीज व पाण्याची व्यवस्था कारखान्याच्यावतीने मोफत करण्यात आली आहे. ऊस तोडणी कामगार फक्त साखर हंगामातच येत असतात, पण त्या काळातही त्यांनी झोपड्यात वा शेतात उभारलेल्या तात्पुरत्या निवाऱ्यात न राहता चांगल्या घरात राहून संसार केला पाहिजे, असे नागनाथअण्णांना वाटे. त्या दृष्टीने प्रारंभीच त्यांनी त्यांच्यासाठी नियोजनपूर्वक घरे बांधली. अशाप्रकारे हंगामी ऊसतोड कामगारांचीसुद्धा काळजी घेणारा देशातील हा अपवादात्मकच साखर कारखाना असावा. अनेक साखर कारखाने 'काटामारी' करतात असा आक्षेप घेतला जात असतो. तथापि, हुतात्माच्या बाबतीत असे कधीच केले जात नाही. शेतकऱ्यांच्या उसाचे जेवढे वजन भरेल तेवढे स्पष्टपणे नोंद केले जाते व त्याचे योग्य प्रकारे पैसे आदा केले जातात. याबाबतीत अत्यंत पारदर्शी व्यवहार होत असतो. साखर कारखान्याच्यावतीने कार्यक्षेत्रात ऊस वाहतूक ज्या ज्या रस्त्याने केली जाते, त्या रस्त्यांची प्रतिवर्षी दुरुस्ती केली जाते. कारखान्यातर्फे शेतकऱ्यांना नाममात्र दरात उत्तम दर्जाचे ऊस बियाणे पुरविले जाते, तसेच गांडूळ खत व प्रेस मडचीही अल्पदरात विक्री केली जाते. हुतात्मा कारखान्यामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची प्रारंभापासूनच दक्षता घेण्यात आली आहे. कारखान्यातर्फे अशुद्ध पाणी शुद्ध करण्यासाठी खास यंत्रणा बसविण्यात आली आहे. हे पाणी सुमारे चारशे एकर क्षेत्राला पुरविण्यात आले असून, एक प्रकारे एवढ्या शेतीचा सिंचनाचा प्रश्नही कायमचा सोडविण्यात आला आहे.

हुतात्मा कारखान्यात विविध कामे करणारे कामगार व कार्यालयीन कर्मचारी हे बव्हंशी वाळवा परिसरातील शेतकऱ्यांची मुलेच आहेत. या भागातील तरुणांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षित करून कारखान्यात सामावून घेण्यात आले आहे. साहजिकच कामगार व कर्मचारी वर्गात कारखान्याविषयी विशेष जिव्हाळ्याची भावना आहे. एकंदरीत 'हुतात्मा पॅटर्न' शेतकऱ्यांची मुलेच उत्तम प्रकारे राबवीत असून परिसरातील युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्नही काही प्रमाणात सुटण्यास त्यामुळे मदत झाली आहे. कारखान्याच्या आधाराने काही जण स्वतंत्र व्यवसायही करू लागले आहेत. हुतात्मा कारखान्याच्या बाबतीत नागनाथअण्णांनी काही परंपरा सुरू केल्या असून, त्या आदर्श गणल्या गेल्या आहेत. या साखर कारखान्याचे संचालक परिसरातील सामान्य शेतकरी सभासदांतूनच निवडले जातात आणि एकदा संचालक झालेल्यास पुन्हा संचालक होता येत नाही. विशेष म्हणजे संचालकांना कसल्याही प्रकारचा भत्ता दिला जात नाही. कारखान्याचे संचालक, अधिकारी, सभासद, कामगार, मजूर हे सारेच जण 'हुतात्मा संकुला'त एका कुटुंबाचे घटक म्हणून वावरतात. स्वतः नागनाथअण्णा आपल्या कुटुंबात कधी रमले नाहीत, पण 'हुतात्मा संकुला'त मात्र एक कुटुंब वत्सल प्रमुख व्यक्ती या नात्याने वावरताना सर्वांना पहायला मिळत. या विशाल कुटुंबाचे ते केवळ कुटुंबप्रमुखच नव्हते, तर प्रेरणास्थानही होते. सहकार क्षेत्रात उभारलेल्या साखर कारखान्यातील भ्रष्टाचार व उधळपट्टीच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा महाराष्ट्रात सर्वत्र ऐकायला मिळतात. अनेक सहकारी साखर कारखाने वैभवाच्या शिखरावरून पूर्णपणे कसे ढासळले आणि त्यांची लिलावात विक्री होण्याची कशी वेळ आली हेही काही ठिकाणी पहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर 'हुतात्मा'ची उभारणी आणि 'हुतात्मा पॅटर्न'चा देशपातळीवर झालेला बोलबाला, हे सर्व अचंबित करणारे ठरले. 'सहकार' या मंत्राची जादू केवढे महान कार्य उभे करू शकते हे वाळवा तालुक्यातील लोकांनी प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले. नागनाथअण्णा या जादूगाराची धडाडी, झपाटून काम करण्याची विलक्षण जिद्द आणि माणसे हाताळण्याची जबरदस्त कल्पकता हे सारे थक्क करून सोडणारे आहे. जवळ पुरेसे आर्थिक बळ नसतानाही हे सारे घडवून आणणे हे सोपे काम नव्हते. नागनाथअण्णाच हे सारे करू जाणोत. त्यांच्या कार्यशैलीबद्दल जेवढे सांगावे तेवढे कमीच.

## सत्तापदापासून दूर

'हुतात्मा'ची उभारणी होऊन सुरळीत वाटचाल सुरू झाल्यानंतर ही जबाबदारी संचालक मंडळावर सोपवून ते अन्य विधायक कार्याकडे वळले. हुतात्मा साखर कारखान्यानंतर

हुतात्मा बँक, हुतात्मा बझार, हुतात्मा दूध संघ अशा विविध संस्थांच्या उभारणीस प्रारंभ झाला. शिक्षण संस्थेचाही वाढविस्तार सुरू झाला. महाविद्यालयाची स्थापना झाली. गरीब व दलित, आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृहांची योजना कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. सहकारी साखर कारखान्याच्या आधाराने इतर संस्थांची उभारणी हळूहळू होत गेली. अनेक सहकारी साखर कारखान्यांनी नंतर शिक्षण संकुले उभारली. नागनाथअण्णांनी मात्र आधी शाळा व वसतिगृह सुरू केले आणि नंतर ते सहकारी साखर कारखानदारीकडे वळले. साहजिकच हा सरळ प्रवास त्यांच्यासाठी अधिक खडतर ठरला. साखर कारखाने व अन्य संस्थांची टप्प्याटप्प्याने उभारणी केली जात असताना त्या त्या काळात नागनाथअण्णांनी एक प्रकारच विधायक दृष्टिकोन ठेवून इतरही अनेक उपक्रम सुरू ठेवले. हे उपक्रम त्यांच्या वेगळ्या विचाराचे निदर्शक ठरले. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नेत्यांनी राजकारणाबरोबरच विधायक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या संस्थांची उभारणी केली. काहींनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात तर काहींनी सहकार क्षेत्रात काम सुरू केले. स्वातंत्र्य चळवळीतील काही नेत्यांनीही हा मार्ग अवलंबला. नागनाथअण्णा हे त्यापैकीच एक. त्यांनी सुरुवातीला शैक्षणिक कार्य सुरू केले. तसे या कार्याकडे ते स्वातंत्र्यपूर्व काळातच वळले होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेसाठी मदत गोळा करून देण्यापासून ते त्यांना नव्या शाळा सुरू करण्यास सहकार्य करण्यापर्यंत नागनाथअण्णा कार्यरत होतेच. शिवाय त्यांनी शिराळा तालुक्याच्या ग्रामीण भागात काही स्वयंसेवी शाळाही सुरू केल्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळातही त्यांनी या कार्यालाच अग्रक्रम देण्याचे ठरवून किसान शिक्षण संस्थेची स्थापना केली व हुतात्मा किसन अहिर विद्यालय आणि विद्यार्थी वसतिगृह सुरू केले. सहकार क्षेत्राकडे ते काहीशा उशिरानेच वळले. बऱ्याच नेत्यांनी सहकारी साखर कारखाने सुरू केले ते केवळ ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन व ग्रामीण भागात शेतमाल प्रक्रिया उद्योग सुरू करण्याच्या हेतूने ; पण नंतरच्या टप्प्यात सहकारी साखर कारखाने उभारण्याचा प्रयत्न झाला तो महत्त्वाकांक्षी राजकीय नेत्यांच्या सत्तास्पर्धेतून. शेतकऱ्यांना संघटित करून ग्रामीण भागात एक आर्थिक सत्ताकेंद्र उभारले तर त्याचा वापर राजकीय लाभासाठी करता येऊ शकतो, ही अटकळ बांधूनच अनेक नेते सहकार क्षेत्रात पुढे सरसावले. त्यामुळे सहकारी साखर कारखाने हे राजकारणाचे अड्डे बनले आणि शेतकऱ्यांचे हित बाजूला राहून तेथे राजकीय सत्तास्पर्धा जोरात सुरू झाली. या सत्तास्पर्धेतूनच अनेक साखर कारखान्यांत भ्रष्टाचार व गैरव्यवहार वाढीस लागला आणि त्यांची वाटचाल अधोगतीकडे सुरू झाली. हे सारे चित्र अवतीभवती दिसत असतानाही नागनाथअण्णा सहकारी साखर उद्योगाकडे

अगदी जाणीवपूर्वक वळले. आजूबाजूच्या परिसरातील बव्हंशी साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारी उपेक्षेची वागणूक आणि साखर सम्राटांकडून त्यांच्यावर होणारा अन्याय पाहून त्यांनी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या मालकीचा म्हणता येईल आणि त्यांना योग्य दर देऊ शकेल, असा वैशिष्ट्यपूर्ण सहकारी साखर कारखाना उभा करण्याचा निर्धार केला. उच्च ध्येयाने झपाटलेल्या अवस्थेत त्यांनी 'हुतात्मा' सहकारी साखर कारखाना उभारण्याचा निर्णय घेऊन त्याचा पाठपुरावा केला आणि अनंत खस्ता खात कारखान्याची उभारणी केली. सहकार क्षेत्रातील मानदंड म्हणता येईल, अशा आदर्श साखर कारखान्याची त्यांनी केलेली उभारणी आणि त्याची अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती हे कल्पनावत वाटावे असे त्यांचे कार्य आहे. या कारखान्यामुळे सहकाराचे महत्त्व जणू लोकांना नव्याने पटले आणि नागनाथअण्णांची प्रतिमा अधिकच उंचावली. अनेक व्यवस्थापन तज्ज्ञांनी थक्क व्हावे अशा प्रकारची हुतात्माची अभिनव कार्यपद्धती हे नागनाथअण्णांच्या अचाट कल्पनाशक्तीचे मूर्त रूप ठरले. देश-विदेशातील विविध साखरतज्ज्ञांनी या कारखान्यास भेट देऊन नागनाथअण्णांच्या कार्याचे तोंडभरून कौतुक केले. या कारखान्याच्या सहकार्याने नागनाथअण्णांनी इतर अनेक विधायक उपक्रम सुरू केले आणि त्याबरोबरच जनजागृतीचे, प्रबोधनात्मक आणि न्याय्य मागण्यांसाठीचे संघर्षात्मक कार्यक्रम हाती घेतले. गरीब, उपेक्षित, दलित, शोषित, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त आदींच्या व्यापक हितासाठी मोर्चे काढले. परिषदा भरविल्या आणि न्याय्य मागण्यांसाठी आंदोलने सुरू ठेवली. कारखाना स्थिरस्थावर व सुरळीत झाला, पण नागनाथअण्णांच्या चळवळ्या वृत्तीला अनेक धुमारे फुटले. त्यांच्या विविध कार्यात आणखी भर पडत राहिली. नवे उपक्रम सुरू झाले.

■■■■

# ७

# शेतकरी, शेतमजुरांचे लढे

१९५७ ते ६२ या काळात नागनाथअण्णा आमदार होते, पण त्यानंतर त्यांनी राजकारणापासून दूर राहून शैक्षणिक कार्यात आणि शेतकऱ्यांवरील अन्यायाविरोधी लढ्यात झोकून देण्याचे ठरवले. किसान शिक्षण संस्थेचे विस्तार कार्य व हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची उभारणी यात सुमारे २३ वर्षांचा काळ गेला. १९८४ मध्ये 'हुतात्मा' च्या उभारणीचे काम पूर्ण होऊन गळीत हंगाम सुरू झाल्यावर सभासद शेतकऱ्यांच्या हाती साखर कारखान्याची सूत्रे देऊन ते मोकळे झाले. पुढे शेतकरी, शेतमजुरांचे संघटन कार्य सुरू ठेवण्याचे त्यांनी ठरवले होते. काही विधायक उपक्रम राबविण्याचीही त्यांची योजना होती, पण दरम्यानच्या काळात १९८५ ला महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. वाळवा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी काँग्रेसविरोधी पक्षांकडे सक्षम उमेदवार नसल्यामुळे नागनाथअण्णांनी निवडणूक लढवावी, असा विरोधी पक्षांच्यावतीने आग्रह धरण्यात आला. नागनाथअण्णांनीही तो मान्य करून वाळवा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यास संमती दिली. अपक्ष म्हणून त्यांनी ही निवडणूक लढवली आणि ते निवडूनही आले. तथापि विधिमंडळाच्या कामकाजात आपल्याला फार रस नसल्याचे त्यांनी यापूर्वीही स्पष्ट केले होते. या निवडणुकीनंतरही त्यांनी शेतकरी, शेतमजुरांच्यासाठी संघटनात्मक पातळीवर काम करण्यालाच अग्रक्रम दिला. शेतकरी, शेतजमूर व कष्टकऱ्यांची संघटना बांधण्याचे त्यांनी १९७१ पासून प्रयत्न चालवले होते. तथापि, ते म्हणावे तेवढे यशस्वी झाले नव्हते. या पार्श्वभूमीवर १९८५ च्या निवडणुकीनंतर त्यांनी पुन्हा त्या दिशेने प्रयत्न करण्याचे ठरवले. त्या दृष्टीने वातावरण निर्मितीसाठी ऐतवडे ब्रुद्रुक येथे शेतकरी, शेतमजुरांची भव्य परिषद घेण्याचे निश्चित केले. परिषदेच्या तयारीसाठी परिसरातील विविध गावांतून शंभराहून अधिक सभा घेतल्या. त्या परिषदेला अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला. हजारो शेतकऱ्यांनी उपस्थित राहून नागनाथअण्णांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. त्यानंतर १९८८ मध्ये त्यांनी वाळवा येथे शेतकऱ्यांसाठी प्रबोधन शिबिर आयोजित केले. शेतकऱ्यांना त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढ्यास प्रेरित करण्याबरोबरच त्यांचे राजकीय, सामाजिकदृष्ट्या

प्रबोधन करण्याची भूमिका घेऊन नागनाथअण्णांनी व्यापक प्रयत्न सुरू ठेवले. २६ मे १९९३ ला त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील किणी येथे भव्य शेतकरी परिषद आयोजित केली. या काळात देशपातळीवर अनेक गंभीर घडामोडी झाल्या होत्या व सामाजिक वातावरणही काहीसे प्रदूषित बनले होते. विशेषतः बाबरी मशीद पाडण्याच्या घटनेमुळे राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवण्यात काँग्रेस पक्षाला अपयश आल्याचे नागनाथअण्णांचे म्हणणे होते व ते जाहीरपणे ते मांडत असत. काँग्रेस पक्ष हा भांडवलदार धार्जिणा बनला असून शेतकरी, शेतमजूर व कष्टकऱ्यांपासून तो दुरावला असल्याचे मत ते व्यक्त करीत असत. देशात जातीयवादी शक्ती प्रबल बनत चालल्याबद्दलही त्यांना चिंता वाटत होती. या जातीय शक्तींचा बीमोड करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी वर्गाचे संघटन आवश्यक आहे असे ते म्हणत. त्यासाठी त्यांच्यात जागृती करून त्यांना संघटित केले पाहिजे, असे त्यांना वाटे. शेतकरी परिषदेच्या प्रचारासाठी ठिकठिकाणी होणाऱ्या सभेत ते आपली ही भूमिका स्पष्टपणे मांडत. शेतकरी, कष्टकरी वर्गात जागृती होऊन त्यांना राजकीय, सामाजिक परिस्थितीचे भान यावे, यासाठी ते जनजागरण करीत राहिले. किणी परिषदेतही त्यांनी ही भूमिका मांडली व संघटनेचे स्वरूप राज्यव्यापी करण्याची तसेच तिची ताकद वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. शेतकरी, कष्टकऱ्यांची संघटना राज्यपातळीवर स्थापन झाली पाहिजेच, पण स्वसामर्थ्यावर आपले प्रश्न सोडविण्याची ताकद असणारी संघटना गावपातळीवरही उभी राहिली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. जातीयवादी पक्षांना त्यांनी नेहमीच विरोध केला आणि जातीय वृत्तीच्या संघटनांनाही त्यांनी कधी थारा दिला नाही. या बाबतीत त्यांनी राजकीय, सामाजिक जीवनातच नव्हे, तर व्यक्तिगत पातळीवरही कधीच तडजोड केली नाही. नागनाथअण्णांची ही तात्त्विक भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतरही नेहमीच कायम राहिली. आपल्या भूमिकेच्या प्रचार, प्रसारास्तव त्यांनी अनेकदा राज्यव्यापी दौरे केले आणि सर्वसामान्य शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या प्रबोधनासाठी जाणीवपूर्वक सातत्याने प्रयत्न केले. केवळ शेतकरीच नव्हे, तर विद्यार्थी, युवक, महिला, कामगार आणि धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांच्यासाठी घेण्यात आलेल्या विविध परिषदांत, आंदोलनात्मक कार्यक्रमात आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या लढ्यात नागनाथअण्णांनी आपले तत्त्वविचार तसेच धार्मिक, जातीय वृत्तीपलीकडची सामाजिक न्यायाची कृतिशीलता कायम ठेवली, हे विशेष म्हणावे लागेल.

किणी परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नागनाथअण्णांनी मंडल आयोगाचे केलेले जाहीर स्वागत व समर्थन. प्रसिद्ध चित्रपट अभिनेते निळु फुले या परिषदेस आवर्जून

उपस्थित राहिले होते. नागनाथअण्णांच्या भूमिकेला त्यांचा पाठिंबा होता. त्यावेळच्या भाषणात ते म्हणाले होते, 'बारा बलुतेदारांच्या हिताचा विचार करणाऱ्या मंडल आयोगाबद्दल चुकीची माहिती देऊन जातीयवादी शक्ती बहुजन समाजातील युवकांना चिथावणी देत आहेत. त्यांचे हे कारस्थान हाणून पाडले पाहिजे. महाराष्ट्रात नव्या परिवर्तनवादी चळवळीचा प्रारंभ या परिषदेद्वारे होत आहे. सर्व धर्मनिरपेक्ष शक्ती एकत्र करून मोठी आरोळी ठोकावयाची आहे, प्रचंड वादळ उभे करावयाचे आहे.'

निळू फुले यांच्या आवाहनानुसार त्या परिषदेत नागनाथअण्णांनी धर्मनिरपेक्ष शक्तींचे संघटन करण्याचा निर्धार केला आणि विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे ठरविले. किणी परिषदेनंतर त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी जातीय शक्तींच्या विरोधात राज्यात सर्वत्र तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात प्रचार दौरे काढले आणि ठिकठिकाणी सभा घेतल्या. मंडल आयोगाच्या कार्यवाहीनंतर देशभर उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या होत्या. आयोगाच्या समर्थनार्थ नागनाथअण्णांनी घेतलेल्या ठोस भूमिकेचे तत्कालीन पंतप्रधान डॉ. व्ही. पी. सिंग यांनीही कौतुक केले. कल्याण येथील फुले, शाहू, आंबेडकर जागतिक साहित्य परिषदेत त्यांच्या हस्ते नागनाथअण्णांचा सत्कारही करण्यात आला. मागास जातींच्या न्याय्य हक्कासाठी लढे सुरू ठेवताना जातीयवादी शक्तींचा बीमोड करण्याचे धोरण व तद्नुषंगाने कार्य त्यांनी सुरू ठेवले. याबाबतीत त्यांचे विचार स्पष्ट होते व त्यांच्या मनात कसलाही वैचारिक संभ्रम नव्हता हे महत्वाचे.

१९८८ नंतर नागनाथअण्णांनी राजकीय आणि सामाजिक कार्यावर अधिक लक्ष केंद्रित केले. समाजातील कमकुवत व उपेक्षित वर्गाच्या न्याय्य हक्कासाठी लढे उभारणे आणि शासनाकडे त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करणे यावर भर दिला. त्यासाठी त्या त्या घटकांना संघटित करून परिषदा भरविणे, मोर्चे, आंदोलने आदी कार्यक्रम राबविणे, दबलेल्या वर्गाचा आवाज बुलंद करणे या दृष्टीने ते अहोरात्र कार्यरत राहिले. १९९३ पासून तर एका पाठोपाठ एक कार्यक्रम त्यांनी हाती घेतले आणि या वर्गाच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यापैकी एक महत्त्वाचा विषय म्हणजे दुष्काळी भागाचा पाणीप्रश्न. सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील जनतेला संघटित करून त्यांच्या मागण्या शासनाकडे मांडण्यासाठी त्यांनी सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथे ११ जुलै, १९९३ ला भव्य पाणी परिषद आयोजित केली. या तीन जिल्ह्यांतील १३ दुष्काळग्रस्त तालुक्यातील शेतकऱ्यांनी तर या परिषदेस उत्फूर्त प्रतिसाद दिलाच, पण सर्वसामान्य

जनतेनेही मोठ्या संख्येने उपस्थित राहून पाठिंबा दर्शवला. सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढे उभारणारा नेता, ही नागनाथअण्णांची ओळख आणखी ठळक झाली. आटपाडीच्या पाणी परिषदेची तयारी अत्यंत नियोजनबद्धरीत्या करण्यात आली होती. महिनाभर आधीपासून कार्यकर्त्यांना गावोगावी पाठवून सभा घेण्यात आल्या होत्या. परिषद कशासाठी आहे, हे त्यांना समजावून सांगण्यात आले होते. कृष्णा पाणी तंटा सोडवणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या बच्छावत आयोगाने महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र प्रदेशच्या वाट्याला किती पाणी येणार हे ठरविले होते. आयोगाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्राच्या वाट्याला ५९४ टीएमसी पाणी आले होते. हे पाणी ३१ मे, २००० पर्यंत अडवणे आवश्यक होते. तथापि त्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने काहीही तयारी केलेली नव्हती. जर हे पाणी दिलेल्या मुदतीत कृष्णा नदीतून उचलले गेले नाही, तर ते कर्नाटक व आंध्र प्रदेशच्या वाट्याला जाणार होते. कृष्णेचे हे पाणी दुष्काळग्रस्त भागाला मिळावे ही मागणी नागनाथअण्णांनी पुढे करून त्यासाठी प्रयत्न चालवले होते. दुष्काळी भागातील जनतेचा या पाण्यावर न्याय्य अग्रहक्क आहे, ही गोष्ट त्यांना पटवून देण्यासाठी मुख्यत्वेकरून आटपाडी पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. एखादी परिषद भरवून केवळ शक्तीप्रदर्शन करण्यापेक्षा लोकांना प्रश्न समजावून सांगून त्यांचे संघटन करणे नागनाथअण्णांना महत्त्वाचे वाटत होते. परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्या दृष्टीने त्यांनी सारा दुष्काळी भाग प्रचार सभांद्वारे ढवळून काढला होता. त्याचा परिणाम चांगला झाला आणि सर्वच थरातून पाणी परिषदेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. सुमारे ४० हजार शेतकऱ्यांनी परिषदेस हजेरी लावली. विशेष म्हणजे या परिषदेचे व्यासपीठ सर्वपक्षीय ठेवण्याचा त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. त्यामुळेच तत्कालीन मंत्री आर. आर. पाटील यांच्यासारखे काही सत्ताधारी नेतेही या पाणी परिषदेचे समर्थक बनले. नागनाथअण्णांनी नंतर दुष्काळी भागात सातत्याने पाणीप्रश्नासाठी जनतेच्या पाठबळावर लढे उभारले आणि तो धसास लावला. सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा त्यांचा हेतू तर साध्य झालाच, पण जनतेचा दबाव वाढू लागल्यामुळे सरकारला या प्रश्नाची गंभीरपणे दखल घेणे भाग पडले.

नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखालील 'हुतात्मा' सहकारी साखर कारखान्याचा परिसर वाळवा तालुक्यातील संपन्न क्षेत्रातील असताना आणि त्यांचा मतदारसंघही वाळवा असताना ते आटपाडीसारख्या दुष्काळी भागात परिषदा घेतात, यामागे त्यांचा काही राजकीय हेतू असावा, असा अपप्रचार त्यांचे काही विरोधक त्या काळात करीत असत; पण नागनाथअण्णांनी

तिकडे कधीच लक्ष दिले नाही वा अशा चर्चांची दखलही घेतली नाही. दुष्काळी भागातील जनतेला पाणी मिळाले पाहिजे, ही त्यांची प्रामाणिक इच्छा होती आणि या भावनेपोटीच ते कार्यरत राहिले. आजवर सहकारी साखर उद्योगातील कोणाही नेत्याने अशा प्रकारचा उदात्त हेतू ठेवून दुष्काळग्रस्त किंवा समाजातील दलित, शोषित व उपेक्षित घटकांसाठी काम केले नव्हते. आपल्या कारखान्याच्या कार्यक्षेत्राबाहेर त्यांचे लक्ष जात नसे आणि जे काही विधायक काम करायचे ते कारखाना कार्यक्षेत्रातच अशी त्यांची भूमिका असे. व्यापक सामाजिक भान असणारा आणि सामाजिक बांधिलकी मानणारा नागनाथअण्णांसारखा नेता साखर उद्योगात अपवादात्मकच म्हणावा लागेल. दुष्काळी भागात प्रचार कार्यासाठी जातानाही ते कार्यकर्त्यांना बरोबर घरच्या भाकरी आणायला सांगत. आपल्या कार्यकर्त्यांचा भार गरीब दुष्काळी जनतेवर किंवा तिथल्या कार्यकर्त्यांवर पडू नये याची ते दक्षता घेत. स्वतः ट्रकमध्ये भुईमुगाच्या शेंगांची पोती आणि गुळाच्या ढेपा घेऊन जात असत आणि कार्यकर्त्यांना त्याचे वाटप करीत. त्यांच्याकडे असणारा कार्यकर्त्यांचा संचही अत्यंत निष्ठेने व तळमळीने काम करणारा होता. त्यामुळे कसल्याही अडचणी न सांगता, कुरकूर न करता उत्स्फूर्तपणे ते प्रचारकार्य करीत असत. परिषदेच्या काळात तर रात्रंदिन परिश्रम घेत आणि दिलेली जबाबदारी आनंदाने पार पाडीत. असे कार्यकर्ते पाठीशी असणे हेही महत्त्वाचेच.

नागनाथअण्णांच्या कार्यावरील निष्ठेमुळेच त्यांना असे अनेक कार्यकर्ते लाभले आणि समर्पित भावनेने काम करीत राहिले. सहकार क्षेत्रात किंवा राजकारणात वावरणाऱ्या अनेक नेत्यांभोवती जमणारी संधीसाधूंची भुतावळ पहायला मिळण्याच्या काळात नागनाथअण्णांच्या पाठीशी निःस्वार्थी कार्यकर्त्यांचे मोहोळ उभे राहिलेले पाहून अक्षरशः भारावून जायला होत असे. निरपेक्ष भावनेने काम करणारे कार्यकर्ते असल्यामुळेच ते नागनाथअण्णांसारख्या कुठलेही सत्तापद नसलेल्या नेत्यांबरोबर कार्यरत राहिले. आपल्या नेत्याविषयी त्यांना वाटणारा विश्वास आणि त्यांच्या बाबतचा आदर यामुळेच हे घडू शकले. नागनाथअण्णा नेहमीच अशा सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या गराड्यात असत. ते सारेच त्यांना जवळचे वाटत. कार्यकर्ते आणि सामान्य शेतकरी, शेतमजूरही. विशेष म्हणजे हे सारे त्यांना सहज जमत असे. कोणाच्याही बाबतीत कसलाही दुजाभाव ते करीत नसत. सारे आपलेच आहेत, अशा आपुलकीच्या भूमिकेतूनच त्यांचा सर्वत्र वावर असे आणि वागणेही. कारखान्याच्या कामासाठी मुंबई किंवा दिल्लीस जात, तेव्हाही कार्यकर्त्यांसोबतच त्यांचे वास्तव्य असे. कमीत कमी खर्चात अत्यंत साधेपणाने राहणे आणि साधे जेवण घेणे हे पथ्य ते नेहमीच पाळत. प्रसंगी

आमदार निवासाच्या व्हरांड्यातही धोतराची खोळ करून ते झोपत. कसलाही ऐषाराम आणि उंची राहणी त्यांना पसंत नसे. आपण सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि जनतेच्या पैशाचे विश्वस्त आहोत याचे भान ते स्वतः ठेवीत आणि बरोबरच्या कार्यकर्त्यांनाही त्याची सतत जाणीव करून देत. एवढ्या साधेपणाने राहणारा आणि वागणारा नेता सहकारी साखर उद्योगात तर दुर्मिळच म्हणावा लागेल.

▣▣▣▣

# ८

# दुष्काळी पाणी परिषदा

नागनाथअण्णांचा सर्वच व्यवहार पारदर्शी असे आणि सर्व निर्णयही ते खुलेपणाने, सर्वांच्या साक्षीनेच घेत असत. त्यांची ही कार्यपद्धती आणि सर्वसामान्यांत मिळून मिसळून वागण्याची वृत्ती त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला भारावून टाकत असे. कडक इस्त्रीच्या पांढऱ्या शुभ्र कपड्यातील उच्चभ्रू नेत्यांना पहायची सवय लागलेल्या लोकांना नागनाथअण्णांची साध्या वेशातील मूर्ती ही नेत्यांच्या प्रस्थापित प्रतिमेशी अत्यंत विसंगत वाटणे साहजिक असे; पण कोणत्याही परिस्थितीत आपल्या साध्या वेशभूषेत आणि राहणीमानातही त्यांनी कधीच बदल केला नाही. कदाचित त्यामुळेही असेल, पण नागनाथअण्णा दुष्काळी भागातील जनतेला अधिक जवळचे वाटले असावेत. कारण दुष्काळग्रस्त जनतेशी त्यांनी निर्माण केलेले नाते अत्यंत आपुलकीचे व सहृदयतेचे राहिले. नागनाथअण्णांनी १९९३ च्या आटपाडी पाणी परिषदेत जाहीर घोषणा केली आणि दुष्काळी भागाला कृष्णेच्या पाण्याचे समान व न्याय्य वाटप होईपर्यंत दरवर्षी शाहू छत्रपती महाराजांच्या २६ जुलै या जन्मदिवशी आटपाडीत पाणी परिषद घेण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यानंतर दरवर्षी पाणी परिषद होऊ लागली. दरम्यान १९९५ साली विधानसभेच्या निवडणुका होऊन काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी अल्पमतात गेली. नव्याने सत्तेवर आलेल्या भाजप-शिवसेना युती सरकारला अपक्ष आमदारांच्या गटाने कृष्णा खोरे पाणीप्रश्न मार्गी लावण्याच्या अटीवर पाठिंबा दिला. अपक्ष आमदारांचा हा गट बव्हंशी काँग्रेसमधील बंडखोरांचा होता. या गटाच्या मागणीची सरकारला गंभीर दखल घ्यावी लागली. त्यावेळचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी आटपाडी येथे खास परिषद घेऊन कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना करण्याचे घोषित केले. कृष्णा खोरे पाणी योजनेच्या कामाला गतीने सुरूवात झाली, पण पुढे पुरेशा निधीअभावी काम रेंगाळले. त्यासाठी पुन्हा लढा उभारावा लागला.

१९९४ ते १९९८ या काळात नागनाथअण्णांनी पाच पाणी परिषदांचे आयोजन केले. त्यापैकी तीन परिषदा सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळी तालुक्यांच्या संयुक्त व्यापक परिषदा होत्या. त्यांना शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

२० जुलै, १९९८ ला घरनिकी (तालुका आटपाडी) येथे चौथी आणि २७ जुलै, १९९८ ला आटपाडी येथे पाचवी अशा पाठोपाठ दोन भव्य परिषदा झाल्या. त्यानंतर २९ ऑक्टोबर, १९९८ ला दुष्काळी भागातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचे मोर्चे काढण्यात आले. यावेळी झालेल्या आंदोलनात २ हजार कार्यकर्त्यांनी अटक करवून घेतली, पण तरीही सरकारने काहीही हालचाल केली नाही. ३१ मे, २००० ही कृष्णेचे पाणी अडवण्यासाठीची अंतिम मुदत जवळ येत होती, पण तरी देखील सरकार अद्याप ढिम्मच होते. तथापि, निराश न होता नागनाथअण्णांनी लढा सुरूच ठेवला. २६ जून, २००२ ला त्यांनी पाणी प्रश्न सोडविण्याबाबत शासनाला निवेदन दिले, तर २८ ऑगस्ट, २००० रोजी दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांचा सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेला. २२ नोव्हेंबर, २००० रोजी कृष्णा खोरे योजनेचे पाणी दुष्काळी भागाला मिळावे या मागणीसाठी आटपाडी तालुक्यातील करगणी, झरे, दिघंची, आटपाडी, शेटफळे या गावांदरम्यान ५० हजारांहून अधिक नागरिकांनी मानवी साखळी करून या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यात स्त्री-पुरुषांबरोबरच विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले. सनदशीर मार्गाने पाणीप्रश्नासाठीचे आंदोलन सुरू असले, तरी योजनेच्या कार्यवाहीकडे सरकार लक्ष देत नाही, असे पाहून नागनाथअण्णांनी आंदोलन अधिक तीव्र करण्याचे ठरवले. ६ एप्रिल, २००१ ला त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी संघटनेच्या वतीने हजारोंचा मोर्चा आटपाडी तहसील कार्यालयावर नेण्यात आला. कृष्णेवरील टेंभू योजनेतून आटपाडी तालुक्यातील शेतीला बारमाही पाणी मिळण्याची मागणी मोर्चाच्या वतीने करण्यात आली. टेंभू योजनेचे पाणी आटपाडीला देण्याच्या मागणीबरोबरच संपूर्ण राज्याचे पाणीवाटपविषयक धोरण बदलण्याचीही मागणी करण्यात आली. समान पाणीवाटपाच्या न्यायाने राज्यातील उपलब्ध पाणी दुष्काळी भागाला आग्रक्रमाने मिळाले पाहिजे, ही भूमिका मांडण्यात आली. या मागणीसाठी आटपाडी तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. १५ ऑगस्ट, २००१ पासून टेंभू योजनेच्या डाव्या कालव्याचे काम सुरू करण्याच्या शासकीय अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतरच हे ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान पुन्हा २८ जुलै, २००१ ला आटपाडी येथे १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकऱ्यांची पाणी संघर्ष परिषद आयोजित करण्यात आली. 'जोपर्यंत दुष्काळी भागाला पाणी मिळत नाही, तोवर दुष्काळी भागातील मंत्र्यांना सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. सरकारवर दबाव आणण्यासाठी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा' अशी मागणी नागनाथअण्णांनी परिषदेत जाहीरपणे केली. तथापि सत्तेत असणारे दुष्काळी भागातील मंत्री कोडगे असल्यामुळे

जनतेच्या पाणीप्रश्नासाठी ते राजीनामे देतील असे वाटत नाही, अशा शब्दात त्यांची संभावनाही केली. १५ ऑगस्टपासून डाव्या कालव्याचे काम सुरू करण्याबाबत दिलेला शब्द शासनाने न पाळल्यामुळे नागनाथअण्णांनी दुष्काळी भागात जोपर्यंत पाणी येणार नाही, तोपर्यंत शेतसारा न भरण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले. २८ जुलै, २००१ ची पाणी परिषद कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आली होती. कर्मवीर भाऊरावअण्णांच्या स्वातंत्र्य व समतेच्या तत्त्वानुसार दुष्काळी भागातील जनतेने वाटचाल करावी आणि शासनापुढे लाचार व हतबल न होता आपल्या न्याय्य हक्कांसाठी स्वाभिमानाने झगडावे, असेही यावेळी जाहीरपणे सांगण्यात आले.

पाणीप्रश्नाबाबत दुष्काळी भागातील जनतेत जागृती निर्माण करण्यात पाणी संघर्ष चळवळीला यश आले. या प्रश्नावर कोठेही बैठक, सभा व परिषद बोलावली, की दुष्काळी भागातील लोक उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागले. जनजागृती व जनमताच्या रेट्यामुळे शासनाला योजनेची कार्यवाही तातडीने करण्यावाचून गत्यंतर राहिले नाही. दरम्यान कृष्णा खोरे महामंडळाने समान पाणीवाटप पथदर्शक प्रकल्प मान्य करून त्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे ठरवले. या पार्श्वभूमीवर ३ डिसेंबर, २००१ ला आटपाडी येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत समाधान व्यक्त करण्यात आले, पण योजनेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत पाणीप्रश्नासाठीचा लढा चालूच ठेवण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. टेंभू पाणी वाटपाबाबत दुष्काळी भागासाठी जे न्याय्य तत्त्व मान्य करण्यात आले, तेच शिराळा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वारणा धरण प्रकल्पाच्या पाण्याबाबतही लागू करण्यात यावे, अशी मागणी नागनाथअण्णांनी शासनाकडे केली. त्यासाठी पणुंब्रे वारुण येथे शेतकऱ्यांची परिषद घेतली आणि जनआंदोलनात सहभागी होण्याचे त्यांना आवाहन केले. एकंदरीत, पाणीप्रश्नासाठी सुमारे ९ वर्षे संघर्ष केल्यानंतर टेंभू योजनेतून दुष्काळी भागाला पाणी नेण्याच्या योजनेची कार्यवाही सुरू झाली. मात्र ही जबाबदारी पार पाडणाऱ्या कृष्णा खोरे महामंडळाकडे पुरेसा निधी नसल्याने योजनेचे काम अल्पावधीतच बंद पडले. त्यामुळे बंद पडलेले काम पूर्ववत सुरू करण्यासाठी पुनश्च आंदोलनाचे हत्यार हाती घेणे पाणी संघर्ष चळवळीच्या नेत्यांना भाग पडले. त्यासाठी पुन्हा २६ जुलै, २००२ ला आटपाडी येथे पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले. पाणीप्रश्नासाठी लढा सुरू झाला त्यावेळी भाजप-शिवसेना युती सरकार सत्तेवर होते, त्यानंतर काँग्रेस आघाडी सरकार सत्तेवर आले. तथापि, दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दोन्ही सरकारांचा दृष्टिकोन एकसारखा आणि

उपेक्षेचाच असल्याचे पाणी संघर्ष चळवळीच्या नेत्यांना अनुभवावयास मिळाले. त्यामुळे आटपाडीच्या या पाणी परिषदेत नागनाथअण्णांनी पुन्हा हा लढा तीव्र करण्याची घोषणा केली. या परिषदेचे उद्घाटन निळू फुले यांनी केले व माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ती पार पडली. सरकार जोपर्यंत दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात नाही व त्यांच्या शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देत नाही, तोपर्यंत पाणीप्रश्नासाठीचा संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार परिषदेत व्यक्त करण्यात आला. कृष्णा खोरे महामंडळाला पुरेसा निधी उपलब्ध होऊन जोपर्यंत योजना पूर्ण केली जात नाही तोपर्यंत संघर्ष सुरूच ठेवणार असल्याचे जाहीर करून त्यासाठी नागनाथअण्णांनी २ ऑक्टोबर, २००२ पर्यंत सरकारला अंतिम मुदत दिली. या मुदतीत काम सुरू न झाल्यास दुष्काळी तालुक्यातील लाख शेतकरी तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही दिला. त्यानंतरही शासनाने हालचाल केली नाही, तर ३० ऑक्टोबर, २००२ अखेर दोन लाख शेतकरी 'जेल भरो' आंदोलनात सहभागी होतील असे स्पष्ट करून त्यासाठी सज्ज राहण्याचे शासनाला आवाहन केले.

दुष्काळी भागातील पाणीप्रश्नी झालेल्या प्रत्येक आंदोलन व परिषदेनंतर शासनाकडून आश्वासने दिली जायची. कधी मुख्यमंत्री, पाटबंधारे मंत्री तर कधी संबंधित वरिष्ठ अधिकारी तातडीने काम सुरू करण्याबाबतची मागणी मान्य करून एखादी तारीख जाहीर करीत असत, पण आश्वासनाचे पालन मात्र त्यांच्याकडून केले जात नसे. दरवेळी आंदोलनकर्त्यांची, त्यांच्या नेत्यांची समजूत काढली जात असे, पण पुढे काहीच होत नसे. २६ जुलै, २००२ च्या आटपाडी परिषदेनंतरही कृष्णा खोरे महामंडळाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे आश्वासनाचा खेळ सुरूच राहिला. पणी संघर्ष समितीच्या वतीनेही निवेदने, मोर्चे, परिषदांचे कार्यक्रम होतच राहिले. या प्रश्नी सतत पाठपुरावा करूनही मुर्दाड शासन ढिम्मच राहिले. परिणामी दुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठीची लढाई समितीला सुरूच ठेवावी लागली. या लढ्याचा भाग म्हणून १९ जानेवारी, २००४ ला पुणे येथील कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन आयोजित करण्यात आले. नागनाथअण्णा, गणपतराव देशमुख, डॉ. बाबा आढाव, डॉ. भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले. दुसऱ्या दिवशी तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील व पाटबंधारे मंत्री अजित पवार यांनी आंदोलनस्थळी येऊन राज्य शासनाने कृष्णा खोरे सिंचन प्रकल्पासाठी ३१ मार्च, २००४ पर्यंत १५०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यास मंजुरी दिल्याचे

जाहीर केले तसेच त्यापैकी ११५० कोटी रुपये कृष्णा खोरेच्या दुष्काळी भाग प्रकल्पासाठी खर्च करण्याचे व महिन्याभरात काम सुरू करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर दोन दिवसांनी ठिय्या आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान, महिन्याभरात काम सुरू झाले. अशाप्रकारे तब्बल ११ वर्षे चाललेल्या या लढ्याची यशस्वी सांगता झाली.

नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली पाणी संघर्ष चळवळीच्या वतीने दीर्घकाळ चाललेल्या या लढ्याला यश आले खरे; पण याचा अर्थ कृष्णा पाणी तंटा शासनाने योग्य प्रकारे हाताळला, असे मात्र म्हणता येणार नाही. ज्या मूळ प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी नागनाथअण्णांनी दुष्काळी भागाला पाणी मिळण्याची मागणी केली, तो प्रश्न मार्गी लावला, इतकेच. नेत्यांनी आश्वासने दिल्यानंतरही या कामात अडथळे निर्माण झालेच. मात्र या लढ्याच्या निमित्ताने बऱ्याच बाबी जनतेच्या निदर्शनास आल्या. एक म्हणजे सत्तेवर कोणतेही सरकार आले, तरी त्याला जनसामान्यांच्या प्रश्नाबद्दल आस्था असतेच असे नाही, किंबहुना लोकहिताच्या कामाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन कमीअधिक प्रमाणात सारखाच असतो. राज्यात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे सत्तेवर असताना नागनाथअण्णांनी हा निर्विवाद प्रश्न धसास लावला तरी त्यांना मिळालेला प्रतिसाद सारखाच होता. नोकरशाहीची कार्यपद्धती आणि वृत्तीही तीच अनुभवावयास आली. कृष्णा पाणी तंटा प्रश्नी लवादाने दिलेला निर्णय अंमलात आणणे व महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी दिलेल्या अंतिम मुदतीत उलचणे आवश्यक असतानाही दोन्ही सरकारांची उदासीनताच दिसून आली. दिलेली जाहीर आश्वासने पाळण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे, असे सत्ताधारी नेत्यांना वाटत नाही. याबाबतीत सत्ताधाऱ्यांची वृत्ती सारखीच असल्याचे दिसून आले. जलसिंचनासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाला अग्रक्रम देणे गरजेचे असतानाही तिकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही. ज्या दूरदृष्टीने व आत्मियतेने राज्याच्या व्यापक हिताचे प्रश्न हाताळणे गरजेचे होते, ती आत्मियता व धोरणात्मक विचार सरकारच्या कार्यपद्धतीत असल्याचे आंदोलनकर्त्यांना कधीच जाणवले नाही. नागनाथअण्णांनी सत्ताधाऱ्यांच्या या मुर्दाड वृत्तीचा अनेकदा अनुभव घेतला. त्यामुळेच त्यांचा कोणत्याच राजकीय पक्षावर विश्वास राहिला नव्हता. मात्र असे असले तरी ते राजकारण करीतच राहिले. अपक्ष म्हणून का होईना राजकीय संघर्ष करीत राहिले. एरव्ही दुष्काळी भागाला पाणी देण्याचा प्रश्न सरकारने अग्रक्रमाने धोरणात्मक म्हणून हाती घेऊन तडीस न्यायला हवा होता, पण त्यासाठी नागनाथअण्णा व त्यांच्या समर्थकांना तब्बल अकरा वर्षे संघर्ष करावा लागला. यात कालापव्यय झाला आणि जादा आर्थिक भारही सोसावा लागला. या

लढ्यामुळे एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय झाला, तो म्हणजे समान पाणी वाटपाचे तत्त्व राज्य सरकारने स्वीकारले. दुष्काळी परिषदांतून व्यापक स्वरुपात करण्यात आलेल्या मागण्यांमुळे व जनतेच्या सहभागामुळेच हे होऊ शकले. पाणी संघर्ष चळवळीच्या लढ्याचे हे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल. यापूर्वी ज्या भागात धरणाचे पाणी उपलब्ध असेल, त्या परिसरातील शेतकऱ्यांनाच पाण्याचा लाभ होत असे. म्हणजे राज्यातील काही भाग सुजलाम होत असे. किंबहुना या न्यायानेच पाण्याचे वाटप होत असे. नागनाथअण्णांनी प्रथमच दुष्काळी भागाचा पाणीप्रश्न धसास लावला आणि दुष्काळग्रस्त भागातील जनतेला न्याय मिळवून दिला. विविध पाणी परिषदांच्या निमित्ताने जी जनजागृती झाली ती शेतकऱ्यांच्या दृष्टीने तर हिताची ठरलीच, पण सर्वसामान्यांनाही आपल्या न्याय्य हक्काची जाणीव करून देणारी ठरली. समान पाणी वाटपाचे तत्त्व दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या मनावर बिंबवताना सामाजिक व राजकीय न्याय्य हक्काची भाषाही लोकांना चांगल्या प्रकारे कळू लागली. एक प्रकारे जनतेचे व्यापक प्रमाणात प्रबोधन होत राहिले. याही दृष्टीने ही आंदोलने लाभदायक ठरली.

▣▣▣▣

# ९
# प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांचे पुनर्वसन

सांगली जिल्ह्यात वारणा नदीवर धरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतल्यानंतर तो कोठे व्हावा, याबाबत मोठा वाद निर्माण झाला. नियोजित धरण खुजगाव येथे व्हावे अशी एक मागणी पुढे आली, तर ते चांदोली येथे व्हावे, अशी दुसरी मागणी होती. १९७२ मध्ये उद्‌भवलेला हा वाद बराच काळ चालू राहिला. सांगली जिल्ह्यात या दोन्ही धरणांच्या जागांचे समर्थन करणाऱ्यांनी प्रचार सभा व परिषदा घेऊन आवाज उठविण्यास सुरुवात केली. या वादाचे पडसाद विधानसभेतही उमटले. त्यावेळी वसंतदादा पाटील हे पाटबंधारे खात्याचे मंत्री होते. या संदर्भात वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी त्यांनी दोन्ही जागांना भेट द्यायचे ठरविले. त्यानुसार सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील प्रमुख नेते, समर्थक, शेतकरी, अभियंते आदींसह त्यांनी खुजगाव व चांदोली या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. तसेच कोणत्या ठिकाणी धरण प्रकल्प उभारला तर किती पाणीसाठा होऊ शकेल, खर्च किती होईल आणि महत्त्वाचे म्हणजे किती गावांचे पुनर्वसन करावे लागेल, याबाबत माहिती घेतली. खुजगाव येथे धरण प्रकल्प उभारला तर सुमारे ७० कोटी रुपये खर्च येणार होता. शिवाय धरण प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या संभाव्य गावांची संख्या मोठी होती. पिकाऊ जमिनींचे धरणाच्या पाण्याखाली जाणारे क्षेत्रही मोठे होते. उलटपक्षी, चांदोली धरणाची उभारणी निम्म्या खर्चात होऊ शकणार होती व पाण्याखाली जाणारे पिकाऊ जमिनींचे क्षेत्रही तुलनेने कमी होते. शिवाय पुनर्वसन करावे लागणाऱ्या गावांची संख्याही कमी होती. खुजगाव धरणाचे पाणी कालव्याद्वारे शेतकऱ्यांना देण्याचे नियोजन होते, तर चांदोलीसाठी पाणी लिफ्ट करावे लागणार होते. लिफ्टसाठी जादा खर्च येणार होता, पण कालव्यामुळे पिकाऊ जमिनीचे क्षेत्र अधिक प्रमाणात वाया जाणार होते. धरण कोठे व्हावे याबाबत दोन्ही धरणांचे समर्थक आपापली बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. त्यासाठी प्रचार सभा, बैठका आणि धरण परिषदांतून आवाज उठविला जात होता. खुजगाव येथे धरण व्हावे अशी मागणी करणाऱ्या गटाचे नेतृत्व सांगली जिल्ह्यातील एक नेते राजारामबापू पाटील करीत होते. वसंतदादा पाटील यांचे ते राजकीय विरोधक म्हणून

ओळखले जात. त्यामुळे या धरणाच्या वादाला राजकीय किनारही लाभली होती. साहजिकच सांगली जिल्ह्याच्या दृष्टीने धरण कोठे होणार या विषयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. अखेरीस २ ऑक्टोबर, १९७२ ला वसंतदादांनी सांगली येथे पत्रकारांशी बोलताना चांदोली येथे धरण प्रकल्प होईल, असे स्पष्ट केले. चांदोली येथे मातीचे धरण बांधल्यास खर्च कमी येईल तसेच सुपीक जमिनीचे कमी क्षेत्र पाण्याखाली जाईल आणि पुनर्वसनाचा प्रश्नही मर्यादित ठेवता येईल, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर लवकरच धरणाचे काम सुरू झाले. १९७६ पासून या कामाला वेग आला आणि पुढे सात-आठ वर्षांत काम बऱ्याच अंशी पूर्ण होऊन धरणात पाणी साठवण्याची वेळ आली. विशेष म्हणजे तोपर्यंत धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न चर्चेतच आला नव्हता. त्यावेळी माजी आमदार वाय. सी. पाटील यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या गावांतील लोकांच्या बैठका घेऊन त्यांनी पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडविण्याची गरज असल्याचे त्यांना पटवून दिले. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी धरणाचे काम पंधरा दिवस बंद पाडले. धरणाच्या कामावरील मजूर व कामगार परिसरातीलच असल्यामुळे त्यांनी काम थांबले. त्यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे वसंतदादा पाटील यांच्याकडेच असल्यामुळे त्यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घातले. विस्थापितांचे योग्य पुरर्वसन केले जाईल. असे त्यांनी आवश्वासन दिले. 'खणाला खण आणि फणाला फण' देऊन हे पुनर्वसन करण्याची जबाबदारी मी स्वतः पार पाडीन, अशी ग्वाही त्यांनी दिली. त्यानुसार संबंधित खात्याला सूचना देऊन त्यांनी पुनर्वसनाचे काम तातडीने सुरूही केले. आपली गावे व घरे सोडून अन्यत्र जाण्याची लोकांची तयारी नव्हती, पण धरणात पाणी साठणार हे स्पष्ट दिसत असल्यामुळे त्यांनी पुनर्वसनाचा पर्याय मान्य केला. या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी सांगली जिल्ह्यातील समडोळी, कवठेपिरान, दुधगाव, तुंग, कसबे डिग्रज, आष्टा, बागणी, शिगाव, फाळकेवाडी, बहादूरवाडी, येलूर, कुरळप, चिकुर्डे, उरुण इस्लामपूर, वाळवा, बोरगाव, नवेखेड, मांगले, सागाव, बिळाशी पतवारूण व आरळा आदी गावी वेगवेगळ्या २५ वसाहती उभारण्यात आल्या आणि तेथे विस्थापितांना स्थलांतरित करण्यात आले.

धरग्रस्तांचे वेगवेगळ्या गावी पुनर्वसन करण्यात आल्याचे शासनाकडून सांगण्यात आले, पण ते तसे नावापुरतेच झाले होते. या धरणग्रस्तांना राहण्यापुरत्या फक्त मोकळ्या जागा देण्यात आल्या. त्या ठिकाणी वसाहती झाल्या, पण तेथे कोणत्याही नागरी सुविधा नव्हत्या. तेथे जाण्यासाठी ना रस्ते, ना वीज, ना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था. अक्षरशः उघड्या

माळावर किंवा गावालगत असणाऱ्या शासकीय मालकीच्या रिकाम्या जागांवर त्यांना घरे उभारण्याची परवानगी देण्यात आली इतकेच. एरव्ही आपापल्या गावी साऱ्या गावगाड्यासोबत परस्पर सहकार्याने जीवन व्यतीत करणारी कुटुंबे दूर उघड्यावर पडल्यासारखी झाली. धरणग्रस्तांच्या या वसाहती भटक्या जमातींचे हंगामी वास्तव्य असते, त्याप्रकारे कशाबशा स्थिरस्थावर झाल्या, पण एक एक करता असंख्य प्रश्न त्यांच्यासमोर आले. दैनंदिन समस्यांना कसे तोंड द्यायचे हे त्यांना समजेनासे झाले. शासनाने त्यांना जणू वाऱ्यावर सोडले होते. अशा परिस्थितीत काय करावे याबाबत सल्लामसलत करण्यासाठी धरणग्रस्तांच्या वसाहतीतील काही मंडळी नागनाथअण्णांकडे आली आणि त्यांनी आपल्या अडचणी त्यांच्यापुढे मांडल्या. त्यांच्या समस्या ऐकून नागनाथअण्णा अस्वस्थ झाले. त्यांच्यासाठी काय करता येईल याचा ते विचार करू लागले. सर्वप्रथम त्यांनी या धरणग्रस्तांना संघटित करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या बैठका घेतल्या आणि ऑगस्ट १९८५ मध्ये 'वारणा धरणग्रस्त संग्राम संघटने' ची स्थापना केली. संघटनेच्या वतीने ज्या ठिकाणी धरणग्रस्तांच्या वसाहती होत्या, त्या गावच्या पंचायती व तलाठ्यांच्या कार्यालयावर निदर्शने, मोर्चे असे कार्यक्रम आयोजित केले. धरणग्रस्तांच्या प्रश्नांची संबंधितांना जाणीव करून देण्यात आली. सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावरही अनेक मोर्चे काढले. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या प्रश्नात लक्ष घालणे भाग पडले. संबंधित धरणग्रस्त वसाहतीत हळूहळू रस्ते, वीज, पाणी आदी प्राथमिक सुविधा मिळण्यास सुरुवात झाली. नागनाथअण्णांनी या प्रश्नात लक्ष घातल्यानंतर हळूहळू त्यांच्या निदर्शनास येत गेले की प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांची व्याप्ती खूप मोठी आहे. सांगली जिल्ह्यातील धरणग्रस्तांप्रमाणेच अन्य जिल्ह्यात ज्या ठिकाणी धरणग्रस्तांच्या वसाहती झाल्या होत्या, तेथील परिस्थितीही सारखीच गैरसोयीची असल्याचे दिसून आले. नजीकच्या कोल्हापूर जिल्ह्यातील आंबोली, तांबवे, करडेवाडी, दुडुंब, दुर्गेवाडी, सोनाळी येथील धरणग्रस्तांच्या कुंभोज, लाटवडे, वडगाव, किणी, चावरे, पारगाव, कोडोली, काखे, सातवे, आरळे, थेरगाव, सरुड, भेडसगाव, सोडोली या ठिकाणी १९८४-८५ साली ज्या वसाहती झाल्या होत्या, तेथेही अद्याप मूलभूत सोयीसुविधांची वानवा होती. त्यामुळे हा प्रश्न राज्य पातळीवर नेण्याचे नागनाथअण्णांनी ठरवले. ७ ऑगस्ट, १९८६ ला त्यांनी मुंबईत मंत्रालयावर धरणग्रस्तांचा मोर्चा आयोजित केला. या मोर्चात ५० हजार धरग्रस्त शेतकरी सहभागी झाले. १९७६ चा पुनर्वसन कायदा सदोष असल्यामुळे तो रद्द करून सुधारित पुनर्वसन कायदा करण्याची मागणी त्यांनी मोर्चाच्या वतीने केली. शासनाला या मोर्चाची गांभीर्याने दखल घ्यावी लागली व पुनर्वसन कायद्यात सुधारणा करण्याचे मान्य करण्यात

आले. या प्रश्नी शासनाने तातडीने पावले उचलली व जुना पुनर्वसन कायदा रद्द करून १९८६ चा नवा कायदा अंमलात आणावयाचे ठरवले. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा प्रकल्पग्रस्तांच्या या मोर्चाची राज्यभर जोरदार चर्चा झाली. वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेने नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली लढा उभारून पहिल्या टप्प्यातच हे ऐतिहसिक यश मिळवले. एकदा कायदा अस्तित्वात आल्यानंतर नागनाथअण्णांनी त्याच्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा सुरू केला. १९८६-८७ या दरम्यान सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील तहसील कार्यालयावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर सातत्याने मोर्चाचे आयोजन केले. वर्षभरात संघटनेच्या वतीने ९ मोर्चे काढण्यात आले, तर सांगली जिल्हाधिकारी कार्यालयापुढे सात दिवस ठिय्या आंदोलन करण्यात आले. या आंदोलनांमुळे धरणग्रस्तांच्या प्रश्नांकडे शासनाने अग्रक्रमाने लक्ष देऊन ते सोडविण्याचा प्रयत्न सुरू केला. अत्यंत दुर्लक्षित असणारा हा विषय ऐरणीवर आला. अर्थातच नागनाथअण्णांनी धरणग्रस्तांच्या मागण्यांचा संघटनेच्या माध्यमातून सतत पाठपुरावा केल्यामुळेच हे घडू शकले. वास्तविक 'आधी पुनर्वसन व मग धरण' या धोरणानुसार धरणग्रस्तांचे पुनर्वसन व्हावयास हवे होते, पण तत्त्वतः मान्य करूनही शासनाने हे केले नव्हते. अगदी स्वातंत्र्योतर काळात पूर्ण झालेल्या कोयना प्रकल्पाच्या बाबतीतही हेच घडले होते. कोयना धरणग्रस्तांची वाताहत दीर्घकाळ सुरू राहिली आणि त्यांच्या अनेक कुटुंबांना हलाखीचे जिणे जगावे लागले. हा पूर्वानुभव असतानाही वारणा धरण प्रकल्पाच्या बाबतीतही शासनाने ही चूक सुधारली नव्हती. वारणा धरणग्रस्तांचीही अशीच वाताहत होत राहिली असती. केवळ नागनाथअण्णांनी या प्रश्नात लक्ष घातले आणि धरणग्रस्तांची संघटना उभारली, त्यामुळेच विस्थापित झालेल्या कुटुंबांना न्याय मिळण्यास मदत झाली. त्यानंतर धरणग्रस्त संग्राम संघटनेच्या कामाची व्याप्ती आणखी वाढली.

## कोयना धरणग्रस्तांचा प्रश्न

धरण प्रकल्पामुळे अडचणीत आलेल्या सांगली जिल्ह्यातील १२, कोल्हापूर जिल्ह्यातील ६, सातारा जिल्ह्यातील ३ व रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावातील शेतकरी धरणग्रस्त संग्राम संघटनेच्या छत्राखाली एकत्र येऊन आपल्या मागण्यासाठी संघर्ष करू लागले. या लढ्यात कोयना धरणग्रस्तांनाही सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने नागनाथअण्णांनी १९८८ मध्ये वाळवा येथे धरणग्रस्तांची परिषद घेतली. कोयना धरणामुळे साऱ्या महाराष्ट्राला वीज मिळाली ; पण कोयना धरणग्रस्तांसाठी उभारण्यात आलेल्या एका वसाहतीत मात्र तब्बल २८ वर्षानंतर वीजपुरवठा सुरू झाल्याचे वर्तमानपत्रातील वृत्त वाचून अस्वस्थ झालेल्या

नागनाथअण्णांनी या धरणग्रस्तांच्या प्रश्नातही लक्ष घालण्याचे ठरवले व त्या दृष्टीने त्यांच्या वसाहतींची पाहणी सुरू केली. १९७२-७३ पासून शेतकरी, शेतमजूर चळवळीत पूर्ण वेळ काम करीत असलेल्या डॉ. भारत पाटणकर यांच्यावर त्यांनी ही जबाबदारी सोपवली. डॉ. पाटणकर यांनी सातारा, रायगड, ठाणे, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील २१६ गावांची पाहणी करून कोयना धरणग्रस्तांची परिस्थिती जाणून घेतली. त्यांचे प्रश्न समजावून घेतले आणि त्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. हे प्रश्न शासनापुढे मांडण्यासाठी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे ठिय्या आंदोलन सुरू केले. तब्बल चौदा दिवस ठिय्या आंदोलन करून त्यांनी कोयना धरणग्रस्तांची कैफियत जनतेपुढे मांडली आणि शासनालाही जाग आणण्याचा प्रयत्न केला. कोयना धरण पूर्ण झाल्यानंतर धरणग्रस्त ज्या हालअपेष्टा सहन करीत जीवन जगत होते त्याची जाणीव शासनाला आणि समाजालाही करून देण्याचे काम धरणग्रस्त संग्राम संघटनेने केले. धरणग्रस्त कुठलेही असोत, त्यांचे प्रश्न आणि व्यथावेदना सारख्याच होत्या. कोयना धरणग्रस्तांना तर अत्यंत अन्याय्य वागणूक मिळाली होती. त्यांचे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्याचे व त्यांना दिलासा देण्याचे काम उशिरा का होईना नागनाथअण्णांमुळे सुरू झाले. कोयना धरणग्रस्तांच्या मदतीसाठी मंगळवेढा तालुक्यात संघटनेने स्वतंत्र कार्यालय उघडले होते. डॉ. भारत पाटणकर व अनिल खरळकर यांनी सतत तीन वर्षे या कामाचा पाठपुरावा केला. ज्या धरणग्रस्तांना शासनाकडून जमिनी मिळाल्या नव्हत्या, त्या त्यांना देण्यास संघटनेने भाग पाडले. सुमारे २२०० कुटुंबांना शासनाकडून जमिनी मिळाल्या. हे काम केवळ नागनाथअण्णांनी या प्रश्नात लक्ष घातल्यामुळेच होऊ शकले, याबाबत दुमत होणार नाही. कोयना धरणग्रस्तांचे हे काम पूर्ण होईपर्यंतचा सर्व खर्च हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने उचलला, हेही येथे नमूद करणे उचित ठरेल.

दरम्यान, सांगली, कोल्हापूर, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील जी २२ गावे धरण प्रकल्पामुळे अडचणीत आलेली होती, तेथील शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी मिळाव्यात यासाठी नागनाथअण्णा प्रयत्नशील होतेच. या संदर्भात त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांची कोल्हापूर येथे भेट घेऊन त्यांच्यापुढे या शेतकऱ्यांची कैफियत मांडली. पवार यांनी त्यांच्याकडून प्रश्न समजून घेतला आणि धरणामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी देण्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला आणि चांदोली धरणग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने शासनाला नवा कायदा

करणे भाग पाडले. या कायद्यामुळे चांदोली अभयारण्य घोषित करून धरणग्रस्तांना वाऱ्यावर सोडून देण्याचा बेपवाईचा मार्ग शासनाला अवलंबता आला नाही. तसेच अभयारण्यातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनही धरणग्रस्तांप्रमाणे ज्या ज्या जिल्ह्यातच करावे लागले. अर्थात त्यासाठी नागनाथअण्णांना अनेकदा मोर्चे काढावे लागले व ठिय्या आंदोलने करावे लागली. वारणा धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांच्या या कामात तीन वर्षाहून अधिक काळ त्यांना संघर्ष करावा लागला, पण त्यामुळे सांगली जिल्ह्यातील १४ गावांतील ६६३ कुटुंबे व १०९ भूमिहिनांचे पुनर्वसन योग्य पद्धतीने, शासकीय नोंदणीनिशी पूर्ण झाले. मोर्चे व आंदोलनाच्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्वांच्या वाहन व्यवस्थेची व त्यांना नाश्ता, जेवण देण्याची जबाबदारी हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने केली जात असे. धरणग्रस्तांच्या त्यागातून धरण प्रकल्प उभे राहिले व धरणाच्या पाण्यामुळे ऊसमळे फुलल्यामुळेच सहकारी साखर कारखानेही कार्यरत राहिले आहेत. त्यामुळे धरणग्रस्तांच्या प्रश्नात लक्ष घालणे, त्यांच्या न्याय्य हक्कासाठी लढणे आणि त्यांना ते मिळवून देणे हे आपले कर्तव्य आहे, असे नागनाथअण्णा मानत असत; पण ही दृष्टी तत्कालीन अन्य कोणा सहकार क्षेत्रातील नेत्याकडे असल्याचे दिसले नाही आणि तशी भूमिकाही कुठल्या सहकारी साखर कारखान्याने घेतली नाही. नागनाथअण्णांचे नेतृत्व व 'हुतात्मा' कारखान्याच्या योगदानामुळेच शेकडो धरणग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन होऊ शकले याची जाणीव धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांना असल्यामुळे नागनाथअण्णा हे त्यांचे दैवतच बनले. वारणा प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे राज्यातील अन्य ठिकाणच्या धरणग्रस्तांचे पुनर्वसनाचे प्रश्नही ऐरणीवर आले. उरमोडी, वांग, सळवे, महिंद, उत्तर मांड, कुसवडे, महू-हातगेघर अशा अनेक धरण क्षेत्रात नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली लढे सुरू झाले. पूर्वानुभवामुळे या सर्व धरणांच्या बाबतीत 'आधी पुनर्वसन मगच धरण' हे तत्त्व अंमलात आणण्यास त्यांनी शासनाला भाग पाडले. त्यामुळे वेगवेगळ्या १८ नागरी सुविधांसह सुसज्ज गावठाण तयार झाल्याशिवाय आणि पर्यायी जमिनी उपलब्ध करून दिल्याखेरीज धरण प्रकल्प बाधित एकही गाव मूळ ठिकाणाहून उठले नाही. या पद्धतीने पुनर्वसन करण्याबाबतचा हा 'उरमोडी पॅटर्न' नागनाथअण्णांच्या लढ्यामुळेच तयार झाला. त्यांच्या नेतृत्वामुळे जुन्या धरणग्रस्तांनाही न्याय मिळू शकला. २००४ पर्यंत त्यांनी सर्व जुन्या धरणग्रस्तांचेही प्रश्न मार्गी लावले आणि पुनर्वसनाचे काम जवळजवळ शंभर टक्के पूर्ण केले. धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत नागनाथअण्णांनी राज्यभरात जे कार्य केले त्याला तोड नाही. विशेष म्हणजे या संदर्भात त्यांनी राज्य शासनाला वेळोवेळी पुनर्वसन कायद्यात जे बदल करण्यास भाग पाडले, ते

केवळ एकट्याच्या नेतृत्व बळावर हे अधिक महत्त्वाचे आहे. आमदार नसतानाही केवळ लोकसंघटन व चळवळीच्या जोरावर शासनास कायदे बदलण्यास भाग पाडणारा हा जनसामान्यांचा नेता अपवादात्मक म्हणावा लागेल.

## फासेपारध्यांचे पुनर्वसन

वारणा धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न हाती घेण्यापूर्वी नागनाथअण्णांनी पुनर्वसनाचा एक प्रयोग फासेपारधी या भटक्या जमातीच्या बाबतीत केला होता. फासेपारधी ही केवळ भटकी जमात नव्हती तर इंग्रजांच्या काळात त्यांच्यावर गुन्हेगार जमातीचा शिक्का पडला होता. या फासेपारध्यांना इतर भटक्या जमातीप्रमाणे दुर्लक्षित केले जात नसे. १८७१ च्या कायद्यानुसार इंग्रजांनी जाहीर केलेल्या २८० गुन्हेगार जमातीत त्यांचा समावेश असल्याने त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही वेगळा होता. वास्तविक स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे १९५२ साली सर्व गुन्हेगार जमातींची गुन्हेगारी कायद्यातून मुक्तता करण्यात आली होती. तरीही समाज त्याच दृष्टीने त्यांच्याकडे पाहत असे. एक तर हे फासेपारधी कुठलाही व्यवसाय करीत नसत. त्यांना स्थैर्य नव्हते आणि पोटापाण्याचा धंदाही नव्हता. त्यामुळे गावोगावी भीक मागून ते उपजीविका करीत. चोऱ्या करण्याची त्यांची सवयही टिकून राहिली होती. अत्यंत गरीब, अशिक्षित आणि भटका राहिलेला हा समाज दूर कुठेतरी माळरानावर वास्तव्य करून गावच्या पोलिसपाटलाच्या परवानगीने गावोगावी भीक मागत फिरत असे. भटक्या जमातीपैकी सर्वाधिक मागासलेला असा हा समाज नागरी जीवनापासून फारच लांब राहिला होता. आजही पूर्णांशाने तो स्थिर झालेला आहे, असे म्हणता येणार नाही. तर अशा या समाजातील काही कुटुंबांना स्थैर्य मिळवून देण्याचा प्रयत्न नागनाथआण्णांनी केला आणि यशस्वी करून दाखवला. १९७५ च्या सुमारास त्यांनी या प्रश्नात लक्ष घातले. वास्तविक असा प्रयोग सर्वप्रथम राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केला होता. फासेपारधी जमातीच्या काही लोकांना त्यांनी संस्थानात सेवेत सामावून घेतले होते. हे फासेपारधी अत्यंत प्रामाणिकपणे व सक्षमपणे काम करतात हे त्यांनी दाखवून दिले होते. तत्कालीन समाजापुढे वेगळा आदर्श निर्माण करणारे हे उदाहरण ठरले होते. नागनाथअण्णांनी बहुधा शाजर्षी शाहू छत्रपती महाराजांपासून प्रेरणा घेऊनच वाळवा परिसरात हा प्रयोग हाती घेतला असावा.

फासेपारध्यांबद्दलचे गैरसमज दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. माणसाला संधी व माणुसकीची वागणूक दिली तर तो निश्चितपणे बदलू शकतो,

यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी काही फासेपारधी तरुणांना किसान शिक्षण संस्थेत नोकऱ्या दिल्या. त्यांच्या काही कुटुंबांना वाळवा परिसरात जागा उपलब्ध करून देऊन वास्तव्य करायला लावले. शिक्षणापासून दूर असणाऱ्या या समाजातील मुलांना शाळेत प्रवेश देऊन शिकण्यास भाग पाडले. चार दशकापूर्वी असा प्रयोग हाती घेणारे नागनाथअण्णा विलक्षणच म्हणावे लागतील. अर्थात त्यांचा हा कितीही उदात्त प्रयोग असला तरी त्यावेळी तो टीकेचा विषय बनणे साहजिक होते आणि तसा तो बनलाही; पण त्यांनी या टीकेकडे दुर्लक्ष केले. पारध्यांची कुटुंबे स्थिरावल्यानंतर त्यांना रोजगाराची संधी मिळू लागली. अंगी कुठलेही कौशल्य नसल्यामुळे पूर्वी त्यांना रोजगार मिळत नसे, पण हळूहळू त्यांचा इतर समाजाशी संबंध येऊ लागला आणि नागरी वस्तीशी, रीतीरिवाजाशी ते परिचित झाले. पारधी कुटुंबातील मुले शिकू लागली. या समाजाला स्थैर्य नसल्यामुळे त्यांची नागरिक म्हणून देखील कुठेच नोंद नसायची. एक प्रकारे ते या देशाचे नागरिक नव्हतेच, पण हळूहळू त्यांची ज्या त्या गावच्या ग्रामपंचायतीकडे नोंद होऊ लागली. वाळवा येथे स्थिर झालेल्या कुटुंबांची स्थिती सुधारल्यामुळे इतर पारधी समाजाच्या दृष्टीने हे एक 'मॉडेल' च बनले. साहजिकच इतर पारध्यांनाही आपण कुठेतरी स्थिर व्हावे, असे वाटू लागले. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नागनाथअण्णांनीही हे कार्य चळवळ म्हणूनच हाती घेतले. पारधी समाजाच्या पुनर्वसनाची चळवळ सुरू करणारे नागनाथअण्णा हे स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील पहिले नेते ठरले. एवढी विशाल सामाजिक दृष्टी असणारा आणि मानवतावादी व समतेच्या भूमिकेतून कार्य करणारा त्यांच्यासारखा नेता विरळाच म्हणावा लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकांना हे आवडेल की नाही, याचा विचार करून लोकप्रिय निर्णय घेणाऱ्यापैकी ते नव्हते. म्हणूनच जनमताची चिंता व टीकेची पर्वा न करता अत्यंत उपेक्षित अशा पारधी समाजाच्या पुनर्वसनाचे काम त्यांनी मोठ्या धाडसाने हाती घेतले. आपल्या मनाला जे पटेल व न्याय्य वाटेल तेच करण्याच्या त्यांच्या वृत्तीचे या बाबतीतही प्रत्यंतर आले. हे कार्य त्यांनी अत्यंत जिद्दीने व चिकाटीने सुरू ठेवल्यामुळेच पारधी समाजाची काही कुटुंबे वाळवा तालुक्यातील वेगवेगळ्या २३ गावांत स्थिरस्थावर होऊ शकली. नागनाथअण्णांनी २००३ पासून पारधी हक्क अभियान सुरू केले. शासनालाही या अभियानाची दखल घेण्यास भाग पाडले. वाळवा तालुक्यातील काही गावांतून ग्रामसभेत ठरावाद्वारे पारधी कुटुंबांना शासकीय मालकीच्या जागेत तसेच गायरानात जागा उपलब्ध करून देण्यात आल्या व त्यांची भटकंती थांबविण्यात आली. 'एक गाव एक पारधी कुटुंब' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या पारधी हक्क अभियानाद्वारे पारधी कुटुंबांना गावपातळीवर सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात

आला. या कुटुंबांना शिधापत्रिका मिळवून देण्यात आल्या. त्यांना कसायला जमिनी देण्याची तसेच शासकीय नोकऱ्यांत पारधी युवकांना सामावून घेण्याचीही मागणी करण्यात आली व त्या दृष्टीने पाठपुरावा सुरू केला. केवळ नागनाथअण्णांनी हे अभियान चालविल्यामुळेच पारधी कुटुंबांतील कितीतरी युवक-युवती आजवर पदवीपर्यंतचे शिक्षण घेऊन ठिठिकाणी नोकऱ्या करू लागले आहेत. वाळवा येथील 'हुतात्मा संकुला' त अनेक पारधी तरुण-तरुणींना स्वतः नागनाथअण्णांनी नोकऱ्यांत सामावून घेतले व एक आदर्श घालून दिला. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी अशा प्रकारचा धाडसी निर्णय त्यांनी घेतल्यामुळेच पारधी समाज स्थिरस्थावर होऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकला आणि त्यांना माणुसकीची वागणूक मिळू लागली. नागनाथअण्णांच्या या कार्याला खरोखरच तोड नाही. या एका कार्याला विचार केला, तरी त्यांच्या कृर्तृत्वाचे वेगळे दर्शन घडते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची ध्यानात येते.

दलित, भटक्या विमुक्त व आदविासी समाजाविषयी नागनाथअण्णांना नेहमीच आस्था वाटत आली व त्यांच्यासाठी त्यांनी शक्य तेवढा मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या न्याय्य मागण्यासांठी संघर्ष केला आणि या घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना समानतेची वागणूक मिळेल, या दृष्टीने कृतिशील कार्यक्रम राबवले. किसान शिक्षण संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या विद्यार्थिनी वसतिगृहात कितीतरी आदिवासी मुला-मुलींना त्यांनी दूरवरून आणून मोफत प्रवेश दिला व शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी हंगामी साखर शाळा सुरू करण्यामागेही त्यांची हीच भूमिका होती. या शाळांतील अनेक मुलांना त्यांनी नंतर वसतिगृहात राहून शिक्षण घेण्याची संधी दिली. समाजातील अत्यंत मागासलेल्या, भटक्या, विमुक्त, आदिवासी व दलितांविषयी त्यांनी केलेल्या कार्याचे मोल फार मोठे आहे. हे सारे त्यांनी अत्यंत निरपेक्ष भावनेने केले हे महत्त्वाचे!

■■■■

# १०
# साहित्य संमेलने व समाज प्रबोधन

दलित, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर, धरणग्रस्त आदींसाठी संघर्ष करीत असताना या उपेक्षित वर्गासाठी साहित्य संमेलनाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा नागनाथअण्णांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. विचारमंथन व्हावे, साहित्यविषयक चर्चा व्हावी तसेच सामाजिक जनजागरण व्हावे यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. स्वतः पुढाकार घेऊन साहित्य संमेलने आयोजित केली आणि ग्रामीण, आदिवासी समाज व पुरोगामी साहित्यिकांना एकत्र आणून त्यांच्यांत सुसंवाद घडविण्यात विशेष रस घेतला. २९ ते ३१ ऑक्टोबर, १९८८ ला हुतात्मा किसन अहिर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात त्यांनी दलित आदिवासी साहित्य संमेलन आयोजित केले. प्रसिद्ध साहित्यिक नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनात नागनाथअण्णा एक साहित्य रसिक या नात्याने वावरले. संमेलनास उपस्थित असलेल्या प्रतिनिधीत व्यासपीठापुढे बसून त्यांनी साहित्यविषयक चर्चांचा आस्वाद घेतला. व्यासपीठापासून दूर राहणे पसंत केले. कामगार, श्रमिक, आदिवासी, दलित व ग्रामीण स्त्री-पुरुष महिलांना साहित्य प्रवाहात सहभागी होण्याची संधी या निमित्ताने मिळाली. एरव्ही पांढरपेशी व उच्च मध्यमवर्गीयांची मक्तेदारी असलेल्या साहित्य क्षेत्रापासून दूर असणाऱ्यांना या क्षेत्रातील पुरोगामी चळवळींची आणि प्रगत विचारप्रवाहांची माहिती होण्याच्या दृष्टीने अशी संमेलने उपयुक्त ठरतील, असे वाटल्याने नागनाथअण्णांनी या उपक्रमाला सर्वतोपरी पाठबल दिले. प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार गिरीश कर्नाड हे या संमेलनाचे उद्‌घाटक होते. दलित, उपेक्षितांच्या शोषणाविरुद्ध तसेच त्यांना न्याय मिळावा व त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी या दृष्टीने साहित्यिकांनी जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन संमेलनास उपस्थित प्रमुख पाहुणे व अध्यक्षांनी केले. या संमेलनाला राज्यातील विविध ठिकाणचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. एखाद्या सहकारी साखर कारखान्याने साहित्य संमेलनासारखा उपक्रम राबवावा याचे अनेकांना आश्चर्य वाटले. विशेष म्हणजे हे संमेलन प्रस्थापित साहित्य संमेलनाहून खूप वेगळ्या प्रकारे तर पार पडलेच, पण तेथील व्यासपीठावर चर्चिले गेलेले विषयही समाजातील उपेक्षित घटकांशी निगडित आणि मूलभूत

प्रश्नांचा ऊहापोह करणारे होते. साहजिकच राज्यपातळीवर या संमेलनाची गंभीरपणे दखल घेतली गेली आणि त्याची व्यापक चर्चाही झाली. वाळव्याच्या क्रांतिभूमीत दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुरोगामी विचार रुजवून ते प्रवाहित ठेवण्याचा मार्ग नागनाथअण्णांनी अवलंबला. त्यानंतर वाळवा परिसरात साहित्यविषयक लहानसहान कार्यक्रम सातत्याने होत राहिले.

१९८८ मध्ये झालेल्या तिसऱ्या दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलनानंतर तब्बल आठ वर्षांनी चौथे दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन पुन्हा वाळवा येथेच घेण्याचा निर्णय झाला आणि याही संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी नागनाथअण्णांनीच स्वीकारली. या संमेलनाचे अध्यक्षपद नामवंत दलित साहित्यिक बाबूराव बागूल यांनी भूषविले, तर बहुजन चळवळीतील कार्यकर्ते प्रसिद्ध अभिनेते निळू फुले हे संमेलनाचे उद्घाटक होते. संमेलनाचे अध्यक्ष बाबूराव बागूल यांनी बहुजन समाजातील साहित्यिकांना मार्गदर्शन करताना समाजाच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला. बहुजन समाजाच्या चळवळीला नव्याने गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बहुजन समाजातील साहित्यिकांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले. भारतीय समाजात ज्या प्रकारची विषमता व असमानता आढळून येते तशी जगाच्या पाठीवर अन्यत्र कोठे दिसून येत नाही. जाती दुभंगल्या गेल्यामुळे बहुजन समाजातील रुंदावत चाललेली दरी सांधण्याचे कार्य बहुजन समाजातील साहित्यिकांनी करावयाचे आहे. बहुजन समाजातील साहित्यिक व बुद्धिजीवी वर्ग हे कार्य हाती घेईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष या नात्याने नागनाथअण्णांनी केलेले भाषणही बरेच गाजले.

वास्तविक पाहता शेतकरी, शेतमजूर व कष्टकऱ्यांच्या संघटना उभारुन त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढ्याचा मार्ग अवलंबणाऱ्या नागनाथअण्णांनी शैक्षणिक व सहकार क्षेत्राच्या मर्यादेतच कार्यरत राहण्याऐवजी साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्राकडे वळावे हा त्या काळात अनेकांच्या कुतूहलाचा विषय बनला होता. यामागे नागनाथअण्णांची भूमिका स्पष्ट व गांभीर्याने विचार करायला लावणारी होती. देशात भांडवलदारांचे राज्य आले असून निरनिराळ्या नावाने जातीयवादी संघटना कार्यरत झाल्या आहेत. भांडवलदारी राज्यव्यवस्था आणि जातीयवादाचे भूत दूर करायचे असेल तर वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करण्याची गरज असून साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार कार्यकर्त्यांनी त्यासाठी योग्य दिशेने पावले उचलली पाहिजेत, असे त्यांचे म्हणणे होते. त्यासाठीच दलित, आदिवासी ग्रामीण साहित्य

संमेलनांच्या नावाने बहुजनांच्या या सांस्कृतिक चळवळीला पाठबळ देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जुन्या काळात जसे शाहीर होते, प्रबोधनकार होते त्याप्रमाणे बहुजन समाजातील कवी, लेखक, विचारवंत व सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार मंडळीनी आता बहुजन समाज जागा व संघटित करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी लेखकांनी, विचारवंतांनी विविध नियतकालिकांतून लेख लिहावेत, सभासंमेलने भरवावीत आणि जनजागृतीचे कार्य जाणतेपणाने सुरू ठेवावे, असे त्यांचे म्हणणे होते. हे कार्य कशा प्रकारे करावे याचे मार्गदर्शन साहित्य संमेलनाद्वारे व्हावे, हे त्यांना अपेक्षित होते. त्यामुळे पुरोगामी विचाराच्या साहित्य संमेलनांना त्यांनी नेहमीच पाठिंबा दिला आणि आवश्यक तेवढे आर्थिक सहकार्यही केले. वाळव्यात झालेल्या दोन्ही 'दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलनां'ची तर संपूर्ण जबाबदारीच त्यांनी आपल्या शिरावर घेऊन ती अत्यंत यशस्वीपणे पार पाडली.

## आपले साहित्य संमेलन

२७ डिसेंबर, २००२ ला कराड येथे झालेले 'आपले साहित्य संमेलन' हेही अशा संमेलनांपैकीच आणखी एक. हे संमेलन घरचे समजून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना त्यात सहभागी होईल, असे आश्वासन नागनाथअण्णांनी या संमेलनाच्या संयोजकांना दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी सर्वतोपरी सहकार्य केले. त्यांच्या सक्रिय पाठिंब्यावर कराड येथील सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात हे संमेलन आयोजित करण्यात आले. कराडचे हे संमेलन ही एक प्रकारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची प्रतिक्रिया होती. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे प्रामुख्याने विशिष्ट वर्गाचे वर्चस्व असणारे व शहरी प्रस्थापित पांढरपेशांचे असते. त्यात ग्रामीण भागातील तसेच बहुजन समाजातील साहित्यिकांना योग्य प्रतिनिधित्व दिले जात नाही. त्यामुळे ब्राह्मणी वर्चस्व असणाऱ्या या संमेलनाच्या मुख्य प्रवाहापासून बहुजन समाजातील साहित्यकांचा वर्ग बाजूला राहतो. या तथाकथित मुख्य प्रवाहातील साहित्यकांना जाणीव करून देण्यासाठी 'आपले साहित्य संमेलन' भरविण्यात आल्याचे सांगण्यात आले. संमेलनाच्या आयोजनामागची ही भूमिका संयोजकांनी तर स्पष्ट केलीच, पण संमेलनातील विविध प्रमुख वक्त्यांनीही आपल्या मनोगतात ही खंत अत्यंत जहाल भाषेत व्यक्त केली.

या संमेलनाचे उद्‌घाटक होते ख्यातनाम साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर. उद्‌घाटनपर भाषणात ते म्हणाले, 'महानगरी वाङ्‌मयीन अभिरुची आजही आपल्या वाङ्‌मयीन व्यवहारावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करीत आहे. साहित्य निर्मितीचे सर्जनशील चक्रीवादळ आज ग्रामीण भागात सरकले आहे. आपले साहित्य संमेलन हे त्याचेच प्रत्यंतर असून

ग्रामीण भागातील प्रतिभावंतांचे प्रतिबिंब या संमेलनात दिसत आहे.' ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे, रामदास आठवले, लक्ष्मण माने, डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. हरी नरके आदींनी या संमेलनात सहभाग घेतला आणि आपले विचार मांडले. या संमेलनातील नागनाथअण्णांचे भाषणही अत्यंत प्रभावी झाले. ते म्हणाले, 'देशाच्या स्वातंत्र्यानंतरही आज खरंखुरं स्वातंत्र्य अनुभवाला येत नाही. बहुजनांनी जातीयवादी व भांडवलदार राजकारणी शक्तींना पराभूत करण्याची गरज आहे. स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधींची हत्या झाली. बाबरी मशीद पाडण्यात आली. गुजरातमध्ये गोध्रा हत्याकांड झाले आणि देशात जातीयवाद्यांचे प्राबल्य वाढत राहिले आहे. ही स्थिती बदलण्यासाठी बहुजन समाजात जागृती करून त्यांना संघटित करण्याची गरज आहे. हे कार्य अशा संमेलनाद्वारे होऊ शकेल, असे वाटते. म्हणूनच आम्ही बहुजन समाजातील साहित्यिकांच्या हाती वैचारिक मशाली देत आहोत; त्या ते तेवत ठेवतील, अशी अपेक्षा आहे.'

महाराष्ट्र व कर्नाटकच्या मराठी भाषिक प्रदेशात बहुजन समाजाच्या हितासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या पुरोगामी विचाराच्या विविध साहित्यिक व वैचारिक कार्यक्रमांना नागनाथअण्णा आवर्जून उपस्थित राहत आणि आपली भूमिका स्पष्टपणे मांडत असत. कर्नाटकातील कारदगा (ता. चिक्कोडी) येथील ग्रामीण साहित्य संमेलन, निपाणीजवळील स्तवनिधी येतील दक्षिण भारत जैन सभेचे संमेलन, मल्हारपेठ (ता. पाटण) येथील बेलदार समाजाचा राज्यव्यापी मेळावा, परभणी येथे सत्यशोधक विद्यार्थी संघटनेतर्फे झालेली 'शिक्षणाचे खासगीकरण व ब्राह्मणीकरणविरोधी परिषद', लातूर येथे २००२ मध्ये झालेले ३१ वे 'अखिल भारतीय सत्यशोधक अधिवेशन', समाजवादी प्रब्रोधिनीच्या वतीने सांगली जिल्ह्यात कुंडल येथे झालेली 'शिक्षणाच्या खासगीकरण व सांप्रदायिकरणविरोधी परिषद', लातूर येथे झालेले पहिले 'सत्यशोधकी साहित्य संमेलन' आदी ठिकाणी उपस्थित राहून नागनाथअण्णांनी आपले विचार मांडले. जेथे जेथे बोलावणे येईल त्या पुरोगामी विचाराच्या व्यासपीठावर जाऊन त्यांनी बहुजन समाजाच्या जनजागृतीसाठी सहकार्य केले. ग्रामीण, दलित, उपेक्षित जनतेचा दबलेला आवाज बुलंद करण्याचा त्यांनी आपल्या परीने प्रयत्न केला. विचाराचा जागर सतत सुरू राहील याची दक्षता घेतली. महिला व युवकांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांना जाणीवपूर्वक मदतीचा हात पुढे केला. बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाचे व्रत घेऊन ते कार्यरत राहिले. विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांना सक्रिय पाठिंबा देण्यामागे त्यांची निश्चित अशी वैचारिक भूमिका होती. युवा वर्गाबद्दल तर त्यांना विशेष आस्था होती. तरुणांच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याबरोबरच, तरुणांच्याच उत्साहाने ते अशा विविध कार्यक्रमात स्वतः सहभागी होत असत.

## विद्रोही व दलित साहित्य संमेलन

याच भूमिकेतून विद्रोही साहित्य संमेलनांना ते उपस्थित राहत आणि सक्रिय मदतही करीत. २६ व २७ फेब्रुवारी, २००२ ला औरंगाबाद येथे झालेल्या दुसऱ्या आणि २० व २१ जानेवारी, २००९ ला झालेल्या तिसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनांना ते उपस्थित राहिले आणि त्यांनी तेथे आपले विचारही मांडले. २३ डिसेंबर, २००१ ला कोल्हापूर जिल्ह्यातील मुरगूड येथे झालेल्या विभागातील विद्रोही मराठी साहित्य संमेलनासही प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित राहिले. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'बहुजनांचे दु:ख वेगळे असते. या दु:खातून मुक्त व्हायचे असेल, तर ब्राह्मणी संस्कृतीतून त्यांनी मुक्त झाले पाहिजे. महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळ उभी केली, म्हणून आपण काही प्रमाणात संकटमुक्त झालो. विद्रोही चळवळ त्या दिशेने पुढे जात राहिली, तर आपण सर्वजण पूर्णांशाने संकटमुक्त होऊ. तो सुवर्ण दिवस लवकर उजाडावा अशी माझी इच्छा आहे.' साहित्य संस्कृती क्षेत्रात कार्य करतानाही नागनाथअण्णांनी बहुजन समाजातील सामान्य माणूस केंद्रबिंदू मानूनच विविध कार्यक्रम राबवले. ग्रामीण, दलित साहित्यिकांना, विचारवंतांना, कलावंतांना नागनाथअण्णा हे आपले वाटत. पुरोगामी विचारधारेचा कोणताही कार्यक्रम त्यांच्यापुढे ठेवला, तर जमेल तेवढे सहकार्य त्यांच्याकडून मिळणार हे गृहीत धरूनच कार्यकर्ते त्यांच्याकडे येत असत. अशा कार्यक्रमात स्वत: मिरवणे ते टाळत. प्रसिद्धीचा तर त्यांना अजिबात सोस नव्हता. या कार्यक्रमाचा सर्वसामान्यांना कितीसा लाभ होईल, त्यांना कशा प्रकारचे वैचारिक खाद्य मिळू शकेल आणि त्यांचे कितपत प्रबोधन होईल, एवढाच विचार ते करीत. विविध क्षेत्रांत ग्रामीण, दलित वा अदिवासींसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना ते भरघोस मदत करीत असत. अर्थातच अशा कार्यकर्त्यांची पूर्ण माहिती घेऊन व त्यांची पारख करूनच ते त्यांना किती जवळ करायचे हे ठरवीत. जातीय संस्था व संघटनांसाठी कार्यरत असणाऱ्यांना वा त्यांच्या संस्थांना मात्र ते अजिबात थारा देत नसत. हे पथ्य ते कटाक्षाने पाळत. अशा संस्थांच्या व्यासपीठावर जाणे तर ते टाळतच, पण त्यांच्या कुठल्याही कार्यक्रमांनाही ते उपस्थित राहात नसत वा त्यांचा सत्कार स्वीकारत नसत. या बाबतीत त्यांची भूमिका कठोर असे. त्यांची वैचारिक भूमिका अत्यंत पारदर्शी होती आणि तत्त्वाशी ते कधी तडजोड करीत नसत. आपल्या विचारांचा प्रभाव जनतेवर पडावा आणि त्यांचे प्रबोधन व्हावे असे मात्र त्यांना निश्चितपणे वाटे. किंबहुना या प्रबोधन कार्याचा एक भाग म्हणूनच हे राज्यभर दौरे करीत आणि विविध कार्यक्रमांना उपस्थित राहात असत.

पुरोगामी विचार प्रसारासाठी व महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेबरोबरच शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आपण एखादे स्वतंत्र दैनिक वृत्तपत्र सुरू करावे असे त्यांना वाटत असे. ८ ऑगष्ट २००९ ला सातारा येथे त्यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त झालेल्या जाहीर सत्कार समारंभ प्रसंगी त्यांनी हा विचार बोलूनही दाखविला होता. ते म्हणाले, 'फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचे दैनिक महाराष्ट्रात नाही, ही बहुजन सामाजाची उणीव आहे. ती भरून काढण्यासाठी सहकारी तत्त्वावर 'हुतात्मा' या नावाचे दैनिक सुरू करण्याची आमची योजना आहे. या दैनिकातून सर्वसामान्य जनतेचा आवाज उठणार आहे. शेतकरी, कामगार, शेतमजूर तसेच भाजी विक्रेत्या महिलादेखील या दैनिकाच्या भागधारक होणार असल्याने ते सर्वांना आपले वाटेल. त्यात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग रहावा यासाठी केवळ दहा रुपये एका समभागाची किंमत ठेवली जाणार आहे.' एक सामाजिक कार्य म्हणून त्याला प्रत्येकाने सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी त्यावेळी केले. स्वातंत्र्यपूर्ण काळात 'गावराज्य' नावाचे साप्ताहिक आचार्य जावडेकरांच्या सहकार्याने नागनाथअण्णा चालवीत असत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना व त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम त्या साप्ताहिकाच्या माध्यमातून ते करीत असत. हा पूर्वानुभव विचारात घेऊनच त्यांनी नव्या उमेदीने 'हुतात्मा' दैनिकाची योजना आखली होती. तथापि, काही कारणामुळे ती प्रत्यक्षात येऊ शकली नाही. मात्र समाज प्रबोधनाच्या व सर्वसामान्यांचे प्रश्न सरकार व समाजापुढे मांडण्याच्या दृष्टीने नागनाथअण्णा केवढ्या व्यापक स्वरुपात व दूरदृष्टीने विचार करीत असत हे समजू शकते.

■■■■

# ११
# वाटचाल आणि भूमिका

नागनाथअण्णांनी आपल्या ७९ वर्षांच्या जीवनाच्या वाटचालीत वाढदिवस कधीही साजरा केला नव्हता. कार्यकर्त्यांनी इच्छा व्यक्त केली असताना देखील त्यांनी वाढदिवस साजरा करण्यास परवानगी दिली नव्हती. तथापि, १५ जुलै, २००९ च्या ८० व्या वाढदिवसापूर्वी मात्र कार्यकर्त्यांनी आत्यंतिक आग्रह केला आणि त्यांनीही त्यासाठी परवानगी दिली. मात्र तीही वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्याच्या अटीवर. त्यांनी एकदा मान्यता दिल्यानंतर कार्येकर्ते उत्साहाने कामाला लागले. या दिवशी नागनाथअण्णांना ८० लाख रुपयांची थैली देण्याचा आणि तो विविध उपक्रमांनी भव्य प्रमाणात साजरा करण्याचा निर्णय प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेण्यात आला. या नियोजित वाढदिवस सोहळ्याची वार्ता तालुक्यात पसरली आणि लोकांच्या उत्साहाला भरते आले. एक प्रकारे नागनाथअण्णांचा हा 'पहिलाच' वाढदिवस होता. अर्थातच तो भव्य स्वरुपात साजरा व्हावा अशी लोकांची अपेक्षा होती. त्याप्रमाणे नियोजन सुरू झाले. ऐंशी लाख रुपयांची रक्कम तर अगदी सहजपणे जमा झाली. लोकांनी उत्स्फूर्तपणे आपला सक्रिय सहभाग नोंदविला. नागनाथअण्णांची समाजाविषयीची आस्था व त्यांची वैचारिक भूमिका विचारात घेऊन कार्यकर्त्यांनीही वाढदिसानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमात शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित व पीडित समाज, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, भटक्या जातीजमाती आदींचे प्रश्न मांडण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमांची आखणी केली. या कार्यक्रमांबाबत व राबविण्यात यावयाच्या विविध उपक्रमांविषयी नागनाथअण्णांना पूर्ण कल्पना देऊन त्यांची मान्यता घेण्यात आली.

नागनाथअण्णांनी या वाढदिवसाच्या निमित्ताने आपल्या वाटचालीचा मागोवा घेण्याचे व आपली भूमिका मांडायचे ठरविले. एरव्ही प्रसिद्धीपासून जाणीवपूर्वक दूर राहणे पसंत करणाऱ्या नागनाथअण्णांनी यावेळी मात्र प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्याशी मनमोकळी चर्चा केली. एकप्रकारे त्यांनी आपल्या आजवरच्या जीवनाचा व सार्वजनिक कार्याचा पटच उलगडून दाखवला. ते म्हणाले, 'आज मी जो आहे, जसा आहे त्याची सुरुवात घरातूनच झाली. मी शेतकरी कुटुंबातला. घरची आर्थिक स्थिती तशी सर्वसाधारणच.

वडील रात्रदिवस काबाडकष्ट करणारे. अंगठेबहाद्दर. आम्ही त्यांना बापू म्हणायचो. सर्व जण त्यांना त्याच नावाने बोलवायचे. माझे दोन मोठे भाऊ वारले. त्यामुळे माझ्यासाठी आईवडिलांनी नवस केला होता. मी नवसाचा ठरलो. नाव नागनाथ ठेवलं. मला समजायला लागलं तेव्हा स्वातंत्र्य चळवळीनं चांगलाच जोर धरला होता. आई (लक्ष्मीबाई) व वडील (रामचंद्र) हे दोघेही स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. त्यामुळं घरात चळवळीचं वातावरण होतं. साहजिकच चळवळीचे संस्कार झाले. मनात स्वातंत्र्याविषयीचा विचार खोलवर रुजला गेला. आदर्श जीवनाचे धडे घरातच मिळाले. वडील म्हणायचे, 'कुणाच्या वाळलेल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही आणि कुणाच्या सुतळीच्या तोड्याचीही अपेक्षा करायची नाही.' आमचे वारकऱ्यांचे घर. आईवडील दोघंही शाकाहारी. त्यामुळं शाकाहाराचा संस्कार झाला. थोडं कळायला लागल्यापासून घरात पाणी भरायचं काम माझ्याकडं आलं. घरात माणसांचा सतत राबता असायचा. त्यामुळं घरात आणि घरच्या जनावरांसाठीही पाणी भरावं लागायचं. तेव्हा कष्टाची भाषा कळायला लागली. आई म्हणायची, 'शिकलं पाहिजे.' आईचे वडील लष्करात होते. त्यामुळं शिक्षणाचं महत्व तिला कळत होतं. वडील मात्र शिकण्यापेक्षा कुस्ती कर म्हणायचे. त्यामुळं मी कुस्ती करायला लागलो, पण शिक्षणाकडं दुर्लक्ष होत गेलं. सहावीपर्यंतची शाळा वाळव्यातच झाली. सातवीला आष्ट्याला गेलो. त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटलांच्या सभा होत असत. त्यांच्या भाषणाचा मनावर परिणाम झाला. त्यांच्या विचारांचं आकर्षण वाटू लागलं. आठवीला शिक्षणासाठी कोल्हापूरला गेलो. १९४२ साली मॅट्रिकचं शिक्षण अर्धवट टाकून भूमिगत चळवळीत दाखल झालो. विद्यार्थी दशेतच काँग्रेसचा झेंडा खांद्यावर घेतला. १९३९ च्या मे महिन्यात कर्मवीर भाऊरावअण्णांची भेट झाली होती. त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. कोल्हापूरात हायस्कूलमध्ये महात्मा गांधींचा 'हरिजन' वाचायला मिळायचा. त्या वाचनाचेही संस्कार झाले. मग जाणतेपणानं, अगदी ठरवून खादीचे कपडे वापरायला सुरुवात केली. ७ व ८ ऑगस्ट, १९४२ ला मुंबईत होणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाबाबतची माहिती 'हरिजन' मध्ये वाचली आणि विद्यार्थी कार्यकर्ता म्हणून अधिवेशनाला जायचे ठरविले. त्याप्रमाणे अधिवेशनाला गेलो आणि 'करेंगे या मरेंगे' व 'चले जाव' चा संदेश घेऊन परतलो. हा संदेशच पुढे स्वातंत्र्याचा मंत्र झाला. काँग्रेस अधिवेशनानंतर भूमिगत चळवळीलाही वेग आला. स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचा विचार मनात सुरू असताना सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचेही आकर्षण वाटत होते. या काळात आणखी एका घटनेचाही मनावर खोल परिणाम झाला. १९४२ च्या नोव्हेंबरमध्ये क्रांतिवीर पांडू मास्तर यांनी येरवडा जेलमधून

पलायन केले. त्यानंतर किसन वीर व छन्नूसिंग चंदेले यांच्यासह ते वाळव्याला आले असता त्यांची भेट झाली. पांडू मास्तर जेलमधून पळाले, पण त्यांच्याकडे तेव्हा एकही हत्यार नव्हते. पदोपदी मरणाचे सापळे रचलेले असताना ते  निःशस्त्र असावेत, याचे आश्चर्य वाटले. स्वातंत्र्यासाठी लढायचे तर निःशस्त्र राहून चालणार नाही असे विचार मनात आले. तेव्हापासून सशस्त्र लढ्याचा निर्धार केला आणि हत्यारे मिळविण्याच्या प्रयत्नाला लागलो. ती कुठून, कशी मिळवायची याची माहिती मिळविली आणि अखेरीस त्यासाठी गोव्याला जायचे ठरविले. शस्त्रास्त्रे मिळविण्याची गोव्याची मोहीम तब्बल ४४ दिवसांनी यशस्वी झाली. एक पिस्तूल, एक रिव्हॉल्व्हर आणि काही काडतुसे मिळाली. विशेष म्हणजे याच हत्यारांचा वापर करून आम्ही शेणोलीजवळ (स्पेशल पे ट्रेन) पगारी रेल्वे गाडी लुटली. त्यानंतर कार्यकर्त्यांची संख्या वाढू लागली आणि हत्यारे कमी पडू लागली. त्यामुळे कसबा सांगाव (जिल्हा कोल्हापूर) येथील पोलिस चौकीतून बंदुका पळविल्या. या बंदुकांच्या जोरावरच १४ एप्रिल, १९४४ ला धुळे खजिना लुटीची मोहीम आम्ही फत्ते करू शकलो. धुळे खजिना लुटीचं प्रकरण देशभर गाजलं. ब्रिटिशांच्या सत्तेला आम्ही एक मोठा हादरा दिला. या खजिना लुटीच्या मोहिमेत जी. डी. बापू लाड, उत्तमराव पाटील, धोंडिराम माळी, रावसाहेब कळके, किसन पवार, राजूताई पाटील असे आम्ही एकत्र होतो. या घटनेनंतरचे दिवस आमच्यासाठी स्वातंत्र्य प्रेरणेने भारावलेले होते. १९४५ च्या डिसेंबरमध्ये मी आमच्या कार्यकर्त्यांना लष्करी शिक्षण देण्यासाठी आझाद हिंद सेनेकडून प्रशिक्षक आणण्यासाठी दिल्लीला गेलो. तिथे दर्यागंज भागात श्रीमती मणीबेन पटेल यांच कार्यालय होतं. त्या सैनिकांच्या बाजूनं खटले चालवायच्या. त्यांना भेटलो. तिथं आझाद हिंद सेनेचे जवान नानकसिंग आणि मनसासिंग यांची भेट झाली. ते दोघे कलकत्त्याहून ब्रिटिश पोलिसांच्या तावडीतून निसटून आलेले होते. त्यांना मी गाठले आणि माझा प्रस्ताव मोडक्या तोडक्या हिंदीत त्यांच्यापुढे मांडला. ते प्रशिक्षण द्यायला तयार झाले. वाळव्याला येण्यापूर्वी मी त्यांच्याबरोबर लुधियानाला त्यांच्या गावी गेलो व त्यांच्या कुटुंबियाना भेटून आलो. शिराळा तालुक्यात फौजी कँप घेतला. शस्त्रे चालविण्याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण एक महिनाभर कार्यकर्त्यांना दिलं. या कँपमधून ८० कार्यकर्ते प्रशिक्षित झाले. या प्रशिक्षणाचा कुणालाही थांगपत्ता लागू नये याची काळजी घेतली होती. तरीही २५ फेब्रुवारी, १९४६ ला सोनवडे गावच्या ओढ्यातून आम्ही बैलगाडीने धान्य आणायला निघालो असताना पोलिसांशी सशस्त्र चकमक उडाली. त्यावेळी नानकसिंग व किसन अहिर पोलिसांच्या गोळ्या लागून धारातीर्थी पडले. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात त्यांनी प्राणांची आहुती दिली. देशासाठी ते हुतात्मा झाले.

त्यांच्या हौतात्म्याचं 'जिवंत' स्मारक उभं करायचं ठरविलं. ते आज वाळव्याच्या क्रांतिभूमीत उभं आहे. सातवीपर्यंत शिक्षण झाल्यावर पुढं बी. ए. बी. टी. व्हायचं आणि गावात जाऊन शाळा सुरू करायची, विद्यार्थ्यांना राष्ट्रीयत्वाचे धडे व संस्कारक्षम शिक्षण द्यायचं असं ठरविलं होतं; पण शिक्षण मध्येच बाजूला पडलं आणि स्वातंत्र्य लढ्याचं कार्य सुरू झालं. मात्र असं झालं तरी आपली दिशा चुकली, मार्ग चुकला, असं कधी वाटलं नाही. जे जे ठरविलं ते ते करून दाखवलं. कशातही अपयश आलं नाही. कर्मवीर भाऊरावअण्णा, साथी एस. एम. जोशी, साथी जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या नेत्यांचा सहवास मिळाला. माझ्या जीवनाच्या आजवरच्या वाटचालीचा मला निश्चितच आनंद वाटतो. एकंदरीत मी समाधानी आहे, पण स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक, राजकीय परिस्थिती मात्र अस्वस्थ करणारी आहे. त्या बाबतीत मी अत्यंत असमाधानी आहे.'

या ८० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने व्यक्त केलेल्या मनोगतात नागनाथअण्णांनी आपल्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा विस्तृत आढावा घेतला. त्यांच्या आजवरच्या कार्यपद्धतीनुसार कुठल्याही गोष्टीचा गाजावाजा वा जाहिरातबाजी करणे त्यांच्या तत्त्वात बसत नसे. किंबहुना या गोष्टी ते कटाक्षाने टाळत असत. त्यामुळे त्यांच्या जीवनातील अनेक घडामोडींबाबत तसेच वेळोवेळी त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत लोकांना फारच कमी माहिती असायची. त्यातून बरेच समज-गैरसमजही पसरलेले होते. म्हणूनच आपल्या त्या वेळेपर्यंतच्या कार्याविषयी व भूमिकेविषयी कधीतरी मोकळेपणाने बोलावे असे त्यांनाही वाटत असावे. त्यासाठी त्यांना ती योग्य वेळ वाटली असावी. म्हणूनच त्यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींपुढे तपशीलवार निवेदन केले. शिवाय काही वृत्तपत्रांनी स्वतंत्रपणे त्यांच्या मुलाखती घेतल्या व अंकाच्या विशेष पुरवण्या प्रसिद्ध केल्या. एकंदरीत वाढदिवस सोहळ्याच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रसारमाध्यमांकडून चांगलाच प्रकाशझोत टाकला गेला. त्यांच्या ज्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू समोर आले आणि त्यांची भूमिकाही लोकांना समजून घेता आली. प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना स्वतंत्रपणे दिलेल्या मुलाखतीतील काही ठळक प्रश्नांच्या उत्तरातून त्यांची विचारधारा तर स्पष्ट झालीच, पण समाजातील विविध विषयांकडे ते कसे पाहत, त्यांचा दृष्टिकोन कसा होता, हेही स्पष्ट झाले.

## समाजहिताचा व्यापक विचार

त्यांच्या मुलाखतीतील काही ठळक प्रश्नोत्तरे पुढीलप्रमाणे:--

**स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय व सामाजिक परिस्थिती कितपत समाधानकारक वाटते?**

'देशाचे एकंदर चित्र अत्यंत अस्वस्थ बनविणारे व निराशाजनक आहे. विषमता वाढते आहे, जातीयता, धर्मांधता वाढते आहे, भ्रष्टाचार वाढतो आहे आणि तत्त्वच्युतीच्या राजकारणाने परिसीमा गाठली आहे. तथापि, अशाही परिस्थितीत भारताला उज्ज्वल भवितव्य आहे असे मला वाटते. या अंधःकारमय वातावरणात प्रकाशकिरण अवतरतील आणि दशदिशा उजळून निघतील, असे आशादायी वातावरण तयार होईल. आम्ही यापूर्वी मिळवले ते स्वातंत्र्य खरे नाही, पण आता दुसऱ्या स्वातंत्र्याची, खऱ्या स्वातंत्र्याची पहाट उगवेल, यावर माझा विश्वास आहे. जनशक्तीच्या बळावर भ्रष्ट व स्वार्थी राजकारण्यांना, अधःपतित सत्ताधाऱ्यांना लोक खुर्च्यांवरून खाली खेचतील आणि चौकाचौकात जाहीर जाब विचारतील. तो दिवस दूर नाही.'

स्वातंत्र्य मिळेपर्यंत नागनाथअण्णांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले, कराड तालुक्यातील कापील गोळेश्वर येथे विद्यार्थी परिषद संघटित केली. रयत शिक्षण संस्थेला एक लाखाचा निधी संकलित करून दिला. महार वतनातून येणारी गुलामी संपविण्यासाठी या जमिनी रयतावा करण्याची मागणी करणारा वतनमुक्तीचा लढा त्यांनी संघटित केला. त्यासाठी पायी प्रवास करून प्रचार केला आणि ८० गावांतून समित्या स्थापन केल्या. कर्मवीर भाऊरावअण्णांच्या गावात सामुदायिक शेतीचा प्रयोगही केला. त्यांच्या आयुष्यातील आजवरचा प्रत्येक दिवस संघर्षात आणि धकाधकीत गेला. कष्टकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी रात्री अपरात्रीही धावून जाणाऱ्या नागनाथअण्णांना विश्रांती काय असते हे जणू ठाऊकच नव्हते. त्यांच्यातील उत्साह, चैतन्य आणि त्यांची धडपड ही तरुणांनाही लाजविणारी होती. या मागे गुपित काय असं त्यांना विचारण्यात आलं तेव्हा ते हसत हसत म्हणाले, 'खरंखुरं स्वातंत्र्य बघायची घाई झाली आहे. आपल्या प्रश्नांसाठी लोक संघटित होतील आणि त्याला एका लढ्याचे स्वरूप येईल. सत्ताधाऱ्यांना उलथवून टाकण्याची ताकद त्यामध्ये असेल.'

**या लढ्याला कोणते वैचारिक अधिष्ठान असेल ?**

'घरात चहासाठी दूध नाही आणि पिठल्याला तेल नाही अशी आज सामान्य माणसाची अवस्था आहे. प्रस्थापित व्यवस्थेचा या सामान्य माणसांच्या प्रश्नांप्रती असणारा नाकर्तेपणा आणि त्याविरुद्ध त्याच्या मनात तयार होणारी खदखद, हाच या लढ्याचा मुख्य आधार असेल. आज आपल्या प्रश्नांसाठी माणूस रस्त्यावर येतो आहे, मग तो प्रश्न कुठलाही असो. त्याला थोडीशी दिशा देण्याची गरज आहे. हा लढा कुठल्याही विचारधारेशी संलग्न

असणार नाही. आधी भाकरीचा प्रश्न महत्त्वाचा असतो. विचार नंतर येतो. या सर्व लढ्यांना एका सूत्रात बांधावे लागेल. त्याशिवाय त्यांची ताकद, तीव्रता वाढणार नाही. लोक आपल्या प्रश्नांबाबत जागरूक आहेत, दक्ष आहेत, असा आजवरचा माझा अनुभव आहे. या लोकांनी काँग्रेस, भाजप, डावे-उजवे अशा विविध प्रकारच्या सत्ताधाऱ्यांचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे ते लगेचच कुठल्या अशा एका विचारधारेचा विचार करण्याच्या मनःस्थितीत नाहीत. सत्ताधारी आपल्या प्रश्नांचा व्यापक विचार करीत नाहीत हे एकदा त्यांना कळले की ही ताकद संघटित व्हायला वेळ लागणार नाही.'

**दुसरी क्रांती दूर नाही असे आपण ठामपणे सांगता, मग पहिली ठिणगी कुठे पडेल? आणि या लढ्यामुळे अराजक माजेल काय?**

'याची सुरुवात आपल्याकडंच होईल. दक्षिण महाराष्ट्राला विशेषत:सांगली, कोल्हापूर आणि साताऱ्याच्या जमिनीला खत फार झालं आहे. फुले, शाहू, आंबेडकरांची ही भूमी आहे. तिचं वैचारिक भरण पोषण चांगलं झालं आहे. नव्या पिढीची अन्याय अत्याचार सहन करायची तयारी नाही. या लढ्यात विद्यार्थी, युवक आणि कामगारच मोठ्या संख्येनं सहभागी होतील. आधीच बेरोजगारांचे तांडे बाहेर पडत असताना जागतिकीकरणासारखे धक्के बसत आहेत. शेतकरी उद्‌ध्वस्त होत आहे. हे लोक व्यवस्थेतून बाहेर फेकले जातील आणि त्यांना लढ्याशिवाय मार्ग उरणार नाही. याचा संघटित स्फोट होईल, पण यातून अराजकता माजणार नाही. हा लढा आपल्या भाकरीसाठी, सुखासाठी असल्याने तशी वेळ येणार नाही.'

**स्वातंत्र्यानंतर परिस्थिती का बिघडत गेली? तुम्हाला काय वाटते?**

'याचा अर्थ स्वातंत्र्यपूर्व काळात ती फार चांगली होती असं नव्हे; पण ज्या कारणांसाठी स्वातंत्र्य हवे होते ते कारणच सत्तेवर आलेली मंडळी विसरून गेली. भांडवलदारी व्यवस्थेचे पोषण करणारी व्यवस्था त्यांनी तयार केली. त्यांच्या धोरणात सामान्य माणसाचा विचार कुठेच दिसला नाही. याला प्रामुख्याने काँग्रेसच जबाबदार होती. दीडशे वर्षे ब्रिटिशांच्या गुलामगिरीत गेली. आता हिंदी भांडवलदारांच्या सापळ्यात हा देश अडकला आहे. लोकसंख्यावाढ ही देशाच्या बिघडलेल्या परिस्थितीला कारणीभूत असल्याचे ढोल बडवले जातात, पण ते खरे नाही. आपल्याकडे प्रचंड प्रमाणात जमीन आहे. या लोकसंख्येचे ओझे पेलण्याची ताकद तिच्यात आहे. फक्त जे मनुष्यबळ आपल्याकडे आहे, त्याचे

नियोजन झाले पाहिजे. आजवर या अंगाने विकासाचा विचारच नाही. राज्यकर्त्यांना जनतेचे प्रश्न दडपायचेच असल्याने हा विचार बाजूला पडला आहे.'

**स्वातंत्र्य लढ्यात सुरुवातीला आपण काँग्रेसच्या विचारधारेशी आणि महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह, अहिंसेच्या तत्त्वाशी बांधील राहिला होता, पण पुढे सशस्त्र लढ्यात सामील झालात. त्यानंतरचा तुमचा राजकीय प्रवास कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), समाजवादी पार्टी (मुलायम सिंग यादव), बहुजन समाज पार्टी अशा मार्गाने झाला. राजकीय वाटचालीत अशी वैचारिक धरसोड का करावी लागली?**

'आपले ध्येय कोणते, याला मी आजवर महत्त्व देत आलो. हे ध्येय आहे सामाजिक न्यायाचे, समतेचे आणि सामान्य माणसांच्या प्रश्नासाठी लढण्याचे. या माणसांचे सुख हे अंतिम उद्दिष्ट आहे. ते महत्त्वाचे. त्यासाठी विचारधारेत थोडाफार बदल केला इतकेच; पण पक्ष कोणताही असो, माझ्या भूमिकेत सामाजिक न्यायाचा लढा केंद्रस्थानी होता. १९४६ साली एस. एम. जोशी यांनी मी समाजवादी पक्षात यावे यासाठी प्रयत्न केले. त्याच वर्षी जयप्रकाश नारायण पत्नीसह वाळव्यात भेटायला आले. त्यांनीही या दृष्टीने प्रयत्न केले होते. लोकांचा लढा उभारत असताना कधी वेगवेगळी विचारधारा जवळची वाटली. भारतीय कम्युनिस्ट पक्षातील प्रवेशही असाच झाला. कॉम्रेड दत्ता देशमुख, यशवंत चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील यांचा सहवास मिळाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. चळवळीतले अनेक नेते मित्र झाले तर काही शत्रूही झाले.'

**स्वातंत्र्य चळवळीत उतरला नसता तर काय केले असते?**

'माझ्यासारखा माणूस चळवळीबाहेर राहूच शकला नसता. राबणाऱ्या शेतकऱ्याच्या घरात जन्म मिळाला याचा विशेष आनंद वाटतो. एखाद्या पाटलाच्या घरात जन्माला आलो नाही हे बरे झाले, असे वाटते.'

**आपल्या पश्चात चळवळीचे काय होणार ? नेतृत्वाचे काय?**

'मी त्याबद्दल निर्धास्त आहे. दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते तयार होत आहेत. त्यामुळे चिंतेचे कारणच नाही. ही चळवळ कष्टकऱ्यांची, शेतमजुरांची, शेतकऱ्यांची, धरणग्रस्तांची आणि सामान्य माणसांची आहे. त्यांचा रेटा मोठा आहे. त्यामुळे चळवळ चालूच राहणार आहे. माणसं हेरायची, त्यांच्यावर जबाबदारी टाकायची, त्यांची तयारी करून घ्यायची हे

काम सुरूच आहे. आंदोलनं यशस्वी होऊ शकतात हे दाखवून दिलं आहे. 'हुतात्मा संकुला'ची उभारणी झाल्यानं माणसांच्या मनात विश्वास निर्माण झाला आहे. पुढील काळात धरणग्रस्त, विद्यार्थी, कष्टकरी, कामगार, शेतकरी यांच्या चळवळी एकत्र येतील आणि त्यातूनच नव्या क्रांतीची मशाल पेटेल. समुदायाच्या हालचाली वाढतील. त्यापुढे बंदुकाही कुचकामी ठरतील.'

**स्वातंत्र्य चळवळीत दिलेला लढा आणि त्यानंतर सामाजिक कार्यासाठी वेळोवेळी दिलेले लढे यात आपणाला कोणते वेगळेपण जाणवले?**

'स्वातंत्र्य लढ्यात बाबू गेनूसारख्या सामान्य कामगाराने हौतात्म्य पत्करले. त्यावेळच्या लढ्यात असंख्य सामान्य माणसे सहभागी झाली होती. स्वातंत्र्यानंतर तळागळातील जनतेचा खराखुरा लढा सत्ताधाऱ्यांनी थंड केला. त्यांच्यात पुन्हा नवचैतन्य निर्माण करणे गरजेचे आहे. हे मोठे आव्हानात्मक काम आहे.'

**सत्ता हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र मानले जाते. त्यादृष्टीने बहुजनांच्या हाती सत्ता यावी, यासाठी आपण सातत्याने प्रयत्न केले, पण बहुजनांच्या उन्नतीचा मार्ग अद्याप तरी दृष्टिक्षेपात आलेला दिसत नाही. अशा वेळी बहुजन समाजासाठी आपला काय कानमंत्र असेल ?**

'आपली शैक्षणिक वाटचाल अत्यंत असमाधानकारक आहे. ब्रिटिशांनी सुरू केलेली कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धतीच आपणही पुढे सुरू ठेवली आहे. कष्टकरी जनता शिक्षण घेऊन पुढे यावी असे कुणालाच वाटत नाही. उलट त्यांना मोडीत काढले जात आहे. या प्रतिकूल परिस्थितीतही आपण सामर्थ्य निर्माण करायला हवे आणि बहुजनांच्या शिक्षणाची व्यवस्था करायला हवी. या तत्त्वावरच संघर्ष निर्माण करणे हा एकमेव मार्ग आहे.'

**स्वातंत्र्य लढ्यातल्याप्रमाणे प्रबळ प्रेरणा समाजाच्या अन्य जडणघडणीत अथवा विधायक परिवर्तनामागे आज दिसत नाही. याबद्दल आपल्याला काय वाटते?**

'या देशातून इंग्रज निघून गेले की, येथे नंदनवन होईल असे वातावरण स्वातंत्र्य चळवळीच्या काळात देशभर तयार झाले होते, पण अचानक असा एक दिवस उजाडला आणि त्या १५ ऑगस्ट, १९४७ या दिवशी देशाचे दोन तुकडे झाले. संस्थानिकांना तनखे देण्याचा निर्णय झाला. हे काही देशाच्या हिताचे झाले नाही. भारतीय जनता ब्रिटिशांच्या गुलामीतून बाहेर पडली, पण पुढे काय? त्यासाठी रस्ता कुणीच दाखवला नाही. ब्रिटिश गेल्यानंतर नंदनवन कुठेच झाले नाही.'

**आपला पिंड समाजकारणाचा आहे. कोणत्याही राजकीय पक्षाची तमा न बाळगता ६० वर्षांहून अधिक काळ आपण अनेक मूलभूत प्रश्नांसाठी झगडत आहात. या संघर्षमय वाटचालीबद्दल आपल्याला काय वाटते?**

'सत्यशोधक चळवळीमुळे सातारा, कोल्हापूर, सांगली या भागात अन्य राज्यांच्या तुलनेत अधिक जागरूकता झालेली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचाही या विभागात प्रभाव होता व त्यामुळे प्रगत विचारांचा वर्ग तयार झाला होता. साहजिकच या परिसरातील जनतेने स्वातंत्र्य लढ्याच्या काळात एक निर्णायक असा संग्राम उभा केला होता. स्वातंत्र्यासाठी त्यांनी शिकस्तीचे प्रयत्न चालवले होते. हातात बंदुका घेऊन ते लढले. किसन अहिर, नानकसिंग यांनी हौतात्म्य पत्करले, पण त्यांच्या त्यागाचे काही चीज झाले नाही. लोकांनाही त्याचे काही महत्त्व वाटले नाही. स्वातंत्र्यानंतर एक चांगले लोकशाहीवादी राष्ट्र तयार झाले, असा अनुभव आला नाही. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यातील अनेक लोक वैफल्यग्रस्त झाले. खरेखुरे स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यासाठी पुन्हा संघर्ष करण्याची गरज आहे असे वाटल्यामुळेच मी या नव्या संघर्षात उतरलो. स्वातंत्र्यानंतर सर्वप्रथम आम्ही 'लेव्ही' विरोधी चळवळ हाती घेतली. जोंधळा, भात, गहू यासारखी पिके तयार करण्यासाठी किती खर्च येतो याचा विचार न करता सरकार शेतकऱ्यांकडून 'लेव्ही' गोळा करीत होते. म्हणूनच या 'लेव्ही' विरोधात जुनेखेड येथे परिषद घेऊन आंदोलन सुरू केले. त्यात क्रांतिसिंह नाना पाटील, कॉम्रेड दत्ता देशमुख, कॉम्रेड यशवंत चव्हाण आदींनी सहभाग घेतला होता. शेतकरी परिषद या नावाने ही चळवळ उभी राहिली. ही चळवळ उभी करीत असताना फुले, शाहू, आंबेडकरांची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ही चळवळ समाजवादाच्या दिशेने वाटचाल करीत लढाऊ बनली.'

**देशातील सामाजिक चळवळींची जन्मभूमी असलेल्या महाराष्ट्रात अलीकडे चळवळी उभ्या राहून त्या यशस्वी होताना दिसत नाहीत. याबाबत आपल्याला काय वाटते ?**

'एके काळी सातत्याने सत्तेवर असलेल्या काँग्रेस पक्षाला भाषावार प्रांत रचना निर्विवादपणे करण्यात अपयश आले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करण्याचा निर्णय जर आधीच घेतला असता, तर १०५ जणांना हुतात्मा व्हावे लागले नसते. बेळगाव, कारवारसह एकसंघ मराठी भाषिक राज्य झाले पाहिजे, पण अजूनही ते होत नाही. काँग्रेसला सत्तेची ओढ बाजूला जाऊ देत नाही; त्यामुळेच हे प्रश्न लोंबकळत पडले आहेत. त्याचे दुष्परिणाम नंतर दिसू लागले. भाजप, शिवसेनेसारखे जातीयवादी पक्ष फोफावू लागले असून मराठी माणसाची अस्मिता म्हणून मिरवू लागले आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात या जातीयवादी

शक्ती सहभागी होणे ही गोष्ट स्वाभिमानी मराठी माणसाला पटलेली नाही. महाराष्ट्रात फुले, शाहू आंबेडकरांच्या विचारांमुळे तळागाळातला समाज जागा झाला, ही मोठीच जमेची बाजू आहे, पण तरीही कष्टकऱ्यांसाठी लढणाऱ्या चळवळी कमीच होत्या. त्यामुळेच प्रतिगामी व संकुचित जातीयवादी शक्तींनी धुमाकूळ घातला. काँग्रेसमधील भांडवलदारांनी राजकीय सत्तेवर कब्जा केला. त्यामुळे त्यांच्याकडून जनतेचा भ्रमनिरास झाला. तरीही काँग्रेसने खूप काळ सत्तेचा लाभ घेतला. मध्यंतरीच्या काळात भाजप-शिवसेना युती सरकारचाही जनतेने अनुभव घेतला. सर्वसामान्य जनतेच्या उन्नतीसाठी तेही काही करू शकले नाही. म्हणूनच आम्हाला सर्वसामान्य जनतेची खरीखुरी सत्ता आली पाहिजे असे वाटते. आमच्या चळवळीचे हेच ध्येय आहे.'

**समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या अनेक व्यक्ती समाजात असतानाही त्यांच्या कार्याचे परिणाम आपल्याला प्रकर्षाने का जाणवत नाहीत ? आणि त्याचे दृश्य रूप समाजात का दिसत नाही ?**

'अशा थोर व्यक्तींच्या कार्याविषयी, त्यांच्या त्यागी वृत्तीविषयी, प्रामाणिकपणा व निष्ठेविषयी शंका घेण्याचे कारण नाही, पण त्यांची ही कामे संघटितपणे व्हायला हवीत आणि त्यांच्या संघटनेत सामर्थ्य असायला हवे. ही सर्वसामान्यांची संघशक्तीच संघटनेला, चळवळीला समर्थपणे पुढे नेऊ शकते. कोणत्याही चळवळीत विविध जनसमूह एकत्र आले पाहिजेत. व्यक्तिवादापेक्षा सर्वसामान्यांच्या संघटित प्रवाहाला महत्त्व आले तर त्याचे परिणाम निश्चितपणे दिसू लागतील. चळवळीच्या नेत्यांनीही संघर्षासाठी लोकांची मानसिक तयारी करवून घेऊन तो तीव्र स्वरुपात वाढविला तर सर्वसामान्य जनताही त्यात मोठ्या प्रमाणात सहभागी होईल. संघटनात्मक व चळवळीच्या पातळीवर लोकांचे राजकीय प्रबोधनही केले गेले पाहिजे. लोकांची राजकीय जाणीव वाढवायला हवी. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी संघटितपणे रान उठविल्यामुळेच ब्रिटिशांना तडाखा बसला होता. त्या पद्धतीचे कार्य आजही अपेक्षित आहे. जोपर्यंत सामान्य वर्ग संघटित होऊन पेटून उठत नाही, तोपर्यंत समूहाची, चळवळीची ताकद वाढणार नाही.'

### योग्य धोरणाचा अभाव

**शेतीविकास, गरिबी, बेरोजगारी यासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काय करायला हवे, असे आपल्याला वाटते.**

'योग्य धोरणाच्या अंमलबजावणी अभावी निर्माण झालेले हे प्रश्न आहेत. मूठभर लोकच चांगले काम करताना दिसतात. शेतीसाठी पाणीप्रश्न महत्त्वाचा आहे. पाणी हे एक

साधन आहे. ते सर्वांना मिळायला हवे. पाण्याचा एक थेंबही वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. सर्वसामान्य शेतकऱ्याला शेतीसाठी पाणी मिळाले, तर देशात समृद्धी येईल. जमीन सुधारणेसाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. सत्ताधाऱ्यांनी ही दृष्टी ठेवून धोरणे राबविली तर दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देणे सहज शक्य होईल. नद्यांचे उपलब्ध पाणी वाया जाऊ न देता धरण प्रकल्प उभारून ते साठविले पाहिजे. समान वाटपाद्वारे त्याचा लाभ सर्वांना कसा होईल, हेही पहायला हवे. धरणे व कृष्णा खोरे सारख्या प्रकल्पासाठी ज्यांनी आपल्या जमिनी दिल्या, त्यांना न्याय मिळाला पाहिजे. हजारो धरणग्रस्त आजही उपेक्षित आहेत. त्यामुळे धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झाल्याशिवाय नवे प्रकल्प हाती घेतले जाऊ नयेत. देशातील वाढती लोकसंख्या विचारात घेता, सिंचनाखालील जमिनींचे क्षेत्र वाढवायला हवे. तसे झाले तरच शेती उत्पादन वाढू शकेल. अनेक धरण प्रकल्पातून झालेला भ्रष्टाचार निपटून टाकण्याची व अर्धवट स्थितीतील प्रकल्प मार्गी लावण्याची गरज आहे. विविध प्रकल्पातून होणारी लूट कशी थांबविता येईल हेही पाहिले पाहिजे. ही जबाबदारी सत्ताधारी नेते व प्रशासन यांनी संयुक्तपणे पार पाडायला हवी. हे झालं तरच खेड्यापाड्यापर्यंत विकासाची गंगा पोहोचू शकेल.'

**सहकारी साखर कारखाना व इतर सहकारी संस्थांची उभारणी करून त्या आपण उत्कृष्टपणे चालवीत आहात. सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत तर 'हुतात्मा पॅटर्न' द्वारे आपण वेगळा आदर्श घालून दिला आहे. राज्यात अन्यत्र मात्र बऱ्याच सहकारी संस्थांना घरघर लागली आहे. असे का?**

'सामान्य माणसाचा विकास व्हावा या उद्देशाने वाळवा येथे हुतात्मा किसन सहकारी साखर कारखान्याची आम्ही उभारणी केली. हा कारखाना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक चळवळींचा भक्कम आधार आहे. कारखाना नसता तर सर्वसामान्य माणसे बाजूला गेली असती. हुतात्मा परिसरात आज एक आदर्श शैक्षणिक संकुल निर्माण झालेले आहे. गोरगरिबांच्या मुलांसाठी वसतिगृह काढण्यात आले आहे. आम्ही जसं योजलं होतं, तसं घडतंय याचं आम्हाला मोठं समाधान आहे. सर्वसामान्य माणसं सुखानं नांदलेली आम्हाला बघायची आहेत. त्यासाठी महात्मा फुले यांच्या विचाराचे व्यासपीठ आम्ही तयार करीत आहोत. सर्वांना बरोबर घेऊन प्रामाणिकपणे काम केले तर सहकारातून प्रचंड काम उभं राहू शकतं, याचं हुतात्मा परिसर हे उदाहरण आहे. जिथं जिथं या पद्धतीनं काम झालं आहे, तिथं सहकार यशस्वी झाला आहे. अपयशाला कारण ठरतात ती तिथली माणसं.'

**हुतात्मा साखर कारखान्याच्या उभारणीला विलंब लागला त्याचे कारण काय?**

'कारणे अनेक आहेत. खूप झाडाझडती झाली. कारखान्याला मान्यता मिळविण्यासाठी सतत आठ वर्षे संघर्ष करावा लागला. कारखान्याला परवानगी मिळविल्याशिवाय परतायचे नाही या जिद्दीने दिल्लीत ११ महिने राहिलो. शेवटी २६ मार्च, १९८१ रोजी मंजुरी मिळवली. विशेष म्हणजे ११ महिन्यात कारखान्याची उभारणी केली. जर मी काँग्रेसची टोपी घातली असती, तर कारखाना लवकर उभा राहिला असता. ती घातली नाही म्हणून कारखान्यासाठी प्रदीर्घ संघर्ष करावा लागला.'

**जातीयवादी प्रवृत्तीविरुद्ध आपण सतत संघर्ष करीत आलात. नव्या पिढीने या अपप्रवृत्तीविरुद्ध कशाप्रकारे लढा द्यावा असे आपल्याला वाटते ?**

'हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पक्ष यासारख्या प्रतिगामी शक्ती पूर्वीपासूनच कट्टर व आक्रमक होण्याचा प्रयत्न करीत आहेत. या शक्ती देशाच्या शत्रू आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत या प्रवृत्तींना जेव्हा प्रवेश दिला गेला, तेव्हा या चळवळीला लढ्याऐवजी वेगळेच स्वरूप प्राप्त होऊ लागले. सारा बहुजन समाज हजारो वर्षे अज्ञानात कसा राहील, हेच या लोकांनी पाहिले. कुठलेही काबाडकष्ट न करता सुखात व चैनीत कसे जगता येईल या दृष्टीनेच या मंडळींचे प्रयत्न राहिले. ग्रामीण भागात उभ्या राहिलेल्या सहकारी संस्था मोडीत कशा काढायच्या हेच जातीयवादी सत्ताधाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या डोक्यात आहे. शेती व सहकारी साखर कारखान्यांवर आयकर बसवून साखर उद्योग संपवायचा हा त्यापैकीच एक विकृत विचार आहे. त्याविरुद्ध बहुजन समाज संघटितपणे ताकद लावून लढतो आहे. साखर उद्योगाने विकासाचा, प्रगतीचा एक टप्पा निश्चितपणे गाठला आहे. त्यासाठी खूप संघर्ष करावा लागला आहे. हा उद्योग आम्ही कदापि मोडून काढू देणार नाही. एकंदरीतच, जातीयवादी शक्तींच्या छुप्या कारवाया हाणून पाडल्या पाहिजेत. वेगवेगळ्या मार्गाने जातीय शक्ती फोफावत आहेत, याचे भान ठेवून त्याविरुद्ध बहुजन समाजातील नव्या पिढीने संघर्ष केला पाहिजे. शेतकरी आणि कामगारांच्या भवितव्याच्या दृष्टीने आम्ही हा लढा सुरूच ठेवला आहे. यापुढे तो आणखी तीव्र केला जाईल.'

**ग्रामीण व विद्रोही साहित्यिक, सांस्कृतिक चळवळींना आपण सातत्याने पाठिंबा देत आला आहात. यामागची आपली भूमिका काय?**

'प्रगतीचा आणि उन्नतीचा मार्ग दाखवून, नव्या पिढीला बौद्धिक सामर्थ्य देऊन ती अधिक प्रभावी करण्यासाठी शिक्षणाबरोबरच साहित्य व संस्कृतीची गरज आहे. या

माध्यमातूनच तळागळात पोहोचता येणार आहे. साहित्यातून राबणाऱ्या जनतेला संघर्ष करण्याची ताकद मिळणार आहे. साऱ्या बाजूनी बहुजनांची चळवळ पुढे येणे हा त्या मागचा उद्देश आहे. दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्य जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहे, पण हे साहित्य बहुजन समाजाचे असल्याने ते पुढे नेलेच पाहिजे.'

**आपल्या आजवरच्या कार्याचे सिंहावलोकन करता काही गोष्टी अद्याप करायच्या राहून गेल्या आहेत असे जाणवते का? तसे असेल तर त्यासाठी भविष्यात काही योजना आहेत काय?**

'कुठलीही चळवळ किंवा कार्यक्रम मोघमपणे पुढे नेता येत नाही. त्यासाठी फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार आणि देशप्रेम सर्व स्तरात रुजविण्याची गरज आहे. भविष्यात जनतेला फार मोठ्या प्रमाणांत संघटित करावे लागणार आहे. भांडवलदार व प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढा द्यावा लागणार आहे. बहुजनांच्या शिक्षण संस्था वाढवण्याची गरज आहे. कष्टकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी कुठलीही तडजोड करून चालणार नाही. ते साध्य करण्यासाठी कामगार, कष्टकऱ्यांना संघटित करायला हवे. करण बदल घडविण्याची शक्ती कामगार आणि कष्टकऱ्यांतच आहे.

**आपण सत्कार वा वाढदिवस साजरा करण्यास आजवर विरोध करीत आलात. मग आता हा सत्कार कसा काय स्वीकारत आहात ?**

'खरे तर मी यापासून प्रयत्नपूर्वक दूर राहिलो आहे; पण वयाच्या ८० व्या वर्षात पदार्पण करताना मी सहज मागे वळून बघतो तेव्हा प्रश्न पडतो, की आपण जगलोच कसे? किती सहकारी सोडून गेले, हुतात्मा झाले. त्यांचे स्मरण म्हणून, त्यांच्या बलिदानाचा गौरव म्हणून हा सत्कार मी स्वीकारतो आहे.'

■■■■

# १२
# आगळा वाढदिवस सोहळा

१४ जुलैच्या संध्याकाळपासूनच हुतात्मा संकुल परिसरात उत्साहाला उधाण आले. विद्यार्थ्यांनी रात्री १२ वाजता वाढदिवसाचा केक कापला. नागनाथअण्णांच्या दृष्टीने वसतिगृहातील विद्यार्थी हा घटक सर्वाधिक जिव्हाळ्याचा व हुतात्मा संकुल कुटुंबातील विशेष महत्त्वाचा. साहजिकच वाढदिवसाचा प्रारंभ त्यांच्या शुभ चिंतनाने सुरू झाला. त्यानंतर पहाटेपासून महिला वर्ग गटागटाने ओवाळणीसाठी येऊ लागला. सकाळपासून तर गावोगावचे शेतकरी मोठ्या संख्येने दाखल होऊ लागले. नागनाथअण्णांना पुष्पहार घालण्यासाठी लांबलचक रांगा लागल्या. यात कोठेही कृत्रिमपणाचा लवलेश नव्हता. सारे उत्स्फूर्तपणे सुरू होते. नागनाथअण्णांना भेटून प्रत्यक्ष शुभेच्छा देण्याची संधी सर्वसामान्य माणसांना एक प्रकारे प्रथमच मिळत होती. त्या दिवशी गावागावांतून लोकांनी घरोघरी गुढ्या आणि रस्त्यावर ठिकठिकाणी कमानी उभ्या केल्या होत्या. निरपेक्ष भावनेने एक कृतज्ञता सोहळा पार पडत होता. नागनाथअण्णांच्या जयजयकाराच्या घोषणांनी परिसर दुमदुमत होता.

दुपारी हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात उभारलेल्या भव्य मंडपात वाढदिवसानिमित्त आयोजित केलेला गौरव सोहळा पार पडला. अभिनेते निळू फुले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात समाजवादी नेते ग. प्र. प्रधान यांच्या हस्ते नागनाथअण्णांना चांदीच्या क्रांतिज्योतीची प्रतिकृती व ८० लाख रुपयांची थैली देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. लाखावर लोकांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. या सत्कार समारंभास झालेली गर्दी ही मुख्यत्वे नागनाथअण्णांच्या प्रेमापोटी, आत्मियतेने व पदरमोड करून आलेल्या सर्वसामान्य नागरिकांची होती. नागनाथअण्णांवरील निरपेक्ष प्रेमाचे विराट स्वरुप यानिमित्ताने लोकांना पहायला मिळाले. लढवय्या लोकनेता आणि त्यांच्याविषयी आत्यंतिक आदरभाव बाळगणारी कृतज्ञ जनता, यांचा जणू अभूतपूर्व असा तो संगम होता. कसलाही डामडौल नसलेला आणि अत्यंत साधेपणाने पार पडलेला पण संस्मरणीय असा तो अनुपम सोहळा राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या असंख्य

नागनाथअण्णाप्रेमींची मने चिंब बनविणारा आणि अंतःकरणात कृतकृत्यतेचे भाव दाटविणारा ठरला. यावेळी बोलताना ग. प्र. प्रधान म्हणाले, 'स्वातंत्र्य लढ्यातील अनेक जखमा अंगावर झेलून क्रांतिवीर नागनाथअण्णा आजही कष्टकरी जनतेसाठी रात्रंदिन झगडत आहेत. दुसऱ्यासाठी जीवन जाळणारा नागनाथअण्णांसारखा नेता एकमेवाद्वितीय म्हणावा लागले. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकार जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. साम्राज्यवाद व जागतिकीकरणामुळे शेतकरी देशोधडीला लागत आहे. यासाठी वाळव्याच्या क्रांतिभूमीतून पुन्हा एकदा क्रांती चळवळ मोठ्या सामर्थ्यानिशी उभी करावी लागणार आहे. त्यासाठी नागनाथअण्णांच्या हातातील क्रांतीची ज्योत पुढे नेण्यासाठी सर्वांनी सज्ज राहिले पाहिजे.'

सत्काराला उत्तर देताना नागनाथअण्णा अत्यंत भावविवश झाले. त्यांनी आपल्या आयुष्याच्या वाटचालीचा मागोवा घेतला. स्वातंत्र्यपूर्व काळातील ठळक घडामोडी सांगितल्या. अनेक प्रकारचा संघर्ष करीत आपण इथवर कसे पोहोचलो याचे आश्चर्य वाटते, असे सांगून यापुढेही न्यायासाठी, खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी झगडत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात निळू फुले म्हणाले, 'देशातील विखारी जातीयतेचा विचार करता, आता जातीयतेविरुद्ध आवाज उठविण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही चिंतेची बाब बनली आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात आपण सर्वांनी एकजुटीने उभे राहणे गरजेचे आहे. नागनाथअण्णांनी हाती घेतलेल्या पाणी संघर्ष चळवळीत मी सुरुवातीपासून कार्यरत आहे. बहुजनांच्या विविध चळवळीसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली जी शक्ती उभी राहील तिला माझा नेहमीच पाठिंबा राहील.'

यावेळी प्रा. एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख डॉ. आ. ह. साळुंखे यांचीही नागनाथअण्णांच्या कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली. वाढदिवसानिमित्त मिळालेली ८० लाख रुपयांची थैली नागनाथअण्णांनी त्या समारंभातच उपस्थितांसमोर खुली केली आणि त्यातील रक्कम त्यांना योग्य वाटतील अशा काही संस्थांना वाटायला सुरुवात केली. अर्धी अधिक थैली त्याच वेळी त्यांनी रिकामी केली. लाखापासून चार पाच लाखापर्यंतच्या देणग्या विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्था व व्यक्तींना दिल्या. या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले, 'पैशाला वस्ती करू द्यायची मला सवय नाही. तो मी कधीच जवळ ठेवलेला नाही.' कधीही पैसा जवळ बाळगायचा नाही, हे पथ्य जीवनाच्या वाटचालीत ते नेहमीच पाळत आले. विशेष म्हणजे असे असतानाही त्यांच्या कार्यासाठी पैसा कधीच

कमी पडला नाही. गरज पडेल तेव्हा त्यांना तो नेहमीच मिळत राहिला. एक प्रकारे त्यांच्याकडे तो चालत आला. कदाचित त्यामुळेच पैशाची चिंता त्यांनी कधीच केली नाही आणि तो जवळ बाळगावा असेही त्यांना कधी वाटले नाही. त्यांचा सारा व्यवहार हा असा पारदर्शी आणि खुलेपणाचा. आजच्या परिस्थितीत या साऱ्या गोष्टी आश्चर्यकारक आणि थक्क करून सोडणाऱ्या वाटतात. नागनाथअण्णांच्या बाबतीत हे सारेच असे अद्‌भुतरम्य आणि अविश्वसनीय वाटावे असे. त्यांच्या एकमेव जाहीर वाढदिवस सोहळ्याची कथा देखील त्यापैकीच एक.

## सच्चा लढाऊ नेता

नागनाथअण्णांचा ८० वा वाढदिवस प्रचंड उत्साहात साजरा झाला. ते वर्ष ' क्रांती गौरव वर्ष ' म्हणून साजरे करण्याची आणि त्यानिमित्त विविध उपक्रम राबविण्याची अट कार्यकर्त्यांना नागनाथअण्णांनीच घातली होती. सांगली जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांना सत्कारासाठी निमंत्रणे येऊ लागली. मात्र त्यापैकी मोजकीच त्यांनी स्वीकारली आणि ती देखील काही ठोस विधायक उपक्रम हाती घेऊन राबविण्याच्या अटीवर. त्यानुसार विविध ठिकाणी उपक्रम राबविले गेले आणि नागनाथअण्णांचे सत्कार सोहळेही पार पडले. अशा प्रकारे वर्षभर ज्यांचा वाढदिवस साजरा केला गेला, असा महाराष्ट्रातील हा अपवादात्मक नेता असावा. अनेक नेत्यांचे वाढदिवस प्रचंड गाजावाजा करून साजरे केले जात असतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर उधळपट्टीही होत असते. नागनाथअण्णांनी विधायक उपक्रमाला अग्रक्रम देऊन वाढदिवसाचा प्रतिकात्मक कार्यक्रम साजरा करण्याचा मार्ग जाणीपूर्वक अवलंबला. एक प्रकारे त्यांच्या परिवर्तनशील वृत्तीचेच हे निदर्शक म्हणावे लागले. या वाढदिवस सोहळ्याचीही वर्षभर व्यापक चर्चा होत राहिली. एका अर्थी वाढदिवसाच्या निमिताने नागनाथअण्णांनी आपल्या विधायक क्रांती कार्याला नव्याने चालना दिली. ते स्वतःही उत्साहाने व जोमाने कामाला लागले. विधायक व रचनात्मक उपक्रमाबरोबरच लढे उभारण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. वाढदिवस सोहळ्यामुळे त्यांना जणू नवी ऊर्जा मिळाली, संघर्षाचे नवे पर्व सुरू झाले.

१५ जुलै, २००२ रोजी वाळवा येथे वाढदिवसाच्या निमित्ताने 'नागनाथअण्णा नायकवडी गौरव समितीच्या' वतीने साखर उद्योगातील प्रश्नांचा विचार करण्यासाठी राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. सुमारे दहा हजार लोकांची या परिसंवादास उपस्थिती होती.

सहकारी साखर कारखान्यांची संख्या वाढत असतानाच साखर उद्योगाशी संबंधित अनेक समस्या निर्माण झाल्या असल्यामुळे त्यांचा ऊहापोह करणे आवश्यक होते. त्यासाठी नागनाथअण्णांनी पुढाकार घेऊन साखर उद्योगाशी संबंधितांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून सहकारी साखर उद्योगाच्या निकोप वाढीसाठी सर्वांना एकत्र आणण्याचा नागनाथअण्णांनी यशस्वी प्रयत्न केला. २००१ मध्ये त्यांनी साखर उद्योगावरील आयकर रद्द करण्याच्या मागणीसाठी लढा उभा केला होता. त्यावेळी काढण्यात आलेल्या मोर्चाचे नेतृत्व त्यांनी केले होते. केंद्र सरकारने त्या आंदोलनाची दखल घेऊन साखर कारखान्यांवरील आयकर रद्द केला होता. त्यानंतर साखर उद्योगातील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्रातील साखर कारखानदारांना संघटित करण्याची कल्पना त्यांनी मांडली व त्याचा एक भाग म्हणून परिसंवादाचे आयोजन केले. सहकारी साखर उद्योगाबाबत केंद्र सरकारच्या पातळीवर असणारी अनास्था दूर होऊन धोरणात्मक बदलाची आवश्यकता असल्याची भावना या परिसंवादात व्यक्त झाली. सरकारी धोरणाबाबत निषेधाचाही सूर उमटला. केंद्र सरकारच्या साखर धोरणाविरोधात संघर्षाची भूमिका घेण्याची गरज अनेक वक्त्यांनी परिसंवादात बोलताना व्यक्त केली. सहकारी साखर उद्योग हा महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेच्या व शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने तो चांगल्या प्रकारे वाढला पाहिजे, असे नागनाथअण्णांचे म्हणणे होते. त्यासाठी त्यांनी या व्यापक व सर्वसमावेशक परिसंवादाचे आयोजन केले आणि साखर उद्योजकांच्या प्रश्नांना जाहीर वाचा फोडली.

दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळाले पाहिजे या मागणीसाठी तर अनेक वर्ष त्यांचा लढा सुरू होताच. या मागणीसाठी ठिकठिकाणी पाणी परिषदा घेऊन शासनाकडे पाठपुरावा केला जात होता. धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचा जो प्रश्न त्यांनी हाती घेतला होता, त्या आघाडीवर परिषदा, मोर्चे, आंदोलने असे कार्यक्रम सुरू होते. या आंदोलनाच्या जोडीनेच इतरही जे काही घटक आपले प्रश्न घेऊन नागनाथअण्णांच्याकडे येत होते, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते लढ्याचा मार्ग अवलंबत होते. प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनचालकांसाठीचा लढा हा त्यापैकीच एक. खासगी वाहनांतून व्यावसायिक पद्धतीने प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी नसते, पण प्रत्यक्षात मात्र अशी प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असते, ही वस्तुस्थिती आहे. खासगी प्रवासी वाहतूकदारांना पोलिसांचा त्रास सहन करावा लागतो. हप्ते दिले की ते वाहतूक सुरू ठेवण्यास परवानगी देतात, ही बाब

प्रवाशांच्या आणि सरकारच्याही दृष्टीने नुकसानकारक ठरत होती. राज्यात सर्वत्रच हा प्रश्न होता. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बससेवा सर्वत्र पुरेशा प्रमाणात नसल्याने लोक खासगी वाहनांचा आधार घेत असत. वाढती लोकसंख्या विचारात घेता बस वाहतूक सेवा सर्वत्र उपलब्ध करून देणे महामंडळालाही शक्य होत नव्हते. अशा परिस्थितीत बेकायदेशीररीत्या खासगी वाहनाने प्रवास करण्यापेक्षा योग्य नियम व अटींचा वापर करून सरकारने खासगी प्रवासी वाहतूकदारांना रीतसर परवानगी द्यावी, अशी खासगी प्रवासी वाहतूकदाराच्या संघटनेची मागणी होती. त्यांच्या विनंतीनुसार या न्याय मागणीसाठी संघर्ष करण्याचा नागनाथअण्णांनी निर्णय घेतला. या खासगी प्रवासी वाहनधारकांची संख्या हजारोंच्या घरात होती. बेकायदेशीररीत्या व पोलिसांच्या दडपणाखाली व्यवसाय करण्यापेक्षा त्यांना शासनाने रीतसर सशर्त वाहतूक परवाना द्यावा, अशी मागणी शासनाकडे करण्याचे ठरले. त्यानुसार खासगी वाहनधारकांची प्रभावी संघटना उभी करण्यासाठी त्यांनी व्यापक मेळाव्याचे आयोजन केले. खासगी प्रवासी वाहतुकीवर शासनाने बंदी आणल्यास प्रवाशांची तर अडचण होणार होतीच, पण हजारो वाहनधारक व वाहनचालकांवर बेरोजगार होण्याची वेळ येणार होती. यातून मार्ग काढण्यासाठी नागनाथअण्णा पुढे सरसावले व त्यांनी या खासगी प्रवासी वाहतूकदारांचे नेतृत्व करण्याचे ठरविले. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अपुऱ्या सेवेमुळेच प्रवासी खासगी वाहतुकीकडे वळतात ही वस्तुस्थिती शासन दरबारी मांडण्यासाठी नागनाथअण्णांनी आंदोलनाचा निर्णय घेतला. ३० जानेवारी, २००२ रोजी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील खासगी वाहनचालकांवर होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर वाहन मालक, चालकांनी विराट मोर्च काढला. या मोर्चामुळे राज्यातील खासगी प्रवासी वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आणि शासनाला त्यात लक्ष घालणे भाग पडले. तसा हा प्रश्न एका विशिष्ट घटकापुरता मर्यादित होता, पण जनतेच्या हिताचा असल्यामुळे नागनाथअण्णांनी त्यात भाग घेतला. त्यांनी हा प्रश्न हातात घेतला तेव्हा राज्यात किंचित टीकेचा सूरही निघाला. बेकायदेशीर प्रश्नासाठी ते लढताहेत, असा अनेकांचा समज झाला, पण याबाबत नागनाथअण्णांची भूमिका स्पष्ट होती. हा प्रश्न सामान्य माणसांच्या जीवनाशी निगडित असल्यामुळे साहजिकच त्यात आपण लक्ष घातले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. खासगी प्रवासी वाहतुकदारांचा प्रश्न सुटल्यामुळे राज्यातील अनेक बेरोजगार युवक रीतसर या व्यवसायाकडे वळले.

नागनाथअण्णांनी याच काळात आणखी एका व्यापक आंदोलनाचे रणशिंग फुंकले, ते विद्युत मंडळाने शेती वीज पंपाच्या केलेल्या वीज दरवाढीविरुद्धचे. या वीज दरवाढीचा

परिणाम शेती, कृषिपूरक उद्योग व प्रामुख्याने साखर उद्योगावर होणार होता. शेती वीज पंपाची वीज दरवाढ वीज मंडळाने अचानक व अवास्तव प्रमाणात केली आणि शेतकऱ्यांना अडचणीत आणले. या वीज दरवाढीविरुद्ध आवाज उठविण्याचा नागनाथअण्णांनी निर्णय घेतला आणि ते संघटित लढ्याच्या तयारीला लागले. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील शेती वीज पंपधारक शेतकरी व पाणीपुरठा संस्था प्रतिनिधींचा कोल्हापूर जिल्ह्यात किणी येथे मेळावा घेण्यात आला. विविध समस्यांमुळे आधीच बेजार झालेल्या शेतकऱ्यांना वाढीव वीज दराचा फटका सहन होण्यासारखा नव्हता. त्यामुळे या दरवाढीला विरोध करणे आवश्यकच होते. शिवाय एकदा का ही दरवाढ स्वीकारली, तर वीज मंडळ मनमानी करून वारंवार वीज दर वाढवत राहील हा धोका होता. त्यामुळे या अन्याय्य दरवाढीविरोधी लढा उभारून ती मागे घेण्यास भाग पाडण्याचा निर्धार किणी येथील मेळाव्यात करण्यात आला. त्यानंतर कोल्हापूर येथील वीज मंडळाच्या विभागीय कार्यालयावर शेतकऱ्यांच्या भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील हजारो शेतकरी या मोर्चात सामील झाले. वीज दरवाढ मागे घेण्याचे वीज मंडळाला आवाहन करण्यात आले आणि ती मागे घेतली जात नाही तोपर्यंत वीज बिले न भरण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. वीज बिले न भरल्यामुळे जर विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला तर तीव्र आंदोलनाचा जाहीर इशाराही देण्यात आला. नागनाथअण्णांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. या आंदोलनास कॉम्रेड यशवंत चव्हाण व प्रा. एन. डी. पाटील यांनीही पाठिंबा दिला व मोर्चात सहभागी होऊन आंदोलकांना मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे वीज मंडळाच्या खासगीकरण व विभाजनाच्या निर्णयाविरोधात वीज मंडळाचे हजारो कर्मचारीही या मोर्चात सहभागी झाले आणि त्यांनी शेतकऱ्यांच्या वीज दरवाढीविरोधी मागणीस पाठिंबा दिला. या मोर्चानंतर २३ नोव्हेंबर, २००१ ला शिराळा तालुक्यातील मणदूर येथे झालेल्या वीज दरवाढीविरोधी जाहीर सभेत पूर्वीप्रमाणेच वीज बिले न भरण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मागणी पुढे रेटण्यासाठी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर २१ जानेवारी, २००२ ला पुन्हा भव्य मोर्चा नेण्यात आला. अखेरीस या प्रश्नी शासनाला नमते घ्यावे लागले.

## भूमिहिनांसाठीचा लढा

शेतकऱ्यांच्या, सामान्यांच्या प्रश्नांसाठी नागनाथअण्णांनी जे अनेक लढे उभारले त्यात भूमिहिनांसाठी केलेल्या लढ्याचाही आवर्जून समावेश करावा लागेल. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त हुतात्मानगर, सोनवडे येथे नागनाथअण्णांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑक्टोबर, २००१ ला 'भूमीहक्क लढा परिषद' आयोजित करण्यात आली होती. जे

भूमिहीन आहेत, त्यांना सरकारने जमिनी उपलब्ध करून घ्याव्यात, तसेच आदिवासी जमीन हस्तांतरण कायद्यातील त्रुटी दूर करून त्यांच्या जमिनी ताबडतोब त्यांना परत कराव्यात, या प्रमुख मागण्या परिषदेत करण्यात आल्या. सरकारी पडीक जमिनी, गायराने तसेच वन विभागाच्या व रेल्वेच्या ताब्यातील जमिनींची पाहणी करून त्या भूमिहिनांना कसण्यासाठी द्याव्यात, त्याचबरोबर धरण व इतर प्रकल्पामुळे जे भूमिहीन झाले त्यांना पर्यायी जमिनी दिल्या जाव्यात, भूमिहिनांना शेतजमिनीसाठी पाणी व वीज योग्य दरात मिळावी आदी मागण्यासाठी भूमिहिनांचा मंत्रालयावर मोर्चा काढण्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले. या निर्णयानुसार १० ऑक्टोबर, २००२ रोजी भूमीहक्क परिषदेच्या वतीने मंत्रालयावर मोर्चा नेण्यात आला. या विराट मोर्चात भूमिहिनांच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी शेतकरी, शेतमजूर, संघटना, श्रमिक क्रांती संघटना, आदिवासी एकता व जमीन हक्क कृती समिती, पुनर्वसन आंदोलन, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, मानवी हक्क अभियान, महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद, नर्मदा बचाव आंदोलन आदी ३५ संघटनांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. या ऐतिहासिक मोर्चाचे नेतृत्व नागनाथअण्णांनी केले. हा लढा त्यांना अतीव आंतरिक समाधान देणारा ठरला. लढ्याचे हे पर्व सुरू असतानाच संघटनात्मक पातळीवर विविध विधायक उपक्रमही त्यांनी चालूच ठेवले होते. लढ्यांना रचनात्मक कार्याची जोड दिली तरच सामाजिक प्रगती व परिवर्तन सुलभ होऊ शकेल, असे त्यांचे म्हणणे होते. त्यासाठी उपेक्षित, दलित, आदिवासी, शेतमजूर, कामगार यांच्या संघटना प्रभावी बनण्याची गरज आहे, असे त्यांना वाटे. या संघटनात्मक कार्याला बळकटी देण्यासाठी विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांना ते वेगवेगळ्या मार्गाने सहकार्य करीत. दलित, आदिवासीसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत तर ते जास्तच संवेदनशील होते. दलितांना न्याय देण्याचा, त्यांच्या संघटनांना मदत करण्याचा, त्यांच्यात आत्मसन्मानाची, स्वाभिमानाची भावना निर्माण करण्याचा ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असत. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी दलित व्यक्तीची निवड करून त्यांनी हे सोदाहरण दाखवून दिले होते. रिपब्लिकन पक्षाच्या सर्व नेत्यांनी एकत्र येऊन जनजागृतीचे कार्य करावे, असे त्यांना वाटत असे. त्या दृष्टीने त्यांनी पुढाकार घेऊन सर्व दलित संघटनांच्या नेत्यांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले. या नेत्यांनी तळागाळातील समाजापर्यंत जाऊन फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार पोहोचवावेत म्हणून 'हुतात्मा' कारखान्याच्या वतीने त्यांना चार चाकी वाहन देण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांना टाटा कंपनीची सुमो गाडी प्रदान करण्याचा कार्यक्रम त्यांनी कारखाना कार्यस्थळावर घडवून आणला. दलित संघटना व रिपब्लिकन

पक्षातील विविध गटांनी एकत्र येऊन एक प्रबळ राजकीय पक्ष उभा करावा, अशी त्यांची इच्छा होती. तथापि ती फलद्रूप झाली नाही. समारंभापुरते एकत्र आलेल्या दलित नेत्यांनी आपले सवते सुभे कायम ठेवले. तरीही नागनाथअण्णांनी त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. दलितांविषयी त्यांना वाटणाऱ्या आत्मियतेचे दर्शन अशा विविध घटनांद्वारे अनेकदा घडले.

केवळ दलितच नव्हे तर आदिवासी, धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त, भूमिहीन शेतकरी, शेतमजूर आदी घटकांविषयी त्यांना प्रचंड आस्था होती. समाजातील या कमकुवत वर्गाची आर्थिक परिस्थिती तर सुधारायला हवीच, पण समाजात त्यांना सन्मानाची वागणूकही मिळायला हवी असे त्यांना वाटे. त्यामुळेच या घटकांनी जागृत व संघटित व्हावे, यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील राहिले. संघटनेच्या बळावर अनेक प्रश्न सोडविता येणे शक्य असते, यावर त्यांचा पूर्ण भरवसा होता. म्हणूनच समाजातील सामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी त्यांना संघटित करून लढ्याचा मार्ग अवलंबला. या संघशक्तीच्या बळावर व आंदोलनाच्या मार्गाने अनेक प्रश्नांची त्यांनी सोडवणूक केली वा ते मार्गी लावले. त्यामुळेच 'नागनाथअण्णा म्हणजे संघर्ष' असे समीकरण तयार झाले. सामान्यांचे लढे लढविताना आपल्या राजकीय फायद्या तोट्याचा विचार न करता संबंधितांचे प्रश्न सुटून त्यांना न्याय कसा मिळेल, एवढेच त्यांनी पाहिले. सर्वसामान्यांचे, दलित, उपेक्षितांचे प्रश्न आणि राजकारण याची गल्लत त्यांनी कधीच केली नाही. अत्यंत निरपेक्ष वृत्तीने कार्य करणारे ते खऱ्या अर्थाने जनसामान्यांचे नेते होते. चळवळीत काम करताना आणि नंतर सर्वसामान्यांच्या व्यापक हिताचे विविध लढे लढविताना त्यांनी भविष्याची चिंता कधीच केली नाही. लढणे आपल्या हातात आहे तेव्हा न्याय्य हक्कासाठी आपण लढत राहायचे असे ते म्हणत. संघर्ष करताना अपयशाने ते कधी खचून गेले नाहीत वा यशाने हुरळून गेले नाहीत. आपल्या नेतृत्वाखाली सर्व लढे कायदेशीर मार्गाने व संयमाने लढविण्यावर त्यांनी भर दिला. हिंसक मार्गाचा कधीच अवलंब केला नाही आणि आपल्या समर्थकांनाही करू दिली नाही. प्रसंगी पोलिसांच्या लाठ्या सहन केल्या आणि तुरुंगवासही पत्करला, पण लढे व आंदोलनांना हिंसक वळण लागणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष दिले. प्रत्येक आंदोलनावर त्यांचा नेहमीच प्रभाव राहिला. त्यांच्या आदेशानुसार मोर्चे व आंदोलनाचे कार्यक्रम शांततेत पार पडत आणि त्यांनी आवाहन केले की आंदोलक शिस्तबद्धपणे घरी परत जात. आंदोलने, निदर्शने कशी करावीत आणि चळवळ संयमाने कशी सुरू ठेवावी, याचा नागनाथअण्णांनी आदर्श घालून दिला. त्यांच्या लढ्याचे हे वेगळेपणच होते.

■■■■

# १३
# गौरव व मानसन्मान

एखादी व्यक्ती प्रकाशझोतात आली की तिला समाजात प्रतिष्ठा मिळते, मानसन्मान मिळू लागतो, विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील संस्था त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना पुरस्कार प्रदान करू लागतात. नागनाथअण्णांनाही विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून अनेक संस्थांचे पुरस्कार प्राप्त झाले. वेगवेगळ्या संस्थांच्या व्यासपीठावर त्यांचे सत्कार झाले. त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सत्काराची मालिका दीर्घकाळ चालू राहिली. केवळ पुरस्कार सोहळा वा सत्कार समारंभासाठी नागनाथअण्णा सहसा कुठे जात नसत. सत्कार, मानसन्मान अशा बाबतीत त्यांना व्यक्तिशः मुळीच रस नव्हता. किंबहुना 'हार' आणि 'माईक' पासून शक्यतो लांब राहण्याचा ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असत. स्वतःचे सत्कार सोहळे घडवून आणण्याच्या आजच्या जमान्यात हे विसंगत वाटावे अशीच परिस्थिती आहे, पण नागनाथअण्णा नेहमीच प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत आले. मात्र जेथे सामाजिक कार्यासाठी म्हणून प्रसिद्धीची गरज आहे, तेथे हमखास व्यासपीठावरून बोलत राहिले. जर प्रश्न सोडवण्यासाठी, तो धसास लावण्यासाठी प्रसिद्धीची आवश्यकता असेल तर ते प्रसिद्धीमाध्यमांचा जरूर वापर करीत, पण त्यात स्वतःच्या प्रसिद्धीचा, सार्वजनिक व्यासपीठावर मिरवण्याचा हव्यास नसे. याबाबतीत त्यांची भूमिका अत्यंत स्पष्ट होती. सार्वजनिक कामासाठी आवाज उठवायला व गाजावाजा करायलाच हवा, पण त्यात व्यक्तिगत प्रसिद्धीचा भाग नसावा असे ते म्हणत. सार्वजनिक क्षेत्रात कामाचा गौरव झाला पाहिजे, व्यक्तीचा नव्हे, ही त्यांची भूमिका होती. त्यामुळेच व्यक्तिगत गौरव करवून घेण्यासाठी वा प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी त्यांनी कधीच आटापिटा केला नाही. उलट अशा प्रसंगांना फाटा देण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला. सत्कार सोहळे, गौरव समारंभ यापासून ते जाणीवपूर्वक दूर राहात आले. तथापि काही संस्था, संघटना गुणवंत व्यक्तींच्या शोधात असतात. साहजिकच नागनाथअण्णांसारख्या व्यक्तींच्या मागे पुरस्कार चालून येत राहिले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पुरस्कारांपासून दूर राहण्याचा त्यांनी प्रयत्न केला, तरी देखील काही पुरस्कार व सत्कार सोहळे त्यांना टाळता

आले नाहीत. काही पुरस्कार नाकारणे योग्य नाही म्हणून वा त्या पुरस्कारांचा सन्मान म्हणून त्यांनी ते स्वीकारले. अशा पुरस्कारांची संख्या देखील लक्षणीय ठरली. जर मिळेल तो पुरस्कार ते स्वीकारत राहिले असते, तर अशा कार्यक्रमातच त्यांचा बव्हंशी कालापव्यय झाला असता, पण त्यांनी ते भान राखले व मोजकेच पुस्कार स्वीकारले. तरीदेखील त्यांची संख्या शंभराहून अधिक भरेल. या सर्व पुरस्कारांचा येथे उल्लेख करण्याची आवश्यकता नाही. तथापि, काही पुरस्कारांची मात्र आवर्जून दखल घ्यावी लागेल. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने त्यांना ८ डिसेंबर, २००७ ला देण्यात आलेली 'डॉक्टर ऑफ लेटर्स' (डी. लिट.), २६ जानेवारी, २००९ ला भारत सरकारच्या वतीने देण्यात आलेला 'पद्मभूषण' पुरस्कार आणि अमेरिकेतील महाराष्ट्र फौंडेशनच्या वतीने देण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार यांची नोंद घेणे आवश्यक आहे. याचा अर्थ अन्य पुरस्कारांचे मोल कमी लेखणे असा नाही. तसा प्रत्येक पुरस्कार मोलाचाच असतो. कारण त्या मागची भावना महत्त्वाची असते; पण काही वेळा पुरस्कार हा व्यक्तिमत्त्वाच्या उंचीचा निदर्शक मानला जात असल्याने या तीन पुरस्कारांचा मुद्दाम उल्लेख करायला हवा.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व विज्ञान क्षेत्रातील नामवंतांना डी. लिट. ही सन्माननीय पदवी देऊन गौरविण्यात येत असते. यशवंतराव चव्हाण, डॉ. अनिल काकोडकर, चंद्रकांत मांडरे, एन. डी. पाटील, भाई माधवराव बागल, लता मंगेशकर आदींना हा सन्मान लाभलेला होता. या दिग्गज मंडळींत नागनाथअण्णांचाही समावेश करण्यात आला. त्यांचे कार्य प्रामुख्याने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातच असल्याने विद्यापीठाने त्यांना ४४ व्या पदवीदान समारंभात डी. लिट. देऊन सन्मानित केले. नागनाथअण्णांना डी. लिट. देण्यात आल्याचा आनंद ग्रामीण भागातील त्यांच्या असंख्य चाहत्यांनी साजरा केला. स्वातंत्र्यसैनिकांपासून ते राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक तसेच सहकार क्षेत्रातील त्यांच्या समर्थकांच्या दृष्टीने तर ही अत्यानंदाचीच बाब ठरली. नागनाथअण्णांना डी. लिट. देऊन शिवाजी विद्यापीठाने जणू स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारकांचा, हौतात्म्य पत्करलेल्या क्रांतिवीरांचा तसेच शेतकरी, कामगार, कष्टकरी जनतेच्या सच्च्या प्रतिनिधीचाच सन्मान केला. एका कृतिशील कार्यकर्त्याच्या प्रामाणिक प्रयत्नाला विद्यापीठाने दिलेली ही पोहोच पावतीच म्हणायला हवी. विद्यापीठाने दिलेल्या डी. लिट. चा स्वीकार करताना ते म्हणाले, 'आज होत असलेला हा सन्मान माझा नसून भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांचा, स्वातंत्र्यवीरांचा आणि या देशाच्या जडणघडणीत

आपले आयुष्य पणाला लावलेल्या अनेक देशभक्तांचा सन्मान आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्य मिळूनही अद्याप सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायापासून वंचित राहिलेले शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांनी चालविलेल्या संघर्षाचा हा सन्मान आहे.' त्यांच्या या उद्‌गारावरून समाजातील उपेक्षित वर्गाविषयी त्यांना वाटणारी आस्था दिसून येते. या घटकांना न्याय मिळावा यासाठी नागनाथअण्णा आयुष्यभर संघर्षरत राहिले. याच भाषणात त्यांनी नव्या पिढीतील युवक-युवतींना केलेले आवाहनही अत्यंत भावस्पर्शी व त्यांची भूमिका स्पष्ट करणारे होते. ते म्हणाले, 'आम्ही आता शरीराने थकलो. जे जे शक्य होते ते ते आम्ही केले. आता क्रांतीचे माध्यम बदलले आहे. परकियांच्या विरोधात आम्ही बंदुकीचा वापर केला. आता स्वकियांबरोबरचा संघर्ष विधायक मार्गाने, बुद्धीने, कौशल्याने, संशोधनाने, निष्ठेने आणि महत्त्वाचे म्हणजे सामाजिक बांधिलकीने करावयाचा आहे. तरच दलित, आदिवासी, शोषित, वंचित, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांना न्याय मिळू शकेल. ती जबाबदारी आजच्या तरुण-तरुणींनी स्वीकारावी असे मी आवाहन करतो.' समाजातील दुर्बल व अन्यायग्रस्त घटकांविषयी त्यांना नेहमीच आत्मियता वाटत असे. विद्यापीठाचा सर्वोच्च बहुमान स्वीकारतानाही त्यांना त्यांचे स्मरण व्हावे हे त्यांच्या विचाराशी सुसंगतच म्हणावे लागेल. त्यांच्या अंतरंगातील ओलाव्याचे व पराकोटीच्या प्रामाणिक भावनेचे हे मनोज्ञ दर्शन अक्षरशः भारावून टाकणारे होते. नागनाथअण्णांना 'डी. लिट.' दिली गेल्याने एक प्रकारे या पदवीचाही सन्मान झाला आणि विद्यापीठाची शानही उंचावली, अशा भावनेचे तरंग या प्रसंगी अनेकांच्या मनात उमटले असतील. शिवाजी विद्यापीठाने 'डी लिट' देऊन त्यांचा गौरव केल्यानंतर सुमारे वर्षभरानंतर राष्ट्रीय पातळीवरील 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते २६ जानेवारी, २००९ ला राष्ट्रपती भवनात झालेल्या शानदार सोहळ्यात त्यांना हा नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. सांगली जिल्ह्यात हा पुरस्कार मिळवणारे नागनाथआण्णा हे दुसरे स्वातंत्र्यसैनिक ठरले. त्यापूर्वी माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांना हा सन्मान लाभला होता. या दोन्ही नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन लक्षणीय कामगिरी पार पाडली होती. त्या काळात त्यांचे मैत्रीसंबंध होते आणि स्वातंत्र्योत्तर काळातही ते तेवढेच दृढ राहिले. स्वातंत्र्य लढ्यात आणि नंतर राजकारण, समाजकारण, शिक्षण व सहकार क्षेत्रात उभय नेत्यांनी मोठे कार्य केले. त्या दोघांचाही 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मान व्हावा हा योगायोगच म्हणावा लागेल. या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या या दोन्ही व्यक्ती अत्यंत कर्तबगार म्हणून नावाजलेल्या आणि

चारित्र्यसंपन्न, निःस्पृह व जनसामान्यात लोकप्रियता लाभलेल्या होत्या. साहजिकच वसंतदादांच्या प्रमाणे नागनाथअण्णांनाही या नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, याचे अनेकांना आत्यंतिक समाधान वाटले.

## जीवन गौरव पुरस्कार

या दोन पुरस्कारानंतर नागनाथअण्णांना मिळालेला आणखी एक महत्त्वाचा पुरस्कार म्हणजे अमेरिकेतील महाराष्ट्र फौंडेशनतर्फे देण्यात आलेला 'जीवन गौरव' पुरस्कार. अमेरिकेतील मराठी उद्योग-व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या महाराष्ट्र फौंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्काराची निवड एका निवड समितीतर्फे अत्यंत सुयोग्य पद्धतीने केली जात असते. त्यामुळे या पुरस्कारांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. नागनाथअण्णांच्या सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन २०११ च्या पुरस्कारासाठी समितीने त्यांची निवड केली व त्यांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे नागनाथअण्णांच्या कार्याचा महाराष्ट्र पातळीवर तर गौरव झालाच, पण सातासमुद्रापार वास्तव्य करणाऱ्या तमाम मराठी भाषिकांनीही त्यांच्या कार्याची नोंद घेऊन एक प्रकारे कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.

महाराष्ट्र फौंडेशनच्या जीवन गौरव पुरस्कारानंतर नागनाथअण्णांनी एकच महत्त्वाचा पुरस्कार स्वीकारला तो म्हणजे कर्मवीर भाऊराव अण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या नावे असलेला 'रयत माऊली' पुरस्कार! लक्ष्मीबाई यांच्या ८२ व्या पुण्यतिथी दिनी २२ मार्च, २०१२ ला 'रयत माऊली' पुरस्काराने नागनाथअण्णांना सन्मानित करण्यात आले. कर्मवीर भाऊरावअण्णा व लक्ष्मीबाई ही नागनाथअण्णांच्या जीवनातील अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्त्वे होती. या पुरस्काराला त्यांच्या दृष्टीने एक भावनिक किनार असल्यामुळेच त्यांनी तो मोठ्या आनंदाने स्वीकारला. त्यांच्या जीवनातील हा तसा शेवटचाच महत्त्वाचा पुरस्कार म्हणावा लागेल. नागनाथअण्णांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची निर्देशित करणारे असे हे महत्त्वाचे पुरस्कार असले, तरी इतरही काहींचा उल्लेख करणे उचित ठरेल. स्व. नेमगोंडादादा पाटील जनसेवा पुरस्कार (१९९३), डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील समाज सेवा पुरस्कार (१९९८), कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार (१९९९), प्रतिशाहू पुरस्कार (२००१), क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार (२००१), हरिश्चंद्र तारामती गौरव पुरस्कार (२००२), डॉ. बाबासाहेब आंबेडकर रत्न पुरस्कार (२००२), भाई माधवराव बागल पुरस्कार (२००२), महाराष्ट्र गौरव पुरस्कार (दक्षिण भारत जैन सभा, बेळगाव २००३), शाहू, फुले, आंबेडकर,

लोकमान्य पुरस्कार, पुणे (२००५), कै. नरुभाऊ लिमये स्मृती आर्यभूषण पुरस्कार (२००७), किसन वीर सामाजिक पुरस्कार (२००७), सामाजिक कृतज्ञता पुरस्कार (२००७) अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांची यादी तशी खूपच मोठी आहे. यापैकी बरेच पुरस्कार त्यांनी त्या त्या ठिकाणच्या लोकभावनांचा आदर करण्याच्या भूमिकेतून स्वीकारले. या पुरस्कार व मानपत्रांचे एक मोठे दालन हुतात्मा संकुल परिसरात तयार करण्यात आले आहे.

एका दृष्टीने पुरस्कार व मानसन्मान ही संबंधित व्यक्तीच्या कार्याला समाजाकडून मिळालेली पोचपावती असते. अशाप्रकारे व्यक्तीच्या कार्याचा गौरव झाला तर त्यांना पुढील कार्यासाठी नवी उमेदही मिळू शकते. नागनाथअण्णांना या मानसन्मानांनी तशी उमेद व ऊर्जा तर दिली असणारच, पण त्याबरोबरच एक प्रकारचे आंतरिक समाधानही त्यांना मिळाले असणार हे गृहीत आहे.

▣▣▣▣

# १४
# सोव्हिएत युनियनचा दौरा

नागनाथअण्णांच्या दृष्टीने आणखी एक समाधानाची गोष्ट म्हणजे त्यांनी पत्नीसह केलेला तत्कालीन सोव्हिएत युनियनचा दौरा. नागनाथअण्णांचे डाव्या चळवळीशी नाते असल्यामुळे त्यांना साम्यवादी विचाराबद्दल नेहमीच आस्था वाटत असे. डाव्या विचारांच्या प्रभावामुळेच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षिले गेले होते. साहजिकच या विचाराची भूमी म्हणून सोव्हिएत युनियनबद्दल त्यांच्या मनात सुप्त आकर्षण होते. तशी इच्छा त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवली होती. गरीब, शेतकरी, कामगार, कष्टकरी व एकूणच श्रमिकांविषयी त्यांना अत्यंत कळकळ वाटत असे आणि त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व त्यांना सामाजिक, राजकीय स्तरावर न्याय मिळावा यासाठी ते अखंड कार्यरत राहिले होते. त्यामुळे साम्यवादी विचारसरणीच्या पायावर उभ्या राहिलेल्या सोव्हिएत युनियनला भेट देणे हे त्यांचे स्वप्न होते. ते साकार होण्याचा योग १९८८ साली आला. १९८५ ते १९८८ या काळात ते महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य असताना सोव्हिएत युनियनला भेट देण्यासाठी जाणाऱ्या आमदारांच्या शिष्टमंडळात त्यांचा समावेश झाला होता, पण काही कारणाने १९८८ चा तो दौर रद्द झाला. नागनाथअण्णा तात्कालिक निराश झाले, पण त्यानंतर काही दिवसांतच कॉम्रेड दत्ता देशमुख यांच्या प्रयत्नाने त्यांचा खासगी स्वरुपाचा दौरा पुन्हा निश्चित झाला. त्यासाठी कॉम्रेड दत्ता देशमुख यांना बरेच परिश्रम घ्यावे लागले. पूर्वी त्यांनी सोव्हिएत युनियनला भेट दिली होती व नागनाथअण्णांनीही द्यावी असे त्यांना मनापासून वाटत होते. तथापि सोव्हिएत युनियनचा व्हिसा मिळणे ही अवघड गोष्ट होती. सोव्हिएत युनियन सरकारच्या निमंत्रणावरून डाव्या विचाराचे काही नेते, कार्यकर्ते, साहित्यिक, कलावंत, कामगार, कार्यकर्ते आदी त्या देशाला भेट देत असत. क्रांतिसिंह नाना पाटील यांनाही ती संधी मिळाली होती. त्यामुळेही असेल कदाचित, नागनाथअण्णांनाही सोव्हिएत युनियनला भेट द्यावी असे वाटत होते. तो योग उशिरा का होईना पण आला. पासपोर्ट, व्हिसा आदी सर्व बाबींची तयारी झाली. नवी दिल्ली येथील हॉलिडे मेकर्स या खासगी प्रवासी कंपनीतर्फे ते प्रवासी म्हणून जाणार होते. त्यावेळी नागनाथअण्णांच्या पत्नी सौ. कुसुमताई यांनीही त्यांच्याबरोबर जाण्याची इच्छा

व्यक्त केली. नागनाथअण्णांनी प्रारंभी त्यांना बरोबर नेण्यास संमती दिली नाही, पण नंतर ते तयार झाले. तथापि, त्यांचा प्रवास खर्च त्यांनी स्वत: करावा अशी अट त्यांनी घातली. नागनाथअण्णांनी स्वत:च्या खर्चासाठी एका कामगाराच्या नावावर कामगार पतसंस्थेतून कर्ज घेतले व आमदार म्हणून मिळणाऱ्या मानधनातून त्याची परतफेड करण्याचे ठरवले. दरम्यान, या दौऱ्यासाठी म्हणून वाळवा परिसरातील शेतकरी व कामगारांनी काही निधी जमवला. दौऱ्यावर जाण्यापूर्वी ही रक्कम नागनाथअण्णांकडे सुपूर्द करण्याचे त्यांनी ठरवले. त्याप्रमाणे ती त्यांच्याकडे देण्यासाठी कार्यकर्ते गेले. नागनाथअण्णांनी रक्कम किती आहे हे विचारले. ती वीस हजार रुपये असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगताच त्यांनी ते पैस वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या खर्चासाठी देण्याबाबत सुचवले. आपण सोव्हिएत युनियनच्या दौऱ्यावरून परत येईपर्यंत वसतिगृहातील विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारे आबाळ होऊ नये, ही चिंता त्यांना लागून राहिली होती. ती त्यांनी आधी दूर केली आणि मग दौऱ्याच्या खर्चाची तजवीज केली. आपल्या दौऱ्यापेक्षाही वसतिगृहातील मुलांची अग्रक्रमाने काळजी घेणाऱ्या नागनाथअण्णांचे हृदय कसे विशाल आणि अंतरीचा कळवळा किती मोठा होता हे लक्षात येते. त्यांच्या या कृतीने उपस्थितांची मने हेलावून गेली नसतील तरच नवल.

नागनाथअण्णांचा हा सोव्हिएत युनियन दौरा तीन आठवड्यांचा होता. या काळात त्यांनी ऐतिहासिक स्थळांबरोबरच तेथील औद्योगिक, वैज्ञानिक, कृषी, शिक्षण, दळणवळण आदी क्षेत्रातील विविधांगी प्रगतीची पाहणी केली. जगातील एका साम्यवादी विचाराच्या देशातील आर्थिक व सामाजिक बदलाचे प्रत्यक्ष दर्शन घेतले. या पहिल्याच विदेश दौऱ्यामुळे ते मनोमन सुखावून गेले. आपल्या देशातील अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी करावा लागणारा संघर्ष आणि सोव्हिएत युनियनमधील कृषी क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाच्या वापराचे, समाज व्यवस्थेचे, विकासाचे तुलनात्मक चित्र मनात रेखाटत त्यांनी विविध विषयांची माहिती घेतली. जरी ते पूर्वी काँग्रेसमध्ये होते, तरी त्या काळातही साम्यवादी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता व तो अखेरपर्यंत कायम राहिला. कामगार, शेतकरी, कष्टकरी व श्रमिकांच्या विषयी आस्थेवाईकपणाची भावना बहुधा या विचारांमुळेच त्यांच्या ठायी रुजली होती. साहजिकच साम्यवादी सरकार अस्तित्वात असणाऱ्या सोव्हिएत युनियनविषयी त्यांना विशेष प्रेम असणे गृहीत होते. दौऱ्याहून परतल्यानंतर वाळवा परिसरातील आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी आपण तेथे काय काय पाहिले या विषयी तसेच तेथील समाजजीवनाबद्दल विस्तृत माहिती दिली. या दौऱ्यामुळे ते खूपच प्रभावित झाल्याचे कार्यकर्त्यांना

प्रकर्षाने जाणवले. येताना त्यांनी काही बॉलपेन्स आणले होते. या दौऱ्यात त्यांनी केलेली खरेदी तेवढीच. हे बॉलपेन्स त्यांनी भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांना सोव्हिएत युनियनची आठवण म्हणून वाटून टाकले. विशेष म्हणजे गरजेपुरताच खर्च त्यांनी दौऱ्यात केला. उरलेले पैसे परत आल्यानंतर कामगारांना परत केले.

सोव्हिएत युनियनच्या दौऱ्यानंतर त्यांचे दैनंदिन कार्यक्रम पूर्ववत सुरू झाले. कार्यकर्त्यांच्या बैठका, सभा, मोर्चे, संमेलने हे सारे नियोजनबद्धपणे चालू झाले. दुष्काळी पाणी परिषदांचा तर धुमधडाकाच सुरू झाला. शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर, धरणग्रस्त परिषदा, प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्तांच्या मागण्यांसाठीचे लढे या साऱ्या कामांना एक प्रकारे नव्याने जोर आला.

■■■■

# १५
# 'क्रांतिसिंहा'च्या छायेत

नागनाथअण्णांनी जीवनाची वाटचाल सुरू केली ती क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रेरणेने. हे प्रेरणास्थान सतत नजरेपुढे ठेवून त्यांनी मार्गक्रमण केले. नागनाथअण्णांच्या जीवनात क्रांतिसिंहांना नेहमीच अनन्यसाधारण महत्त्व राहिले. क्रांतिसिंहांचे मानसपुत्र म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जात असे. वाळवा येथे २५ फेब्रुवारी, १९७१ ला हुतात्मा किसन अहिर यांच्या अर्धपुतळ्याच्या अनावरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील उपस्थित राहिले होते. त्यावेळी क्रांतिसिंह पंढरपूर येथे राहत होते. नागनाथअण्णांनी या कार्यक्रमासाठी त्यांना आग्रहपूर्वक निमंत्रित केले होते. २५ फेब्रुवारी, १९७१ ला झालेल्या या समारंभानंतर नागनाथअण्णांनी त्यांना हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या परिसरातच कायमचे राहण्याची विनंती केली. सत्तरी पार केलेल्या नाना पाटील यांनीही ती मान्य केली व ते वास्तव्यासाठी आले. 'हुतात्मा' परिवारात ते सहभागी झाले. नागनाथअण्णांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र निवासाची व त्यांना घरातून जेवण पाठविण्याची व्यवस्था केली. त्यांची सर्वप्रकारे सेवाशुश्रूषा केली जाईल हेही पाहिले. नागनाथअण्णांच्या दृष्टीने ही अतीव समाधानाची बाब होती. त्यानंतर नाना पाटील वर्षातून आठ महिने वाळवा येथे तर उर्वरित चार महिने पंढरपूर येथे राहू लागले. त्यांचे पंढरपुरात वास्तव्य असतानाच्या काळातही नागनाथअण्णा अधूनमधून तिकडे जाऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी करीत. त्यांना हवं नको ते बघत. नागनाथअण्णांच्या जीवनात नाना पाटील यांचे स्थान अत्यंत आदराचे होते. त्यांच्या दृष्टीने नाना पाटील हे जणू त्यांच्या जीवनाचे शिल्पकार होते. नाना पाटील यांच्या सभांतील भाषणांमुळे प्रभावित होऊनच ते स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. भूमिगत असतानाच्या काळातही त्यांच्या मार्गदर्शनानुसारच त्यांचे कार्य सुरू राहिले. प्रतिसरकारच्या वतीने 'स्वतंत्र भारत' नावाचे पत्रक प्रसिद्ध केले जात असे. शिराळा व वाळवा तालुक्यात ते गावोगावी पोहोचवण्याची जबाबदारी नागनाथअण्णा आपल्या सहकाऱ्यांमार्फत पार पाडत असत. १९४२ ची चळवळ देशभर पसरली होती, पण पुढे ती हळूहळू थंडावत गेली. सातारा जिल्हा मात्र याला अपवाद होता. प्रतिसरकारच्या मार्गदर्शनाखाली ही चळवळ सातारा जिल्ह्यातील भूमिगतांनी

धगधगती ठेवली होती. या प्रतिसरकारची धुरा नाना पाटील यांच्या खांद्यावर असताना नागनाथअण्णा वाळवा व शिराळा तालुक्यात महत्त्वाची भूमिका बजावत होते. जी. डी. बापू लाड व नागनाथअण्णा हे जणू नाना पाटलांचे दोन खंदे वीर व बिनीचे लढवय्ये होते. स्वातंत्र्य लढ्यात व प्रतिसरकारच्या चळवळीत नाना पाटील यांच्याशी निर्माण झालेल्या ऋणानुबंधाची नागनाथअण्णांनी स्वातंत्र्योत्तर काळातही जपणूक केली आणि १९७१ ला नाना पाटील वाळवा येथे वास्तव्यासाठी आल्यानंतर तर ते अधिकच दृढ झाले. नाना पाटील यांची वास्तपुस्त केल्याशिवाय नागनाथअण्णांचा दिवस जात नसे. अत्यंत मनोभावे ते त्यांची काळजी घेत. पितृतुल्य मानून त्यांनी त्यांची सेवा केली. नाना पाटलांनीही त्यांच्यावर पुत्रवत प्रेम केले. नागनाथअण्णांना ते आपला राजकीय वारस समजत असत. आयुष्यभर नाना पाटील यांनी खूप सोसले तेव्हा उतारवयात त्यांनी आयुष्याचा उर्वरित काळ समाधानाने व्यतीत करावा, असे नागनाथअण्णांना वाटत होते. त्यांचे वास्तव्य आपल्या जवळपास असावे अशीही त्यांची इच्छा होती. साहजिकच नाना पाटील वास्तव्यासाठी वाळव्यास आले याचे त्यांना आत्यंतिक समाधान झाले.

नाना पाटील यांचे आठ वर्षे वाळवा येथे वास्तव्य राहिले. या काळात त्यांना दोन्ही वेळचे जेवण नागनाथअण्णांच्या घरून दिले जात असे. त्यांच्या औषधोपचार व इतर खर्चाची जबाबदारीही नागनाथअण्णांनीच घेतली होती. आठ महिने वाळव्यात व चार महिने पंढरपूरच्या रामबागेत पुरुषोत्तम रंगाचार्य यांच्या मठात ते राहत. एकदा पंढरपूरला असताना त्यांच्या पायाला छोटीशी जखम झाली. ते मधुमेहाचे रुग्ण असल्यामुळे त्यांची ही जखम वाढत गेली आणि त्यांना आत्यंतिक वेदना होऊ लागल्या. उपचारासाठी त्यांना मिरज येथे डॉ. आनंद गायकवाड यांच्या इस्पितळात दाखल करण्यात आले. तेथे दोन महिने त्यांच्या पायावर उपचार करण्यात आले, पण गँगरीन झाल्यामुळे अखेर त्यांचा तो पाय काढावा लागला. या काळात अनेक कार्यकर्ते व चाहते त्यांच्या भेटीसाठी येत असत. बीड जिल्ह्यातून कम्युनिस्ट पक्षातर्फे ते संसद सदस्य म्हणून निवडून आले होते व त्यांनी त्या काळात सोव्हिएत युनियन सरकारच्या निमंत्रणावरून त्या देशाचा दौराही केला होता. तथापि, नंतर मात्र ते राजकीय व सामाजिक कार्यापासून काहीसे अलिप्तच राहिले होते. त्यामुळे मिरजेत ते उपचारासाठी आल्याचे समजताच त्यांच्या भेटीसाठी लोक मोठ्या संख्येने येत असत. त्यांच्या आजारपणाच्या काळात नागनाथअण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाई या नियमितपणे वाळव्याहून येऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करीत असत. नागनाथअण्णा तर सतत

सेवेतच असत. शस्त्रक्रियेनंतरचे उपचार पूर्ण झाल्यावर नाना पाटील यांना पंढरपूरऐवजी वाळवा येथेच वास्तव्यासाठी नेण्यात आले. तेथे त्यांची प्रकृती सुधारली. १९७६ मध्ये त्यांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली. त्यानिमित्त २३ नोव्हेंबर, १९७६ ला विटा येथे पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या समारंभानंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागल्यामुळे मिरज येथील मिशन इस्पितळात दाखल करण्यात आले. तेथे दहा-बारा दिवस उपचार सुरू होते. अखेरीस ६ डिसेंबर, १९७६ ला त्यांचे निधन झाले. नागनाथअण्णांच्या दृष्टीने ही अतीव दुःखद घटना होती. मोठ्या धीराने ते या घटनेला सामोरे गेले. नाना पाटील यांचे पार्थिव मिरजेपासून मिरवणुकीने वाळव्यास नेण्यात आले. तेथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या निधनाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील एका महान लढवय्या नेत्याचा अस्त झाला. जणू एक धगधगते क्रांतिपर्व संपले. ज्या ठिकाणी नाना पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले, तेथे त्यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय नागनाथअण्णांनी जाहीर केला होता. त्यानुसार नाना पाटील यांचा पूर्णाकृती पुतळा उभा करण्यात आला. भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते १९ फेब्रुवारी, २००९ रोजी या पुतळ्याचे भव्य समारंभाद्वारे अनावरण करण्यात आले. सुमारे दोन लाखांच्या उपस्थितीत झालेला हा समारंभ वाळव्याच्या इतिहासातील एक संस्मरणीय सोहळा ठरला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाने वाळवा येथे कला व विज्ञान महाविद्यालय १९९२ ला सुरू झाले होते. त्यानंतरचे त्यांचे झालेले हे दुसरे मोठे स्मारक. एका थोर क्रांतिकारकाचे हे स्मारक वाळव्याच्या लढाऊ जनतेला जणू सतत लढ्याची प्रेरणा देणारे ठरले. नागनाथअण्णांना या पुतळा अनावरण कार्यक्रमामुळे अत्यंत आनंद तर झालाच, पण कर्तव्यपूर्तीचे समाधानही लाभले. समारंभात त्यांनी ते जाहीरपणे बोलूनही दाखवले. नागनाथअण्णांच्या जीवनात नाना पाटील यांना अत्यंत आदराचे स्थान होते. त्यांच्याविषयीची कृतज्ञता त्यांनी त्यांच्या उत्तरायुष्यात त्यांची सेवा करून व त्यांच्या नावाने महाविद्यालयाची तसेच त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी करून व्यक्त केली.

## हुतात्म्यांची स्मारके

नाना पाटील यांच्याप्रमाणेच नागनाथअण्णांच्या जीवनातील आणखी दोन जिव्हाळ्याची व्यक्तिमत्त्वे म्हणजे हुतात्मा किसन अहिर व नानकसिंग. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात नागनाथअण्णांबरोबर ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले, त्यात हुतात्मा किसन अहिर हे

प्रमुख होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नागनाथअण्णांनी वाळवा येथे 'हुतात्मा किसन अहिर विद्यालय' तसेच शिराळा तालुक्यात सोनवडे येथे 'हुतात्मा किसन अहिर वसतिगृह' सुरू केले. त्यांच्या २५ व्या स्मृतीदिनी वाळवा येथील विद्यालयाच्या प्रांगणात त्यांचा अर्धपुतळा उभारला. या पुतळ्याचा अनावरण समारंभ २५ फेब्रुवारी, १९७१ रोजी तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष कॉम्रेड दत्ता देशमुख होते. या समारंभास हुतात्मा किसन अहिर यांच्याबरोबर स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेले पन्नासहून अधिक क्रांतिकारक उपस्थित होते. नागनाथअण्णांच्या दृष्टीने त्यांना अत्यंत समाधान देणारा असा तो सोहळा होता. हुतात्मा किसन अहिर यांच्या या स्मारकाबरोबरच त्यांची स्मृती जोपासण्याच्या उद्देशाने वाळवा येथे उभारण्यात आलेल्या सहकारी साखर कारखान्यालाही त्यांचेच नाव देण्यात आले. सहकारी साखर कारखान्याची कल्पना शेतकऱ्यांच्यापुढे मांडतानाच नागनाथअण्णांनी कारखान्याचे नावही निश्चित केले होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हुतात्मा झालेल्या आपल्या सहकाऱ्यांविषयी त्यांच्या अंतःकरणात विलक्षण आत्मियता व प्रेम होते. ते त्यांनी त्यांची वेगवेगळ्या स्वरुपात स्मारके उभा करून व्यक्त करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. २५ फेब्रुवारी, १९४७ च्या पहिल्या स्मृतीदिनापासून दरवर्षी २५ फेब्रुवारीला हुतात्मा किसन अहिर यांच्या स्मृतीदिनी ते स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करीत. स्वातंत्र्यासाठी लढलेले व हुतात्मा झालेले अनेक स्वातंत्र्यसैनिक विस्मरणात गेले. या पार्श्वभूमीवर नागनाथअण्णांनी निष्ठेने व कर्तव्यबुद्धीने आपला सहकारी हुतात्मा किसन अहिर यांची स्मृती जोपासण्याचा केलेला प्रयत्न वाखाणण्यासारखा तर आहेच पण त्यांच्या अंतःकरणातील सहृदयतेचे दर्शन घडविणारा आहे. नाना पाटील व किसन अहिर यांची स्मारके ही जणू मूर्तिमंत त्यागाची प्रतीके आहेत. वेगवेगळ्या टप्प्यांवर नागनाथअण्णांनी ही जी स्मारके उभी केली, ती आणखी एका दृष्टीने महत्त्वाची आहेत. या स्मारकांसाठी त्यांनी केलेला खर्च हा सामान्य माणसांच्या, श्रमिक व कष्टकऱ्यांच्या घामातून निर्माण झालेल्या सरळ मार्गी निधीतील होता. त्यामागच्या प्रामाणिक सद्भावनेमुळे त्यांचे मोल अधिक आहे.

नागनाथअण्णांचा जसा आपल्या कुटुंबीयांशी 'व्यावहारिक संबंध' नव्हता, तद्वतच ते ज्या हुतात्मा संकुलात राहत, तेथील कुठल्याही संस्थेच्या आर्थिक व्यवहाराशी त्यांचा संबंध नव्हता. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे वा अन्य कोणत्याच संस्थेचे

ते सदस्यही नव्हते. त्यामुळे तेथे पदाधिकारी होण्याचा प्रश्नच नव्हता. प्रथमपासूनच त्यांनी ते पथ्य पाळले होते. एक प्रकारची अलिप्तता त्यांनी जाणीवपूर्वकच ठेवली होती. त्यांच्या विविध संस्थांतील सर्व व्यवहार लोकशाही पद्धतीने निर्णय घेऊनच होत असत. एवढ्या संस्था आणि मुख्य म्हणजे एक सहकारी साखर कारखाना हाताशी असतानाही कोणत्याही मोहाला बळी न पडता त्यांच्या सत्तापदापासून दूर राहणे ही सोपी गोष्ट नव्हती. त्यासाठी मन खंबीर असावे लागते. नागनाथअण्णांकडे ते होते आणि त्यांच्या सर्वच व्यवहारात खुलेपणा व पारदर्शीपणा होता. त्यामुळे त्यांच्यावर कसल्याही प्रकारचा अविश्वास दाखविण्याचा वा त्यांच्या कुठल्याही कार्याबद्दल आक्षेप घेण्याचा प्रश्नच येत नसे. व्यक्तिगत चारित्र्य तर त्यांनी निष्कलंक ठेवलेच, पण संस्थांचा कारभारही स्वच्छ राहील, याची दक्षता घेतली. त्यांच्या पारदर्शी कार्यपद्धतीमुळे कोणत्याही संस्थेत कधीही व कसलाही गैरव्यवहार झाल्याचे कधी ऐकायला मिळाले नाही. अवती भवती अनेक शिक्षण संस्था व सहकारी संस्थांतून प्रचंड भ्रष्टाचार व गैरव्यवहार होत असल्याच्या कितीतरी घटना निदर्शनास येत असताना नागनाथअण्णांनी उभ्या केलेल्या सर्वच संस्थांचा कारभार निकोपपणे चालत राहावा हा चमत्कारच म्हणावा लागेल. ते ना शिक्षणसम्राट झाले ना सहकारसम्राट. उलटपक्षी संस्था कशा चालवाव्यात याचा आदर्श त्यांनी घालून दिला. त्यांच्या हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने तर देशपातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली. भ्रष्टाचार व गैरव्यवस्थापनामुळे सहकारी साखर उद्योगाची सर्वत्र वाताहत होऊन ते मोडीत निघत असताना हुतात्मा सहकारी साखर कारखान्याने मात्र दर्जेदार साखर उत्पादन करून व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देऊन देशभर लौकिक मिळविला. त्यांनी चालविलेल्या सर्वच संस्था उत्तम स्थितीत व चांगल्या प्रकारे कार्यरत राहिल्या. अर्थातच नागनाथअण्णांचे पारदर्शी, निःस्पृह व निःस्वार्थी नेतृत्व हेच यामागचे मुख्य कारण होते, हे गृहीत आहे.

■■■■

# १६
# सत्शील, पारदर्शी व्यक्तिमत्त्व

नागनाथअण्णांचा जन्म वाळवा येथे झाला आणि त्यांचे मुख्य कार्यक्षेत्रही वाळवा तालुका परिसर हेच राहिले. त्यांचे वडील रामचंद्र व आई लक्ष्मीबाई यांचे नागनाथअण्णा हे तिसरे अपत्य. पहिली दोन अपत्ये लहानपणीच अल्पशा आजाराने मरण पावल्यामुळे घरात नागनाथअण्णा व त्यांचे लहान बंधू शामराव असे चौघांचे कुटुंब वाळवा येथेच वास्तव्यास होते व अखेरपर्यंत ते तेथेच राहिले. नागनाथअण्णांना किरण, अरुण व वैभव हे तीन पुत्र आणि विशाखा व प्रगती या दोन कन्या. ज्येष्ठ सुपुत्र किरण हे घरची पारंपरिक शेती करतात, तर द्वितीय पुत्र अरुण हे एम.एस्सी. (कृषी) झाल्यानंतर हुतात्मा परिवारात दाखल झाले. हुतात्मा सहकारी बँकेचे अध्यक्षपद व हुतात्मा उद्योग समूहाची धुरा ते सांभाळत होते, पण २४ फेब्रुवारी, २००५ ला त्यांचे अकाली निधन झाले. नागनाथअण्णांच्या कुटुंबीयांवर हा मोठाच आघात झाला. अरुण हे 'हुतात्मा संकुला'तील एक कर्तबगार व्यक्तिमत्त्व होते. हुतात्मा सहकारी बँकेच्या नव्या दहा शाखा त्यांनी सुरू केल्या. 'हुतात्मा' सहकारी साखर कारखान्याचेही ते मार्गदर्शक होते. त्यांच्या काळात साखर कारखान्याचे विस्तार कार्य सुरू झाले आणि कारखान्याला अनेक पुरस्कारही मिळाले. कार्यकर्त्यांत मिसळणारे, निरपेक्ष भावनेने त्यांना मदत करणारे, अत्यंत विनयशील असे अरुण भय्या नागनाथअण्णांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारे युवा नेते होते. त्यांच्या अकाली निधनाने साऱ्यांनाच धक्का बसला. नागनाथअण्णा व त्यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी हजारो लोक भेटायला येऊन गेले. नागनाथअण्णा या धक्क्यातून कसेबसे सावरले, पण मनात हे दुःख कायम ठेवूनच ते कार्यरत झाले. अरुण यांच्या निधनानंतर वैभव यांच्यावर अधिक जबाबदारी पडली. तेही नागनाथअण्णांच्या मार्गदर्शनाखाली विविध जबाबदाऱ्या पार पाडत होतेच. अनपेक्षितपणे त्यांच्याकडील कार्यभार वाढला. राज्यशास्त्र विषयातले उच्च पदवीधर असलेले वैभव हे विद्यार्थी नेते म्हणून सुपरिचित होते. आता संस्थात्मक कार्यात आणि राजकीय आघाडीवरही त्यांना अधिक लक्ष देणे गरजेचे बनले. नागनाथअण्णांच्या दोन्ही कन्या विवाहबद्ध झाल्या. त्यांची पत्नी तसेच सर्वच मुले पदवीधर व उच्च पदवीधर

असल्याने एका सुसंस्कृत कुटुंबातील घटक या नात्याने ते सर्वजण हुतात्मा संकुलात वावरत आणि आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडत असत. हुतात्मा परिवाराचे नेतृत्व अप्रत्यक्षरीत्या वैभव यांच्याकडे आले आणि हळूहळू तेही नागनाथअण्णांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण क्षमतेने कार्यरत झाले. नागनाथअण्णा यांच्या पत्नी कुसुमताई शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या, तर दिवंगत अरुण यांच्या पत्नी डॉ. सुषमा या हुतात्मा किसन अहिर महाविद्यालयाच्या प्राचार्य आहेत. घरात नातवंडेही खेळू लागली, पण या भरल्या कुटुंबात नागनाथअण्णा मात्र रमले नाहीत. १९४२ ला त्यांनी घर सोडले. त्यानंतर पुनश्च कौटुंबिक पाशात ते कधीच अडकले नाहीत. हुतात्मा संकुलातच ते सदैव वावरत राहिले. त्यांचे वास्तव्यही आधी किसन अहिर विद्यालयात आणि नंतर हुतात्मा साखर कारखान्याच्या साखर शाळेत असे. वसतिगृहातील मुलांसमवेत राहण्यात त्यांना नेहमीच आनंद वाटे. त्यांचा दिनक्रम पहाटे लवकर सुरू होई. स्नानासाठी ते हुतात्मा किसन अहिर विद्यालयात जात. किसन अहिर विद्यालयासमोर त्यांचे कुटुंबीय राहतात. त्यांच्याकडून त्यांना रोजचे जेवण पाठवले जात असे. त्यानंतर दिवसभर लोकांच्या भेटीगाठी, पत्रव्यवहार, आगामी कामांचे नियोजन आदी दैनंदिन व्यवहारात त्यांचा दिवस जात असे. रात्री पुन्हा स्नान करून ते फक्त फलाहार घेत. नंतर तर त्यांनी रात्रीचा फलाहारही बंद केला. थोडे चुरमुरे आणि नारळपाणी एवढाच त्यांचा आहार असे. ते स्वतः जरी अत्यंत कमी आहार घेत असले, तरी भेटीसाठी येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला मात्र आग्रहपूर्वक जेवण घ्यायला लावीत. ग्रामीण भागातून कारखान्यावर कामासाठी येणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना केवळ दोन रुपयात पोटभर जेवण देण्याची व्यवस्था त्यांनी साखर कारखान्याच्या कँटीनमध्ये केली होती. हुतात्मा संकुल परिसरात येणारी कोणीही व्यक्ती उपाशीपोटी जाणार नाही याची दक्षता ते घेत. कारखान्याच्या उत्पन्नातून कँटीनसाठी मदत दिली जात असे. अन्नदानाचा हा उपक्रम त्यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून चालू ठेवला होता.

गोरगरीब व उपेक्षितांविषयी आत्यंतिक कणव असणाऱ्या या नेत्याने समाजातील दुर्बल घटकांविषयी नेहमीच आत्मीयता बाळगली. त्यांचे जीवन सुधारले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत असे. सहकारी साखर कारखाना, शिक्षण संस्था, सहकारी बँक, दूध संस्था वा अन्य कुठल्याही संस्थेत नागनाथअण्णा स्वतः कुठेही पदाधिकारी नव्हते. सर्व संस्थांच्या सत्तापदापासून आणि त्यांच्या आर्थिक व्यवहारापासून ते नेहमीच दूर राहिले. विशेष म्हणजे वसंतदादा पाटील यांच्यासारख्या दीर्घकालीन निकट मित्रांनी आग्रह करून देखील त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांसाठी मिळणारी पेन्शनही घेतली नाही. आमदाराला मिळणाऱ्या पेन्शनमधूनच ते आपला व्यक्तिगत खर्च भागवत असत. घरची जबाबदारी तर त्यांनी कधीच घेतली

नव्हती. त्यामुळे अत्यंत काटकसरीने ते आपले जीवन व्यतीत करत. सोव्हिएत युनियनच्या दौऱ्यावर जाताना त्यांनी आपल्या पत्नीला देखील त्यांचा खर्च त्यांनाच करावयास लावला. आपल्या दौऱ्याचा खर्चही कामगार सहकारी पतसंस्थेतून कर्ज घेऊन केला. एवढेच नव्हे, तर आजारपणानंतर डॉक्टरांनी रोज नारळाचे पाणी पिण्यास सांगितले तेव्हा 'हुतात्मा' साखर कारखाना परिसरातील नारळ काढण्याआधी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत सभासदांची ठरावाद्वारे संमती घेतली. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे जे पाहुणे येत त्यांना जेवण वा चहा, दूध देण्यासाठीही सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांची मान्यता घेतली. शिक्षण संस्था, सहकारी संस्था, बँका आदींमध्ये चालणाऱ्या प्रचंड प्रमाणावरील गैरव्यवहारांचा आणि त्यांचा वापर करून भ्रष्ट मार्गाने कोट्यवधी रुपये मिळवणाऱ्या बहुसंख्य संस्थाचालकांचा विचार करता नागनाथअण्णांसारखा अत्यंत पारदर्शी व प्रामाणिक व्यवहार करणारा नेता असू शकतो हेच कोणाला पटणार नाही ; पण हे निखळ सत्य होते. सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळलेला असतानाच्या काळात देखील नागनाथअण्णांनी आपले नैतिक बळ शाबूत ठेवले. स्वच्छ चारित्र्याचा व मूल्याधिष्ठित जीवनप्रणाली आचरणात आणणारा त्यांच्यासारखा नेता अपवादात्मकच म्हणावा लागेल.

नागनाथअण्णांचे जीवन म्हणजे जणू एक उघडे पुस्तक होते. अत्यंत साधेपणाने ते राहत. साधे धोतर, शर्ट हा नेहमीचा वेष. स्वतःसाठी गरजेइतकाच खर्च करीत आणि त्या गरजाही कमीत कमी असत. ते शुद्ध शाकाहारी होते आणि त्यांचा रोजचा आहारही अत्यंत साधा असे. सकाळी एक वेळ जेवत. तेही साडेसातपूर्वी. रात्रीचे जेवण घेत नसत. मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी महत्त्वाची कामे ते करीत नसत. याचा अर्थ ते अंधश्रद्ध होते असा नाही. स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे जीवलग सहकारी मंगळवारी हुतात्मा झाले आणि प्रतिगामी, जातीय शक्तींनी महात्मा गांधींची हत्या केली तो दिवस शुक्रवार होता. म्हणून हे दोन्ही दिवस ते शुभकार्यास वर्ज्य मानत. वयाच्या पन्नाशीनंतर स्वतःच्या कुटुंबापासून पूर्णपणे अलिप्त राहून जास्तीत जास्त वेळ सार्वजनिक कार्यासाठी व समाजातील दुर्बल घटकांसाठी देण्याचे व्रत त्यांनी अखेरपर्यंत पाळले.

## त्यागी आणि तत्त्वनिष्ठ

नागनाथअण्णांच्या काटकसरी वृत्तीच्या आणि तत्त्वनिष्ठेच्या अनेक कथा सांगितल्या जातात. सहकारी साखर कारखान्याच्या कामासाठी त्यांना वारंवार मुंबई व दिल्लीच्या फेऱ्या

कराव्या लागत. त्या काळात कुठल्याही हॉटेलात वास्तव्य न करता ते आमदार निवास, खासदार निवास वा एखाद्या कंपनीच्या गेस्ट हाऊसमध्ये राहत किंवा तशीच वेळ आली तर ओळखीच्या व्यक्तीकडे मुक्काम करीत. सार्वजनिक वा संस्थेच्या कामासाठी गेल्यानंतर देखील आपण सामान्य माणसांच्या पैशातून हा खर्च करत आहोत याचे ते सदैव भान ठेवत. कुठेही वायफळ पैसा खर्च न करण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या सहकारी कार्यकर्त्यांनीही जोपासली होती. साखर कारखान्याच्या परवान्यासाठी नवी दिल्लीत त्यांना बराच काळ वास्तव्य करावे लागले होते. तथापि, त्या काळातही कमीत कमी खर्चात कसे राहता येईल याचा ते नेहमीच विचार करीत. विशेष म्हणजे परतल्यानंतर खर्चाचा सर्व तपशील सहकाऱ्यांना सांगत. सोव्हिएत युनियनच्या दौऱ्यावरून परतल्यानंतरही त्यांनी असाच खर्चाचा तपशील सर्वांसमोर ठेवला आणि उरलेली रक्कम ज्यांनी वर्गणीद्वारे दिली होती, त्यांना ती परत केली. दिल्लीहून परतताना सहकाऱ्यांसाठी आणलेल्या मिठाईचाही ते हिशेब देत आणि त्यापैकी एखादा बॉक्स घरी दिला असेल तर तेवढी रक्कम पत्नीच्या नावे टाकून त्यांच्या पगारातून कापून घ्यायला सांगत. स्वातंत्र्यसैनिकांसाठीचे निवृत्तीवेतन (पेन्शन) त्यांनी घेतले नाही. त्यामागची त्यांची भूमिका त्यांनी स्पष्ट केली होती. ते म्हणायचे, ज्यांची शासन दरबारी नोंद झाली, त्यांच्यामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले असे नाही. त्यांच्याशिवाय ज्ञात-अज्ञात अशा किती तरी भारतीय जनतेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केला आहे. त्यांना कुठे पेन्शन मिळते ? त्या सर्वांना पेन्शन मिळाल्यानंतर मगच मीही घेईन. आपल्या या भूमिकेशी ते प्रामाणिक राहिले व त्यांनी पेन्शन न घेण्याचा निर्णय कायम राखला. त्यांनी केवळ पेन्शनच घेतली नाही असे नव्हे, तर स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना मिळणाऱ्या अल्प उत्पन्न गटातील शैक्षणिक फी सवलतीचा व शिष्यवृत्तीचा लाभही आपल्या मुलांना घेऊ दिला नाही. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या सर्वांच्या मुलांना जर शिष्यवृत्ती वा शैक्षणिक सवलती मिळत नसतील, तर आपल्या मुलांनाही त्या घ्यायचा नैतिक हक्क नाही, असे त्यांचे म्हणणे. वास्तविक प्रारंभीच्या काळात घरची आर्थिक स्थिती कठीण असतानाही त्यांनी कुठेही आपल्या तत्त्वाशी तडजोड केली नाही. सार्वजनिक कामात त्यांचा जसा पारदर्शीपणा असायचा, तसाच व्यक्तिगत जीवनातही त्यांनी तो राखला. बोलणे एक आणि वर्तन वेगळे असा दुटप्पीपणा त्यांच्या बाबतीत नसायचा. विधिमंडळ व संसदेच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरताना उमेदवारांना आपली संपत्ती जाहीर करावी लागते. तथापि बऱ्याच उमेदवारांची प्रत्यक्षातील व जाहीर केलेली संपत्ती यात प्रचंड तफावत असते. खरे उत्पन्न दडवण्याचा निवडणुकीच्या वेळी जाणीवपूर्वक प्रयत्न करणारे असंख्य

उमेदवार लोकांना माहीत असतात. या पार्श्वभूमीवर नागनाथअण्णांनी जाहीर केलेली संपत्ती मात्र अनेकांना चक्रावून टाकणारी असे. त्यांच्या नावावर ना घर ना जमीन होती. एवढेच काय, त्यांचे कुठल्या बँकेत खातेही नव्हते. त्यांची मालमत्ता म्हणजे त्यांचे अंगावरील व नित्य वापरातले कपडे, एक प्रवासी बॅग आणि दोन-पाच हजाराची रोख रक्कम. एवढा साधासुधा व एका अर्थी अगदी 'निर्धन' म्हणावा असा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीस उभा राहत असेल यावर कुणी विश्वास ठेवणार नाही. पण नागनाथअण्णांच्या बाबतीत हे सत्य होते. कसलीही संपत्ती जवळ न बाळगता ते कार्य करीत राहिले. कोट्यवधी रुपयांचा आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्था त्यांनी उभ्या केल्या, पण स्वत: मात्र संपत्तीच्या मोहात ते कधी अडकले नाहीत. सार्वजनिक कार्यासाठी किंवा निवडणुकीसाठी जेव्हा केव्हा निधीची गरज भासेल तेव्हा त्यांनी त्या त्या वेळी लोकांना आवाहन करून आपली भूमिका पटवून देत पैसा उभा केला ; पण ते कार्य पार पडले की, सर्व पैशाचा हिशोब सादर करून, प्रसंगी उरलेली रक्कम संबंधितांना परतही केली. नागनाथअण्णा म्हणजे प्रामाणिकपणा आणि स्वच्छ व पारदर्शी व्यवहार हे समीकरण बनून गेले होते.

केवळ आर्थिक व्यवहारच नव्हे, तर संस्थेच्या परिसरातील फळझाडांच्या उत्पादनाबाबतही त्यांची भूमिका स्पष्ट असे. हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या तसेच सोनवडे येथील हुतात्मा नानकसिंग विद्यालयाच्या परिसरात लावलेल्या झाडांचे आंबेसुद्धा संबंधित सर्वांना कसे मिळतील याचा ते विचार करत. मुख्य म्हणजे हे आंबे न विकता ते विद्यार्थी, शिक्षक, कामगार यांना खायला मिळावेत असा त्यांचा दृष्टिकोन असे. त्याप्रमाणे त्यांचे वाटप होत असे. त्यातून जे आंबे उरत ते साखर कारखान्याच्या ऊस उत्पादक सदस्यांच्या घरी किमान एक तरी पोहोचेल अशी व्यवस्था केली जाई. गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ ही कार्यपद्धत व परंपरा सुरू राहिली आहे. हुतात्मा संकुल परिवाराला नागनाथअण्णांसारखा कुटुंबप्रमुख लाभल्यामुळेच तेथे समाधानाचे, आनंदाचे वातावरण निर्माण होऊ शकले आणि ते पुढेही टिकून राहिले.

■■■■

# १७

# कृतार्थ जीवनाची अखेर

नागनाथअण्णांची प्रकृती उत्तम होती. लहानपणापासून तालमीत जात असल्यामुळे त्यांचे शरीर दणकट बनले होते. स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत असतानाच्या काळात मात्र त्यांना प्रकृतीकडे फारसे लक्ष देता आले नव्हते. मिळेल तेथे व मिळेल ते खावे लागे. दैनंदिन जीवनातही शिस्त राहिली नव्हती. रात्री निवांत झोप त्यांनी कधीच घेतली नाही. पोलिसांपासून सुरक्षित राहण्यासाठी दिवसा झोप व रात्रीचा संचार चालू असे. कधी कुठे रात्री झोपायचा प्रसंग आलाच, तर रात्रीतून तीन-चारदा जागा बदलून ते झोपत असत. थोडक्यात, ते सलग आणि एकाच जागी कधीच झोप घेत नसत. असे असूनही त्यांची तब्येत चांगली राहिली होती. ते सहसा आजारी पडत नसत. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र त्यांच्या दैनंदिन जीवनात बरीच शिस्त आली होती. आहार मर्यादित आणि वेळच्या वेळी घेत असत. शक्यतो घरचे शुद्ध शाकाहारी व साधे जेवण घेत. दिवसभर कार्यमग्न असत. अधूनमधून दौरेही सुरू असत. १५ जुलै, २००१ ला त्यांचा ८० वा वाढदिवस भव्य स्वरुपात साजरा झाल्यानंतर पुन्हा ते जोमाने कार्यरत झाले होते. सभा, परिषदा, लढे, संमेलने हे सारे पूर्वीप्रमाणे सुरू झाले होते. २२ जून २०११ ला साखर शाळेतील आपल्या खोलीत वावरताना त्यांच्या हातातील काठी घसरल्यामुळे ते अचानक खाली कोसळले. त्यात त्यांच्या कमरेखालील हाड मोडले. त्यामुळे त्यांना मिरज येथील मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर शस्त्रक्रियेसाठी पुण्यात डॉ. संचेती यांच्या इस्पितळात नेण्यात आले. तेथे बॉंबे हॉस्पिटलचे डॉ. पाचारे व डॉ. संचेती यांनी शस्त्रक्रिया केली. ती यशस्वी पार पडली. दवाखान्यात असतानाच १५ जुलै, २०११ ला त्यांचा ८९ वा वाढदिवस साधेपणाने साजरा करण्यात आला. महिन्याभरानंतर बरे होऊन ते वाळव्यात परतले. तथापि, दहा-बारा दिवसांनंतर त्यांना अस्वस्थ वाटू लागल्यामुळे ११ सप्टेंबर, २०११ ला पुन्हा मिरज येथील मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे पुण्याहून आलेल्या डॉ. प्रयाग यांनी उपचार केले. त्यांच्याच सल्ल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मुंबईत लीलावती हॉस्पिटलमध्ये नेण्याचे ठरले. तत्कालीन गृहमंत्री आर. आर.

पाटील यांनी मिरजेहून खास विमानाने त्यांना मुंबईस नेण्याची व्यवस्था केली. डॉ. वाज व अन्य तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तेथे उपचार सुरू राहिले. प्रकृती हळूहळू सुधारत होती. तथापि २२ मार्च, २०१२ ला रक्तदाब अचानक अत्यंत कमी झाला आणि सायंकाळी साडेचार वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यानंतर त्यांचे पार्थिव वाळवा येथे आणण्यात आले. २३ मार्चला सायंकाळी 'हुतात्मा संकुल' परिसरात शासकीय इतमामाने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी वाळवा परिसरातील हजारो नागरिकांनी 'हुतात्मा संकुलात' त्यांचे अंत्यदर्शन घेतले. अंत्यसंस्कार प्रसंगी राज्यभरातून प्रचंड संख्येने लोक उपस्थित राहिले होते. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व मंत्रिमंडळातील त्यांचे अनेक सहकारी, स्वातंत्र्यसैनिक, विविध राजकीय पक्ष व संघटनांचे नेते तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रातील पदाधिकारी, विचारवंत आदींनी यावेळी नागनाथअण्णांना आदरांजली वाहिली. एक थोर स्वातंत्र्यसेनानी, प्रतिसरकारमधील लढवय्या नेता व कामगार, श्रमिक, शेतकरी, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त तसेच दलित, शोषित व भटक्या विमुक्तांचा कैवारी काळाच्या पडद्याआड गेल्याचे दुःख अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहताना व्यक्त केले.

वयाच्या ९०व्या वर्षी नागनाथअण्णांचे निधन झाले. तसे त्यांना दीर्घायुष्य लाभले आणि विशेष म्हणजे चार-दोन महिन्यांचा काळ वगळता त्यांची प्रकृती ठणठणीत राहिली. अखेरपर्यंत ते कार्यरत राहिले. तसा त्यांचा मृत्यू वयपरत्वे नैसर्गिकच, पण तरीदेखील अनेकांना त्यांच्या निधनाने प्रचंड धक्का बसला. चांगले काम करणारी माणसे हवीहवीशी वाटत असतात आणि समाजाला त्यांची गरज नेहमीच असते. नागनाथअण्णा हेही सर्वांना हवेसे वाटणारेच व्यक्तिमत्त्व होते. लोकांनी त्यांच्यावर प्रचंड प्रेम केले. त्यांचे जीवन अपवादातील अपवादात्मक म्हणता येईल असे होते. आयुष्यभर त्यांनी फार मोठा संघर्ष केला. प्रचंड काम उभे केले. त्यांचे व्यक्तिमत्त्व, धाडसी कृत्ये, निःस्पृहता, स्वच्छ चारित्र्य, त्यागी वृत्ती, उपेक्षित समाजाविषयी त्यांना असणारी कणव, त्यांची ध्येयनिष्ठा, तत्त्वनिष्ठा, मूल्यनिष्ठा, पारदर्शी कारभार, देशप्रेम अशा कितीतरी गोष्टींविषयी खूपच लिहिता येईल. कशाकशाबद्दल किती म्हणून आणि काय काय लिहावे? त्यांचे विविध गुण व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विचारात घेता त्यांच्यासारखे आदर्श व्यक्तिमत्त्व केवळ कल्पनेतच असू शकते, असे अनेकांना वाटेल; पण अशी विविध गुणसंपन्न आणि प्रत्यक्षाहूनही भव्य प्रतिमा असलेली व्यक्ती नागनाथअण्णांच्या रुपाने समाजात वावरत होती, ही वस्तुस्थिती

आहे. कदाचित काही वर्षे लोटल्यानंतर 'नागनाथअण्णा नायकवडी' नावाचे एक 'कल्पित वा अद्‌भूत' व्यक्तिमत्त्व होते असेच अनेकांना वाटेल.

नागनाथअण्णांनी व्यक्तिगत जीवनात जशी काही पथ्ये पाळली व तत्त्वाशी तडजोड न करता नैतिकता कायम राखली, तशीच आपण उभ्या केलेल्या विविध संस्थांचेही पावित्र्य राखण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या कुठल्याही संस्थेत गैरकारभार वा आर्थिक गैरव्यवहार कधीच झाला नाही. त्यांच्या सर्वच संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने व खुलेपणाने चालत असे. कुठेही पडद्याआड व नजरेआड काही घडत नसे. साहजिकच संस्थांची स्थिती कशी आहे, कोठे काय चालले आहे, याची सर्वांगीण माहिती तेथे काम करणाऱ्यांना तसेच संस्थेशी संबंधित सर्वांना असे. संस्थात्मक कारभारात एवढी पारदर्शकता ठेवणारा त्यांच्यासारखा नेता अपवादात्मकच असेल. विशेष म्हणजे एकदा संस्थेची उभारणी झाली, की तिची जबाबदारी अन्य सहकाऱ्यांवर सोपवून ते बाजूला होत असत. 'हुतात्मा' सहकारी साखर कारखाना हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. कारखान्याच्या उभारणीपर्यंत तेथे अहोरात्र कार्यरत असणाऱ्या नागनाथअण्णांनी साखर उत्पादन सुरू झालेल्या दिवसापासून पुन्हा कारखान्यात कधीही पाऊल टाकले नाही. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी भ्रष्टाचार, गैरव्यवस्थापन व नेत्यांच्या खाबुगिरीमुळे बदनाम झाली असताना हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचा लौकिक देशभर पसरला. या कारखान्यात तयार होणारी साखर देशातील सर्वोत्तम म्हणून गणली गेली, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देणारा साखर कारखाना म्हणूनही हुतात्मा कारखान्याची नोंद झाली. 'हुतात्मा पॅटर्न' म्हणून देशपातळीवर त्याचा गौरव झाला. सहकारी साखर कारखाना असून देखील अत्यंत आदर्श पद्धतीने त्यांनी तो चालवून दाखवला. अनेक सहकारी साखर कारखाने विविध कारणांमुळे बंद पडले वा खासगी कंपन्यांना चालविण्यास दिले गेले. या पार्श्वभूमीवर हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे यश कौतुकास्पद ठरले. सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या साखर कारखान्याने सामाजिक कार्याचेही नवे पायंडे पाडले. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आपला वाटावा असा हा साखर कारखाना नागनाथअण्णांच्या पश्चातही अतिशय उत्तम पद्धतीने चालू राहिला, यामागे त्यांच्या कार्यपद्धतीची व स्वच्छ कारभाराची रुळलेली चाकोरी हेच महत्त्वाचे कारण आहे. हुतात्मा सहकारी साखर कारखाना हा केवळ परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी व कामगारांनाच नव्हे, तर महाराष्ट्रातील विविध पुरोगामी चळचवळीतील कार्यकर्त्यांनाही आपला वाटतो. तो जसा विकासाचे केंद्र बनला आहे तसाच पुरोगामी

चळवळीतील नेते व कार्यकर्त्यांचा आधारस्तंभही ! नागनाथअण्णांनी रचनात्मक कार्याबरोबरच जनजागृतीचा, समता प्रस्थापनेचा, समाजात पुरोगामी विचार रुजविण्याचा, लोकांना डोळस बनवण्याचा व न्याय्य हक्कासाठी लढ्याची प्रेरणा देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शिक्षणाबरोबरच लोकशिक्षणही झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांची दृष्टी विशाल होती आणि सामाजिक बदलाचा विचार तळागाळातील जनतेच्या सर्वांगीण विकासाशी निगडित होता. त्यामुळेच दुर्गम भागात शाळा सुरू करण्याचा त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात प्रयत्न केला आणि स्वातंत्र्योत्तर काळातही आदिवासी, दलित, भटके, विमुक्त व समाजातील दुर्बल घटकांच्या मुलांसाठी वसतिगृह व निवासी शाळांची उभारणी केली. विविध संस्थांच्या परिसरात त्यांनी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली. गरीब मुलांना, कामगारांना फळे खायला मिळावीत या उद्देशाने आंबा, चिक्कू, नारळ, सीताफळ आदी फळझाडे लावली. पर्यावरण रक्षणाबाबत अलीकडे खूपच चर्चा होत असते. नागनाथअण्णांनी दूरदृष्टीने विविध संस्थांच्या परिसरात हजारो झाडे लावण्याची दक्षता घेतली. गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ त्यांच्या संस्थेतील विद्यार्थी, कामगार व कर्मचारी विविध फळांचा आस्वाद घेत आहेत. आपल्या संस्था स्वावलंबी व आदर्श बनविण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न राहिला. शेतकऱ्यांचे भागभांडवल व शासकीय कर्ज घेऊन उभारलेला हुतात्मा सहकारी साखर कारखानाही त्यांनी अल्पावधीतच कर्जमुक्त करून दाखवला. विविध संस्था जरी आपण उभ्या केलेल्या असल्या तरी अनेकांच्या सहभागातून त्या उभ्या राहिलेल्या असून आपण केवळ विश्वस्त म्हणून काम करीत आहोत, ही भावना मनात ठेवूनच ते सतत कार्यरत राहिले. त्यांच्यासारखा निःस्पृह, निःस्वार्थी व समाजाविषयी आत्यंतिक कळकळ असणारा नेता खरोखरच अपवादात्मक म्हणावा लागेल.

## खऱ्या स्वातंत्र्याची प्रतीक्षा

वाळव्यासारख्या एका ग्रामीण खेड्यात जन्मलेले नागनाथअण्णा जाज्वल्य देशप्रेमाने प्रेरित होऊन स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले. स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिशांकडून जनसामान्यांचे मोर्चे, आंदोलने बंदुकीच्या धाकाने उधळून लावण्यात येत. त्यामुळे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याप्रमाणे सशस्त्र क्रांती हाच स्वातंत्र्य मिळवण्याचा मार्ग आहे, असे त्यांना वाटत असे; पण स्वातंत्र्यानंतर त्यांनी या मार्गाचा त्याग केला आणि विधायक कार्य हाती घेऊन वाटचाल सुरू केली. तथापि, बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे लवकरच ते निराश झाले. ते म्हणत, 'स्वातंत्र्यानंतर देशाचे विभाजन ही अत्यंत वेदनादायी घटना ठरली. फाळणीमुळे

आपली फसगत झाली. मुस्लिम समाजाला देशाचा वेगळा तुकडा दिला हे वाईट झाले. सामाजिक ऐक्याला बाधा पोचली. देशातील नागरिकांची मनं दुभंगली. राजकीय बाबतीतही समाधानकारक काही घडलं नाही. आपले प्रश्न सत्ताधाऱ्यांकडून सुटतील याची लोकांना खात्री वाटत नाही. भांडवलदारांचे पोषण आणि सामान्य, कष्टकरी माणसांचे शोषण करणारी व्यवस्था तयार झाली आहे. ती फार काळ टिकेल असं वाटत नाही. लोक समाधानी नाहीत. ते संघटित होत आहेत. केव्हा कुठं ठिगणी पडेल व वणवा पेटेल हे सांगता येणार नाही; पण उठाव होईल, जनशक्तीचे प्रचंड वादळ उठेल, खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी दुसरी क्रांती होईल.'

नागनाथअण्णांच्या शब्दांना धार होती. ते प्रभावी वक्ते नसले, तरी शांतपणे लोकांना आपले विचार समजावून सांगण्याची त्यांची वेगळी हातोटी होती. त्यामुळे भाषणबाजीपेक्षा आपला मुद्दा लोकांना पटवून देण्यावर त्यांचा भर असे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणत्याही कार्यक्रमाला ते नियोजित वेळेनुसार उपस्थित राहत असत. ठरविलेल्या वेळेबरहुकूम कार्यक्रम सुरू होण्याबाबत ते दक्ष असत. कोणालाही दिलेली वेळ कटाक्षाने पाळण्याचा त्यांचा स्वभाव होता. आपल्यामुळे कुणालाही वाट पहायला लागू नये आणि अकारण वेळ वाया जाऊ नये असे त्यांचे म्हणणे असे. सार्वजनिक कार्यक्रमास दिलेल्या वेळी उपस्थित न राहण्याची किंवा जाणीवपूर्वक उशिरा येण्याची परंपरा रूढ करणाऱ्या आजकालच्या मंत्री व नेत्यांचा विचार करता या बाबतीत नागनाथअण्णांचे वेगळेपण प्रकर्षाने नजरेत भरत असे. कुठलाही कार्यक्रम असो वा सभा-संमेलन, ते वेळेवर येत व आपलेपणाने सहभागी होत आणि अत्यंत तळमळीने बोलत. विचारपूर्वक व नेमकेपणाने बोलत. लोकांच्या हृदयाला हात घालत. साहजिकच त्यांच्या साध्या, सोप्या भाषेतील भाषणाला उत्तम प्रतिसाद मिळे. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर आलेल्या राज्यकर्त्यांविषयी मात्र ते अत्यंत नाराजीने बोलत. वाढती विषमता, जातीयता, धर्मांधता, भ्रष्टाचार आणि तत्त्वच्युतीच्या राजकारणाने गाठलेली परिसीमा हे सारे उद्वेगजनक आहे, असे ते म्हणत. तथापि, अशाही परिस्थितीत आपल्या देशाला उज्ज्वल भवितव्य आहे, असे त्यांना वाटे. या अंधकारमय वातावरणात कुठून तरी प्रकाशकिरणे अवतरतील आणि दशदिशा उजळून निघतील, अशी आशा ते व्यक्त करीत. 'आम्ही यापूर्वी मिळवले ते स्वातंत्र्य खरे नसून, दुसऱ्या खऱ्या स्वातंत्र्याची पहाट उगवेल यावर माझा विश्वास आहे' असे ते म्हणत. नागनाथअण्णा ज्या आत्मविश्वासाने बोलत त्याचे लोकांना आश्चर्य वाटत असे. ' नव्या क्रांतीचे अग्रदूत' अशा शब्दात त्यांचा गौरवाने उल्लेख केला जात असे. ते म्हणत, लोक जागृत व संघटित होऊन भ्रष्ट व स्वार्थी

राजकारण्यांना, अध:पतीत सत्ताधाऱ्यांना एक ना एक दिवस खुर्चीवरून खाली खेचतील आणि चौकाचौकात जाहीर जाब विचारतील. सभोवतीची परिस्थिती पाहून समाजात मोठा क्रांतिकारी बदल घडेल असे लोकांना वाटत नसले, तरी नागनाथअण्णांच्या बोलण्यात मात्र 'दुसऱ्या क्रांती'ची भाषा अगदी सहजपणे येत असे. स्वातंत्र्य लढ्यात नागनाथअण्णा अत्यंत आक्रमक व लढाऊ होते. स्वातंत्र्योत्तर काळात ते खूपच बदलले, पण त्यांचा लढाऊ बाणा मात्र कायम राहिला. म्हणूनच विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी अनेक लढे उभारले आणि ते सतत संघर्ष करीत राहिले. राजकीय, सामाजिक व अन्य क्षेत्राबाबत त्यांचे विचार वेगळे होते आणि त्या त्या विषयाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही निराळा असे. कोणताही प्रश्न असो, तो पूर्ण समजून घेण्याचा, त्याच्या मुळाशी जाण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यामुळे जीवनाच्या वाटचालीत त्यांनी जे जे केले ते समजून उमजून, डोळसपणे, विचारपूर्वक आणि मुख्य म्हणजे झोकून देऊन. साहजिकच, आपण घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबाबत त्यांना कधी पश्चात्ताप करावा लागला नाही. महात्मा गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर मोठाच पगडा होता. त्यामुळे विद्यार्थी असल्यापासून ते खादी वापरत असत. 'हरिजन'च्या नियमित वाचनामुळे त्यांची वैचारिक भूमिका पक्की तयार झाली होती. गांधी विचारांच्या प्रभावामुळेच त्यांनी मांसाहार सोडला आणि खादीचे महत्त्व पटल्यामुळे स्वत: तर खादी वापरायला सुरुवात केलीच, पण खादीच्या प्रचारासाठी इस्लामपुरात खादी भांडारही सुरू केले. राष्ट्र सेवा दलामुळे त्यांच्या अंगी संघटन कौशल्य आले आणि सामाजिक समतेचा विचार रुजला. गांधीजींच्या तत्त्वविचारांचा त्यांच्यावर प्रभाव होताच, पण तरीही स्वातंत्र्य लढ्याच्या काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचेही त्यांना आकर्षण वाटले. त्यामुळेच त्यांनी सशस्त्र लढ्याचा मार्ग अवलंबला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या कार्याची दिशा बदलली. सामाजिक प्रगतीसाठी शैक्षणिक कार्यावर भर दिला, पण राजकीय क्षेत्रातही लोकशाही मार्गाने परिवर्तनासाठी ते प्रयत्नशील राहिले. प्रकल्पग्रस्त व धरणग्रस्त तसेच दुर्बल घटकांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी जसा संघर्ष सुरू ठेवला, तसाच दुष्काळग्रस्त व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी लढे उभारले. सहकार क्षेत्रातही ते जाणीवपूर्वक उतरले. विविध क्षेत्रांत त्यांनी स्वत:ची म्हणून एक वेगळी कार्यशैली प्रस्थापित केली. त्यामुळेच महाराष्ट्रात त्यांचे नेतृत्व वैशिष्ट्यपूर्ण व विशेष उल्लेखनीय ठरले.

## दुर्दम्य आशावादी

नागनाथअण्णा म्हणत, 'सामान्य माणसे आपल्या प्रश्नासाठी जागरूक असतात. लढ्यासाठी त्यांची तयारी असते. मात्र त्यासाठी त्यांना एका सूत्रात बांधावे लागते. त्याशिवाय

त्यांची ताकद वाढत नसते. कुठल्याही विशिष्ट विचारधारेशी संलग्न न राहता मी त्यांच्या प्रश्नांचा आधी विचार करत आलो. सर्वात महत्त्वाचा प्रश्न भाकरीचा असतो. विचार नंतर येतो. लोक कुठल्याही विशिष्ट विचारधारेचा विचार करण्याच्या मनःस्थितीत नसतात. आधी त्यांचे प्रश्न हाती घ्यावे लागतात आणि मग विचार द्यावा लागतो.' या पद्धतीनेच विचार करून आपण लोकांना संघटित केले व त्यांचे लढे उभारले, असे ते अनुभवाने सांगत. अशा संघटित लढ्यातूनच परिवर्तन होऊन सामान्य माणसाच्या हाती सत्ता येईल, असा आशावाद ते व्यक्त करीत. लोकशाही ही आयुर्वेदिक उपचारासारखी आहे. गुण यायला वेळ लागेल, पण एकदा का योग्य उपचार सुरू झाले आणि औषध लागू पडले की, रोग बरा व्हायला वेळ लागणार नाही. लोकांना संघटित करणे हे आयुर्वेदिक उपचार करण्यासारखेच आहे; पण लोक निश्चितपणे संघटित होऊन लढे देतील, असा त्यांना विश्वास वाटे. 'परिवर्तन वळिवाच्या पावसासारखे आहे. वळीव कधी, कसा येईल हे जसे सांगता येत नाही, तसेच लोकांचे संघटन कधी व कसे होईल आणि परिवर्तन घडेल, हेही सांगता येणार नाही. त्यासाठी वाट पहावी लागेल,' असे ते म्हणत.

नागनाथअण्णा दुर्दम्य आशावादी होते. कदाचित हा आशावादच त्यांच्या लढ्याची प्रेरणा असावा. त्यामुळेच विशिष्ट ध्येयवादाने झपाटून ते निष्ठेने कार्यरत राहिले. व्यक्तिगत जीवनातील सचोटी आणि निरलसता ही आजच्या काळातील राजकीय नेत्यांत क्वचितच आढळणारी गुणवैशिष्ट्ये त्यांच्या ठायी होती. मनाचा नितळपणा, निःस्वार्थी वृत्ती व निःस्पृहता हे दुर्मिळ गुणही त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची शान होती. अन्याय व अत्याचाराविषयी चीड हा त्यांच्या अंतःकरणाचा उद्‌गार होता. राजकारण आणि समाजकारण ही त्यांची सहज प्रेरणा होती. नागनाथअण्णा एखादी भूमिका घेत तेव्हा ती राजकीय सोयीसाठी वा लोकप्रियतेसाठी घेतात, असे कधीच कुणाला वाटत नसे. भ्रष्ट व तत्त्वच्युतीचे राजकारण व समाजकारण करणाऱ्या आजच्या संधिसाधू नेते व संस्थाचालकांच्या जमान्यात नागनाथअण्णांसारखा अत्यंत निःस्पृह व पारदर्शी जीवन जगणारा नेता अगदी कालपरवापर्यंत आपल्या समाजात वावरत होता ही गोष्ट अनेकांना काल्पनिक वा अद्‌भुतरम्य वाटेल. अशाप्रकारे जीवनभर एखादी व्यक्ती तत्त्वनिष्ठेने जगू शकते यावरही अनेकांचा विश्वास बसणार नाही, पण नागनाथअण्णांच्या रुपाने प्रत्यक्षाहुनी विशाल असे त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व असंख्य लोकांनी याची डोळा पाहिले आहे.

नागनाथअण्णांच्या त्यागी वृत्तीने भारावून जाऊन त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची संख्या मोठी होती. त्यांच्या हाकेसरशी ओ देणारे शेतकरी, कामगार व श्रमिक तसेच धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त हे तर हजारोंच्या संख्येने होतेच, पण त्यांना आदर्श मानून त्यांच्या मार्गदर्शनानुसार वाटचाल करणारे अनेक लोक होते. नागनाथअण्णांना याचा आनंद होता आणि समाधानही वाटे; पण तरीही एक प्रकारची अस्वस्थता त्यांच्या मनात सतत घर करून होती. आपण या उपेक्षित वर्गासाठी जे केले ते पुरेसे नाही असे त्यांना वाटत असे. स्वातंत्र्यापूर्वी जी स्वप्ने आपण पाहिली, ती पूर्ण करण्यात आपण कमी पडलो, ही त्यांची खंत होती. मिळालेले स्वातंत्र्य अंतर्मनाला समाधान देणारे नाही, असे ते म्हणत असत. हे शल्य अखेरपर्यंत त्यांना बोचत राहिले. त्यांच्या प्रामाणिक भूमिकेबाबत त्यांचे विरोधकही शंका घेत नसत. त्यांच्याविषयी एस. एम. जोशी, कॉम्रेड दत्ता देशमुख, वसंतदादा पाटील यांच्यापासून ते आर. आर. पाटील यांच्यापर्यंत अनेक नेत्यांना नेहमीच जवळीक वाटत असे. तळागाळातील श्रमिक, दलित, आदिवासी, शेतकरी, कामगार, धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त, आदी घटकांविषयी त्यांना जशी आत्मियता वाटे तशीच त्यांनाही नागनाथअण्णांविषयी आत्यंतिक आपलेपणा वाटे. जणू या घटकांशी त्यांची नाळच जोडली गेली होती. आपल्या व्यक्तिगत जीवनाप्रमाणेच सार्वजनिक जीवनातही ते नैतिकतेचा व मूल्यांचा आग्रह धरणारे नेते होते. समाजजीवनात आज सर्वत्र मूल्यांची पिछेहाट होत असताना आणि भ्रष्ट आचरण हा जीवनाच्या सर्व क्षेत्रांचा स्थायीभाव झाला असताना नागनाथअण्णांसारख्या स्फटिकासारखे स्वच्छ जीवन असलेल्या नेत्याची उणीव फार मोठ्या प्रमाणात व तीव्रतेने सततच वाटत राहणे साहजिक आहे. व्यक्तिमत्त्वाची उंची मोजण्याचे विविध निकष थिटे पडावेत, असे त्यांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे सारे जीवनच प्रत्यक्षाहून कितीतरी विशाल व सुंदर होते. त्यांच्यासारखा नेता पुन्हा होणे नाही. नागनाथअण्णा एकमेवाद्वितीयच !

■■■■

# संदर्भ ग्रंथ


१) पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य
- जी. डी. (बापू) लाड
**प्रकाशक :** क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड समाज प्रबोधिनी संस्था, कुंडल.

२) क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी
- भालचंद्र विष्णू धर्माधिकारी
**प्रकाशक :** क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती, वाळवे, जि. सांगली.

३) क्रांतिवीर नागनाथअण्णा भाग १ व २
- ज. य. अहिर
**प्रकाशक :** क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी गौरव समिती, वाळवे, जि. सांगली.

४) क्रांतिसिंह नाना पाटील - जीवन व कार्य
- प्रा. डॉ. सुमित संभाजी यादव, प्रकाशक अध्यक्ष, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा.

५) क्रांतिमाता लक्ष्मीबाई नायकवडी
- जयवंत अहिर
**प्रकाशक :** नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर.

६) क्रांतिसूर्य - क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी स्मृती ग्रंथ
**प्रकाशक :** हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना, लि. वाळवे, जि. सांगली.

७) जीवन संग्राम - सा. बा. सनदे

८) दैनिक लोकमत, सकाळ, पुढारी व महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रांचे अंक, विविध वृत्तपत्रे, नियतकालिके व स्मरणिकांतून प्रसिद्ध झालेले नागनाथअण्णांच्या विषयीचे लेख व मुलाखती.

९) दैनिक सकाळ १९८२ च्या दिवाळी अंकातील दशरथ पारेकर यांचा लेख.

१०) दैनिक लोकमत (१४ व १५ जुलै, २००१) मधील पत्रकार दशरथ पारेकर व विजय जाधव यांनी घेतलेली नागनाथअण्णा नायकवडी यांची प्रदीर्घ मुलाखत

११) क्रांतिसिंह नाना पाटील - डॉ. जयसिंगराव पवार
**प्रकाशक :** अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.

१२) माझी वाटचाल - ग. प्र. प्रधान
**प्रकाशक :** साधना प्रकाशन, पुणे.

१३) महाराष्ट्राचे शिल्पकार : कॉ. श्रीपाद अमृत डांगे-डॉ. अशोक चौसाळकर
**प्रकाशक :** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

# नागनाथअण्णा यांचा जीवनपट

| | | |
|---|---|---|
| **१५ जुलै, १९२२** | : | वाळवा येथे जन्म |
| | | शालेय शिक्षण वाळवा व आष्टा (तालुका वाळवा) येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापुरला. |
| **१९३०** | : | क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभांना उपस्थिती. |
| **मे १९३९** | : | कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट, शिराळा तालुक्यात व्हॉलंटरी शाळा सुरू. |
| **१९४०** | : | कामेरी येथे पहिली विद्यार्थी परिषद. |
| **७ ऑगस्ट, १९४२** | : | मुंबई येथील काँग्रेस अधिवेशनास विद्यार्थी कार्यकर्ता म्हणून उपस्थिती. |
| **३ सप्टेंबर, १९४२** | : | तासगाव तहसील कचेरीवर मोर्चा. |
| **९ सप्टेंबर, १९४२** | : | वडूज तहसील कचेरीवर मोर्चा. |
| **१० सप्टेंबर, १९४२** | : | इस्लामपूरचा गोळीबार. |
| **७ जून, १९४३** | : | शेणोली येथे पगारी रेल्वेगाडीतील सरकारी पैशांची लूट. |
| **३ ऑगस्ट, १९४३** | : | क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली पणुंब्रे येथे प्रतिसरकारची स्थापना. |
| **१ ऑक्टोबर, १९४३** | : | कसबा सांगाव (जिल्हा कोल्हापूर) येथील पोलीस चौकीतून बंदुका पळवण्याची धाडसी यशस्वी मोहीम. |
| **१४ एप्रिल, १९४४** | : | धुळे खजिना लुटीत सहभाग. |
| **२९ जुलै, १९४४** | : | वाळवा येथे अटक व नंतर सातारा तुरुंगात रवानगी. |
| **१० सप्टेंबर, १९४४** | : | सातारा तुरुंगाच्या तटावरुन उडी मारुन पलायन. |

| | | |
|---|---|---|
| **२५ फेब्रुवारी, १९४६** | : | सोनवडे येथे ब्रिटिश पोलिसांशी झालेल्या चकमकीत किसन अहिर व नानकसिंग यांना वीरमरण. |
| **२७ नोव्हेंबर, १९४८** | : | लोकवर्गणीतून जमविण्यात आलेला एक लाख रुपये निधी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेसाठी म्हणून सातारा येथे त्यांच्याकडे समारंभपूर्वक सुपूर्द. |
| **१९४८** | : | किर्लोस्करवाडी येथे किर्लोस्कर कामगारांच्या सभेत अटक. नागरिकांच्या मोर्चामुळे सुटका. |
| **१९४८ :** | | वाळवा येथे किसान शिक्षण संस्थेची स्थापना. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीवर निवड. |
| **१३ फेब्रुवारी, १९५२** | : | कुसुमताई यांच्याशी सत्यशोधकी पद्धतीने विवाह. |
| **१९५२** | : | डाव्या पक्षांतर्फे वाळवा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी. निवडणुकीत पराभव. |
| **१९५६** | : | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग. |
| **१९५७** | : | संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे वाळवा मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत विजयी. |
| **१९७२** | : | किसान लिफ्ट इरिगेशन योजनेच्या कामास प्रारंभ. |
| **२६ मार्च, १९८१** | : | हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्यास मंजुरी. |
| **२९ जानेवारी, १९८४** | : | हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा गळित हंगाम सुरू. |
| **१९८५** | : | वाळवा मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीत विजयी |
| **१९८५** | : | ऐतवडे बुद्रुक येथे शेतकरी शेतमजुरांची परिषद. |
| **१९८६** | : | वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना. |
| **१९८८** | : | कोयना धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना. |
| **१९८९** | : | वाळवा येथे तिसरे अखिल भारतीय दलित, अदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन. |
| **१९८९** | : | सोव्हिएत युनियनचा पत्नी कुसुमताईसमवेत दौरा. |
| **१९९१** | : | कराड मतदारसंघातून लढविलेल्या लोकसभा निवडणुकीत पराभव. |

| | | |
|---|---|---|
| **१९९३** | : | समान पाणी वाटप मागणीसाठी दुष्काळी भागात पाणी परिषद. |
| **१९९६** | : | महाराष्ट्र राज्य धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संघटनेच्या अध्यक्षपदी निवड. कराड लोकसभा मतदारसंघातून लढविलेल्या निवडणुकीत पराभूत. |
| **१९९९** | : | दुष्काळग्रस्त व धरणग्रस्तांचा मुंबईत मोर्चा. |
| **२६ फेब्रुवारी, २०००** | : | दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक. |
| **२६ मार्च, २०००** | : | साखर कामगार, ऊस उत्पादक शेतकरी व दुष्काळग्रस्तांची वाळवा येथे परिषद. |
| **मे, २००४** | : | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुरच्यावतीने डी. लिट पदवीने सन्मान. |
| **जुलै, २००५** | : | आटपाडी येथे पाणी परिषद. |
| **फेब्रुवारी, २००८** | : | हुतात्मा किसन अहिर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे तत्कालीन उप मुख्यमंत्री आर. आर. पाटील यांचे हस्ते अनावरण. |
| **२००९** | : | 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मानित. |
| **फेब्रुवारी, २००९** | : | हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या प्रांगणात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्याचे तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते अनावरण. |
| **जुलै, २०१०** | : | आटपाडी येथे पाणी परिषद. |
| **२०१०** | : | महाराष्ट्र फौंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार. |
| **२२ मे, २०११** | : | पडवळवाडी (तालुका वाळवा) येथील हुतात्मा बाबूराव कोकाटे विद्यालयाच्या इमारत भूमिपूजन कार्यक्रमास उपस्थिती. |
| **२२ मार्च, २०१२** | : | मुंबई येथे निधन. |
| **२३ मार्च, २०१२** | : | वाळवा येथे हुतात्मा संकुल परिसरात शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार. |

---------------

वाय ४०६-११०० पु. अ'१*-२.२०१८



नागनाथअण्णा - एका निवांत क्षणी




खासगी वाहतूकदार संघटनेच्या आंदोलनात नागनाथअण्णा नायकवडी



एन. डी. पाटील यांच्या समवेत वीज दरवाढ विरोधी आंदोलनात नागनाथअण्णा नायकवडी



हुतात्मा किसान अहिर सहकारी साखर कारखाना, वाळवा



आटपाडी येथील पाणी परिषद् – संघर्ष पाण्यासाठी....



**डॉ. नंदा पारेकर**
एम.ए., पीएच.डी.

- ★ सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- ★ समन्वयक, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- ★ अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ, इतिहास परिषद.
- ★ विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदातून सहभाग व शोधनिबंध वाचन.
- ★ युरोप, मध्य आशियाई देश तसेच जापान, श्रीलंका, मालदीव, भूतान, नेपाळ आदी देशांचा प्रवास व अभ्यास दौरे.
- ★ विविध नियतकालिकांतून शोधनिबंध तसेच चालू घडामोडीविषयक प्रासंगीक लेखन.

मुखपृष्ठ मुद्रण : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.